का-त्रा
६९४७

# आनंदभुवन

[ पं. जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनकार्याचा परिचय ]

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : ...चा.च...
दा. क्र. : ६९४७

गोपीनाथ तळवलकर

IRBK-0106947
IRBK-0106947

कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणें

# आनंदभुवन

[ पं. जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनकार्याचा परिचय ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 30,925
विभाग
क्रमांक
नों. दि.

गोपीनाथ तळवलकर

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
दा. क्र. नों. दि.
वि. क्र.

IRBK 0106947
IRBK-0106947

कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणें

प्रकाशक :
अ. अं. कुलकर्णी
कॉंटिनेंटल प्रकाशन,
११६/१९ सदाशिव, पुणें २.

पुढील आवृत्तींचे हक्क प्रकाशकाकडे
इतर सर्व हक्क लेखकाकडे

**किंमत दीड रुपया**

पहिली आवृत्ति १९४९
दुसरी आवृत्ति १९५३
तिसरी आवृत्ति १९५४
चवथी आवृत्ति १९५५
पांचवी आवृत्ति १९५६
सहावी आवृत्ति १९५८

मुद्रक :
केशव गणेश शारंगपाणी,
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४.

# दोन शब्द

माझ्या जीवनांतील सर्वांत प्रिय विषयावरील हें पुस्तक वाचकांच्या हातांत देतांना मला परमानंद होत आहे. हा आनंद पूर्ण कृतार्थतेचा मात्र नाहीं; कारण, ज्या विषयानें माझें जीवन व्यापलें आहे तो माझ्या साध्या शब्दांत व एवढ्याशा पुस्तकाच्या मर्यादेंत मी कितीसा मांडूं शकणार आणि मग कृतार्थता तरी कुठली ? पण मीं शक्य तेवढा प्रयत्न केला आहे याचा मात्र खास संतोष वाटतो.

माझ्या बहुतेक पुस्तकांप्रमाणें माझें हेंहि पुस्तक विद्वानांकरितां नाहीं. पं. नेहरूंनीं आपल्या अलौकिक जीवनांत जीं माणुसकीचीं मूल्यें प्रगट केलीं, पाश्चात्य व पौर्वात्य संस्कृतींतल्या उत्तमोत्तम गोष्टींचा जो मनोहर संगम साधला, त्याचा परिचय साध्या भाविक जिज्ञासूंना करून देण्याकरितां हें पुस्तक मीं विरचिलें आहे. विशेषतः उद्यांच्या नागरिकांना या पुस्तकाचा मार्गदर्शन म्हणून उपयोग व्हावा अशी माझी कळकळीची इच्छा आहे.

—आणि म्हणूनच आटोपशीरपणा व सुबोधता यांवर माझा मुख्य भर आहे. इंग्रजी उतारे मुद्दाम दिले नाहींत. त्यामुळें निव्वळ मराठी वाचकालाहि हें पुस्तक सुगम होईल. अवतरणें दिलीं आहेत तीं प्रामुख्यानें पंडितजींचींच आहेत. त्यामुळें पुस्तकाची उपयुक्तता व सौंदर्यहि वाढलें आहे असें वाटतें. पुस्तकाचें नांव पंडितजींच्या अलाहाबाद येथील निवासाच्या नांवावरून सुचलें. मूळ नांवांत एका ‘ उ ’ काराचा फरक केला आहे. त्याचें रहस्य शेवटच्या प्रकरणांत कळेल.

‘ पंडित नेहरू ’ या विषयावर मीं आजवर अनेक नियतकालिकांतून पुष्कळ लेखन केलें आहे. त्याचा थोडाफार उपयोग प्रस्तुत पुस्तक लिहितांना झाला. नेहरूंचें हें समग्र चरित्र नाहीं; पण चरित्रांतील महत्त्वाच्या बहुतेक गोष्टी या ना त्या संदर्भात आलेल्या आहेत. माझा दृष्टिकोण चिकित्सक किंवा बुद्धिवादी असा अर्थातच नाहीं. पण सूक्ष्म दृष्टीनें पाहणाराला यांतील भाविकता डोळस आहे हें सहज दिसून येण्यासारखें आहे. पुस्तक ठरलेल्या मुदतींत लिहून व छापून झालें याचें सर्व श्रेय श्री. अनंतराव कुलकर्णी व श्री. यशवंतराव जोशी या माझ्या बंधुतुल्य मित्रद्वयालाच आहे. त्यांचे औपचारिक आभार मानणें म्हणजे ज्या सुहृद्भावानें त्यांनीं माझ्याकडून काम करवून घेतलें त्याचा अपमान करणें होय. म्हणून त्या सुहृद्भावाचा केवळ उल्लेख करूनच थांबतों. माझा पुतण्या चि. गोविंद याला हें पुस्तक पुरें होण्याविषयीं माझ्याइतकीच आस्था होती. मुद्दे सुचविणें व चर्चा करणें, पुस्तकें पुरविणें, कात्रणें धाडणें अशी विविध मदत त्यानें मला केली.

' प्रगतिशील साहित्य ग्रंथागारा ' चे श्री. इंद्रनाथ मदन यांच्या हार्दिक सहकार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानावेसे वाटतात. मात्र त्यांच्या आभाराचा जमाखर्च आजच पुरा करीत नाहीं. कारण पुनः त्यांना मी तसदी देणारच आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हीरकमहोत्सवाच्या दिवशीं हें पुस्तक प्रसिद्ध होत आहे याची धन्यता मला शब्दांनीं वर्णन करतां येत नाहीं !

आनंद कार्यालय, पुणें २.
ता. ७–११–४९
} गोपीनाथ तळवलकर

## चौथ्या आवृत्तीचें संक्षिप्त निवेदन

प्रस्तुत पुस्तक प्रथम पंडितजींच्या हीरकमहोत्सवाचे दिवशीं ( १४-११-४९ ) प्रसिद्ध झालें. त्यानंतर आज सहा वर्षांत त्याच्या तीन आवृत्त्या संपून ही चौथी आवृत्ति प्रसिद्ध होत आहे. पुस्तकाच्या या लोकप्रियतेचें रहस्य विषयाच्या लोकोत्तरपणांतच मुख्यतः सांपडेल. मित्र अनंतराव कुलकर्णी यांच्या आस्थेवाईकपणाकडे व व्यवसायनैपुण्याकडेहि पुस्तकाच्या प्रचाराचें बरेंच श्रेय जातें. असा सुसंयोग क्वचितच येतो म्हणून पुस्तकाच्या यशाकडे मी साभिमान पण सकृतज्ञपणें पाहात आहें.

प्रस्तुत पुस्तकाची तिसरी आवृत्ति संपत आली तेव्हां पंडितजींच्या भेटीचें परम भाग्य ती० दादासाहेब मावळंकरांच्या मध्यस्थीनें लाभलें. चरित्रकार, चरित्रविषय, आणि ज्यास चरित्र अर्पण केलें ते थोर आप्त यांचें एकत्र असें चिरस्मरणीय छायाचित्र निघण्याचा दुर्मिळ व हृदयंगम योगहि सहजच आला. तें छायाचित्र आरंभीं दिलें आहे. गेल्या सहा वर्षांतील पंडितजींच्या चरित्रकार्याचा धांवता आढावा परिशिष्टांत देऊन हें चरित्र आतां अद्ययावत् केलें आहे. याहि आवृत्तीचा स्वीकार विद्यार्थी व रसिक पूर्वीइतक्याच उत्साहानें करतील ही आशा.

१४।११।५५, नेहरू-जयंति —गोपीनाथ तळवलकर

ही सहावी आवृत्ति म्हणजे चौथ्या आवृत्तीचें केवळ पुनर्मुद्रणच आहे.

१।८।५८ लेखक

धन्य काल हा दिवस !



पं० नेहरू · सभापति मावळंकर गोपीनाथ तळवलकर

सभापति मावळंकर यांच्या समवेत श्री. गोपीनाथ तळवलकर ता. २५।११।५४ रोजीं राष्ट्रपतिभवनमध्यें गेले असतां पंडितजींच्या मुलाखतीचा अपूर्व योग आला. जन्मांतरीचें सौहार्द जागें होऊन कीं काय पंडितजी तळवलकरांना म्हणाले, ' आपण पूर्वी भेटलों आहोंत असें वाटतें. '

माझे आप्त आणि हितचिंतक

**ती० ना. गणेश वासुदेव ऊर्फ दादासाहेब मावळंकर,**

भारतीय लोकसभेचे सभापति,

यांना

## सादर समर्पण

अनुक्रम
नों. दि.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | महाद्वारांत | ९ |
| २ | संस्कार | १९ |
| ३ | कर्तृत्व [ १ ] | २७ |
| ४ | कर्तृत्व [ २ ] | ४१ |
| ५ | त्रिखंड कीर्ति | ५४ |
| ६ | त्रिमूर्ति | ६७ |
| ७ | साहित्य | ८० |
| ८ | तत्त्वमंदिर | ९८ |
| ९ | खाजगी दालनांत | ११२ |
| १० | अंतरंग | १२३ |
| ११ | टीका-परामर्श | १३६ |
| १२ | समारोप | १४६ |
| १३ | परिशिष्ट | १६१ |



ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम 3022
विभाग
क्रमांक
नों. दि.

: १ :

# महाद्वारांत

त्या गोष्टीला आज वीस वर्षें झालीं. एवढ्या काळांत आपल्या देशांत आणि बाहेरील जगांत केवढाले प्रळय होऊन गेले आहेत ! मोठाले राजवंश उन्मळून पडले; प्रतापी हुकूमशहा जमीनदोस्त झाले; मृत्यूचें तांडव जगभर चाललें; ठिकठिकाणची समाजरचना तळापासून बदलली; दारिद्र्य आणि संघर्ष यांनीं सर्वत्र पेट घेतला; ‘ पृथ्वी बुडाली रे बुडाली ’ अशी भयंकर आरोळी देवादिकांनीं मारण्याची वेळ आली ! उद्यानें आणि हिरवळी अदृश्य होऊन सर्वत्र ज्वालामुखींनीं पेट घेतला !

—परंतु वीस वर्षांपूर्वीची ती रमणीय सायंकाळ माझ्या मनांत अद्यापि ताजी आहे. हिंवाळ्याचे दिवस. सारा किरणसंभार बरोबर घेऊन निघालेला सूर्य थोडासा रेंगाळल्यासारखा वाटत होता. युवक परिषदेच्या अध्यक्षाची मिरवणूक निघाल्याची वार्ता आली; आणि हातांतलें काम घाईघाईनें संपवून मी सामोरा जाण्यासाठीं निघालों. शिवाजी पुतळ्यापाशीं मीं मिरवणुकीस गांठलें. पुढील जीवनांत सदैव अंत:करण उजळीत राहील अशी दिव्य ज्योति येथें दिसणार आहे ही कल्पनाहि नव्हती मला ! “ **योगियां दुर्लभ तो म्यां देखिला।** ” असा साक्षात्कार आज होणार आहे, याचा अंधुकहि अंदाज मला आला नाहीं.

मिरवणुकीच्या मध्यें असलेल्या रथांत उच्चासनावर एक देदीप्यमान पुरुष विराजमान झालेला दिसला. शुभ्र खादीच्या पोषाखानें त्याची कर्पूरगौर कांति अधिकच उज्ज्वल झालेली दिसत होती. चेहेऱ्यावर बादशाही ऐट, हालचालींत नेत्याचा डौल आणि हास्यामध्यें पोरकट भाबडेपणा. गोजिरवाणें मूल आणि

पराक्रमी वीर यांच्यांतल्या मधुर व उदात्त भावनांचें प्रयागतीर्थच वाटलें तें मला. तें अप्रतिम सौंदर्य श्रीमंतीनें संगोपिलेलें, ज्ञानानें सुसंस्कृत केलेलें, आणि त्यागानें तेजस्वी झालेलें दिसलें. हंसतां हंसतां कुणीं कांहीं विचित्र विधान केलें कीं हा पुरुष लागलीच खवळे. कधीं अंगावर पडणारे हार परत जनसमुदायाकडे वेगानें फेंकून देई, तर कधीं अनावर झालेल्या गर्दीला हटविण्याकरितां झटकन् उभा राहून हातानें हुकूम करी. डोळ्यांत जिज्ञासा खूप दिसे. हंसणें काय आणि रागावणें काय, सर्वच मोठें निर्मळ आणि प्रांजल वाटे. प्रामाणिकपणा हाच या पुरुषाचा जीवनरस होय, हें कोणालाहि सहज उमगण्यासारखें होतें. निसर्गाची ही ' खास कामगिरी ' आहे याविषयीं कुणाला शंका उरणें शक्य नव्हतें. सर्व जनसमूह उत्साहपूर्ण अंतःकरणानें ओरडत होता—

**' पं. जवाहरलाल नेहरू की जय '**

मींहि देहभान विसरून तोच जयघोष केला !

—सूर्य डोंगराआड झाला होता. दिवस आणि रात्र यांच्या सीमेवर जग येऊन पोंचलें होतें. एकीकडे शिवाजीमहाराजांचा अश्वारूढ पुतळा भूतकालांतील वैभवें दाखवीत आहे, तर दुसरीकडे हा रथारूढ नेता भविष्याचीं स्वप्नें रंगवीत आहे अशा अपूर्व वातावरणांत मी सांपडलों होतों. सत्यसृष्टीची रेषा ओलांडून स्वप्नाच्या सरहद्दीवर मी वावरत होतों. जागृति आणि सुषुप्ति यांच्या कांठावरून चालल्यासारखें वाटे. पं. नेहरूंना त्यानंतर अनेकदां पाहण्याचें भाग्य मला लाभलें; पण तें पहिलें दर्शन आठवलें कीं अजून अंगावर रोमांच उभे राहतात !

या साक्षात्काराची ज्योत कायम राहावी यासाठीं या वीस वर्षांत मी तिला सतत ज्ञानाची जोड देत आलों आहें. पंडितजींच्या श्रेष्ठतेचें रहस्य समजावून घेण्यासाठीं त्यांचीं पत्रकें, व्याख्यानें, लेख, पुस्तकें यांचा मोठ्या तन्मयतेनें अभ्यास केला आहे. त्यांच्या विभूतिमत्त्वासंबंधीं जें जें कुणीं लिहिलें तें तें वाचण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या जीवनांत शिरण्याचें, त्यांना जवळून पाहण्याचें भाग्य ज्यांना लाभलें त्या माणसांपासून पंडितजींविषयीं जी काय मिळेल ती माहिती घेतली आहे, आणि या साऱ्या सामुग्रीचें चिंतन व मनन करण्यांत तासचे तास दवडले आहेत. पंडितजींच्या उत्कर्षानें वेडावून जाऊन स्वतःच्या जीवितांतील कित्येक विफलतांच्या यातना विसरलों आहें, आणि

पंडितजींवरील संकटांमुळें स्वतः मिळालेल्या थोड्याफार यशाचा आनंदहि वेळो-वेळीं गमावला आहे. इतकें असूनहि हें माझेंच वैशिष्ट्य असें मी मानीत नाहीं. माझ्यासारखे त्यांचे पूजक लाखों आहेत. पण आपल्या भक्तींतच कांहीं वेगळें सौंदर्य असतें या धुंदींत राहण्याचा अधिकार तर प्रत्येक भक्ताला असतोच कीं नाहीं ? असो.

मुळांतच पंडितजी दैववान् असल्यानें यशःश्रीची कृपा त्यांच्यावर पहिल्या-पासूनच होती. पण गेल्या वीस वर्षांत त्यांचें ऐश्वर्य शिगोशिग भरून वाहूं लागलें असें दिसेल. या काळांतच त्यांच्या अगणित मिरवणुकी निघाल्या. पन्नास हजार लोकांनीं एका बाजूनें साद घालावी कीं—

**" हमारा बादशाह कौन है ? "**

आणि दुसऱ्या बाजूनें तेवढ्याच जनसमुदायानें उत्तर द्यावें—

**" जवाहरलाल नेहरू ! "**

या काळांतच चीन ते अमेरिका एवढ्या विशाल भूभागांत त्यांनीं अनेकदां संचार केला आणि ठिकठिकाणीं त्यांचें अपूर्व उत्साहानें स्वागत झालें; त्यांच्या जन्मदिनाचा महोत्सव कोण अधिक झगझगाटानें साजरा करतो याबद्दल पाश्चात्य देशांतहि चढाओढ सुरू झाली. चार वेळां हिंदी राष्ट्रसभेच्या अध्यक्षपदावर त्यांची निवडणूक झाली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते राष्ट्राचे अभिषिक्त नेतेच झाले. त्यांचा गौरव कितीहि केला तरी मनाची अतृप्तता जातच नाहीं असें जगांत अगणित लोकांना वाटतें.

**" हा बहर आपुल्या मानवता-तरुवरला**
**जो युगायुगांनीं कधीं दिसे मोहरला * "**

ही त्यांच्याविषयीं लोकांत भावना आहे.

—आणि या प्रेमभावनेला सर्वस्वीं लायक असल्याचें त्यांनीं आपल्या अमोल कर्तृत्वानें सिद्ध केलें आहे. गेल्या वीस वर्षांत हिंदी राष्ट्राचें जीवन आमूलाग्र बदललें आहे. जुन्या जगाची सारी अडगळ अजून पूर्णपणें हालली नाहीं हें खरें,

अनुक्रम
क्रमांक ...2254
नों. दि.

---

* बुद्धचरित्रावरील सर एडविन् अर्नोल्ड यांच्या " The Light of Asia " या जगविख्यात काव्यांतून.

पण त्याचा ताबा मात्र नष्ट झाला आहे हें खास. नव्या जगानें आतां येथें चांगलेंच बस्तान बसविलें आहे. नव्या जगाच्या आगमनापूर्वींच त्याची चाहूल ज्यांना कळली आणि त्याच्या स्वागतासाठीं जनमनांत योग्य तो बदल करण्याची खटपट ज्यांनीं यशस्वीपणें केली त्यांत पं. जवाहरलाल नेहरू अग्रगण्य होत.

नव्या युगाच्या स्वागतासाठीं पं. नेहरूंनीं आपणांस काय शिकविलें यापेक्षां काय शिकविलें नाहीं हेंच विचारणें अधिक युक्त ठरेल. पंडितजी एकोणिसाव्या शतकांतील शेवटच्या दशकाच्या कांहींसे अगोदर जन्माला आले (१४ नोव्हेंबर १८८९). पंडितजींच्या शुभ जन्मापूर्वींपासून पाश्चात्य संस्कृतीचीं पावलें या प्राचीन व विराट् देशांत अधिकाधिक वेगानें उमटूं लागलीं. विसाव्या शतकाच्या आरंभींचें महायुद्ध संपल्यानंतर तर या क्रमाला फार जोराची गति मिळाली. पं. नेहरूंनीं पाश्चात्य संस्कृतीच्या माहेरघरांतच आपला शिक्षणक्रम संपविल्यामुळें (१९०५ ते १९१२) ते त्या संस्कृतीचे चांगले जाणकार बनले, आणि साधकावस्था संपल्यानंतर त्यांनीं राष्ट्रजीवनांत प्रत्यक्ष उडी घेतली ( १९२२ ). तेव्हां पाश्चात्यांकडील हरएक नवी कल्पना त्यांनीं कृतीनें, वाणीनें व लेखणीनें आम्हांला शिकविली. नेहरूंनीं हातीं नेतृत्व येईपर्यंत जुन्या तऱ्हेच्या राष्ट्रवादाचा पाड संपत आला होता. नवा राष्ट्रवाद हा समाजवादी वळणावर गेला तरच तो सकस व बलिष्ठ होत जाईल, ही कल्पना नेहरूंना प्रथम आली आणि मग राष्ट्रांतल्या घडामोडींचें निदान त्या दृष्टीनें करण्यास त्यांनीं सुरुवात केली. वसाहतीच्या स्वराज्याच्या मर्यादित कक्षेंत जोंवर स्वराज्याचें ध्येय फिरत आहे, तोंवर खऱ्या प्रगतीचा पाया घातला जाणार नाहीं याचा अंदाज घेऊन पूर्ण स्वातंत्र्याची घोषणा त्यांनीं केली आणि सनदशीरपणाच्या रुळावरून क्रांतिकारकतेच्या फांट्यावर राजकारणाची गाडी आणिली. लाहोर कॉंग्रेसच्या ( १९२९ ) अध्यक्षपदावरून ह्या नव्या धोरणावर राष्ट्रसभेकडून त्यांनीं शिक्कामोर्तब करून घेतलें. पण ध्येय क्रांतिकारक आहे एवढ्यानें कार्यभाग साधणार नाहीं ही व्यवहारी दृष्टि पंडितजींना होतीच. देशांत उदयास येऊं घातलेली ' युवकसंघा 'ची चळवळ नव्या स्फूर्तीनें चैतन्यशाली करून पूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयाला तिचा पाठिंबा मिळविला आणि राजकीय संग्राम उग्र व परिणामकारक करण्यासाठीं मजूर-किसानांचीं दळें हळूहळू त्यांनीं स्वातंत्र्ययुद्धाच्या बाजूला वळविलीं. आपण राष्ट्रसभेचे पाईक व हिंदी स्वातंत्र्याचे सैनिक आहों हें सांगतांनाच आपण समाजवादीहि आहोंत हेंहि निःसंकोचपणें त्यांनीं बोलून दाखविलें. लाहोरलाच त्यांनीं अध्यक्ष-

पदावरून हें सांगितलें होतें. १९३६ सालीं लखनौ काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून त्यांनीं पुनः एकदां आपल्या निष्ठेचें स्पष्टीकरण केलें.

"समाजवाद हें केवळ माझें एक आवडतें आर्थिक तत्त्व आहे असें नाहीं; ती एक सामर्थ्यवान् तत्त्वप्रणाली असून बुद्धीनें व हृदयानें मीं तिचा अंगीकार केला आहे. हिंदी स्वातंत्र्यासाठीं मी झगडतों याचें कारण, माझ्या अंगीं असलेली राष्ट्रीय वृत्ति मला परकीय सत्तेचें जोखड सहन करूं देत नाहीं. पण याहिपेक्षां माझ्या झगडण्याचें बलवत्तर कारण म्हणजे हिंदी स्वातंत्र्य ही सामाजिक व आर्थिक स्थित्यंतरासाठीं अवश्य असलेली पहिली पायरी आहे हें होय."

मात्र, इंग्लंड-फ्रान्समधील भांडवलवाल्यांच्या पंखाखालीं वाढणारा मवाळ समाजवाद आणि रशियाच्या क्रूर व हिंसात्मक धोरणावर आधारलेला जलाल साम्यवाद हे दोन्ही मार्ग हिंदुस्थानांतल्या समाजवाद्यांनीं टाळले पाहिजेत असा योग्य इषारा त्यांनीं वेळोवेळीं दिला. आपली परागति, आपलीं दैन्यें, आपले दोष, आपणांतले संघर्ष हे सर्व कांहीं राजकीय व आर्थिक गुलामगिरीमुळें आलेले आहेत; आणि या दोन्ही प्रकारची गुलामगिरी नष्ट होण्यासाठीं एका आघाडीवर परसत्तेशीं जसें झगडलें पाहिजे, त्याचप्रमाणें दुसऱ्या आघाडीवर जीर्णशीर्ण झालेल्या आपल्याच समाजव्यवस्थेवरहि आघात केले पाहिजेत ही जाणीव नेहरूंनीं आम्हांला करून दिली.

याच काळांत जातीय प्रश्न चांगलाच चिघळूं लागला होता. या प्रश्नावर कांहीं आततायी लोक यादवीचा अघोरी तोडगा सुचवीत, तर दुसरे सात्त्विक लोक असीम औदार्याचा उपदेश करीत ! पण या प्रश्नाची शास्त्रीय चिकित्सा करून हा प्रश्न मूलतः अर्थकारणावर कसा आधारलेला आहे हें पं. नेहरूंनीं दाखविलें आणि हा प्रश्न 'घटनासमिती'च्या रामबाण उपायानेंच सुटेल असें सांगितलें (१९३३). जे गोंधळांत पडले होते त्यांना नवा मार्ग दिसला आणि 'घटनासमिती' ची क्रांतिकारक व नवी कल्पना एकदम लोकप्रिय झाली. ही कल्पना राष्ट्रसभेच्या प्रसिद्ध व्यासपीठावरून पंडितजींनीं उद्घोषित करून (१९३५), नंतर निरनिराळ्या प्रांतिक कायदेमंडळांतून ती पसार करवून घेतली (१९३७). नव्या स्वतंत्र हिंदुस्थानचें राज्ययंत्र कसें तयार होणार याचें

निश्चित तंत्र लोकांना कळलें; आणि प्रगतिपर शक्ति त्या दिशेनें एकत्र येऊं लागल्या.

याच सुमारास युरोपांत युद्धाचे ढग जमूं लागले होते. शांततावादी व स्वार्थ-साधु मुत्सद्दी युद्ध टाळण्याचा शक्यतोंवर प्रयत्न करीत होते आणि त्यासाठीं लाचार होऊन हिटलेर-मुसोलिनीसारख्या हुकूमशहांना हवी ती लांच द्यायला निगरगट्टपणें तयार झाले होते. यावेळीं पं. नेहरू युरोपच्या दौऱ्यावर होते. चेंबर्लेनचीं नाझी नेत्यांपुढील लोटांगणें पाहून पंडितजींनीं उद्गार काढले कीं, "आज जरी चेंबर्लेन हिटलेरशीं घातुक तडजोड करून युद्ध टाळीत असला, तरी इंग्लंडमधील लोकसत्ताप्रेमी जनता नाझी-फॅसिस्ट हुकूमशाहीविरुद्ध झगडा करण्यास ब्रिटनला भाग पाडील." हे उद्गार द्रष्ट्याचे होते. थोड्याच अवधींत ते अपेक्षेबाहेर खरे ठरले. या युद्धाच्या सुरुवातीला चीनमधून परत येत असतां नेहरूंनीं म्हटलें होतें कीं, "हें युद्ध जगाचें स्वरूप आमूलाग्र बदलून टाकील" (१९३९). आज दहा वर्षांनीं त्या शब्दांची प्रचीति कुणालाहि कळून येण्या-सारखी आहे.

या दुसऱ्या महायुद्धांत आपल्या बाजूला लोकमत ओढून घेण्यासाठीं दोस्त राष्ट्रांनीं, विशेषतः ब्रिटननें, आपल्या चातुर्याची शिकस्त केली! अगोदर जर्मनीनें लहानसहान दुबळ्या राष्ट्रांवर प्रथम हल्ला केला हें दोस्तांना जर्मनीविरुद्ध जगाचें लोकमत बिथरविण्यास भरपूर भांडवल होतें. त्याच भांडवलावर 'आपला युद्धहेतु लोकशाहीचा ध्वज उंच ठेवावा हा आहे' असा प्रचार दोस्तांनीं सुरू केला. पुढें दोस्तांच्या बाजूनें रशिया युद्धांत दाखल झाल्यानें आणि अमेरिकेचा भरभक्कम आधार मिळाल्यानें ब्रिटनचा मार्ग सुकर झाला. खुद्द हिंदुस्थानांतले ज्वलज्जहाल साम्राज्यविरोधीसुद्धां ब्रिटनला साह्य केलें पाहिजे असें घसा फोडून सांगूं लागले! वख्त मोठा बाका होता! क्षणाक्षणाला प्रतिगामी शक्ति प्रबळ होत होत्या. लोकशाही आणि हुकूमशाही यांच्यांतला हा लढा आहे असा देखावा दिसत होता. अशा वेळीं या विप्लवांत जुन्या-नव्या मतप्रणालींची झालेली गुंतागुंत सोडवून हिंदी स्वातंत्र्यसंग्राम साम्राज्यविरोधी तसाच फॅसिस्टविरोधी ठेवण्यासाठीं दिव्य-दृष्टीचा नेताच पाहिजे होता; आणि पं. नेहरूंनीं हें नेतेपण मोठ्या यशस्वितेनें पार पाडलें. कॉंग्रेसनें १९४० सालीं युद्धविषयक जो ठराव केला तो पं. नेहरूंनींच तयार केला होता हें आतां जगजाहीर आहे. अचूक भाषा, उदात्त व पुरोगामी

तत्त्वप्रणाली, प्रांजल मार्गदर्शन इ० वैशिष्ट्यांमुळें या ठरावाचें जगभर स्वागत झालें.

या ठरावांत मांडलेल्या भूमिकेसाठीं राष्ट्राची तयारी पंडितजींनीं अनेक वर्षें चालविली होती. स्पेन देशांतील लोकशाहीचा निर्वंश करण्यासाठीं युरोपांतलीं जर्मनीसारखीं पुढारलेलीं राष्ट्रें ज्यावेळीं झटत होतीं, तेव्हां माद्रिद् येथें प्रत्यक्ष अग्निवर्षावांत जाऊन पं. नेहरूंनीं स्पॅनिश लोकनेत्यांना धीर दिला होता. अबिसिनियावरील इटलीचें राक्षसी आक्रमण जेव्हां रशियानेंसुद्धां निमूटपणें सहन केलें, तेव्हां कॉंग्रेसकडून फॅसिस्ट इटलीचा निषेध पंडितजींनीं करविला. आणि चीनमध्यें जातीनें जाऊन पं. नेहरूंनीं राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या चिनी जनतेला स्फूर्ति दिली! चीनमध्यें शुश्रूषापथक पाठविल्याची 'अमर कहानी' तर आतां घरोघर ठाऊक आहे. आपल्या स्वातंत्र्याचा लढा हा जगांतील सर्व स्वातंत्र्येच्छु दलित लोकांच्या लढ्याचाच एक भाग आहे ही जाणीव नेहरू वारंवार राष्ट्राला देत होते. हिंदी जनतेंत हुकूमशाहीच्या विरुद्ध वातावरण निर्माण करण्यासाठीं पंडितजींनीं केलेले हे प्रयत्न जगाच्या कौतुकाचे विषय झाले होते.

मात्र, पं. नेहरूंचें मोठेपण हें कीं, पुस्तकी फॅसिस्ट-विरोधकांच्या धोरणांत ते सांपडले नाहींत आणि राष्ट्रालाहि त्यांनीं सांपडूं दिलें नाहीं. फॅसिझम्, नाझीझम् यांचा नायनाट व्हायला पाहिजे, आणि दोस्त राष्ट्रांचा विजय होणें हेंहि अगत्याचें आहे. पण खुद्द दोस्त राष्ट्रांतच फॅसिझम्, नाझीझम्च्या ज्या प्रवृत्ति आहेत त्या नष्ट झाल्या पाहिजेत; हिंदुस्थानचें पारतंत्र्य हा त्या प्रवृत्तींचा स्पष्ट पुरावा होय. म्हणूनच युरोपांतल्या राष्ट्रांना नाझींच्या जुलमी टांचेखालून काढून स्वतंत्र करूं पाहणाऱ्या 'लोकसत्तावादी' इंग्लंडनें प्रथम हिंदुस्थानचें स्वातंत्र्य जाहीर केलें पाहिजे; आणि आपल्या या घोषणेचा विसार म्हणून बरीचशी सत्ता लोक-प्रतिनिधींच्या ताब्यांत दिली पाहिजे; हें सत्तांतर समाधानकारक झालें तर हिंदुस्थान लोकशाहीच्या बाजूनें लढणाऱ्या दोस्त राष्ट्रांशीं आनंदानें सहकार्य करील, अशी शुद्ध व निर्मळ विचारसरणी पं. नेहरूंनीं राष्ट्रापुढें मांडली. लोकसत्ता आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य या दोनहि गोष्टी या विचारांत एकत्रित केल्या होत्या.

नेहरूंचा उदात्त दृष्टिकोण साम्राज्यशाहीला पटण्यासारखा नव्हता हें उघड होतें. पण देशाला या आणीबाणीच्या प्रसंगीं योग्य मार्गदर्शन मिळालें. आणि पुढें १९४२ चा लढा सुरू झाल्यावर कॉंग्रेसला 'फॅसिस्ट-धार्जिणी' म्हणणाऱ्या

देशी-विदेशी शत्रूंचा डाव मुळांतच फसला ! पुढें युद्धाचा उपसंहार झाल्यानंतर पं. नेहरू जेव्हां बंधमुक्त होऊन बाहेर आले, तेव्हां लोकशाहीचा प्रणेता म्हणूनच त्यांचा अपूर्व लौकिक जगभर दुमदुमूं लागला. अखेर, ब्रिटिश सरकारलाहि राष्ट्रीय सरकारचें नेतृत्व त्यांचेकडेच द्यावें लागलें ( १९४६ ).

पण पंडितजींच्या अलौकिक कर्तृत्वाची कसोटी तर यापुढेंच होती. दुसऱ्या महायुद्धानें क्षीणबल झालेल्या इंग्लंडनें हिंदुस्थानला स्वातंत्र्य देऊं केलें; पण त्यांत फाळणीचें भयंकर विष पेरून ठेवलें होतें. फाळणी पत्करायची नाहीं असें म्हटलें तर पारतंत्र्याचा फांस नजीकच्या काळांत दूर होईल अशीं लक्षणें दिसेनात ! पं. नेहरूंनीं फाळणीचें हलाहल प्राशन करून स्वातंत्र्याचा अमृतकुंभ पत्करायचें ठरविलें. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं देश स्वतंत्र झाला. पं. जवाहरलाल नेहरू मुख्य प्रधान होऊन त्यांनीं राज्यसूत्रें हातीं घेतलीं. पण याच वेळा पाकिस्तानांत कत्तली सुरू झाल्या. अत्याचार, बलात्कार, द्रव्यदारापहरण यांचें भीषण पर्व सुरू झालें ! हजारों निर्वासित आपल्या नवोदित हिंदी संघराज्यांत घुसले. पण या साऱ्या आकान्तांतून व हालअपेष्टांतून पंडितजींनीं मोठ्या धैर्यानें, नेटानें, उदारतेनें राष्ट्राला सुखरूप वर काढलें. जनतेच्या हृदयांत पंडितजींनीं जें सर्वश्रेष्ठ स्थान मिळविलें होतें, त्याचमुळें हिंदी स्वातंत्र्याच्या जन्मकाळींच त्यावर आलेला हा मृत्युयोग टळला.

पण आणखीहि एक थोर आपत्ति देशावर यायची होती. गोकुळांत सुखानें वाढणाऱ्या बालश्रीकृष्णाचा अंत करण्यासाठीं कंस जसा मधून मधून मायावी राक्षसांना धाडी, त्याचप्रमाणें देशांतील प्रतिगामी शक्ति हिंदी स्वातंत्र्याच्या जन्मकालापासून त्यावर प्राणांतिक हल्ले करण्यास झटत होत्या. ३० जानेवारी १९४८ रोजीं महात्माजींचा झालेला खून हा असाच जबरदस्त आघात होता ! हिंदुस्थानच नव्हे, तर सारें जग या आमच्या राष्ट्रपित्याच्या झालेल्या अमानुष वधानें हादरून गेलें. देशांत अराजक माजणार आणि लोकसत्ताविरोधी शक्तींचा नंगा नाच सुरू होणार असें भय वाटूं लागलें. महात्माजींचा मृत्यु म्हणजे पंडितजींच्या अंतःकरणावर बसलेला केवढा तडाखा ! महात्माजी म्हणजे त्यांचें स्फूर्तिनिधान, त्यांचें सर्वस्व ! पण यावेळीं अतुल धैर्यानें एका हातानें आपल्या अंतःकरणाची जखम दाबून दुसऱ्या हातानें राष्ट्रनौकेचें सुकाणूं पंडितजींनीं यशस्वी रीतीनें चालविलें; आणि देशांत बाल्यावस्थेंत असलेल्या लोकशाहीचें संरक्षण केलें.

या वीस वर्षांत नेहरूंनीं हिंदुस्थानला जुन्या राष्ट्रवादाच्या पातळीवरून नव्या जागृतीच्या उच्च पातळीवर कसें नेलें व कोणत्या वादळांना तोंड दिलें याचा आलेख हा असा आहे. याखेरिज त्यांचीं लहानमोठीं यशेंहि केवळ अविस्मरणीय आहेत. लोकांत नागरिक हक्कांविषयींची आस्था त्यांनीं निर्माण केली; काँग्रेसच्या घटनेंत बळ आणून दिलें; हिंदी कायदेमंडळांतल्या काँग्रेसतर्फे निवडून आलेल्या सर्व प्रतिनिधींची परिषद् भरवून सर्वांना समान असें ध्येय आंखून दिलें, व स्वातंत्र्य मिळण्यापूर्वींच भावि लोकराज्याचा पाया घातला; विज्ञानाशिवाय उत्कर्ष नाहीं, आणि देशव्यापी योजना आंखल्याखेरीज समृद्धि नाहीं हें जाणून 'राष्ट्रीय संयोजना'ची उभारणी त्यांनीं केली; आणि विशेष म्हणजे मधून मधून आलेल्या अपयशांनीं जेव्हां राष्ट्राला मरगळ आली, तेव्हां आपल्या तेजस्वी व्यक्तित्वानें नवें चैतन्य व स्फूर्ति त्यास वेळोवेळीं त्यांनीं दिली. पिढ्यान् पिढ्या पुरतील एवढे उपकार पंडितजींनीं आपल्या बांधवांवर करून ठेविले आहेत.

**" कुलं पवित्रं जननी कृतार्था**
**वसुंधरा पुण्यवती च येन "**

अशा महाभागांत पंडितजींची गणना अग्रभागीं करणें जरूर आहे.

आज आपल्या नवीन राष्ट्रांत सळसळणाऱ्या अनेक शक्ति व अनेक ध्येयें यांचें उगमस्थान नेहरूंच्या शिकवणुकींत आपणांला सांपडेल. गंगेच्या ओघाप्रमाणें विशाल होत जाणाऱ्या त्यांच्या जीवनकार्यानें आज राष्ट्र समृद्ध केलें आहे गंगा केवळ कांठचा प्रदेश सुपीकच करून थांबते का ? नाहीं. गंगेमुळें ठिकठिकाणीं तीर्थक्षेत्रें, शहरें वसतात, वाहतूक सोपी होते, आणि देशाला अलौकिक सौंदर्य येतें. पं. नेहरूंच्या अवतारकार्यामुळें अशी सर्वांगीण समृद्धि देशाच्या या कालांत झालेली दिसते. आणि म्हणूनच नेहरूंच्या जीवनाचा अभ्यास म्हणजे नवभारतांत बहरलेल्या विविध ध्येयसृष्टीचा अभ्यास होय.

मात्र, या अभ्यासांत आपण सांपडलों म्हणजे कित्येक भोंवरे असे लागतील, कीं त्यांतून आपणांला बाहेर पडणें मुष्कील होऊन जाईल. कारण नेहरू-चरित्र म्हणजे विरोधाभासांचा एक प्रचंड संगम आहे. नेहरूंच्याविषयीं अमर्याद भक्ति लोकांत असली तरी या विरोधाभासांतली सूक्ष्म संगति कितीकांना कळली आहे कोण जाणें ! सर्व तऱ्हेनें भाग्यशाली असा आयुष्यक्रम लाभून हा राजर्षि अवस्थ कां

दिसतो ? ऐश्वर्याच्या शिखरावर असतांनाहि उदासिनतेच्या ढगांनीं याचें सुंदर मुखमंडल काळवंडलेलें कां दिसतें? हा नम्र आहे कीं अहंकारी आहे ! गर्भश्रीमंतींत वाढलेला हा पुरुष समाजवादी कसा झाला ? विज्ञानाच्या ह्या भोक्त्यानें गांधींजीं-सारख्या गूढवाद्याचा नाद कां धरला !...हे व असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. अनेक जाणत्यांनीं ही प्रश्नावली सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. खुद्द पं॰ नेहरूंनींहि कठोर आत्मपरीक्षण वेळोवेळीं केलें आहे. ते म्हणतात :

"माझा खरा संघर्ष माझ्या हृदयांत होता. कल्पना, भावना आणि निष्ठा, त्याचप्रमाणें बाह्य परिस्थितीशीं झुंजणारें अंतर्मन, अंतरींची अतृप्ति यांचा तो संग्राम होता. माझें मन एक युद्धक्षेत्र बनलें. या ठिकाणीं हुकमत मिळविण्यासाठीं अनेक शक्ति झगडत होत्या.

"पूर्व आणि पश्चिम यांचा मी एक विचित्र सांधा आहें. प्रत्येक ठिकाणीं परका, कुठेंच घरोब्याचा नाहीं...पाश्चात्य जगांत मी तिऱ्हाईत व परकीय असून त्या जगाशीं समरस होणें शक्य नाहीं. पण माझ्या स्वतःच्या देशांतहि कित्येकदां मी निर्वासित आहें असें वाटतें.

"मला युद्धांत मौज वाटते. युद्धामुळेंच आपण जिवंत आहोंत ही जाणीव होते."

अशा उद्गारांवरून कदाचित् आपणांला जास्त बोध न होतां अधिक घोटाळल्यासारखें होईल ! परंतु नेहरूंच्या लोकोत्तर जीवनांत प्रवेश मिळवून त्यांत तळाशीं दडलेली सुसंगति शोधणें ही एक मोठी हृदयंगम साधना आहे; ती करण्यासाठींच या महाद्वारांतून आपण आंत प्रवेश करणार आहोंत.

०००

: २ :

# संस्कार

रघुराजाचा जन्म झाला तेव्हां दिशा उज्ज्वल झाल्या आणि सुखकारक वारे वाहूं लागले, असें वर्णन आपल्या कविकुलगुरूनें केलें आहे. पंडित जवाहरलाल नेहरू जन्मास आले तेव्हां निसर्गानें असाच आनंदोत्सव साजरा केला असेल असें म्हटल्यास तें शोभण्यासारखें आहे. कारण त्या रघुकुलदीपकाप्रमाणेंच नियति आणि निसर्ग यांनीं प्रथमपासून आपल्या ऋद्धिसिद्धि पंडितजींच्या दिमतीस दिल्या होत्या. पंडितजींच्या व्यक्तित्वाचा पूर्ण विकास होण्यास या अनुकूलतेची फार मदत झाली हें मान्य करण्यांत कोणताहि कमीपणा नाहीं. पंडितजींइतकी परिस्थितीची अनुकूलता फारच थोड्यांना लाभते हें खरें; पण त्या थोड्यांपैकीं थोडींदेखील माणसें 'जवाहरलाल' होऊं शकत नाहींत हें लक्षांत घेतलें म्हणजे जवाहरलालजींचें स्वयंभू मोठेपण व कर्तृत्व एकदम डोळ्यांत भरतें; आणि मग जन्मजात असलेली अनुकूल परिस्थिति हें त्यांच्या वैभवाच्या अनेक कारणांपैकीं एक आहे एवढाच विचार शिल्लक राहतो.

पंडित जवाहरलालांच्या जीवनावर ज्या अनेक गोष्टींचे संस्कार होऊन त्या जीवनाला इतकें रमणीयत्व आलें, त्यांत 'काश्मीर' या त्यांच्या वाडवडिलांच्या जन्मभूमीस अग्रस्थान द्यावें लागेल. नेहरू घराणेंच काश्मीरांतलें. मूळचे 'राजकौल', पण एका 'नहरा' कांठीं (कालव्याच्या) त्यांनीं वास्तव्य केलें म्हणून 'नेहरू' हें नांव पडलें. दिल्लीच्या मोगल दरबारीं आल्यापासून विद्या व कर्तृत्व यांविषयीं यांची प्रसिद्धि होती. मातेकडून तर जवाहरलालांचा काश्मीरचा संबंध याहून निकटचा. स्वरूपराणींचें घराणें केवळ दोनच पिढ्यांपूर्वीं काश्मीरच्या नंदनवनांतून

हिंदुस्थानांत उतरलें. स्वतःच्या व मातुल घराण्याच्या पूर्वजांची ही देखणी जन्मभूमि पंडित जवाहरलालांच्या अंतरंगांत खोलवर प्रतिबिंबित झालेली आहे. काश्मिरला जाण्याची संधि म्हणजे त्यांना महोत्सव वाटतो. १९४० सालच्या ऑगस्टमध्यें आपल्या आत्मचरित्राच्या नव्या आवृत्तीला पुरवणी जोडतांना तींत त्यांनीं म्हटलें आहे :

" ...कांहीं काळ तरी या जगापासून दूर जाऊन विश्रांति घेण्याची संधि मिळाली. गेल्या महिन्यांत मी काश्मीरला गेलों होतों. तेवीस वर्षांनंतर ही माझी काश्मिरला भेट होती. बारा दिवसच होतों मी तेथें, पण हे दिवस रम्यतेनें भरून गेले. त्या जादूमय सृष्टींतल्या सौंदर्याचें मीं आकण्ठ पान केलें. मी दरीडोंगरांत भटकलों, हिमनदीपर्यंत चढलों, आणि जीवन हें जगण्यालायक आहे असें मला वाटूं लागलें .. "

काश्मीरचें असें विलक्षण आकर्षण पंडितजींना आहे. काश्मीरनें त्यांना असामान्य रूपसंपदा दिली आहे, त्याप्रमाणें सौंदर्यवादी अंतरंगहि दिलें आहे. बौद्धिक कर्तृत्व हें काश्मिरी ब्राह्मणांचें कुलव्रतच होतें. जवाहरलालनीं तें मोठ्या धडाडीनें चालविलें आहे. पंडितजींच्या जीवनांतला केवढा तरी आकर्षकपणा त्यांच्या काश्मीर-परंपरेनें निर्माण केला आहे. आणि आज काश्मीरच्या प्रश्नाबाबत त्यांनीं जो न्याय्य आग्रह व खंबीरपणा धरलेला आहे त्याला राजनैतिक भूमिका जितकी कारण आहे, त्याहूनहि काश्मीरबद्दल त्यांना वाटणारें अलोट ममत्व हेंच प्रभावी आहे असें म्हटल्यास चूक ठरेल काय ?

निसर्गानें जवाहरलालना जन्मतः दिलेली संपन्नता मोतीलालजींनीं मोठ्या कौशल्यानें आणि जबाबदारीनें शतगुणित केली. शहाजीराजांच्या व्यक्तित्वाचें आणि कर्तृत्वाचें आकलन झाल्याशिवाय शिवछत्रपतींच्या श्रेष्ठतेचें मूळ कळणार नाहीं; तसेंच मोतीलालजींच्या खानदानी जीवनाचें व वत्सलतेचें ज्ञान झाल्या-शिवाय जवाहरलालांच्या मोठेपणाचें रहस्य ध्यानीं येणार नाहीं. मोतीलाल जितके प्रेमळ तितकेच करडे होते. बाल जवाहरलालनीं एकदां वडिलांच्या दोन फौंटन पेन्सपैकीं एक सहज न विचारतां घेतलें, तेव्हां या तापट उमरावानें आपल्या त्या एकुलत्या एक गोजिरवाण्या मुलास याद राहील असें झोडपून काढलें ! पण शिस्तीच्या बाबतींत मोतीलाल जरी कडक होते, तरी आपल्या गुणसंपन्न

पुत्राच्या मनोभूमीची मशागत मोठ्या तत्परतेनें त्यांनीं केली. आधुनिक जगांतील मोल्यवान् व दुर्मिळ सवलती चिरंजीवास त्यांनीं उपलब्ध करून दिल्या. घरीं मि. ब्रूक्ससारखे सत्त्वशील गुरु त्यांनीं जवाहरलालसाठीं त्यांच्या लहानपणींच ठेवले आणि इंग्लंडसारख्या विद्येच्या माहेरघरांत जवाहरलालना ७–८ वर्षें उच्च शिक्षण निर्वेधपणें घेतां येईल अशी व्यवस्था केली. स्वाभिमान आणि महत्त्वाकांक्षा, शौर्य आणि त्याग या गोष्टींचे पंडित मोतीलालजी हे आदर्शच होते. आणि दिव्यावर दिवा लावावा त्याप्रमाणें जवाहरलालजींना हे गुण पित्याकडून मिळाले. मात्र, या नव्या दिव्यांत आणखीहि कांहीं स्वयंभू ज्योति पुढें जागृत झाल्या, त्यामुळें त्याचा प्रकाश फार दूरवर पसरला.

जवाहरलालजींचे लहानपणचे शिक्षक ब्रूक्स हे थिऑसॉफिस्ट होते. त्यांनीं त्या पंथाची दीक्षा पंडितजींना दिली. बेझंटबाईंच्या वक्तृत्वाचाहि परिणाम जवाहरलालजींवर झाल्याशिवाय राहिला नाहीं. वयाच्या तेराव्या वर्षींच जवाहरलालजी विधिपूर्वक थिऑसॉफिस्ट झाले. बेझंटबाईंनींच या वेळीं पौरोहित्य करून त्यांना गुरुमंत्र दिला होता. थिऑसफीशीं जवाहरलालजींचा संबंध पुढें विशेष टिकला नाहीं, तरी त्यांच्या मनावर त्या वेळीं उमटलेला आस्तिक वादाचा ठसा कायम राहिला असें म्हणण्यास हरकत नाहीं. थिऑसफी हा आत्मज्ञान करून घेण्याचा आधुनिक पंथ आहे. विज्ञान आणि अध्यात्म यांवरील पूल म्हणजे थिऑसफी. ब्रूक्सच्या गूढवादी उपदेशाचा परिणाम होऊन आकाशांत आपण तरंगत जात आहोंत आणि विशाल भूप्रदेश आपल्या पायांखालून सरकत आहे असें स्वप्न पंडितजींना नेहमीं पडूं लागलें. पुढें विज्ञानवादी दृष्टिकोण पंडितजींना पटला हें खरें असलें, तरी ते रूक्ष अथवा जडवादी झाले नाहींत. याला कारण हे लहानपणचे आध्यात्मिक संस्कार नव्हेत काय ? आणि थिऑसफीप्रमाणेंच पंडितजींनीं विज्ञान व अध्यात्म यांची एकता करण्याचा भगीरथ प्रयत्न आजवर चालविला नाहीं काय ?

मागील वर्षीं गीताजयंतीनिमित्त बोलतांना म. गांधी, बुद्ध व भगवद्गीता या तिघांचा आपल्या जीवनावर फार मोठा परिणाम झाला आहे, असें पंडितजींनीं सांगितलें. त्यांचें जीवन गीतेच्या कर्मयोगाचें मूर्तिमंत प्रतीकच होय. गांधीजी आणि जवाहरलाल यांच्या ऋणानुबंधावर बोलावें तितकें कमीच होईल. बुद्धाविषयीं नेहरूंना अपरंपार प्रेम वाटतें. आणि तर्कशुद्ध, समतावादी, नैतिक अधिष्ठान

असलेल्या बुद्धाच्या शिकवणीनें त्यांच्या मनाची पकड प्रथमपासूनच घेतली असावी असें दिसतें. लहानपणापासून बुद्धाविषयीं वाटणारी भक्ति आपल्या कलासक्त लेखणीनें व्यक्त करतांना, पंडितजी आपल्या अगदीं अलीकडील ग्रंथांत म्हणतात :

"अगणित भक्तिमान् कलाकारांच्या हातांनीं संगमरवरी दगड अथवा धातु यांच्या रूपानें ज्या बुद्धकल्पनेचा आविष्कार करण्याचा प्रयत्न केला, तींत सर्व हिंदी तत्त्वज्ञान, निदान त्यांतली एक महत्त्वाची बाजू प्रकट झाली आहे. त्याची कमलासनस्थ शांत-दांत मूर्ति वासना-संकल्पपालीकडे व जगांतील संघर्ष-वादळांच्यापासून दूर गेलेली आपणांस अगम्य अशी भासते. पण पुनः आपण नीट पाहूं लागलों, तर या शांत व स्थिर सौंदर्याच्या मागें, आपणांस विदित असलेल्या भावना-संवेदनापेक्षां वेगळ्या व अधिक प्रबळ अशा भावना-संवेदना दिसतात. त्याचे डोळे मिटलेले आहेत, पण कसल्या तरी आत्मशक्तीनें तो पाहात आहे व त्याचें सर्व शरीर सामर्थ्यपूरित झालेलें आहे असें दिसून येतें. शतकेंच्या शतकें निघून गेलीं, पण बुद्ध अजून आपणांपासून फार दूर गेलेला नाहीं असें वाटतें. त्याचा आवाज आपल्या कानांत घुमत आहे. आणि झगड्याला भिऊन पळून न जातां स्थिर दृष्टीनें त्याला तोंड द्या व याच जीवनांत प्रगति व उन्नति यांच्या थोर संधि साधा असें आपणांस सांगत आहे असा भास होतो.

"विभूतींचें महत्त्व आजहि आहे, आणि ज्या बुद्धानें मानवतेवर एवढा आपला ठसा उमटविला आणि ज्याचें स्मरण अद्यापिहि इतकें ताजें व चैतन्यपूर्ण वाटतें, त्या बुद्धाचें विभूतिमत्त्व खरोखर अलौकिक असलें पाहिजे यांत शंका नाहीं. बार्थ म्हणतो : 'शांत व मधुर असा बादशाही डौल, प्राणिमात्राविषयीं अगाध प्रेम आणि पीडितांविषयीं कळवळा, नैतिक स्वातंत्र्य व पूर्वग्रहापासून मुक्तता म्हणजे बुद्ध ।' असा वैभवशाली आदर्श निर्माण करणाऱ्या राष्ट्रांत व मानववंशांत अंतःसामर्थ्य व ज्ञान यांचे निधि खूप खोलवर गेले असले पाहिजेत. नाहीं का!"

बुद्धाचा उल्लेख जेथें येईल तेथें पं. नेहरूंची लेखणी आणि वाणी अशीच

चहऱ्याला येते. बुद्धाबद्दल त्यांना वाटणाऱ्या जबरदस्त आकर्षणांत अनेक भावनांचें मिश्रण आहे. बुद्ध समाजक्रांतीचा सक्रिय पुरस्कर्ता होता आणि श्रद्धेलासुद्धां तर्काचें अधिष्ठान असावें अशी त्याची वृत्ति असे. बुद्धपरंपरेभोंवतीं शिल्पादि कलांची रमणीय सृष्टि रचिली गेली आहे. हें सर्व जवाहरलालना आकर्षित करणारें असेंच होतें. पण तो भारतीय आहे याचाहि वाजवी अभिमान त्यांच्या बुद्ध-पूजनांत व बौद्ध संस्कारांत दिसतो. वरील उताऱ्यांत ह्या सर्व छटा प्रतिबिंबित झालेल्या दिसतील.

जवाहरलालजी इंग्लंडमध्यें ज्या गुरुकुलवजा विद्यालयांत शिकले त्याचाहि त्यांच्या जीवनावर उच्च संस्कार झाला आहे हें मान्य केलें पाहिजे. 'पूर्व ती पूर्व आणि पश्चिम ती पश्चिम. या दोन्ही कधीं भेटूं शकणार नाहींत.' ही किप्लिंग कवीची उर्मट उक्ति जवाहरलालजींच्या जीवनांत फोल ठरली आहे. आधुनिक यंत्रयुगांतील कार्यक्षमता, वक्तशीरपणा, ऐहिक जीवनाविषयीं हौस व जिज्ञासा आणि सामुदायिक दृष्टीनें व सहकार्यानें वागण्याची वृत्ति हे सारे गुण-विशेष इंग्रजांचे आहेत; आणि पंडितजींच्या अंगीं ते फार मोठ्या प्रमाणांत आले आहेत. त्यामुळें ते पाश्चात्यांना ओळखूं शकतात व पाश्चात्यांनाहि त्यांचें अंतरंग समजतें. होअर, बाल्डविनसारखीं कर्तबगार माणसें ज्या इंग्लिश विद्यालयानें निर्माण केलीं, त्यांत जवाहरलालजींच्या कोमल तरुतुल्य बुद्धीचा विस्तार झाला ही गोष्ट हिंदी राष्ट्राला भाग्याचीच वाटली पाहिजे; नाहीं का ? कारण पंडितजींनीं हे पाश्चात्य संस्कार कमावले म्हणूनच या हिंदनेत्याला आज जागतिक राज-कारणांत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. आणि पुढारलेलीं पाश्चात्य राष्ट्रें या पुरुषाची ग्रहणशक्ति मान्य करीत आहेत; आणि त्यामुळें हिंदचा महिमा आपो-आपच वाढत आहे.

भारतीय परंपरेच्या वैभवांत जन्मलेल्या जवाहरलालनीं विज्ञानाची उपासना केलेली आहे, ही गोष्ट विसरतां येणार नाहीं. जीवनांत त्यांनीं शास्त्रीय दृष्टिकोण पत्करलेला दिसतो याचें कारण विज्ञानाचा त्यांचा गाढ अभ्यासच होय. १९३८ सालीं नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सेस या संस्थेच्या वार्षिक बैठकींत शास्त्रज्ञांना उद्देशून बोलतांना ते म्हणाले :

"विज्ञान आणि विद्यामंदिराचीं दालनें यांना पुष्कळ दिवस मी

पारखा झालों आहें. दैव आणि परिस्थिति यांनीं मला बाजाराच्या गज-बजाटांत आणि शेतांच्या धुळींत सोडलें आहे. जेथें मजूर राहतात, खपतात, कष्ट सोसतात अशा ठिकाणीं मी आलों आहें. अलीकडे या भूमीला हादरून टाकणाऱ्या ज्या प्रचंड मानवनिर्मित घटना झाल्या त्यांत मी सांपडलों आहें. पण इतक्या वादळांत व चळवळींत मी गुरफटलों असलों, तरी मी तुमच्यापुढें अगदीं परका म्हणून आलों आहें असें नाहीं. कारण, मींहि विज्ञानदेवाच्या मंदिरांत उपासना केली आहे आणि त्याचा भक्त म्हणवून घेतलें आहे."

याचसंबंधीं आणखी एका ठिकाणीं ते म्हणतात :

"आणि परिस्थितीनें जरी मला विज्ञानापासून दूर फेकून नेलें तरी मन त्याकडे पुनःपुनः ओढ घेतें. पुढील जीवनांत वेगळ्या मार्गांनीं मी पुनः विज्ञानाकडे येऊन पोहोंचलों आणि मला कळून आलें कीं, विज्ञान ही कांहीं जीवनांतील एक मनोरंजक चवपालट नाहीं, तर तें जीवनाचेंच एक अंग आहे; आणि विज्ञान नसेल तर आपल्या आधुनिक जगाला अस्तित्वच उरणार नाहीं.

विज्ञानाच्या या अभ्यासांतून व आवडींतूनच जवाहरलालजींचा समाजवाद निघालेला आहे. १९२६ सालीं ब्रुसेल्स येथें ज्या वेळीं दलित राष्ट्रांची परिषद भरली तेव्हां जवाहरलालजींना राष्ट्रीय पारतंत्र्य व आर्थिक पिळवणूक यांच्यांतले गुप्त संबंध विशेष प्रामुख्यानें कळले. यानंतर खुद्द सोव्हिएट रशियाच्या निमंत्रणा-वरून पंडितजी सरकारी पाहुणे म्हणून रशियाला गेले होते. जगांतल्या पहिल्या साम्यवादी राष्ट्रानें जनकल्याणासाठीं तेथें चालविलेला महान् प्रयोग त्यांनीं जवळून पाहिला. या प्रयोगानें त्यांचें मन हरखून गेलें. 'सोव्हिएट रशिया' हें त्यांचें पुस्तक याच सानंद निरीक्षणांतून जन्माला आलें. सोव्हिएट रशियांतून परत आल्यानंतर आपल्या राष्ट्रवादाचा आशय बदलण्याचा व आर्थिक भूमिकेवर राष्ट्रीय संग्राम नेण्याचा ते प्रयत्न करूं लागले. १९२९ सालीं पहिल्यानें त्यांची कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावर निवड झाली, तेव्हां 'मी समाजवादी आहें आणि समाजवादावर आधारलेल्या समाजरचनेचा भोक्ता आहें.' असें त्यांनीं प्रांजलपणें सांगून टाकलें !

नदी डोंगरांतून निघाली आणि समुद्राला मिळावयास जाऊं लागली म्हणजे तिच्यांतलें कांहीं पाणी भूमींत गुप्त होतें, तर कांहीं वाफ होऊन वर आकाशांत जातें. पण याच वेळीं लहान लहान उपनद्या आजूबाजूंनीं धांवत येऊन तिला जीवनाचा करभार देत असतात. माणसाच्या संस्कारांचें असेंच नाहीं का होत ? लहानपणापासून प्राप्त झालेले कांहीं संस्कार व्यवहारांत शोषले जातात, कांहीं विचाराची आंच लागून नाहींसे होतात. पण मनाची टवटवी व उभारी कायम असेल तर नव्या नव्या सुंदर संस्कारांची भरहि पडत जाते. एकंदर जमेची बाजूच मोठी होत असते. पंडित जवाहरलालांच्या जीवनांत ही समृद्धि फारच मोठ्या प्रमाणावर झालेली आहे. काश्मीरच्या गूढरम्य प्रदेशांत उगम पावलेली त्यांची मनःसरिता थिऑसफी, इंग्रजी शिक्षण, विज्ञान, समाजवाद इ० प्रदेशांतुन वेगवेगळे संस्कार घेत व विस्तार आणि खोली या दोनहि गोष्टींनीं विशाल होत आली आहे. त्यांचे लहानपणचे कांहीं संस्कार पुसट झाले असले तरी त्यांनीं आपलें काम चोख बजावलें आहे. जवाहरलालांच्या अंतःकरणाला वार्धक्य माहीत नाहीं. त्यांची बुद्धि अप्सरेसारखी चिरतरुण आहे. म्हणूनच बदलत्या जगाशीं मिळतें घेणें आणि नव्या नव्या क्षेत्रांत नवें कर्तृत्व गाजवणें त्यांना शक्य होत आहे.

शेवटीं पंडितजींच्या जीवनावर झालेल्या एकाच संस्काराची चर्चा करावयाची. हा संस्कार जितका स्थूल तितकाच सूक्ष्म आहे; आणि तो संस्कार म्हणजे जनताजनार्दनाचा. म. गांधी सोडले तर या देशांत लक्षावधि लोकांनीं पाहिलेला व पूजिलेला पुढारी नेहरूंवांचून दुसरा कोण आहे ! राजकारणांत पडल्यापासून जनतेच्या प्रेमानें जवाहरलालांच्या मताची विलक्षण पकड घेतली. हिंदुस्थानांतल्या कानाकोपऱ्यांत राहणाऱ्या सर्व देशबांधवांपर्यंत ते पोंचलेले आहेत. रेल्वेनें प्रवास करीत असतां रात्रीच्या वेळीं झोंपेंतुन जागे होऊन बाहेर जमलेल्या दर्शनोत्सुक जमावावर नुसता दृष्टिक्षेप केला, तरी हे लोक कुठल्या प्रांतांतले आहेत हें त्यांच्या चटकन् ध्यानांत येतें. हिंदी जनतेशीं त्यांचा इतका गाढ परिचय आहे. हा परिचय जसजसा वाढत गेला तसतसा त्यांच्या ध्येयाला आकार आणि भरीवपणा येत गेला.

**“ बालक बापाच्या ताटीं रिघे । आणि बापातेंचि जेववूं लागे ।। ”**

असेंहि झालें. जनताजनार्दनाला नेहरूंनीं हितकारक कल्पना भरविण्यास सुरुवात

केली. पण त्यांनीं त्यापासून आपलाहि विकास करून घेतला आहे. समुद्रानें आपल्या जीवनांतला भाग देऊन ढगांना बाळसें आणावें आणि ढगानें परत समुद्रांत आपलें जीवन विसर्जन करावें, असा जवाहर व जनता यांचा परस्परांचा प्रेमळ संबंध आहे. जनता नेहरूंपासून किती तरी गोष्टी शिकली. त्याचप्रमाणें जनतेच्या प्रेमामुळें पंडितजींनाहि अनेक धडे घेतां आले. त्यांच्या मनाचे किती तरी कंगोरे साफ धुऊन गेले. जनतेच्या गाढ संबंधामुळें खानदानी वातावरणाचें कवच फोडून जवाहरलाल नेहरू विशाल व मोकळ्या जगांत येऊं शकले. आज लोकसत्ता व लोकराज्य या ध्येयांवर जवाहरलालांइतकी अपरंपार श्रद्धा एकाहि जागतिक नेत्याची नसेल. एवढी श्रद्धा जनतेशीं ते ज्या वत्सलतेनें आजवर वागले तीमुळेंच उत्पन्न झाली आहे. सत्ताधारी झाल्यानंतर लोकसत्तेला मर्यादा घालून सारे अधिकार आपल्या मुठींत आणायची हुकूमशाही वृत्ति नेत्यांत बळावते असें इतिहासावरून आपणांला दिसतें. नेहरूंचें जनताप्रेम व जनतेच्या क्रांतिशक्ती-वरील विश्वास इतका अढळ आहे, कीं या प्रतिगामी वळणाला ते कधींच जाणार नाहींत ही आज त्यांच्या विरोधकांनासुद्धां आशा वाटते. ज्या जनताजनार्दनानें त्यांच्यावर पुरोगामित्वाचे संस्कार केले तोच त्यांचा अखेरपर्यंत तारक ठरेल.

ooo

: ३ :

# कर्तृत्व ( १ )

मनुष्य जसा बदलतो त्याप्रमाणें त्याच्या भोंवतालचें जगहि बदलत असतें. राष्ट्राच्या जीवनांतले बदल दोन प्रकारचे असतात : एक क्रमविकास पद्धतीनें होणारे आणि दुसरे क्रांतिकारक घटनेमुळें होणारे. हेंच निसर्गाचा दाखला घेऊन स्पष्ट करतां येईल. नदीचें पात्र बदलल्यामुळें भोंवतालच्या प्रदेशांतला भूभाग भिन्न रूप धारण करतो, पण हें रूप त्याला एकाएकीं येत नसून हळूहळू येत असतें. उलट, ज्वालामुखीचा स्फोट झाल्यानें जी उलथापालथ होते ती क्रांतिकारक पद्धतीनें होते. अगदीं थोड्या अवधींत होत्याचें नव्हतें असें होऊन जातें! या दोन्ही पद्धतींनीं इतिहास घडविला जात असतो. आपल्याच देशाचा गेल्या कांहीं वर्षांचा इतिहास पाहिला तर राष्ट्रीय जागृतीमुळें होणारा क्रमविकास आणि युद्धें, फाळणी, गांधीवध इ० क्षोभकारक घटनांनीं झालेले क्रांतिकारक बदल हे दोनहि प्रकार त्यांत दिसतील. सावकाश अथवा एकाएकीं कायापालट करीत राहणाऱ्या इतिहासाशीं जुळवून घेणारे, नवनव्या युगांतल्या अभिनव संगीताशीं संवादी सूर मिळवूं शकणारे महापुरुष हेच चिरकाल नेतृत्वाची धुरा वाहूं शकतात. पं. जवाहरलाल नेहरू अशा महापुरुषांपैकीं होत.

पण केवळ काळाबरोबर आपण बदलायचे एवढेंच करून असे महापुरुष रहात नाहींत. जनतेला नव्या काळाची चाहूल अगोदर लागत नाहीं, आणि नवे बदल पाहून पुष्कळदां जनता गोंधळून जाते. महापुरुष हा पित्याच्या वत्सलतेनें व गुरूच्या कौशल्यानें जनतेला गोंजारून शिकवीत राहतो आणि नव्या काळाचें स्वरूप ओळखण्याची शिकवणहि तिला देत असतो. कधीं कधीं जनतेच्या संदिग्ध

विचारांना त्याला वाचा फोडावी लागते, तर कधीं नव्या कल्पनांना सुबोध रूप देऊन जनमनाला शहाणें करावें लागतें. जवाहरलालनीं हें सर्व आजवर मोठ्या तन्मयतेनें केलें आहे आणि म्हणूनच त्यांच्या नेतृत्वाचें वैभव इतकें दीर्घकाल टिकून राहिलें आहे.

पं. नेहरूंच्या राजकीय जीवनाचे साधारणतः चार खंड पडतात. असहकारितेच्या चळवळीपासून कायदेभंगापर्यंत ( १९२० ते १९३० ) पहिला खंड पडतो. या वेळीं संग्रामांतले सैनिक म्हणून त्यांनीं मुख्यतः काम केलें आणि त्यांत मोठें शौर्य दाखवून भराभर बढती मिळविली. पण या कालखंडाच्या शेवटच्या दोन-तीन वर्षांतच काय तो त्यांनीं स्वतंत्र नेतृत्वाची चुणूक दाखविली. दुसरा कालखंड कायदेभंगाच्या चळवळीनंतर सुरू होऊन दुसऱ्या जागतिक युद्धाच्या आरंभापर्यंत संपतो ( १९३० ते १९३९ ). यांत पंडितजी हे फार प्रभावशाली प्रचारक म्हणून गाजले. काँग्रेसचा, त्याचप्रमाणें अनेक नवीन ध्येयांचा प्रचार त्यांनीं मोठ्या हिरीरीनें केला. एक नवी विचारप्रणाली त्यांनीं देशाला या काळांत शिकविली. दुसरें महायुद्ध सुरू झाल्यापासून स्वातंत्र्य मिळून पंडितजी पंतप्रधान होईपर्यंत ( १९३९–१९४७ ) तिसरा कालखंड येतो; आणि त्यानंतर आतां चौथा कालखंड सुरू आहे. हा कालखंड सुरू होऊन दोनच वर्षे झालीं आहेत. आणि तो लौकर न संपो अशीच कोट्यवधि अंतःकरणांची इच्छा आहे !

१ ऑगस्ट १९२० रोजीं लोकमान्य टिळक दिवंगत झाले आणि म. गांधींनीं असहकारितेची रणभेरी फुंकली. पंडितजींच्या राजकीय जीवनाचा हा उषःकाल होय. बांकीपूरच्या काँग्रेसला ( १९१२ ) ते मोतीलालांबरोबर हजर राहिले होते. हें त्यांनीं पाहिलेलें पहिलें काँग्रेसचें अधिवेशन होय. अमृतसरला ( १९१९ ) खुद्द मोतीलालजीच अध्यक्ष असल्यानें सर्व नेहरू कुटुंबच तेथें गेलें होतें. सर्वांत लहान प्रेक्षक इंदिरा प्रियदर्शिनी ही १॥ वर्षांची असून ती अध्यक्षांच्या कडेवरच होती, असें पंडितजींनीं या सुप्रसंगाचें वर्णन केलें आहे ! बेझंटबाईंबरोबर होमरूल-लीगच्या दौऱ्यावरहि पंडितजी गेले होते. पण काँग्रेसच्या राजकारणाच्या मध्य-प्रवाहांत ते उतरले ते १९२० नंतरच असें म्हणतां येईल. आणि एकदां त्यांनीं तें आपलें ध्येय ठरविल्यानंतर त्यांतल्या साऱ्या यातना व यशापयशें त्यांनीं हंसत-मुखानें पत्करण्याचें ठरविलें.

## " घातली एकदां अतां उडी
## ने बुडव लाव वा पैलथडी "

जवाहरलाल राजकारणांत पडण्याच्या सुमारास पहिलें महायुद्ध संपलें होतें. हिंदी उद्योगधंद्यांना थोडी तेजी आली होती. पण शेतकरी मात्र अंधारांत आपला कांट्याकुट्यांचा खडतर मार्ग आक्रमीत होता ! १९१७ सालीं रशियांत राज्यक्रांति होऊन पहिलें साम्यवादी राज्य उदयास आलें होतें. पण त्याच वेळीं हिंदुस्थान मॉंटेग्यु-चेल्मसफोर्डनीं दिलेल्या निःसत्त्व सुधारणांचा हक्ष घेऊन बसला होता. या वेळच्या स्थितीचें पंडितजींनींच वर्णन केलें आहे :

" नेमस्त वर्गाचा ब्रिटिश सरकार व जमीनदार वर्ग यांच्याशीं दाट ऋणानुबंध होता. जहाल लोक खालच्या मध्यम वर्गाचे प्रतिनिधि होते. लढाईमुळें कारखान्यांचा मजूरवर्ग वाढला होता; पण स्थानिक रीतीनें तो कुठें कुठें थोडा संघटित होता इतकेंच. त्याचें वजन फार नव्हतें. शेतकरी-वर्ग अंधश्रद्ध, गरिबीनें गांजलेला, आपल्या दुर्दैवाला जखडलेला होता. सरकार, जमीनदार, सावकार, अधिकारी, पोलीस, वकील, भिक्षुक हे सर्व या वर्गाची पिळवणूक करित. "

लोकमान्यांनीं आमरण व्यक्तिशः देह झिजवून ' स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे ' हा मंत्र लोकांना दिला. मध्यम वर्ग पुरा जागृत झाला आणि बहुजन-समाज डोळे किलकिले करून पाहूं लागला. पण त्याला संघटित व निर्भय करून साम्राज्यशाहीविरुद्ध लढा देण्यास उभा करणारा नेता पाहिजे होता. ती असामान्य भूमिका गांधीजींकडे आली, आणि ती त्यांनीं फार प्रचंड प्रमाणावर यशस्वी करून दाखविली. जनतेला त्यांनीं धैर्य व संघटना दिली आणि दास, नेहरू, शार्दूलसिंग, खानबंधु, पटेल, देव, देशपांडे, अणे, राजगोपालाचारी, प्रकाशम्, पट्टाभिसीता-रामय्या इ० नेते गांधीजींच्या स्फूर्तीनें प्रांतोप्रांतीं उदयाला आले. त्यांतच नुकतीच तिशी गांठलेले जवाहरलाल पुढें आले.

आपलें त्या वेळचें राजकारण वरिष्ठ वर्गाचेंच होतें असें पंडितजी म्हणतात. पण आपल्या अनुभवाचीं क्षितिजें विस्तृत करण्याची शिकस्त ते याच वेळीं करीत होते असें दिसतें. किसानांच्या झोंपड्यांतून ते हिंडत. त्यांच्या सुख-दुःखांची पूसतपास करीत. आणि या दगदगीनें आपला चेहरा काळवंडला आहे हें

आरशांत पाहतांना त्यांना समाधान व अभिमान वाटे. त्या वेळीं मैदानीं वक्तृत्व करायला जवाहरलाल शिकत होते. त्यांच्या भाषणांतला कित्येक भाग किसानांना कळतहि नसे. पण किसानांच्या अंतश्चक्षूंना पंडितजींच्या हृदयांतली प्रांजलता जरूर दिसे आणि त्यांचीं भाषणें ते किसान भावनोत्कट होऊन ऐकत. त्यांना थोडीफार निर्भयता वाटूं लागली होती आणि ते जागृत होत होते. गांधीजींची असहकारितेची चळवळ किसानांना योग्य तें स्थान देऊनच चालली होती हें खरें; पण असहकारिता आणि किसान चळवळ या दोन चळवळी सर्वस्वीं एक नव्हत्या. मात्र, या दोन चळवळींनीं एकमेकींना बळ दिलें हें खास. किसानांची चळवळ ही जरी आर्थिक होती तरी तिला राजकीय स्वरूप येऊं लागलें; आणि तसें होणें अपरिहार्य होतें. कारण, किसान चळवळ ज्या जमीनदारांविरुद्ध चालवायची ते जमीनदार राजसत्तेचे आधारस्तंभ होते. अर्थात् त्यांच्याशीं तंटा म्हणजे सरकारशीं तंटा हें सहज ओघानेंच येत होतें. असहकारितेंत किसानांना आवाहन होतें आणि गांधीजींनीं खादी-ग्रामोद्योग यांचा पुरस्कार मुख्यतः किसानांच्या कल्याणासाठींच केला होता. पंडितजींनीं आपल्या राजकीय उमेदवारीच्या काळांत या दोन चळवळींतलें सामर्थ्य नीट ओळखलें, आणि अग्रभागीं राहून राजकीय स्वातंत्र्याच्या संग्रामांत नवा आशय आणला. आणि १९२१ च्या डिसेंबरांत पहिल्यानेंच सरकारनें त्यांना जी अटक केली व शिक्षा दिली ती असहकारितेंतल्या तांत्रिक कायदेभंगामुळें होती. पण त्याच वेळीं नेहरू नवें सामर्थ्य राष्ट्रीय चळवळींत आणीत आहेत हें साम्राज्य सरकारला जरूर कळून चुकलें होतें.

नाभा संस्थानांतल्या पीडित प्रजेची हालहवाल पाहावयास जवाहरलाल निघाले असतां त्यांना ( १९२३ ) अटक झाली. पंडितजींच्या कर्तृत्वाच्या एका पैलूचें येथें दर्शन घडतें. संस्थानी गट ही हिंदी राजकीय प्रगतींतली एक मोठी धोंड होती. नेहरू-रिपोर्टांत या विषयावर प्रकरण लिहितांना ' इंडियन् अल्स्टर ' असा सर तेजबहादुर सप्रूंनीं त्याचा उल्लेख केला आहे। मध्ययुगीन अर्थव्यवस्था, जातिवाद, उच्चनीचतेच्या वेडगळ कल्पना, एकतंत्री व वतनदारी राज्यकारभार हीं सारीं प्रतिगामी वैशिष्ट्यें संस्थानांत एकत्र पाहायला मिळत. राजे ख्यालीखुशालींत दंग असायचे. त्यांचे अधिकारी पिळवणूक करण्यांत गुंतलेले असायचे. महाराजांच्या आवडत्या घोड्याची सरबराई अथवा नबाबसाहेबांच्या लाडक्या कुत्र्याचा विवाह हा राज्यांत महोत्सवाचा विषय असायचा। किसान आणि मजूर

यांची स्थिति कित्येक ठिकाणीं जनावरांपेक्षां वाईट होती. पण हीं सारीं सहा-सातशें प्रतिगामी संस्थानें आपल्या राज्याच्या आधारासाठीं ब्रिटिश सरकारनें जतन केलीं होतीं. आणि हीं संस्थानें त्या सरकारकडे आपले पोशिंदे व रक्षणकर्ते म्हणून पाहात होतीं। आपले करारमदार ब्रिटिश सरकारशीं झाले आहेत, आपण आपल्या संस्थानांतल्या प्रजेचें कांहीं लागत नाहीं, अशीच संस्थानिकांची बेपर्वाईची वृत्ति होती. पं. जवाहरलालनीं संस्थानी प्रजेचा प्रश्न हा हिंदी स्वराज्याच्याच प्रश्नाचा एक भाग आहे, हें पहिल्यापासून पटवून दिलें.

> "हिंदी स्वातंत्र्याचें महान् युद्ध एकच आहे. त्याचीं रणक्षेत्रें व कांहीं भूमिका वेगवेगळ्या असतील, पण अनेक ठिकाणीं अनेक स्वातंत्र्ययुद्धें चालूं आहेत असें मुळींच नाहीं."

ही स्पष्ट घोषणा त्यांनीं १९३९ सालीं अखिल भारतीय प्रजापरिषदेच्या अध्यक्षपदावरून केली. पण तत्पूर्वी त्या घोषणेला अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठीं ते झटले. नाभा येथील अटक ही पंडितजींच्या संस्थानविषयक कर्तृत्वाची नांदी होय. "राजे-महाराजांचें अस्तित्व नसलेलें जग मला निर्माण करावयाचें आहे," असें ते म्हणत. हिंदला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संस्थानांचा प्रश्न मोठ्या कौशल्यानें सरदार वल्लभभाईंनीं सोडविला याबद्दल इतिहास या पोलादी पुरुषास योग्य तें श्रेय देईलच. पण संस्थानी प्रजेच्या स्वातंत्र्याचा लढा हा हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्याचाच एक भाग आहे, ही जाणीव संस्थानी जनतेंत गांधी-नेहरूंनीं उत्पन्न केली म्हणूनच वल्लभभाईंचें कार्य सुकर झालें हें विसरून कसें चालेल ?

१९२६ सालीं नेहरू आपल्या रुग्ण पत्नीला औषधोपचारासाठीं युरोपला घेऊन गेले. १९२७ मध्यें दोन घटना विशेष महत्त्वाच्या घडल्या. ब्रुसेल्स येथें जगांतल्या 'दलित राष्ट्रांची परिषद' ( Congress of Oppressed Nationalities ) भरली. हिंदी कॉंग्रेसतर्फे पंडितजी या कॉंग्रेसला हजर होते. एक दिवस त्यांना अध्यक्षपदाचाहि मान मिळाला होता. त्याच वर्षी सोव्हिएट सरकारनें आपल्या रियासतीचा दहावा वाढदिवस साजरा केला, त्याहि समारंभास 'सरकारी पाहुणे' या नात्यानें पंडितजी गेले होते. त्यांच्या राजकीय विचारांना या दोन घटनांनीं कांहीं नवेंच वळण दिलें. अर्जुनानें हिमालयांत जाऊन ज्याप्रमाणें 'पाशुपतास्त्र' मिळविलें, त्याप्रमाणें पंडितजींनीं पुरोगामी विचारांची एक नवी सिद्धीच या वेळीं प्राप्त करून घेतली.

आणि मग ते हिंदुस्थानांत परत आल्यानंतर वेगळीच भाषा बोलूं लागले. या वेळीं आर्थिक मंदीची लाट येऊं लागली होती. कॉंग्रेसच्या राजकारणाची गाडी सनदशीरपणाच्या रुळावर गेल्यामुळें मध्यमवर्गीय उत्साही तरुण अस्वस्थ होत होते. बेकारीची आंच जोराची लागूं लागली होती. " मी जर बेकार असतों तर कदाचित् दहशतवादाचा अवलंब केला असता. " असे उद्गार सर तेजबहादुरांनीं काढले. यावरून नेमस्तांनासुद्धां या वेळच्या वास्तवाचें सारें उग्र रूप कळूं लागलें होतें असें दिसतें. मग त्यांतच होरपळून निघणाऱ्या नवजवान जहालांची काय स्थिति विचारावी! परकीय सत्तेच्या विषाचींच हीं सारीं कटु फळें आहेत हें ठाम पटूं लागलें. याच आगींत तेल ओतण्याकरितां सरकारनें ' सायमन कमिशन ' इकडे पाठविलें. हिंदी राष्ट्रवादाचा हा भयंकर अपमान होता. ' सायमन गो बॅक ' अशा गर्जना सर्वत्र उठल्या, आणि या बहिष्कारपर्वांत तरुणांचें नेतृत्व जवाहरलालांकडे आलें.

या वेळीं पोलिसांच्या लाठीचा प्रसाद नेहरूंना मिळाला. त्या प्रसंगाचें वर्णन करून नेहरू अखेर म्हणतात :

> " आंधळेपणानें आम्ही झगडत होतों. आम्ही कशाकरितां झगडत आहोंत, कुठें चाललों आहोंत हें आम्हांला कळत नव्हतें. प्रत्यक्ष कृतीची धुंदी थोडा वेळ टिके. पण एकदां ती गेली कीं लागलीच प्रश्न पडे— कोणत्या ध्येयासाठीं हें सर्व आहे? कोणत्या? "

या व अशा ध्येयविषयक गोंधळांत तरुणवर्ग तर विशेष सांपडला होता. कोणीं सांगावें, तमोगुणाचा कोप होऊन हा वर्ग कदाचित् श्रद्धाशून्य बनला असता; किंवा हिंसाप्रधान साम्यवादाला त्यानें कवटाळलें असतें! खून किंवा आत्मघात या दोन अनिष्ट टोकांकडून त्याला वळवून, व त्याचें सामर्थ्य युवक-संस्थेंत ( Youth League ) सांठवून लोकसत्ताक समाजवादाकडे तें नेण्याचें महान् ऐतिहासिक कार्य पं. नेहरूंनीं घडवून आणलें. असंतुष्ट जहाल तरुणांना त्यांनीं श्रद्धा दिली. हिंदी राष्ट्रवादांत त्यांनीं समाजवादाचें नवचैतन्य आणलें, आणि समाजवादाला त्यांनीं सत्त्वगुणाची दीक्षा दिली.

या काळांत नेहरू हे तडजोडीच्या धोरणाचे कडवे विरोधक म्हणून सर्व आघाड्यांवर चमकले. पित्यानें परिश्रमपूर्वक तयार केलेल्या नेहरू रिपोर्टाला

त्यांनीं विरोध केला. कारण या रिपोर्टांत ब्रिटिशांचें सार्वभौमत्व गृहीत धरलेलें होतें. मंडलाकार परिषदेच्या ते विरुद्ध होते. मजूर चळवळींतल्या मवाळांशींहि ट्रेड युनियन काँग्रेसमध्यें त्यांनीं अटीतटीनें सामना दिला; आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदावर निवड झाल्यावर (१९२९) आपण समाजवादी आहोंत हें स्पष्टपणें जाहीर करून काँग्रेसमधील उजव्या गटाला एक प्रकारें आव्हान दिलें.

पंडित जवाहरलाल नेहरूंच्या कर्तृत्वाचा दुसरा कालखंड १९३० सालच्या कायदेभंगानें सुरू होतो. यापुढील दहा वर्षें हिंदुस्थानच्या मनोभूमींत त्यांनीं अनेक ध्येयांची मोठ्या मेहनतीनें सजावट केली. संघटना व संग्राम हें जसें कर्तृत्व तसेंच ध्येयकल्पनांचा प्रचार हेंहि मोठें कर्तृत्वच असतें; इतकेंच नव्हे, हें दुसऱ्या प्रकारचें कर्तृत्व जितकें अवघड तितकेंच चिरस्थायी स्वरूपाचें होतें. पंडितजींची बहादुरी अशी कीं, या दोनहि प्रकारच्या कर्तृत्वांत त्यांनीं अग्रेसरत्व मिळविलें.

समाजवाद या ध्येयाला राष्ट्रवादाच्या दरबारांत पंडितजींनीं मानाची जागा अगोदरच मिळवून दिली होती. १९३४ सालीं नाशिकच्या कारागृहांत समाजवादी पक्षाचा जन्म झाला. या पक्षाच्या नेत्यांचे व नेहरूंचे संबंध आज कसेहि असले, तरी या पक्षाच्या जन्मकाळीं नेहरू हेच त्यांच्या स्फूर्तिस्थानीं होते हें कोण विसरूं शकेल? पण एखाद्या पक्षाचा मांड मांडणें एवढाच संकुचित अर्थ नेहरूंनीं या नव्या तत्त्वज्ञानावरून उचलला नव्हता. समाजवाद हें त्यांच्या दृष्टीनें एक संपूर्ण जीवनदर्शन होतें. आणि म्हणूनच कला, अर्थकारण, स्वातंत्र्यसंग्राम, समाजसुधारणा, राज्यघटना इ० सर्वच महत्त्वाच्या जीवनशाखांत समाजवादी दृष्टिकोणानें क्रांतिकारक असे बदल होणें अवश्य आहे, हें ते मोठ्या आग्रहानें प्रतिपादन करीत राहिले. १९३१ सालच्या कराची काँग्रेसच्या अधिवेशनांत त्यांनीं आपल्या या नव्या दृष्टिकोणाचा पुष्कळच प्रभाव पाडला.

पण एका नव्या तत्त्वज्ञानाचा उदय होऊनहि हिंदी राजकारण हें प्राधान्यें-करून राष्ट्रवादीच होतें. काँग्रेसमध्यें अनेक नवे जुने गट एकजुटीनें काम करीत असले तरी काँग्रेसची प्रमुख प्रवृत्ति राष्ट्रवादीच होती. याच वेळीं देशामध्यें जातीयवादाचा आश्रय करूनहि एक प्रतिगामी राष्ट्रवाद पसरत चालला होता. तिकडे युरोपमध्यें पाहिलें तर अमेरिका आणि इंग्लंड, त्याप्रमाणेंच इटली व

ग्रंथसंग्रहालय, वाचनालय

जर्मनी राष्ट्रवादाचीच भाषा बोलत. या राष्ट्रांचा विशेषत: इटली व जर्मनी यांचा, आदर्श डोळ्यांपुढें ठेवून आमच्या देशांतल्या प्रतिगामी प्रवृत्ति, या वंशाभिमान, धर्माभिनिवेश, वतनदारी यांची तरफदारी करीत आपल्या विकृत राष्ट्रवादाचे नगारे वाजवूं लागल्या होत्या ! भोळी जनता गांगरून गेल्यास नवल कोणतें ? दमयंतीच्या स्वयंवराचे वेळीं यम, इंद्र इ० काममोहित देवांनीं नलासारखेंच रूप घेऊन नलाशेजारीं आसन ठोकलें. बिचारी दमयंती हातांत पुष्पमाला घेऊन उभी राहिली; पण सारख्या दिसणाऱ्या अनेक नलांत खरा नल कोणता हें तिला कळेना आणि त्यामुळें तिला कोणाला माळ घालावी हें कळेना ! तसेंच जनतेचें झालें. या वेळीं विकृत प्रतिगामी राष्ट्रवादाचें घातक रूप उघड करून पं. नेहरूंनीं पुरोगामी राष्ट्रवाद कोणता तें स्पष्ट केलें आणि जनतेचा गोंधळ नाहींसा करून तिच्या शक्ति इष्ट दिशेकडे वळविल्या हें त्यांचें महनीय कर्तृत्व होय. देशावर प्रतिगामीपणाची कीड पडून नवीन प्रगतिकारक विचार कोळपून जाऊं नयेत याची सावधगिरी ते घेत होते, आणि याच दृष्टीनें जातीयवादाला त्यांनीं प्राणपणानें विरोध करायचें धोरण ठेविलें. कुठलाहि मुलाहिजा न ठेवतां त्यांनीं सांगितलें :

"खरा जातिवाद भीतीच्या पोटीं जन्म घेतो, तर खोट्या जातिवादाचें मूळ राजकीय प्रतिगामीपणांत असतें......

"जातिवाद म्हणजे तिसऱ्या पक्षाकडून — शासनकर्त्यांकडून — सवलती मिळविण्यासाठीं करावयाची शिकार होय. जातिनिष्ठाला परकीय सत्तेचें वर्चस्व संमत असतें आणि त्या सत्तेचा आपल्या गटाला जास्तींत जास्त फायदा कसा होईल हें तो पाहात असतो. परकीय सत्ता दूर करा, कीं जातिवाद्यांचे मुद्दे व मागण्या एकदम खालीं येतील. परकीय सत्ता आणि जातिवादी गट हे वरिष्ठ वर्गाचे प्रतिनिधि असतात, आणि देशाच्या सामाजिक व राजकीय व्यवस्थेंत मूलभूत फरक करणें त्यांना नको असतें. आपल्या प्रतिष्ठित हितसंबंधांची जपणूक एवढेंच दोघांचें पाहणें असतें."

पंडितजी स्वत: समाजवादी होते तरी जनतेच्या डोक्यावर वरून आपलें तत्त्वज्ञान थापणें इष्ट होणार नाहीं, असें त्यांना वाटे. फुलांतून फळ निघावें

त्याप्रमाणें पुरोगामी राष्ट्रवादांतूनच समाजवाद प्रफुल्लित व्हावा हें त्यांचें प्रतिपादन होतें; आणि यांतच त्यांचें द्रष्टेपण दिसून येतें.

शोकानें मोठीं माणसें अधिक उदात्त व अधिक दूरदर्शी होत असावींत. लखनौ कॉंग्रेसच्या अगोदर पंडितजींच्या प्रिय पत्नी स्वर्गस्थ झाल्या होत्या! पण आपला तो शोकावेग आंवरून कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून (१९३६) पंडितजींनीं जें भाषण केलें तें एक महत्त्वाचा राजकीय दस्तऐवज म्हणून सदैव स्मरणांत राहावें असें आहे. वर सांगितलेल्या कल्पनांचा त्यांत परिपाक उतरला आहे. समाजवाद हें आपण हृदय आणि बुद्धि यांनीं पत्करलेलें तत्त्व आहे, हें या भाषणांत पंडितजींनीं पुनः एकदां स्पष्ट केलें. जगांत हुकूमशाही शक्ति संघटित होत आहेत आणि स्वातंत्र्योन्मुख हिंदुस्थाननें आपल्या राजकीय शक्ति लोकसत्तेच्या बाजूनें उभ्या केल्या पाहिजेत हें त्यांनीं पटवून दिलें. पाश्चात्य राष्ट्रांचा आक्रमक राष्ट्रवाद ही त्यांतल्या भांडवलशाहीची अखेरची धडपड आहे, तर आपला राष्ट्रवाद हा स्वातंत्र्य व स्वयंनिर्णय या कल्पनांनीं पुष्ट व म्हणूनच पुरोगामी आहे असा निर्वाळा दिला. पुढें झालेल्या अनेक घटनांचे अंदाज व उद्भवलेल्या प्रश्नांची चिकित्सा या अप्रतिम वक्तव्यांत येऊन गेली आहे.

याच भाषणांत घटनासमितीचा उल्लेख पंडितजींनीं पुनः नव्या उत्साहानें केला. १९३३ सालीं जातिवादाविरुद्ध पहिली तोफ पंडितजींनीं डागली होती; तीविरुद्ध परमानंद, मुंजे, इक्बल वगैरे हिंदु-मुस्लिम महारथींनीं केवढे प्रतिहल्ले चढविले ! त्याच वेळीं घटनासमितीच्या भट्टींत हा सर्व वाद घालावा असें आव्हान पंडितजींनीं दिलें होतें. लखनौच्या अध्यक्षपदावरून याच कल्पनेला त्यांनीं पुनः उजळा दिला, व हिंदी राजकारणांत प्रबळ विचारांचा विद्युत्प्रवाह सोडला.

> "माझी अशी खात्री आहे कीं, आपल्या राजकीय व जातीय समस्यांची तड आपणांला घटनासमितीच्याच साह्यानें लावतां येईल. मात्र ही समिति जनतेच्या आधारावर आणि प्रौढ मतदानपद्धतीनें निवडली गेली पाहिजे."

लखनौनंतर पहिली खेड्यांतली कॉंग्रेस महाराष्ट्रांत फैजपूर येथें भरली. हें कॉंग्रेसचें सुवर्णमहोत्सवाचें अधिवेशन होतें. 'आनंदवनभुवनां'त झालेल्या या अपूर्व सोहळ्याचें नेतृत्व पुनः पंडितजींकडेच आलें. त्याहि वेळीं वरील कल्पनांचा विस्तार त्यांनीं केला.

यानंतर १९३७ सालीं कॉंग्रेसनें प्रांतिक कायदेमंडळांत निवडून येण्यासाठीं देशव्यापी मोहीम सुरू केली. कौन्सिलच्या सनदशीर व मवाळ मार्गांत नेहरूंचें मन रमण्यासारखें नव्हतें; पण त्यांचें लोकशाहीवरचें प्रेम इतकें अढळ होतें कीं, कॉंग्रेसनें घेतलेला निर्णय त्यांनीं शिरसावंद्य मानला, आणि सर्व देशभर प्रचारासाठीं दौरा काढला. त्यांत निवडणुकीचा प्रचार हा हेतु जरी त्यांना मनापासून रुचला नसला, तरी दुसरें एक जबरदस्त आकर्षण होतें. या निवडणुकीच्या निमित्तानें जनतेच्या अंतरंगापर्यंत पोंचण्याची पर्वणी त्यांना लाभणार होती. आणि म्हणूनच त्यांचें मन या कार्यांत ओढलें गेलें. ५०००० मैलांचा प्रवास त्यांनीं केला. सायकल, बैलगाडी, नाव, आगबोट, मोटार, रेल्वे, विमान, इ० सारीं उपलब्ध साधनें या प्रवासांत त्यांनीं वापरलीं ! कित्येकदां पायींहि जावें लागे ! मोटारींत दूरध्वनिक्षेपकाची व्यवस्था असे आणि सकाळपासून रात्रीपर्यंत हजारों लोकांच्या दहा दहा सभांत वाटेनें बोलावें लागे. कोट्यवधि भाविक लोकांनीं मुग्ध होऊन या भारतहृदयसम्राटाचे तळमळीचे बोल ऐकले ! याच प्रवासांत भारतीय एकतेचें दर्शन पंडित जवाहरलालांना झालें. कोट्यवधि क्षीण व प्रेमळ नेत्रांतून त्यांना भारतीय जनतेच्या अंतःकरणांतल्या एकत्वाचा साक्षात्कार झाला. सूर्य ज्याप्रमाणें आपला किरणसंभार घेऊनच संचार करतो, त्याप्रमाणें आपल्या पुरोगामी ध्येयवादाच्या शलाका घेऊन पंडितजी हिंदच्या कानाकोपऱ्यांत गेले आणि झोंपडी-झोंपडींत त्यांनीं नवीन प्रकाश पाडला.

निवडणुकी संपल्या आणि बहुसंख्य प्रांतांत कॉंग्रेसचें मर्यादित अधिराज्य सुरू झालें. प्रांतिक कायदेमंडळांतून घटनासमितीचा ठराव पास करून पंडितजींनीं पुनः एकवार त्या ध्येयाची उजळणी करावयास लावलें. लोकशाही हा समाजवादाचा प्राण म्हटलें तर नागरिक हक्क हा त्याचा प्राणवायु म्हणतां येईल. ह्याचें महत्त्व लोकांना पटवून त्याविषयीं जागृति करण्याकरितां नेहरूंनीं नागरिक हक्कसंरक्षक मंडळाची रचना केली. आणि यांत संकुचित पक्षाभिमानाला जागा न उरावी म्हणून त्याचें स्वरूप सर्वपक्षीय केलें. याच वेळीं पंडितजींनीं दुसऱ्या एका प्रचंड उपक्रमाला आरंभ केला. तो उपक्रम अद्यापि चालू आहे आणि कदाचित् तो सुफलित होण्यास कालावधि लागेल. पण एका राष्ट्रोपयोगी कल्पनेची भक्कम मुहूर्तमेढ पंडितजींनीं रोंवली याबद्दल राष्ट्रानें त्यांना कृतज्ञ राहिलें पाहिजे. राष्ट्रीय नियोजन ( National Planning ) ही ती कल्पना होय. या वेळीं

बाबू सुभाषचंद्र बोस हे राष्ट्राध्यक्ष होते. बाबूंची दृष्टिहि विशाल असल्यानें हिंदी उद्योगधंद्यांची प्रगति व्हावयाची असेल तर कांहीं राष्ट्रव्यापी योजना आंखणें जरूर आहे हें त्यांनाहि पटलें. खाजगी मालकीवर नियंत्रण हें योजनाबद्ध अर्थ-व्यवस्थेंत शक्य असतें; आणि योजनाबद्ध अर्थव्यवस्थेशिवाय प्रत्येक व्यक्ति सुखी होणें अशक्य असतें. राष्ट्रीय संयोजन समितीची स्थापना होऊन पंडितजी तिचे अध्यक्ष निवडले गेले.

पंडितजींनीं नियोजन म्हणजे काय हें स्पष्ट करतांना म्हटलें :

> "राष्ट्राला प्रातिनिधिक असणाऱ्या संस्थांनीं आपल्या सामाजिक गरजा लक्षांत घेऊन आर्थिक वांटणी, उत्पादन, व्यय, व्यापार या सर्वांत जी एक सुसंगत तांत्रिक योजना निःपक्षपाती तज्ज्ञांच्या साह्यानें आंखलेली असते, तिला लोकशाहींत नियोजन म्हणतात."

या समितीची पहिली बैठक १८ डिसेंबर १९३८ रोजीं भरली.

पक्षनिष्ठेच्या संकुचित विचारांत न सांपडतां देशांतल्या सर्व पक्षांच्या, स्वतंत्र विचारांच्या तज्ज्ञांचें साह्य पंडितजींनीं घेतलें. या समितीमुळें राष्ट्रीय नियोजन या कल्पनेविषयीं लोकांत जाणीव व जागृति निर्माण झाली, आणि समितीनें केलेलें संशोधन व घेतलेले श्रम ही राष्ट्राची महत्त्वाची ठेव होऊन राहिली आहे. योग्य वातावरणांत ही ठेव वापरण्यासाठीं निघाली म्हणजे ह्या राष्ट्राच्या समृद्धीला पारावार राहणार नाहीं. तो दिवस केव्हां उजाडायचा असेल तेव्हां उजाडो ! पण तो उजाडण्यासाठीं ज्यांनीं उग्र तपश्चर्या केली त्यांत जवाहरलालजींचें नांव प्रथम आहे हें कोण बरें विसरेल !

१९३९ साल हें मोठें खळबळीचें ठरलें. याच वर्षीं त्रिपुरी काँग्रेस भरली. सुभाषचंद्रांनीं पूर्वपरंपरा सोडून अध्यक्षीय निवडणूक लढविली आणि डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांचा पराभव करून ते निवडून आले ! डावे गट व उजवे गट असा तंटा माजला ! संयुक्त नेतृत्वाच्या मूर्तीला तडा गेला ! उजव्या गटांनीं सुभाषचंद्रांच्या नेतृत्वाला शह देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. पं. नेहरूंच्या तत्त्व-निष्ठेची या वेळीं पुरेपूर कसोटी लागली. उजव्या गटाला त्यांच्या आधारावांचून उणेपणा येत होता. डावा गट तर त्यांच्याकडे फार आशेनें पाहात होता. या वेळीं आपली खंबीर भूमिका न सोडतां व सवंग लोकप्रियतेच्या आहारीं न

जातां संयुक्त नेतृत्वाचा पुकारा नेहरूंनीं केला. साम्राज्यशाही विरुद्ध आपला तंटा आहे, जुन्यांचा अनुभव व जनतेवरील त्यांचें वजन आणि नव्यांचा उत्साह व पुरोगामित्व यांचा संयोग होणेंच जरूर आहे हें त्यांनीं आग्रहानें प्रतिपादन केलें. या वेळच्या त्यांच्या लेखनांतले कांहीं महत्त्वाचे उतारे पाहा. अद्यापिहि त्यांतला आशय मार्गदर्शक होण्यासारखा आहे.

" मोठ्या संस्थेंत मतभेदाच्या छटा अवश्य असाव्यात, परंतु पुन्हां त्या एका सांखळींत सांधलेल्याहि असल्या पाहिजेत. काँग्रेसमध्यें स्थूल मानानें दोन मोठ्या फळ्या आहेत; ( पण जहाल व मवाळ अशीं नांवें त्यांना देतां येणार नाहींत. ) एक गांधीवादी, दुसरे आपणांला आधुनिक ( Modernist ) समजणारे. हे शब्द चपखल किंवा अचूक आहेत असें नाहीं. कारण त्यायोगें गांधीवाद म्हणजे कांहीं जीर्ण व मुदतीबाहेर गेलेला पंथ आहे असा समज होतो. उलट, खरें पाहिलें तर गांधीवाद हा अगदीं आधुनिक आहे, आणि कांहीं बाबतींत तर तो आधुनिक काळाच्याहि पुढें आहे. मात्र, पाश्चात्य आधुनिकपणापेक्षां तो वेगळा आहे. आणि त्यांत कांहीं धार्मिक छटा मिसळलेल्या असल्यानें विज्ञानाच्या आधारावर चाललेल्या आजच्या उत्कृष्ट युरोपीय विचारांशीं त्याचें जुळत नाहीं......परंतु गांधीवादी तंत्राचा आधुनिक शुद्ध शास्त्रीय दृष्टीनें विचार होऊन तें विज्ञानाच्या भूमिकेवर कां आणतां येऊं नये, कळत नाहीं.

"( काँग्रेसमध्यें ) जे आपणांला आधुनिक म्हणवतात त्यांत वेगवेगळ्या पंथांचे समाजवादी आणि विज्ञान व प्रगति यांवर संदिग्धपणें बोलणारे पुढारी यांचा समावेश होतो. त्यांतले कित्येक जुन्यापुराण्या राष्ट्रवादाचे अवशेष आहेत आणि विज्ञानशास्त्रें किंवा प्रगति यांच्याशीं त्यांचा कसलाहि संबंध नाहीं.

" म्हणून हे दोन स्थूल विभाग उजवे ( Rightist ) व डावे ( Leftist ) म्हणतां येणार नाहींत. दोनहि पक्षांत उजवे डावे आहेत.

" कांहीं समाजवादी लोक जुन्या पुढाऱ्यांना उखडून त्या जागीं नवें नेतृत्व प्रस्थापित करण्याची भाषा उघडपणें बोलतात, आणि हें कार्य करण्यासाठीं दैवानें आपली योजना केलेली आहे असें त्यांना वाटतें.

स्थानिक काँग्रेस कमिट्यांतून आपले उमेदवार निवडून आणण्याचा हे प्रयत्न करतात. त्यामुळें असा समज होतो कीं, या समित्यांचा ताबा घेऊन त्या चालविण्याचा यांनीं मनसुबा केला आहे. लोकशाहीच्या दृष्टीनें त्यांना तसा अधिकार आहे, पण त्यांचे प्रयत्न व त्यांचें तंत्र त्यांच्याविरुद्ध जातें आणि तटस्थ पक्ष बिचकून त्यांच्याविरुद्ध असलेल्या फळीमध्यें जाऊन उभे राहतात. अशा रीतीनें ज्यांना समाजवाद खरोखर पटायचा, असेच तिऱ्हाईत लोक दूर लोटले जाऊन त्याचे वैरी बनतात. " मी स्वतः जुने पुढारी आणि नवे समाजवादी पंथ यांच्यांतलें अंतर नाहींसें करण्यासाठीं झटत असतों आणि दोनहि पक्षांत मला प्रवेश असल्यानें या कामीं मी थोडाबहुत लायक आहें असें वाटतें. माझी अशी खात्री झाली आहे कीं, हिंदुस्थानला या दोन पक्षांतल्या कोणालाहि वगळून चालणें शक्य नाहीं, आणि या दोन पक्षांत साम्राज्यशाहीविरुद्ध लढण्यांत एकोपा कां होऊं नये याचें सयुक्तिक कारण मला तरी दिसत नाहीं. जुने पुढारी हे अनुभवी असून त्यांना बहुजनसमाजांत प्रतिष्ठा व वजन आहे आणि अनेक वर्षें स्वातंत्र्यसंग्रामाचें नेतृत्व त्यांनीं केलेलें आहे. त्यांना मवाळ किंवा उजवे म्हणतां येणार नाहीं. राजकीयदृष्ट्या ते कडवे डावे आणि कट्टे साम्राज्यविरोधी आहेत.

" संयुक्त नेतृत्व हा शब्दप्रयोग संदिग्ध वाटतो. आणि त्याचा पुष्कळदां दुरुपयोगहि केलेला आढळतो. युरोपांत ' संयुक्त नेतृत्व ' प्रभावी ठरलें नाहीं आणि त्यानें कडवटपणा उत्पन्न करून ठेवला. पण हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, तेथले मतभेद हे अधिक मूलगामी होते. उलट, चीनमध्यें एकेकाळचे एकमेकांचे कट्टे विरोधक कंपू आज उत्कटतेनें सहकार्य करतांना आढळतात. राष्ट्रीय संकटानें त्यांना एकत्र येण्यास भाग पाडलें. आपण आगामी संकटाबद्दल कमी सावध आहोंत काय ?......

" आज डावा गट विध्वंस करूं शकेल, रचना करूं शकणार नाहीं. डावे पुढारी अद्यापि नुसता असंतोष पसरविण्याच्या नादांत आहेत. पण त्यांना हें कळत नाहीं कीं, काँग्रेस आणि राष्ट्रीय चळवळ ही आतां खूप वाढली असून अधिकारवाणीनें व जबाबदारीनें बोलण्याचा दर्जा तिला प्राप्त झाला आहे. "

या वादळाची धूळ थोडी बसते न बसते तोंच दुसऱ्या महायुद्धाच्या रणभेरी वाजल्या आणि जग हादरून गेलें! चिनी स्वातंत्र्यवाद्यांना धीर द्यायला पंडितजी चुंकिंगला गेले होते. तेथून हिंदी राष्ट्रनेत्यांनीं लगोलग परत येण्याची विनंती केली आणि त्याप्रमाणें ते परतले. यापुढें त्यांनीं प्रसृत केलेल्या ध्येय-कल्पना साकार करण्याचें सामर्थ्य त्यांना येणार होतें. येथूनच त्यांच्या कर्तृत्वाचा तिसरा कालखंड सुरू झाला.

०००

: ४ :

# कर्तृत्व (२)

युद्धांत पहिला वध सत्याचा होतो असें कुणींसें म्हटलें आहे! सत्याबरोबरच न्यायालाहि सुळीं देण्यांत येतें. मानवी जीवनांत कांहीं तरी अनैसर्गिक क्रिया सुरू होऊन जीवनाचा समतोलपणा पार बिघडून जातो. टाकाऊ गोष्टींना महत्त्व येतें आणि उच्च जीवनमूल्यांना वाईट दिवस येतात. हें होत असतांनाच सारें जीवन तळापासून ढवळून निघत असतें. १९३९ सालीं युरोपांत दुसरें महायुद्ध सुरू झालें तेव्हां हेच परिणाम हिंदुस्थानांत होऊं लागले होते!

हिंदुस्थानच्या प्रातिनिधिक संस्थांना न विचारतां व्हाइसरॉय लॉर्ड लिन्लिथगो यांनीं हिंदुस्थानला युद्धांत गोवूनहि टाकलें! हा राष्ट्रीय अपमान होता, आणि म्हणूनच कॉंग्रेसनें प्रांतिक मंत्रिमंडळें ताबडतोब सोडलीं. पण देशांतले नरम पक्ष या युद्धाच्या घटनेकडे आशेनें पाहूं लागले. समरविद्येंत पारंगत होण्याची ही सुसंधि दवडूं नये असें महासभा–नेते सांगूं लागले! इंग्लंड नाझींच्या क्रूर हुकूमशाहीविरुद्ध लढतें आहे, तेव्हां हें युद्ध लोकशाहीसाठीं आहे व आपण इंग्लंडच्या बाजूनें नाझिवादाला सामना दिला पाहिजे, असें एम्. एन्. रॉयसारखे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे विचारवंत प्रतिपादन करूं लागले! पुढें रशिया इंग्लंडच्या बाजूनें पडल्यावर हें युद्ध 'लोकयुद्ध' असल्याचा साक्षात्कार कम्युनिस्ट पक्षाला झाला! युद्धामुळें येणाऱ्या कृत्रिम तेजीमुळें ज्यांचें उखळ पांढरें होणार होतें, त्यांनीं अर्थातच सरकारला कायावाचामनें साह्य करायचें ठरविलें!

जनता भांबावून गेली होती आणि कॉंग्रेसकडे नेतृत्वाच्या आशेनें पाहात होती! म. गांधी या युद्धाचे कट्टे विरोधक होते. हें युद्ध हिंसात्मक होतें आणि

कुणाचे हेतु कितीहि चांगले असोत, साधनें जर हिंसात्मक असतील तर गांधीजींचें सहकार्य मिळणें मुळींच संभवनीय नाहीं हें सर्वांनाच ठाऊक होतें. पण गांधीजींच्या या अलौकिक व परमोच्च भूमिकेवर कॉंग्रेसला चढणें शक्य होणार नव्हतें. कॉंग्रेसनें युद्धांत सामिल होणें हें स्वाभिमानाला धरून झालें नसतें. पण कॉंग्रेसनें युद्धाविषयीं उदासीन राहणें म्हणजे कॉंग्रेसनें आपल्या देशीविदेशी हितशत्रूंना टीकेला जागा करून देण्यासारखें होतें. कारण, त्यायोगें कॉंग्रेस नाझी-फॅसिस्टांना अप्रत्यक्ष रीतीनें मदत करीत आहे असा डांगोरा पिटायला विघ्नसंतोषी लोक जगभर तयार होऊन बसले होतेच! अशा वेळीं पंडितजींनीं आपल्या प्रज्ञेनें या पेंचप्रसंगांतून नेमका मार्ग काढला, आणि देशाचे व पुरोगामी जगाचे धन्यवाद मिळविले.

१४ सप्टेंबर १९३९ रोजीं हिंदी कॉंग्रेसनें एक विस्तृत ठराव केला. त्यांत म्हटलें होतें :

> “ या युद्धानें जर ‘ जैसे थे ’ हीच परिस्थिति कायम राह्यची असेल, साम्राज्यवादी वतनें, वसाहती, वतनदारांचे हितसंबंध हे सर्व जर कायम राहणार असतील तर हिंदुस्थानला या युद्धाशीं कांहीं कर्तव्य नाहीं. पण लोकशाही व लोकशाहीवर आधारलेलें जग ही जर भूमिका असेल तर हिंदुस्थानला अर्थातच या युद्धांत पुष्कळच लक्ष घालावयाचें आहे. कामिटीची खात्री आहे, कीं हिंदी लोकशाहीचा ब्रिटिश अथवा जागतिक लोकशाहीशीं संघर्ष नाहीं. पण फॅसिझम् व साम्राज्यवाद यांच्याशीं मात्र हिंदी लोकशाहीचा जरूर विरोध आहे. म्हणूनच ग्रेट ब्रिटन जर लोकशाही-साठीं लढणार असेल तर आपल्या छायेखालीं असलेल्या देशांतल्या साम्राज्यशाहीचें त्यानें विसर्जन केलें पाहिजे...स्वतंत्र झालेला लोक-सत्ताक हिंदुस्थान आक्रमणाविरुद्ध संरक्षण व आर्थिक सहकार्य या कामीं इतर स्वतंत्र राष्ट्रांशीं जरूर हातमिळवणी करील...या युद्धानें जगाचें आर्थिक, सामाजिक व राजकीय स्वरूप चांगलें म्हणा किंवा वाईट म्हणा, पण आमूलाग्र बदलणार आहे. मागल्या युद्धापासून वाढलेले विरोध व संघर्ष यांचा चालू युद्ध हा अपरिहार्य परिणाम आहे, आणि ते विरोध व संघर्ष नष्ट होऊन नवा समतोल प्रस्थापित झाल्यावांचून युद्धाचा खऱ्या अर्थानें शेवट होणार नाहीं. ”

या ठरावांत घेतलेली शुद्ध, स्वाभिमानी, प्रगतिपर व उदात्त भूमिका जगांत फार वाखाणली गेली. हा ठराव नेहरूंनींच लिहिला होता आणि यांतला प्रत्येक शब्द कलावंताप्रमाणें वापरला आहे अशी प्रशंसा गांधीजींनीं केली.

कलावंत! किती समर्पक शब्द योजला होता गांधीजींनीं! पंडितजींचें हृदय खरोखरच कलावंताचें नाहीं का? जनमनाला आकलन होणारा विलासच कलावंत आपल्या कृतींत दाखवितो; आणि त्यांत अगदीं जें नवीन असतें त्यामुळें लोक चकित झाले तरी त्यांना तें संभाव्य वाटतें. कलावंत जी सृष्टि निर्माण करतो ती अद्भुत तर वाटतेच, पण तींत हिंडतांना परिचितासारखा मोकळेपणाहि वाटतो. ज्या आपल्या यातना आपणांस समजतात त्यांना कलावंत साकार करतो आणि ज्या गूढ किंवा संदिग्ध असतात त्यांनाहि मूर्तरूप देतो. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं हींच महनीय कामगिरी पंडितजींनीं केली. हिंदी जनतेला युद्धापासून अलिप्त राहणें अशक्य वाटत होतें, पण युद्धसहकाराविषयीं उत्साह नव्हता. नाझींचा पराभव व्हावा असें मनापासून वाटत होतें, पण हें लोकशाही युद्ध आहे असें म्हणावयाला मन तयार होत नव्हतें. अशा वेळीं जनतेच्या त्या साऱ्या मानसिक गोंधळाला वाचा फोडून पं. नेहरूंनीं एक नवी पण पटणारी ध्येयप्रणाली उभी केली. या दृष्टीनें गांधीजींनीं त्यांना दिलेली 'कलावंत' ही पदवी सार्थ होत नाहीं काय?

कॉंग्रेसच्या ठरावांतील आशय त्यांनीं पुढें (जाने. १९४०) एकदां अधिक विशद केला.

> "साम्राज्यशाहीचा गाडा चालू आहे व ना तसाच अबाधित राखण्याचें धोरण आहे हें स्पष्ट आहे. हिंदुस्थान अर्थातच त्यांत सहभागी होणार नसल्यानें तो महायुद्धापासून अलिप्त राहिला आहे......... साम्राज्यशाहीचें विसर्जन करून हिंदुस्थान हा स्वतंत्र देश आहे हें मान्य केलें गेलें पाहिजे."

याच वक्तव्यांत पंडितजींनीं साध्य-साधन-शुचितेची भूमिकाहि स्पष्ट केली.

> "राजकारणांत नैतिक मूल्यें सर्वस्वीं आचरणांत आणण्याचे बाबतींत आम्ही बरेच वेळां अपेशी ठरलों असलों, तरी आमच्या राजकीय चळवळींचीं हींच मूल्यें अधिष्ठान आहेत. जगांत आपणांला अनेक वेळां

अपेश आलेलें आहे. पण हें युद्धसुद्धां कोणतेंहि उदात्त हेतु पुढें न ठेवतां जुन्या साम्राज्यशाही मार्गानेंच लढलें जाणार असेल आणि जर त्यामुळें जागतिक किंवा मानवी स्वातंत्र्याच्या दृष्टीनें मूलभूत बदल घडून येणार नसतील, तसेंच त्यामुळें युद्धाचीं आणि मानवी अधोगतीचीं मूळ कारणेंच नष्ट होणार नसतील तर तो एक अनर्थच ठरेल. हा अनर्थ टाळावा म्हणून हिंदुस्थानचा प्रयत्न आहे."

हा उदात्त दृष्टिकोण नेहरूंना एकदम अंतःस्फूर्तीनें आला नव्हता. त्याच्यामागें अनेक दिवसांच्या सहृदय चिंतनाची तपश्चर्या होती. १९३८ मध्यें युरोपमधील संचारांत पंडितजींना दुसऱ्या महायुद्धाची चाहूल ऐकूं येत होती. या पंडितजींच्या दौऱ्यांत कांहीं झेक लोकांनीं पंडितजींना विचारलें होतें कीं, "हिटलरनें उद्यां युद्धाचा बॉंब पेटविला तर हिंदुस्थान काय करील?" यावर पंडितजींनीं जें उत्तर दिलें तें पुढें कॉंग्रेसनें केलेल्या युद्धविषयक ठरावांतल्या आशयाचेंच होतें. त्या झेक लोकांना त्याचें पूर्ण रहस्य त्या वेळीं कळलें नाहीं; पण एवढें मात्र खरें कीं, ही कांहीं नवीन पण चिंतनीय अशी भूमिका आहे एवढें त्यांना उमगलें.

तिकडे नाझी-फॅसिस्टांच्या जुलमी टांचांखालीं हळूहळू युरोपांतलीं सर्व राष्ट्रें भरडलीं जात होतीं. लोकसत्ताप्रेमी माणसांना दररोज अधिकाधिक चिंता लागत चालली होती. इकडे हिंदुस्थानांत हिंसात्मक युद्धाला विरोध दर्शविण्यासाठीं वैयक्तिक सत्याग्रहाचा लढा गांधीजींनीं सुरू केला. यांत सरकारच्या युद्धप्रयत्नांना खीळ घालण्याचा उद्देश मुळींच नव्हता. जगांतल्या हिंसात्मक संग्रामाची निष्फलता दाखविणें एवढेंच कार्य गांधीजींना साधायचें होतें, आणि त्याबरोबर हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्नहि पुढें न्यायचा होता. पण सरकार एवढा उदात्त विचार जाणण्याच्या मनःस्थितींत थोडेंच होतें! कंसाप्रमाणें जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं त्याला आपल्या हंतकाचीच मूर्ति दिसत होती. वैयक्तिक सत्याग्रहाविरुद्ध सरकारी दडपशाहीचा वरवंटा फिरूं लागला. या सत्याग्रहांत पंडितजींनीं भाग घेण्याच्या पूर्वींच बिथरलेल्या सरकारनें त्यांना पकडून चार वर्षांची शिक्षा ठोठावली (आक्टो. १९४०)! आपण लोकशाहीसाठीं झगडत आहों असें दिमाखानें सांगणाऱ्या सरकारनें लोकसत्तेच्या सर्वांत मोठ्या भक्ताला कारागृहांत कोंडलें! लोकशाहीची याहून विटंबना दुसरी कोणती असणार?

पण युद्धाला आणखी भयानकपणा आला. जपाननें १९४१ च्या शेवटीं नाझी-फॅसिस्टांच्या बाजूनें या युद्धांत उडी ठोकली. सिंगापूरचा पाडाव इतक्या अल्पावकाशांत जपानी सैन्यानें केला, कीं इंग्रज साम्राज्यशाहीचें धाबें दणाणून गेलें. नेहरूप्रभृति नेत्यांना सरकारनें मुक्त केलें आणि युद्धसहकार्यासाठीं हिंदी राष्ट्रसभेची पुनः एकदां आळवणी सुरू झाली. सर स्टॅफोर्ड क्रिप्स् या भल्या इंग्रज गृहस्थाची या कामावर नेमणूक करण्यांत आली. हे गृहस्थ उदारमतवादी, गांधी-नेहरूंचे चाहते, शाकाहारी, शिष्टाईपटु म्हणून गाजलेले होते. पण यांनीं जी सहकार्यासाठीं म्हणून योजना आणली होती तिनें मात्र सर्वांची निराशा झाली ! गांधीजींनीं तर आपल्या तीन साडेतीन तासांच्या मुलाखतींत पहिल्या पांच मिनिटांत क्रिप्स्साहेबांना आपणांस ही योजना सपशेल नापसंत असल्याचें सांगितलें आणि नंतर बाकी सर्व वेळ आपल्या व क्रिप्स्साहेबांच्या आवडत्या आहारशास्त्रावर चर्चा केली ! शीख, हिंदुसभा, मुस्लिम लीग इ. पक्षांनींहि या ना त्या कारणानें क्रिप्स्-योजना झिडकारली. या योजनेंत युद्ध संपल्यानंतर हिंदला स्वराज्य देण्याची घोषणा होती, एकाहून अधिक तुकडे या देशाचे पाडावेत अशी मखलाशी होती; आणि युद्धकाळांत कुठलेहि जादा हक्क न देण्याची व्यवस्था होती. 'आम्हांला आजच्या घटकेच्या समस्यांचा मुख्यतः विचार करायचा आहे. भविष्यांतील योजनासुद्धां आजच्या काळाला अनुलक्षूनच आम्ही पारखून घेणार आहोंत.' असें स्पष्टपणें त्यावेळचे राष्ट्राध्यक्ष मौलाना अबुल कलम आझाद यांनीं क्रिप्स्साहेबांना कळविलें.

क्रिप्स्साहेबांशीं झालेल्या वाटाघाटींत जवाहरलालांची उदात्त विचारसरणी आणि मुत्सद्देगिरी दोन्ही कसाला लागल्या. क्रिप्स्–योजना झिडकारणें क्रमप्राप्तच होतें. पण पं. नेहरूंनीं सहकार्य करण्यासाठीं जेवढें म्हणून उदार धोरण स्वीकारायला पाहिजे होतें तेवढें स्वीकारून पाहिलें. 'या वेळीं माझ्या आयुष्यांत जास्तींत जास्त कडू गोळ्या मीं गिळल्या' असें नेहरूंनीं पुढें एकदां म्हटलें. पहिल्यानें राष्ट्रीय सरकारचे बरेच अधिकार हिंदी लोकांना मिळतील अशी योजना क्रिप्स्नीं सांगितली. संरक्षण सोडून सर्व खातीं संपूर्णपणें हिंदी मंत्र्यांच्या हातीं देण्यांत येतील असें क्रिप्स् म्हणाले. आणि संरक्षणाचे बाबतींतसुद्धां हिंदी संरक्षणमंत्र्याचा सल्ला वारंवार घेतला जाईल अशी त्यांनीं पुष्टि जोडली. वाटाघाटी यशस्वी होणार असें वाटलें; पण कुणीकडून कळ फिरली न कळे; क्रिप्स्नीं पहिल्या बोलण्याला

सपशेल हरताळ फांसला. व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळांत चार हिंदी गृहस्थ अधिक नेमणें व लष्कराच्या भटारखान्यावर देखरेख ठेवण्याचा अधिकार संरक्षण-मंत्र्यांना देणें याखेरीज कांहींच करावयास सरकार तयार नाहीं असें दिसून आलें! अर्थात् काँग्रेसनें क्रिप्स्-योजना नाकारली. लगेच दुसरे दिवशीं क्रिप्स्नीं विमानांत बसून स्वगृहीं प्रयाण केलें. तिकडे 'क्रिप्स्, हॅलिफॅक्स् आणि मंडळी' काँग्रेसनेत्यांच्या धोरणाचा विपर्यास करून गांधी व काँग्रेस यांवर ठपका देऊं लागली. गांधीजींच्या दुराग्रहामुळेंच क्रिप्स्-योजना काँग्रेसनें झिडकारली, काँग्रेसचा असहकार म्हणजे जर्मन व जपानी हुकूमशाहीला अप्रत्यक्ष मदतच आहे असा अपप्रचार सुरू झाला! पण काँग्रेसनें युद्धाचे कामीं स्वीकारलेली उच्च भूमिका व नेहरूंनीं क्रिप्स्शीं वाटाघाटी करतांना प्रकट केलेली प्रांजलता यांमुळें हिंदनिंदकांचे हे आरोप सपशेल खोटे आहेत हें जगाला सहजच कळून चुकलें.

क्रिप्स्-शिष्टाई फोल झाली. युद्धाचा वणवा तर चोंहींकडे फैलावत चालला होता. युद्धप्रयत्नांत अडथळा आणायचा नाहीं एवढें व्रत काँग्रेसनें कसोशीनें प्रथमपासून पाळलें. पण ही निष्क्रियता किती दिवस परवडणार? युद्धानें जगाचें स्वरूप पालटलें तरी हिंद आहे त्याच स्थितींत राहणार ही कल्पना बळावत चालली, आणि तीबरोबर असंतोष वाढत गेला. गांधीजींना हें सर्व दिसत होतें. अखेर 'इंग्रजांनों, या देशांतून चालते व्हा' ही सुप्रसिद्ध घोषणा त्यांनीं केली! हिंदुस्थानांत पुनः एकदां चैतन्य आलें! ९ ऑगस्ट १९४२ रोजीं मुंबई येथें भरलेल्या ऑ. इं. काँ. च्या त्या इतिहासप्रसिद्ध सभेंत 'छोडो भारत' ठराव पास झाला! त्याच रात्रीं गांधी, नेहरू इ. प्रसिद्ध नेत्यांना अटक करून सरकारनें तुरुंगांत टाकलें! पं. नेहरू काँग्रेस वर्किंग कमिटीच्या इतर सदस्यांसह अहमद-नगरच्या किल्ल्यात स्थानबद्ध होऊन पडले!

येथूनच १५ जून १९४५ रोजीं पंडितजींची सुटका झाली. पंडितजी बाहेर आले, त्या वेळीं देश किती हैराण झाला होता! दडपशाहीचा रूळ सारखा फिरत होता! बंगालच्या दुष्काळानें लक्षावधि लोकांचे बळी घेतलेले! बेचाळीसची क्रांतीची ज्योत मंदावत चाललेली! काळ्या बाजाराला बरकत आलेली! प्रति-गामी लोकांनीं राज्ययंत्रांत महत्त्वाच्या जागा अडविलेल्या! बेचाळीसच्या क्रांतीनें सरकारला जरब बसविली होती आणि मोठाले नेते तुरुंगांत खेंचले गेल्यावर जनतेनें स्वयंस्फूर्तीनें ही चळवळ केली होती; पण या चळवळींत अहिंसा

तत्त्वाची पायमल्ली झाली म्हणून कॉंग्रेसजनच ओरडा करीत होते! (मात्र अहिंसेचे जगद्वंद्य प्रणेते गांधीजी व त्यांचे कांहीं निष्ठावंत भक्त बेचाळीसच्या क्रांतिवीरांचा तेजोभंग करीत नव्हते, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.) अशा या विषाद व विफलता यांनीं अंधारलेल्या वातावरणांत पंडितजींच्या मुक्ततेनें आशाकिरण चमकूं लागले.

"बेचाळीसच्या क्रांतिवीरांनीं केलें तें कदाचित् मींहि त्या स्थितींत केलें असतें. या संगरांत अरुणादेवींनीं केलेली कामगिरी फार उज्ज्वल आहे. त्या जिथें असतील तिथें त्यांना माझें अभिवादन पोहोंचो."

कारामुक्त होतांच पंडितजींनीं काढलेले हे स्फूर्तिदायक उद्गार विद्युत्प्रवाहासारखे परिणामकारक ठरले. त्यागी व शूर कार्यकर्त्यांना सार्थक वाटलें. गांजलेल्या जनतेच्या तोंडावर उत्साहाचें तेज दिसूं लागलें. राष्ट्रशरिरांतल्यां मृत झालेल्या पेशी पुनः सजीव झाल्या.

महायुद्ध संपलें. अणुबॉंबचें अपूर्व संहारक अस्त्र निघून माणसांची हिंसाशक्ति किती पराकोटीला गेली आहे हें कळलें. या अस्त्रापुढें जपानी हुकूमशाहीनें दोस्तांपुढें लोटांगण घातलें! युद्धाचा शेवट इंग्लंडच्या विजयांत झाला तरी या अरिष्टानें इंग्लंडचा भयंकर शक्तिपात झाला होता. हिंदुस्थानावर आतां पूर्वी-प्रमाणें प्रभुत्व ठेवतां येणार नाहीं याची इंग्लंडला जाणीव झाली. पण सत्तांतर करायचें त्यांत कांहीं तरी घोटाळे निर्माण करून ठेवावे आणि हिंदवी स्वराज्याला जन्मतः ग्रहण लावावें असा इंग्रज मुत्सद्दी डाव रचीत होते. जिनांचा पाकिस्तानी गट हा हुकुमाचा एक्का त्यांच्या हातांत होता आणि त्याच्या जोरावरच आपला डाव ते यशस्वी रीतीनें खेळूं शकत होते. अशा घालमेलींतच हंगामी राष्ट्रीय सरकारची स्थापना झाली आणि २ सप्टेंबर १९४६ रोजीं पं. नेहरूंना उपप्रधान व परराष्ट्रमंत्री म्हणून अधिकारसूत्रें देण्यांत आलीं.

ज्यू ज्युत्सु म्हणून जपानी कुस्तीचा एक प्रकार आहे. या प्रकारांत प्रतिपक्षी जितका भारी असेल तितकें त्याला चीत करणें सोपें असतें. प्रतिपक्षाच्या सामर्थ्यांत गोंधळ उत्पन्न करायचा आणि त्यायोगें तें सामर्थ्य अखेर त्यालाच तापदायक करावयाचें असें अजब तंत्र आहे तें! हेंच ज्यू ज्युत्सु तंत्र इंग्रजांनीं हिंदुस्थानला स्वराज्यदानांत प्रतिस्पर्धी समजून वापरलें. हंगामी राष्ट्रीय सरकारांत

पुढें जो मुस्लिम मंत्र्यांचा गट आला तो नेहरूंना छळण्यासाठींच व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनीं योजला होता कीं काय असें वाटूं लागलें. मिरत कॅाँग्रेसच्या वेळीं पंडितजींचा सात्त्विक संताप व्यक्त झाला. "हंगामी राष्ट्रीय सरकार स्थापन झाल्यापासून राज्यशकटाचें एक एक चाक काढून घ्यायचा उपद्व्याप वेव्हेलनीं आरंभिला आहे." असें जळजळीत निवेदन नेहरूंनीं केलें. या वेळींच नौखाली प्रकरण झालें ! बिहार येथें त्याचा बदला घेण्यांत आला ! पंडितजींच्या सरहद्द प्रांतांतील दौऱ्यांत पाकिस्तानी मद्यानें झिंगलेल्या टोळीवाल्यांनीं पंडितजींवर प्राणघातक हल्ला करण्याचाहि प्रयत्न केला ! पण एखाद्या स्थितप्रज्ञा-प्रमाणें पंडितजींनीं आपलें नेतृत्व सांभाळलें. दररोज माथें भडकविणाऱ्या घटना घडत असतां त्यांनीं तोंडांतून अपशब्द काढला नाहीं किंवा राज्यकारभारांत गोंधळ किंवा उथळपणा येऊं दिला नाहीं.

इंग्लंडमध्यें चर्चिलचा पक्ष पदभ्रष्ट होऊन मजूर सरकार अस्तित्वांत आलें होतें. वेव्हेल गेले, माऊंटबॅटन आले. भारतमंत्री पेथिक लॉरेन्स एकदां इकडे येऊन गेले ! अखेर फाळणीसह स्वातंत्र्य तरी पत्करा नाहींतर पारतंत्र्याचें आहे तेंच जोखड कायमचें चालवून घ्या, असा पेंच माऊंटबॅटननीं घातला. यांतला पहिला पर्याय नेहरूंनीं मोठ्या साहसानें पत्करला ! या पत्करण्यांत नक्की चूक झाली कीं काय तें इतिहासच पुढें सांगूं शकेल. पण एवढें मान्यच केलें पाहिजे, कीं इतिहासाला कलाटणी देणारा एक निर्णय मोठ्या जबाबदारीनें व धैर्यानें घेऊन पं. नेहरूंनीं या देशांतून साम्राज्यशाही व सरंजामशाही या दोन जीर्ण संस्थांचें समूळ उच्चाटन केलें, आणि या नवभारताला जन्माला घातलें. ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं हिंद स्वतंत्र झाला आणि या स्वतंत्र देशाचे पहिले पंतप्रधान म्हणून जवाहरलालजींचीच निवड झाली.

१५ ऑगस्ट १९४७ ला दिल्लीच्या लाल किल्ल्यावर तिरंगी ध्वज लागला. जनता हर्षानें वेडी झाली होती. हिंदुस्थानचे राजकुलोत्पन्न गव्हर्नर-जनरल लॉर्ड माऊंटबॅटन व पं. जवाहरलाल यांची मिरवणूक लाल किल्ल्याकडे निघाली त्यावेळीं जनतेचा उत्साह कोण वर्णावा ? सम्राट् अशोकाच्या काळानंतर भारताचा एवढा मोठा विभाग प्रथमच स्वतंत्र होत होता. अंधार होता, पाऊस होता, पण लक्षावधि लोकांनीं गर्दी केली होती. आनंदाला कृतज्ञतेचें भरतें आलें होतें. अभिमानाला सार्थकता आली होती. हें स्वातंत्र्य मिळवून देण्या-

करितां जे आमरण झगडले त्या स्वर्गस्थ हुतात्म्यांना व देशभक्तांना काय वाटलें असेल !

**“ जीर्ण चिरगुटें यत्नें अणिलीं**
**आई ! लज्जा तुझी राखिली**
**परंतु तींहि अपुरीं पडलीं**
**ढाळियलें मग अश्रूंना ! ”**

असें म्हणत असलेल्या स्वर्गस्थ देशभक्तांना खरोखर आपल्या तपश्चर्येचें सार्थक त्या दिवशीं झालें असें वाटलें. कारण, पारतंत्र्याच्या अंधारांत ज्या दीन परतंत्र मातेला स्वतंत्र व सुखी करण्यास ते झटत होते ती माता त्या दिवशीं स्वतंत्र झाली होती. इतिहासांतील अशाच अपूर्व घटनेस उद्देशून एका आंग्ल कवीनें म्हटलें आहे—

**“ त्या वेळीं जिवंत असणें हेंच मोठें भाग्य, आणि तरुण असणें म्हणजे तर प्रत्यक्ष स्वर्गसुखच ! ”**

एका प्राचीन, महान् राष्ट्रांत स्वातंत्र्याचा अरुणोदय होत होता. पं. जवाहरलाल नेहरूंचीं या वेळचीं भाषणें या अलौकिक प्रसंगास साजेशींच झालीं.

“ निश्चित केलेला तो दिवस अखेर आला आहे. नियतीनें निश्चित केलेला हा दिवस आहे. दीर्घकालीन निद्रेनंतर, लढा केल्यावर हिंदुस्थान आज जागा झाला आहे. जिवंत रक्त त्याच्या शरिरांत सळसळूं लागलें आहे. तो आज स्वतंत्र झाला आहे. अजूनहि कांहीं अंशांनीं भूतकालाचीं लक्तरें आपल्या अंगाला चिकटलेलीं आहेत; आणि आजवर आपण अनेकदां ज्या प्रतिज्ञेचा उच्चार केला तिची पूर्तता व्हावयाला अद्याप पुष्कळ कार्य आपल्याला करावयाचें आहे. तथापि नव्या रस्त्याला आपण लागलों आहोंत. आपला नवा इतिहास सुरू झाला आहे. आतां आपल्याला हा इतिहास आपल्या प्रत्यक्ष जीवनाच्या व कार्याच्या रूपानें बनवावयाचा असून पुढील पिढ्यांतील लोक तो इतिहास मग लिहितील.

“ हा आजचा क्षण आम्हां हिंदी लोकांस, सगळ्या आशियास व जगास भवितव्यावर परिणाम करणारा म्हणून महत्त्वाचा आहे. नवा तारा

उदयास आला आहे. पूर्वेकडील देशांच्या स्वातंत्र्याचा हा तारा आहे-नव्या आशेचा हा उदय आहे. कितीतरी कालापासून दृष्टीपुढें तरळणारें दृश्य अखेर प्रत्यक्षांत आलें आहे. ह्या ताऱ्याचा कधींहि अस्त न होवो आणि आपली आशा कदापीहि खोटी न ठरो.

"मध्यरात्रीच्या प्रशांत समयीं जेव्हां जग झोंपलेलें आहे तेव्हां भारत जागा होत आहे. स्वतंत्र होत आहे...हिंदुस्थानची सेवा म्हणजे हिंदुस्थानच्या असंख्य जनतेची सेवा; दारिद्र्य, अज्ञान, विकासाच्या संधि मिळण्याच्या बाबतींतली विषमता यांचा शेवट. आपल्या युगांतल्या सर्वश्रेष्ठ माणसाची महत्त्वाकांक्षा अशी आहे कीं, हरएक नेत्रांतला अश्रु पुसून टाकावा. ही गोष्ट आपल्या शक्तीच्या बाहेरची कदाचित् असेल; पण जोंवर जगांत यातना आणि अश्रु कायम आहेत तोंवर आपलें काम सतत चालू राहिलें पाहिजे."

पण हें स्वातंत्र्य शापित होतें. म. गांधींनीं त्या दिवशीं चोवीस तासांचा उपास केला. यावरून स्वातंत्र्यप्राप्तीच्या दिवशींच हा देश दुभंगला गेल्यामुळें त्यांना वेदना किती तीव्र झाल्या याची कल्पना येतें! फाळणीचें विषार स्वतंत्र भारत गर्भांत असतांनाच त्यांत भिनलें होतें, त्यामुळें त्याच्या जन्मकाळींच आक्रांत सुरू झाला! आणि महत्प्रयासानें पदरीं पडलेलें हें स्वातंत्र्य अराजकतेच्या उन्माद वायूंत सांपडून गारद होतें कीं काय अशी भीति पडली. पुढें वर्ष सव्वा वर्षानें गांधीजींचा वध झाला तेव्हांहि हें असेंच भय निर्माण झालें होतें! या दोनहि प्रसंगीं पं. नेहरूंच्या कर्तृत्वाची व लोकप्रियतेची कसोटी लागली आणि त्यांत ते सन्मानपूर्वक उत्तीर्ण झाले.

पंडितजींच्या कर्तृत्वाचा चौथा कालखंड १५ ऑगस्ट १९४७ पासून सुरू होतो हें मागें सांगितलेंच आहे. या कालखंडांतील त्यांची जबाबदारी, त्यांच्या अडचणी यांची विविधता व व्यापकता फारच मोठी आहे. आपल्या नवहिंद राष्ट्राची व्यवस्था लावतांनाच, पाकिस्तानच्या भाऊबंदकीची व अत्याचाराची असह्य झळ लागत होती व आहेहि. घराची वांटणी होतांना वरवंटासुद्धां उभा कापून घेणाऱ्या क्रूर व आडमुठ्या भाऊबंदाप्रमाणें पाकिस्ताननें वर्तन केलें! अन्नधान्याची तूट, निर्वासितांची आयात, बिघडत चाललेली आंतरराष्ट्रीय

वा. क्र. ...... नों. दि. ..........
वि. ...वाल... वा. क्र. ..................



परिस्थिति, उद्योगधंद्यांतील शिथिलता, लोकांचा मागासलेपणा, लायक माणसांची कमताई, इ० अनेक अडचणी नेहरूंच्या पुढें होत्या व आहेत. एखादा रोग अंगीं मुरलेला असला म्हणजे त्यांतुन अनेक इतर रोग व विकृति उद्भवतात, तसें या हिंदुस्थानचें होत आहे! त्यांतच कॉंग्रेसची जी सर्वश्रेष्ठ संघटना इतके दिवस अभेद्य उभी होती ती शिथिल होत चालली आहे. सत्ता मिळण्यापूर्वी कॉंग्रेसमध्यें जो एकोपा व जो सेवाभाव होता तो आतां ढांसळला आहे. ज्या पुरोगामी गटांनी कॉंग्रेसला ओज व सामर्थ्य दिलें ते हळूहळू कॉंग्रेसमधून काढता पाय घेत आहेत. देशांत असंतोष व अव्यवस्था माजविणें यांवरच ज्यांचें भवितव्य अवलंबून आहे असे परपुष्ट लोक आपल्या निंद्य कर्मांत दंग झाले आहेत !

पण इतक्या अडचणींतुनहि नेहरूंनीं या देशाला राष्ट्रपण देण्याचा फार मोठा उद्योग अहर्निश चालविला आहे. घटनासमितीची स्थापना होऊन तिच्या ऐरणीवर नव्या भारताची लोकसत्ताक राज्यघटना घडविली जात आहे. स्वतंत्र मतदारसंघ गेले. इंग्रजीचें जोखड मानेवरून उचललें गेलें. राष्ट्रभाषेचा वाद गेलीं कित्येक वर्षें महान् नेत्यांना तापदायक होऊन बसला होता तो निकालांत निघाला आणि ' हिंदी ' ही राष्ट्रभाषा व ' नागरी ' ही राष्ट्रलिपि ठरली. भारताच्या अहिंसामय संस्कृतीचें निदर्शक असें अशोकचक्र तिरंगी ध्वजावर येऊन राष्ट्रध्वजाचें स्वरूप निश्चित झालें. हिराकुड धरण, लष्करी विद्यापीठ, राष्ट्रीय प्रयोगशाळा इ० राष्ट्रोपयोगी योजना वाट चालूं लागल्या. निर्वासितांचे नवे संसार रुटूखुटू का होईना पण सुरू झाले. अन्नधान्याची तूट कमी प्रमाणांत येऊं लागली. परदेशांत ठिकठिकाणीं भारताच्या वकिलाती थाटल्या गेल्या. ' जलउषा, ' ' जलजवाहर, ' ' दिल्ली ' इ० नौका पाण्यांत उतरून स्थलाप्रमाणें जळावरहि भारताचें प्रभुत्व गाजवूं लागल्या. आशियांतील राष्ट्रप्रतिनिधि नेहरूंच्या निमंत्रणावरून दिल्लीस जमले. आणि आशियाचें अनभिषिक्त नेतृत्व आमच्या पंतप्रधानांना सर्वांनीं मिळून मोठ्या आनंदानें अर्पण केलें. आंतरराष्ट्रीय परिषदांत स्वतंत्र भारताचे प्रतिनिधि आपला प्रभाव पाडूं लागले. हैद्राबादचें प्रकरण निकालांत निघालें आणि काश्मीरांत पाय बळकट रोंवला गेला. सरंजामशाहीचीं अवशेष म्हणून भारभूत झालेलीं ५-६ शें लहान-मोठीं संस्थानें लोकशाहीच्या महापुरांत ढांसळून पडलीं.

पं. नेहरूंच्या कारकीर्दीस २-२। वर्षें झालीं. तेवढ्या काळांतली ही प्रगति आहे. सरकारचें कार्य हें सामुदायिक सहकार्यानें होत असतें हें खरें आहे. पण या २-२। वर्षांच्या राष्ट्रीय प्रगतींतलें तपशील सूक्ष्मपणें तपासले तर सर्वत्र नेहरूंचा कौशल्यपूर्ण हात फिरला आहे असेंच दिसून येईल. नव्या नव्या उपक्रमांना जन्म देऊन त्यांनीं राष्ट्राची सुप्त प्रतिभा आज जागृत केली आहे, तडजोडविरोध, ध्येयप्रचार, मुत्सद्देगिरी आणि शासनकौशल्य अशीं त्यांच्या कर्तृत्वाच्या चार कालखंडांचीं चार वैशिष्ट्यें आहेत. पण या चौथ्या कालखंडांत त्यांना हें चतुर्विध कार्य एकाच वेळीं करावें लागत आहे. काश्मीर प्रकरण म्हणा किंवा जातीयवाद म्हणा, या कामीं कुठल्याहि तडजोडीला थारा न देण्याचा निश्चयेंकरून त्यांचा प्रयत्न आहे. लोकसत्तात्मक उदार ध्येयांचा प्रचार हा तर त्यांच्या जीवनाचा आवडता छंद आहे; एका मोठ्या राष्ट्राचे पंतप्रधान म्हणून राजनीतिकौशल्यहि ते प्रकट करीत आहेत; आणि एवढ्या प्रचंड राज्याची धुरा वाहण्याची ते पराकाष्ठा करीत आहेत. पंडितजींचें हें अचाट कर्तृत्व पाहिलें म्हणजे म्हणावेंसें वाटतें,

**“ वळते अंजलि नकळत बघुनी तुम्हांलागीं ”.**

क्रमिक पुस्तकाच्या पानांवर अनंत तारागणांचें चित्र देतात. तद्वत् पंडितजींच्या कर्तृत्वाचा वरील धांवता आढावा आहे. पुस्तकांतील त्या चित्रांत इंचाच्या अगदीं लहान भागाला अमुक कोटी मैल असें प्रमाण दिलेलें असतें. तेव्हां तें प्रमाण धरून कल्पनाशक्तीनेंच तो विस्तार जाणायचा असतो. वरील धांवता आढावा डोळ्यांपुढें घेऊन कल्पकतेला खूप राबविलें म्हणजे पंडितजींच्या कर्तृत्वाची असामान्य विशालता ध्यानांत येईल. पण या श्रेष्ठ कर्मयोग्याच्या कर्तृत्वाची परिसीमा वेगळीच आहे. माझ्या मतें राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतल्या त्यांच्या भव्य कर्तृत्वापेक्षांहि त्यांच्या अंतरंगाचें सौंदर्य त्यांनीं टिकविलें हें कर्तृत्व मी अधिक मोठें समजतों. राजकारण हें क्षेत्र असें आहे, कीं कपट, अश्रद्धा, कडवटपणा या गोष्टींना तेथें तेजी असते. पण त्या क्षेत्रांत आजवरची हयात उत्कटतेनें घालवूनहि पंडितजी सरळ, प्रांजल व उदार राहिलेले आहेत. जीवनाचा त्यांना उबग आला नाहीं. अजून लडाकी लामांनीं दिलेला विचित्र पोषाख चढवून आपलें सोंग कसें दिसतें हें खेळकरपणें ते पाहूं शकतात; “ आम्हीं

इतक्या चुका केल्या आहेत कीं, मी जर सरकारच्या बाहेर असतों तर या सरकारला पाठिंबा दिला असता कीं नाहीं कोण जाणे!" अशी प्रांजलपणें कबुली द्यायला त्यांना संकोच वाटत नाहीं! संधि मिळाली कीं समुद्रांत पोहून ऐन पंचविशीचा निकोप आनंद ते लुटतात; आणि मुलांत मिसळून शिवाशिवी खेळण्यांतहि रंगून जातात! ही हौस, हा प्रांजलपणा, हा खेळकरपणा जगांत अत्यंत दुर्मिळ आहे. आणि म्हणूनच जवाहरलालजींविषयीं कोट्यवधि लोकांना इतका जिव्हाळा वाटतो. "युद्धांत पहिला, शांततेच्या काळांत पहिला, आणि आपल्या देशबांधवांच्या अंतःकरणांत पहिला" हें जें जॉर्ज वॉशिंग्टनविषयीं म्हणतात तें आमच्या आवडत्या पंतप्रधानांबद्दलहि अगदीं तंतोतंत लागू पडत नाहीं काय?

० ० ०

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 30925
विभाग
क्रमांक 2205
नों. दि.

# त्रिखंड कीर्ति

उर्दू शब्दसृष्टीचे विधाते सर महंमद इक्बल हे लाहोर येथें शेवटच्या दुखण्यानें आजारी होते. आतां हा साहित्यसूर्य अस्ताला जाणार हें सर्वांना, खुद्द त्यांना स्वतःलाहि कळून चुकलें होतें. याच वेळीं पंडित नेहरू लाहोरांत आल्याची वार्ता इक्बलना समजली. पंडितजींना भेटण्याची त्यांनीं इच्छा प्रदर्शित केली आणि पंडितजीहि मोठ्या अगत्यानें त्यांच्याकडे गेले. प्रहरभर या दोघांनीं परस्परांच्या अंतरंगाचें दर्शन घेऊन संवादसुखाचा आनंद लुटला. पंडितजींना निरोप देण्याचे वेळीं कशावरून तरी जिनांचें नांव निघालें. त्या वेळीं शरपंजरीं पडलेला तो इस्लामी महाकवि सद्गदित होऊन म्हणाला, "पंडितजी, जिना आणि तुम्ही यांत काय साम्य आहे ? जिना मुत्सद्दी आहेत, तुम्ही देशभक्त आहां !" महाकवि एका सूत्रबद्ध वाक्यांत साऱ्या जीवनाचा सारांश सांगतात तो असा ! जिनांच्या तमोगुणी व्यक्तित्वाची पार्श्वभूमि घेऊन इक्बलनीं पंडितजींच्या उज्ज्वल भूमिकेचें चित्र किती सुंदर रेखाटलें पाहा. हेच इक्बल जिनांच्या पाकिस्तान कल्पनेचे आद्यप्रवर्तक होते आणि नेहरूंशीं जाहीर रीतीनें त्यांनीं कडाक्याचे वाद केले होते हें लक्षांत घेतलें म्हणजे त्यांच्या वरील वाक्यांतलें सत्य अधिकच खुलून दिसतें.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं पंडितजींनीं आपलें सर्व जीवन समर्पण केलें म्हणून आज या देशाचे ते कंठमणि व्हावेत यांत कांहींच नवल नाहीं. पण हिंदुस्थानबाहेरहि या देशभक्ताला लोकांचें प्रेम इतक्या अल्प प्रयासांत मिळतें कीं थोरामोठ्या भाग्यवंतांनीं त्यांचा हेवा करावा. याचें कारण वर इक्बलच्या

वाक्यांतच आलें आहे. ट्रुमन, स्टॅलिन, चर्चिल ही सर्व मंडळी अत्यंत कर्तबगार आहेत. आपापल्या राष्ट्राची नौका त्यांनीं घोर वादळांतुन सुरक्षितपणें नेली आहे. पण ही मंडळी सर्व जगाला राजकारणी मुत्सद्दी वाटतात, तर जवाहरलाल हे उदारमतवादी देशभक्त वाटतात. हा हिंदी देशभक्त चर्चिलप्रमाणें साम्राज्यवादी नाहीं, स्टॅलिनप्रमाणें हुकूमशहा नाहीं आणि ट्रुमनप्रमाणें हिंसेची धमकावणी देणारा भांडवलशहा नाहीं, आणि म्हणूनच पंडितजींना सर्व जगांतील आम जनता इतक्या जिव्हाळ्यानें आपल्या उद्धारकांपैकीं एक असें समजते.

पण जगांतील गेल्या शतक दीड शतकांतल्या इतिहासाचें व आजच्या विचारप्रवाहांचें आलोडन केल्याशिवाय पंडितजींच्या त्रिखंड कीर्तीचें मर्म नीट लक्षांत येणार नाहीं. पाश्चात्य देशांत एकोणिसाव्या शतकांत यंत्रसंस्कृतीचा विलक्षण विकास झाला. यंत्रसंस्कृतीचे पहिले पहिले पुरस्कर्ते जे होते त्यांना सरंजामशाहीचा नाश करायचा होता. त्याप्रमाणेंच माणसाच्या उन्नतीची त्यांपैकीं पुष्कळांना खरोखरची चाड होती. त्यामुळें लोकशाही व उदारमतवाद यांचीहि वाढ झाली. स्वपराक्रमानें माणसानें आपली प्रतिभा प्रफुल्लित करावी, इतरांना वाढूं द्यावें व आपणहि मोठें व्हावें, श्रद्धेऐवजीं बुद्धीला प्राधान्य द्यावें, सृष्टिचमत्काराचें ज्ञान करून घेऊन जगांतली भौतिक संपत्ति शतगुणित करावी, समतेचा ध्वज उंच ठेवावा, सामान्य माणसाचें स्वातंत्र्य अबाधित ठेवावें इत्यादि तत्त्वें बहराला आलीं. लोकशाहीचा जयजयकार इतका प्रचंड झाला कीं, एकोणिसावें शतक म्हणजे ‘ लोकशाहीचें शतक ’ असें समजलें गेलें. सर्व प्रकारच्या एकतंत्री सत्तेविरुद्ध माणसांनीं त्या वेळीं धर्मयुद्ध पुकारल्यासारखें होतें. या धर्म, वर्ण, वंश यांच्या हुकमतीविरुद्धहि संग्राम झाला. तो काळ बराच शांततेचा होता. जगांतले संघर्ष व तंटे निकराला आलेले नव्हते. त्यामुळें वरील तत्त्वें व त्याबरोबर विद्या व कला यांचा प्रसार सारखा होत राहिला. यंत्रारूढ संस्कृतींत जें जें म्हणून कांहीं चांगलें व उदात्त होतें त्याची जोपासना झाली. माणसाच्या प्रगतींत ही एक फार श्रेष्ठ दर्जाची अवस्था निर्माण झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

पण विसाव्या शतकाच्या आरंभीं ही सर्व शांतता निश्चितपणें भग्न झाली. यंत्रसंस्कृतीच्या प्रगतीबरोबर माणसाच्या स्वार्थाला सीमा उरली नाहीं. भांडवलशाहीनें राष्ट्रवाद हें गोंडस रूप धारण केलें, आणि जगांत प्रळय मांडला.

" परमुलुखा जाळि पोळि । लाखांचे खून करीं
न्यायाचा वर तोरा । चोर चढवि फांशिं हा
शास्त्रतटीं तोफ घोर । फडशा करि बंधूचा
विश्वबंधुता खरि ही । रक्षी दुबळ्यांशिं हा "

उत्पादन व आक्रमण यांना धरबंद राहिला नाहीं. श्रीमंत आणि गरीब यांच्यांतली दरी रुंदावत गेली. पुढारलेले व मागासलेले देश यांच्यांत लढत सुरू झाली. माणसाच्या रोजच्या जीवनापासून आंतरराष्ट्रीय क्षेत्रापर्यंत सर्वत्र संघर्ष सुरू झाले. वर्गभेद आणि वंशभेद या अहीमहींचा नंगा नाच सुरू झाला. या साऱ्या कोलाहलांत दोन महायुद्धांचे भयंकर वणवे पेटून सुसंस्कृत जग बेचिराख होणार कीं काय अशी भीति वाटूं लागली. या भयग्रस्त पण शांततावादी जगाला नेहरू हें एकच आशास्थान वाटलें. १९२९ सालीं कॉंग्रेसच्या अध्यक्ष-पदासाठीं पंडित नेहरूंची शिफारस करतांना गांधीजींनीं म्हटलें होतें, " राष्ट्र त्यांच्या हातांत सुरक्षित आहे. " [ Nation is safe in his hands ]. आजचें प्रगतिपर: शांततेसाठीं आसुसलेलें जग म्हणतें, " लोकशाही त्यांच्या हातीं सुरक्षित आहे. " [ Democracy is safe in his hands ].

हा केवळ तर्क नव्हे किंवा अतिशयोक्तिहि नाहीं. विलायतेंत क्रायडन् या विमानतळावर जे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पाहुणे येतात त्यांच्या स्वागतासाठीं किती मोटारी येतात याची नोंद ठेविली जाते. नुकतेच कॉमनवेल्थ परिषदेसाठीं पंडितजी गेले होते. तेव्हां कुठल्याहि नेत्याच्या स्वागतापेक्षां त्यांचें स्वागत अधिक मोठ्या प्रमाणावर झालें असें वरील नोंद आपणांला सांगते. मध्यरात्रीची वेळ असून तीस मोटारी स्वागतार्थ उभ्या होत्या. या तुलनेनें त्या प्रसंगीं इतर जे बडे पाहुणे आले त्यांच्या स्वागतासाठीं दहा, सात, तीन अशी मोटारींची संख्या होती. ट्रुमन किंवा स्टॅलिन यांचे वाढदिवस होऊन गेले तरी आमच्या व इतर अनेक देशांत पत्ता नसतो ! पण १४ नोव्हेंबरला अनेक इंग्रजी व अमेरिकन पत्रें जादा अंक अथवा पुरवणी काढून पंडितजींचा जन्मदिनमहोत्सव मोठ्या आदरानें साजरा करतात. अमेरिकन लेखिका पर्ल बक पंडितजींची तुलना रूझवेल्ट-ट्रुमनप्रभृति आजच्या युगांतील इरसाल मुत्सद्यांशीं न करतां लिंकन-जेफरसन् इ० महान् राष्ट्रपुरुषांशीं करते. प्रख्यात चिनी साहित्यिक लीन यूटांग

नेहरूंचा 'पूर्वेकडला उदयोन्मुख तारा' असा गौरव करतात. इंडोनेशियन पुढारी शिवकर्ण आपल्या राष्ट्राचें नेतेपण करण्यासाठीं पंडितजींना सन्मानपूर्वक पाचारण करतात. हीं व अशीं उदाहरणें शेंकड्यांनीं सांगतां येतील. यावरून पंडितजींची त्रिखंड कीर्ति ही एक सिद्ध गोष्ट आहे असें निश्चितपणें म्हणण्यास हरकत नाहीं.

पाश्चात्य देशांना पंडितजींबद्दल वाटणारें ममत्व हें पंडितजींच्या पहिल्या संस्काराचें फळ आहे. पंडितजींच्या बालबुद्धीची मशागत पाश्चात्य संस्कृतींत झाली आणि नंतरहि पाश्चात्य जगाशीं त्यांचा ऋणानुबंध पुष्कळच आला. आज गांधींप्रमाणेंच त्यांना अनेक उत्कृष्ट मित्र व अनुयायी पाश्चात्य जगांत लाभले आहेत. खाऱ्या समुद्रांत कुठें कुठें गोड्या पाण्याचे झरे सांपडतात, त्याप्रमाणें एकंदर कष्टमय सामान्य मानवी जीवनांत संस्कृतीचे निर्झर असतात. जाणकार माणसाच्याच ते निर्झर हातांत येतात. पाश्चात्य समाजजीवनांत शिरून त्या समाजाचे संस्कृतिनिर्झर पंडितजींनीं हस्तगत करून घेतले आहेत. म्हणूनच पुष्कळदां ते म्हणतात, "माझ्यांत आणि पाश्चात्य माणसांत बरेंच साधर्म्य आहे."

पाश्चात्यांचे शिष्टाचार ते फार सफाईनें पाळूं शकतात. त्यांना पाश्चात्य पोशाख विशेष आवडत असावा असें दिसतें आणि त्यांना तो खुलूनहि दिसतो. विज्ञान-वादी दृष्टिकोणानें पंडितजी हरएक गोष्टीचा विचार करतात याची पाश्चात्यांना विशेष जाणीव आहे, आणि म्हणूनच गांधीजींपेक्षां या हिंदी पुरुषाला जाणणें सोपें आहे असें एका पाश्चात्य प्रवाशानें म्हटलें आहे. वक्तशीरपणा किंवा यंत्रशास्त्रांतली अभिज्ञता ह्या गोष्टी साध्या वाटतात, पण त्याहि पूर्णांशानें माणसांत असतील तर तो माणूस पाश्चात्यांना जवळचा वाटेल. पंडितजींना हें सर्व साध्य झालें आहे. पण या सर्व गुणसमुच्चयापेक्षांहि लोकसत्तेचें प्रेम या एकाच गुणामुळें पंडितजी आंतरराष्ट्रीय जगांत सर्वमान्य झाले आहेत. "सामान्य माणसाच्या जीवनाबद्दल नेहरूंना वाटणारी आस्था" हाच त्यांच्याविषयीं जगाला वाटणाऱ्या आकर्षणाचा गुरुत्वमध्य आहे. वर सांगितल्याप्रमाणें आज मानवी जीवनांतले संघर्ष निकराला आले आणि लोकसत्ता, व्यक्तिस्वातंत्र्य, उदारमतवाद इ. पूर्वींचीं बहुमोल मूल्यें संकटांत सांपडलीं. अशा वेळीं नाझी-वादाचा कट्टा विरोधक म्हणून नेहरूंचें यश जगाच्या, विशेषतः पाश्चात्य लोकांच्या, डोळ्यांत विशेष भरलें. नाझीवादाच्या विरोधाची नेहरूंची कामगिरी केवढी आहे

हें समग्र पाहिलें म्हणजेच आंतरराष्ट्रीय जगांतल्या त्यांच्या लोकप्रियतेचें रहस्य कळेल. त्याचप्रमाणें आपला राष्ट्रवाद प्रगतिपर कां व कसा झाला याचीहि कल्पना येईल.

हिंदी स्वराज्याची चळवळ ही राष्ट्रीय असली तरी तिचें भवितव्य जगाच्या दलित व परतंत्र लोकांच्या भविष्याशीं निगडित आहे. ही जागृति करण्यासाठीं पं. नेहरूंनीं प्रथमपासून फार परिश्रम घेतले. भांडवलशाहीचा विकास होऊं लागला कीं भांडवलाचें केंद्रीकरण होऊं लागतें. थोड्या माणसांच्या हातांत सर्व आर्थिक व्यवहाराचीं सूत्रें व अर्थव्यवस्था येऊं लागते, आणि मग हीं थोडीं माणसें जगाच्या व्यापारपेठांत एकमेकांच्या सोयीप्रमाणें मक्तेदारी मिळवितात. अर्थात् भांडवलवाले आपली संघटना आंतरराष्ट्रीय भूमिकेवरून करतात आणि मग साहजिकच त्यांचा पिळवणुकीचा कार्यक्रमहि आंतरराष्ट्रीय भूमिकेवरून होऊं लागतो. इंग्लंडची भांडवलशाही हिंदुस्थान व पूर्वेकडील देश येथील भांडवलशाहीचें पोषण करूं पाहते; आणि मग तें पोषण हुकमी रीतीनें करतां यावें म्हणून भांडवलशाहीला साम्राज्यशाहीची गरज लागते. अर्थात् जगभर साम्राज्यवादाचा म्हणजेच संघटित होऊं पाहणाऱ्या भांडवलशाहीच्या टांचेखालीं जे जे तुडविले जात असतील त्या सर्वांचें दुखणें एकच असतें व त्यावर सर्वांनीं संघटित होऊन निदान परस्पर सहकार्यानें उपाय करावयाचा असतो. जगांतल्या दलित व परतंत्र लोकांचें असें नातें आहे. हेंच आपल्या वाणीनें, लेखणीनें व आचरणानें पंडितजींनीं हिंदी लोकांना गेलीं दोन तपें पटवून दिलें; आणि त्यामुळेंच पुरोगामी हिंदी लोक, त्याचप्रमाणें बाहेरील प्रगतिपर विचाराची मंडळी पंडितजींची भक्त बनली.

आबिसिनियावर इटलीनें हल्ला केला तेव्हां हिंदी राष्ट्रसभेकडून नेहरूंनीं त्याचा कडाडून निषेध करविला. त्या वेळीं आपण स्वातंत्र्येच्छु लोकांनीं इटलीचा निषेध करायचें कारण काय, असा प्रश्न येथील अदूरदर्शी लोक करीत होते! खुद्द सोव्हिएट रशियासुद्धां इटलीशीं केलेला तेलाचा करार मोडायला नको म्हणून डोळ्यांवर कातडें ओढून स्वस्थ बसला! पण इटलीच्या या फॅसिस्ट बकासुराची व त्याचा वडील नाझी भाऊ जर्मनी याची राक्षसी भूक कशी भयंकर वाढली आणि सर्व जगाचा एक घांस करायचें या दोघांनीं कसें ठरविलें हें लौकरच सर्वांच्या प्रत्ययाला आलें. नेहरूंच्या आंतरराष्ट्रीय व्यापक धोरणाची जे टवाळी

करीत होते त्यांनाच दुसऱ्या महायुद्धांत हुकूमशाहीचा पाडाव करण्यासाठीं ब्रिटिश सत्तेशीं सहकार्य करण्याची घाई झाली ! स्पेनच्या फ्रँकोनें स्पॅनिश लोकशाहीवर घाला घातला त्या वेळींहि नेहरूंनीं साम्राज्यवाद् व फॅसिझम् यांच्या जगद्व्यापी स्वरूपाची स्पष्ट कल्पना दिली.

१९३७ सालच्या निवडणुकीची धामधूम संपल्यावर त्यांनीं लगोलग अलाहाबादहून पत्रक काढलें. त्यांत त्यांनीं सांगितलें :

" निवडणुकीची धामधूम संपली आहे. आतां जगाच्या रंगभूमीकडे पाहिलें पाहिजे. सध्यांचें वातावरण असेंच राहात गेलें तर जगत्प्रलय होणार हें नक्की दिसत आहे. इतरांचें संकट तेंच आपलें संकट आहे; कारण एकाच प्रकारच्या मूलतत्त्वांचा सर्वत्र संघर्ष सुरू आहे. या संघर्षाची झळ आपणांलाहि लागून आपलें भवितव्य घडविलें जाणार आहे. "

नंतर स्पेनमधील लोकशाही सैन्यांनीं कसा धीरोदात्त संग्राम केला व तरीहि अखेर कोणत्या कारणांनीं त्यांना अपेश आलें हें सांगून पंडितजी म्हणाले :

" आपणां हिंदी लोकांचें काय ? आपण उदासीन नाहीं. मानवी स्वातंत्र्यासाठीं धैर्यानें व वीरवृत्तीनें लढणाऱ्यांबद्दल आपण उदासीन कसे राहूं ? आपलेहि मोठे हितसंबंध त्यांत गुंतले आहेत व ज्या स्वातंत्र्यासाठीं आपण झगडत आहों तेंहि धोक्यांत आहे हें आपण विसरूं शकत नाहीं. कारण साम्राज्यवाद् आणि फॅसिझम् हे सहोदर बंधु आहेत; हातांत हात घालून ते जातात. त्यांतला एकाचा विजय म्हणजेच उभयतांचा जगद्विजय होय. "

ही भूमिका त्यांनीं अनेकदां वेगवेगळ्या शब्दांत व संदर्भांत व्यक्त केली आहे. स्पेनमध्यें लोकशाहीचा खून करण्यास फॅसिस्ट हुकूमशहा फ्रँको झटत होता आणि इंग्रज, जर्मन, इटॅलियन् इ. साम्राज्यवादी व हुकूमशाही राष्ट्रें त्याला प्रत्यक्षाप्रत्यक्ष मदत करीत होतीं ! फ्रँकोचीं ' स्पॅनिश ' सैन्यें वाटेनें स्पेन भाषेंत भिंतीवर लावलेल्या जाहिराती वाचूं शकत नाहींत असें व्यंगचित्र लंडनमध्यें एका चतुर चित्रकारानें काढलें होतें ! याचा अर्थ बाहेरच्या समर्थ राष्ट्रांनीं आपले सैनिक स्पॅनिश लोकशाहीचे भाडोत्री मारेकरी म्हणून दिले होते ! हें पाहिलें म्हणजे नेहरूंच्या वरील म्हणण्याची सत्यता पटेल. पण केवळ विवेचन करून

हें समग्र पाहिलें म्हणजेच आंतरराष्ट्रीय जगांतल्या त्यांच्या लोकप्रियतेचें रहस्य कळेल. त्याचप्रमाणें आपला राष्ट्रवाद प्रगतिपर कां व कसा झाला याचीहि कल्पना येईल.

हिंदी स्वराज्याची चळवळ ही राष्ट्रीय असली तरी तिचें भवितव्य जगाच्या दलित व परतंत्र लोकांच्या भविष्याशीं निगडित आहे. ही जागृति करण्यासाठीं पं. नेहरूंनीं प्रथमपासून फार परिश्रम घेतले. भांडवलशाहीचा विकास होऊं लागला कीं भांडवलाचें केंद्रीकरण होऊं लागतें. थोड्या माणसांच्या हातांत सर्व आर्थिक व्यवहाराचीं सूत्रें व अर्थव्यवस्था येऊं लागते, आणि मग हीं थोडीं माणसें जगाच्या व्यापारपेठांत एकमेकांच्या सोयीप्रमाणें मक्तेदारी मिळवितात. अर्थात् भांडवलवाले आपली संघटना आंतरराष्ट्रीय भूमिकेवरून करतात आणि मग साहजिकच त्यांचा पिळवणुकीचा कार्यक्रमहि आंतरराष्ट्रीय भूमिकेवरून होऊं लागतो. इंग्लंडची भांडवलशाही हिंदुस्थान व पूर्वेकडील देश येथील भांडवलशाहीचें पोषण करूं पाहते; आणि मग तें पोषण हुकमी रीतीनें करतां यावें म्हणून भांडवलशाहीला साम्राज्यशाहीची गरज लागते. अर्थात् जगभर साम्राज्यवादाचा म्हणजेच संघटित होऊं पाहणाऱ्या भांडवलशाहीच्या टांचेखालीं जे जे तुडविले जात असतील त्या सर्वांचें दुखणें एकच असतें व त्यावर सर्वांनीं संघटित होऊन निदान परस्पर सहकार्यानें उपाय करावयाचा असतो. जगांतल्या दलित व परतंत्र लोकांचें असें नातें आहे. हेंच आपल्या वाणीनें, लेखणीनें व आचरणानें पंडितजींनीं हिंदी लोकांना गेलीं दोन तपें पटवून दिलें; आणि त्यामुळेंच पुरोगामी हिंदी लोक, त्याचप्रमाणें बाहेरील प्रगतिपर विचाराची मंडळी पंडितजींची भक्त बनली.

अबिसिनियावर इटलीनें हल्ला केला तेव्हां हिंदी राष्ट्रसभेकडून नेहरूंनीं त्याचा कडाडून निषेध करविला. त्या वेळीं आपण स्वातंत्र्येच्छु लोकांनीं इटलीचा निषेध करायचें कारण काय, असा प्रश्न येथील अदूरदर्शी लोक करीत होते! खुद्द सोव्हिएट रशियासुद्धां इटलीशीं केलेला तेलाचा करार मोडायला नको म्हणून डोळ्यांवर कातडें ओढून स्वस्थ बसला ? पण इटलीच्या या फॅसिस्ट बकासुराची व त्याचा वडील नाझी भाऊ जर्मनी याची राक्षसी भूक कशी भयंकर वाढली आणि सर्व जगाचा एक घांस करायचें या दोघांनीं कसें ठरविलें हें लौकरच सर्वांच्या प्रत्ययाला आलें. नेहरूंच्या आंतरराष्ट्रीय व्यापक धोरणाची जे टवाळी

करीत होते त्यांनाच दुसऱ्या महायुद्धांत हुकूमशाहीचा पाडाव करण्यासाठीं ब्रिटिश सत्तेशीं सहकार्य करण्याची घाई झाली! स्पेनच्या फ्रँकोनें स्पॅनिश लोकशाहीवर घाला घातला त्या वेळींहि नेहरूंनीं साम्राज्यवाद् व फॅसिझम् यांच्या जगद्व्यापी स्वरूपाची स्पष्ट कल्पना दिली.

१९३७ सालच्या निवडणुकीची धामधूम संपल्यावर त्यांनीं लगोलग अलाहाबादहून पत्रक काढलें. त्यांत त्यांनीं सांगितलें :

"निवडणुकीची धामधूम संपली आहे. आतां जगाच्या रंगभूमीकडे पाहिलें पाहिजे. सध्यांचें वातावरण असेंच राहात गेलें तर जगत्प्रलय होणार हें नक्की दिसत आहे. इतरांचें संकट तेंच आपलें संकट आहे; कारण एकाच प्रकारच्या मूलतत्त्वांचा सर्वत्र संघर्ष सुरू आहे. या संघर्षाची झळ आपणांलाहि लागून आपलें भवितव्य घडविलें जाणार आहे."

नंतर स्पेनमधील लोकशाही सैन्यांनीं कसा धीरोदात्त संग्राम केला व तरीहि अखेर कोणत्या कारणांनीं त्यांना अपेश आलें हें सांगून पंडितजी म्हणाले :

"आपणां हिंदी लोकांचें काय? आपण उदासीन नाहीं. मानवी स्वातंत्र्यासाठीं धैर्यानें व वीरवृत्तीनें लढणाऱ्यांबद्दल आपण उदासीन कसे राहूं? आपलेहि मोठे हितसंबंध त्यांत गुंतले आहेत व ज्या स्वातंत्र्यासाठीं आपण झगडत आहों तेंहि धोक्यांत आहे हें आपण विसरूं शकत नाहीं. कारण साम्राज्यवाद् आणि फॅसिझम् हे सहोदर बंधु आहेत; हातांत हात घालून ते जातात. त्यांतला एकाचा विजय म्हणजेच उभयतांचा जगद्विजय होय."

ही भूमिका त्यांनीं अनेकदां वेगवेगळ्या शब्दांत व संदर्भात व्यक्त केली आहे. स्पेनमध्यें लोकशाहीचा खून करण्यास फॅसिस्ट हुकूमशहा फ्रँको झटत होता आणि इंग्रज, जर्मन, इटॅलियन् इ. साम्राज्यवादी व हुकूमशाही राष्ट्रें त्याला प्रत्यक्षाप्रत्यक्ष मदत करीत होतीं! फ्रँकोचीं 'स्पॅनिश' सैन्यें वाटेनें स्पेन भाषेंत भिंतीवर लावलेल्या जाहिराती वाचूं शकत नाहींत असें व्यंगचित्र लंडनमध्यें एका चतुर चित्रकारानें काढलें होतें! याचा अर्थ बाहेरच्या समर्थ राष्ट्रांनीं आपले सैनिक स्पॅनिश लोकशाहीचे भाडोत्री मारेकरी म्हणून दिले होते! हें पाहिलें म्हणजे नेहरूंच्या वरील म्हणण्याची सत्यता पटेल. पण केवळ विवेचन करून

किंवा शाब्दिक दिलासा देऊन पं. नेहरू थांबले नाहींत. स्पॅनिश लोकशाहीच्या मर्द सैनिकांना जातीनें धीर देण्याकरितां माद्रिद् येथें ते गेले आणि बाँबच्या वर्षावांत तेथें त्यांनीं मुक्कामहि केला ! हिंदी राष्ट्रसभेकडून स्पॅनिश लोकशाहीच्या अभिनंदनाचा ठराव त्यांनीं केला आणि स्पेनला धान्य पाठविण्याची खटपटहि केली. या सर्वांमुळें स्पेनला फार मोठी मदत झाली असें कोण म्हणेल? पण मानवी हक्काचा लढा सर्वत्र एक कसा असतो याची जाणीव यायोगें वाढली आणि ही जाणीव करून देणाराकडेच साहजिकच सुधारलेलें जग आदरानें पाहूं लागलें हें मात्र खरें !

फॅसिझम्‌ला संपूर्ण व सर्वांगीण विरोध ही पंडितजींची पहिल्यापासून ठाम भूमिका होती. फॅसिझम् ही भांडवलशाहीची अगदीं निदानीची अवस्था असते. फॅसिझम् काय किंवा नाझीझम् काय, ही एक अर्थव्यवस्था किंवा राज्ययंत्र आहे. त्याप्रमाणेंच किंवा त्याहिपेक्षां अधिक ती एक विशिष्ट मनोवृत्ति आहे. या मनोवृत्तींत कोमल भावनांना मुळींच स्थान नसतें. हिंसा, क्रौर्य, कर्मठपणा इ० मनाचे जे ताठर गुणधर्म त्यांची मशागत केली जाते. फॅसिझम् हा बुद्धिवादाचा कट्टा दुष्मन आहे. त्यानें समतेचें तत्त्व हास्यास्पद ठरविलें आहे. 'बळी तो कान पिळी' किंवा 'समर्थ तेच जगायला लायक' अशा घोषणा हा पंथ करीत असतो. वंशभेद, वर्णभेद, वर्गभेद या सर्वांचा हा पुरस्कर्ता असल्यानें मानवतावादाला यानें हरताळ फांसला आहे. युद्धामुळें माणसाचें सत्त्व बहराला येतें असें मानणारा हा पंथ युद्धाचा पुरस्कर्ता व अहिंसेचा विरोधक असावा यांत नवल काय? नेहरूंचें सुसंस्कृत व सहृदय मन या सर्वांविरुद्ध बंड करून उठतें. पंडितजींना १९४० सालीं जेव्हां चार वर्षांची कडक शिक्षा झाली त्या वेळीं आपली कैफियत दाखल करतांना ते म्हणाले होते :

"फॅसिझम् आणि नाझीझम्‌विरुद्ध माझ्या सर्व शक्ति बंड करून उठतात. शरणागति पत्करण्याच्या ब्रिटिश सरकारच्या धोरणास मीं कित्येकदां विरोध केला आहे. मांचूरियाच्या स्वारींत व स्पेन, मध्य युरोप, अबिसिनिया, चीन येथें या शरणागतीच्या धोरणानें एकामागून एक अशा या देशांचा विश्वासघात केला गेला हें पाहून माझें मन दुःख व संताप यांनीं भरून जातें. लोकसत्तेचे दीप एकामागून एक मालविले गेले आहेत ! साम्राज्यशाहीला असें वागण्याशिवाय गत्यंतर नाहीं हें मी जाणतों. दुसऱ्या

साम्राज्यशाह्यांना शरण गेलें नाहीं तर तिचा तात्त्विक पायाच कोलमडून पडेल. तिला दोनच मार्गांतून निवड करावयाची आहे. एक, इतर साम्राज्य-शाह्यांना शरण जाणें किंवा लोकसत्ता व स्वातंत्र्य यासाठीं स्वतःचें विसर्जन करणें याखेरीज मधला मार्गच नाहीं.''

फॅसिझम्‌बद्दलचा हा तिरस्कार अत्यंत निःस्वार्थी वृत्तीनें पंडितजींनीं अनेकदां व्यक्त केला आहे. लखनौ, फैजपूर यानंतर पुनः तिसऱ्यानें त्यांचीच काँग्रेसच्या अध्यक्षपदीं निवड करण्याचें लोकांनीं ठरविलें तेव्हां त्यांनीं तें साफ नाकारलें. ' देशांत अशानें फॅसिस्ट मनोवृत्ति वाढीला लागते.' असें सांगून देशांत मिळणारा सर्वोच्च मान त्यांनीं नाकारला. आपल्या प्रियपत्नीच्या अस्थि घेऊन ते हिंदु-स्थानास येत असतां रोमला त्यांना उतरावें लागलें. त्या वेळीं मुसोलिनीनें त्यांना सन्मानपूर्वक आपल्या प्रासादांत पाचारण केलें. पण मानवी सात्त्विक मूल्यांच्या त्या आसुरी मारेकऱ्यानें देऊं केलेला तो दरबारी मान पंडितजींनीं लाथेनें दूर केला !

या आणि अशाच गोष्टींनीं फॅसिझम्‌चे वैरी व लोकसत्तेचे कैवारी असा नेहरूंबद्दलचा लौकिक पाश्चात्य देशांत दुमदुमत आहे. असा एक प्रवाद आज सर्वत्र उठला आहे कीं, आज इंग्लंड-अमेरिका येथें नेहरूंचें अलौकिक स्वागत होत आहे तें सहेतुक आहे. आशिया खंडांत ठिकठिकाणीं कम्युनिझम्‌चे सुरुंग पेरले गेले आहेत. चीन तर पुरा कम्युनिस्ट बनलाच आहे. तेव्हां या ' लाल ' संकटाचा परिहार करण्याकरितां इंग्लंड व अमेरिका आज आपलीं सर्व प्रकट व गुप्त सामर्थ्यें इरेला घालीत आहेत. आशियांत हिंदुस्थानचें महत्त्व फार मोठें आहे. प्राचीनता, संपन्नता आणि विशालता या सर्व दृष्टींनीं हा देश आशिया खंडाच्या अग्रभागीं आहे. तेव्हां या देशाचें लोकप्रिय सरकार व त्याचा विख्यात नेता आपल्या कटांत सामील करून घेतला तर आशियांत भडकत चाललेल्या कम्यु-निझम्‌ला खास आळा घालतां येईल. मागें अशाच कारणासाठीं चँग कै शेकचा फुगा अमेरिकन व इंग्लिश सरकारांनीं असाच नाहीं का फुगविला ? आणि आतां या चिनी नेत्याच्या सुविद्य अर्धांगीला ट्रूमनसाहेब साधी मुलाखत द्यायलाहि तयार नाहींत ! उद्यां उपयुक्तता संपतांच हीं भांडवलवादी राष्ट्रें नेहरूंना असें निर्माल्यवत्‌ कशावरून करणार नाहींत ? आणि असें जर होण्याचा संभव आहे, तर आजची पाश्चात्य सृष्टींतील नेहरूंची ख्याति व लोकप्रियता यांना सत्याचा कसला आधार आहे ?

या म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. भांडवलशाहीच्या मायाबाजारांत अशक्य असें काय आहे ? उद्यां काय होईल हें अचूक सांगणें भविष्यज्ञात्यांनाहि अवघड असतें. पण वर ज्या प्रवादाचा उल्लेख केला तो बिनतोड मात्र नाहीं. एक तर, चँग कै शेकची नेहरूंशीं तुलनाच होऊं शकत नाहीं. चीनच्या त्या आडमुठ्या, हिंस्र हुकूमशाही सेनानीचें आमच्या सात्त्विक, सुसंस्कृत नेत्याशीं कसलें साम्य आहे ? कसलेंच नाहीं. राजकीय नेतृत्व एवढें एकच चँग कै शेकचें वैशिष्ट्य होतें. तें मिळालें तेव्हां इंग्लंड-अमेरिका त्याच्या गौरवासाठीं पुढें झालीं आणि तें जातांच त्याला या सुधारलेल्या राष्ट्रांच्या सरकारांनीं उष्ट्या पत्रावळीप्रमाणें फेंकून दिलें ! नेहरू पंतप्रधान नव्हते तेव्हांहि त्यांच्या नांवाचें पाश्चात्य जनतेला विलक्षण आकर्षण होतें. आणि म्हणूनच असें वाटतें कीं, उद्यां राजकीय नेतृत्वाचीं वस्त्रें त्यांना उतरावीं लागलीं तरी त्यांना पाश्चात्य जगांत प्रतिष्ठेचें स्थान राहीलच.

आणखी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. पाश्चात्य राष्ट्रांतलीं सरकारें आणि पाश्चात्य जनता हीं एकरूप समजून कसें चालेल ? पाश्चात्य राष्ट्रांतलीं सरकारें जशीं भांडवलशाही आहेत तशी जनता आहे का ? मुळींच नाहीं ! तसें असतें तर हिटलरपुढें लोटांगण घालणाऱ्या चेंबर्लेनला स्थानभ्रष्ट करून नाझीवादाशीं सामना देण्यास इंग्लिश सरकारला तेथील जनतेनें भाग पाडलें असतें का ? इंग्लिश सरकार जेव्हां नेहरूंना राजबंदी म्हणून तुरुंगांत डांबत होतें, तेव्हांहि इंग्लिश जनता नेहरूंविषयीं आदर प्रकट करीत नव्हती का ? नेहरूंच्या पाश्चात्य देशांतल्या लोकप्रियतेला तेथील पुरोगामी जनतेच्या अंतःकरणाची अशी भक्कम बैठक असल्यानें तेथल्या सरकारांच्या मतलबीपणानें मोठेसें बिघडतें असें वाटत नाहीं. नेहरूंची त्रिखंड कीर्ति ही त्यांच्या होणाऱ्या सरकारी गौरवावरून नव्हे, तर बिनसरकारी स्वागतावरून सिद्ध झाली आहे हें पुनः पुनः सांगावेंसें वाटतें.

आशियांतल्या इंग्लंड-अमेरिका गटाच्या शत्रूंना आळा घालण्याचें काम नेहरू पत्करतील असें मानण्याचें कारण नाहीं. नेहरू हे कट्टे साम्राज्यविरोधी आणि लोकसत्तावादी आहेत. पाश्चात्य साम्राज्यवाद्यांना आशिया हें कुरण आजवर फार चांगलें मिळालें होतें. या कुरणांत स्वैरपणें चरणाऱ्या भांडवलपुंगवांना हांकलून लावणें हें नेहरूंचें जीवितकार्य होतें. जग एक स्वयंशासित

राष्ट्रांचा खेळीमेळीनें वागणारा राष्ट्रसंघ असावा हें अनेक उदात्त पुरुषांप्रमाणेंच नेहरूंचें ध्येयस्वप्न आहे. परंतु आशिया खंडांतले देश हे मागासलेले व पिळले जाणारे आहेत, तेव्हां पारतंत्र्याचें जोखड झुगारून देऊन त्यांनीं स्वतंत्र व्हावें व आपला एक स्वतंत्र संघ करावा असें नेहरूंनीं फार पूर्वीपासून सांगितलें आहे.

"असा हा पूर्वेकडील राष्ट्रसंघ तयार होईल; त्यांत चीन आणि हिंदुस्थान, ब्रह्मदेश आणि सिलोन, आणि नेपाळ व अफगाणिस्तान हीं राष्ट्रें येतील; मलायाहि येईल; आणि सयाम, इराण व दुसरींहि अनेक राष्ट्रें कां न यावीं ? अशा रीतीनें स्वतंत्र राष्ट्रांचा हा बलिष्ठ संघ होऊन तो स्वतःच्या व जगाच्या कल्याणाकरितां झटूं शकेल...म्हणून आपण पुढें होऊन हा पूर्वेचा राष्ट्रसंघ स्थापण्यासाठीं झटूं या. मात्र, हा राष्ट्रसंघ ही जगाच्या संयुक्त राष्ट्रसंघाची पहिली पायरी आहे हें डोळ्यांआड होऊं देतां कामा नये."

१९४० सालीं मांडलेली ही सूचना प्रत्यक्षांत आणण्यासाठीं पं. नेहरूंनीं राज्यसूत्रें हातांत येतांच मोठी खटपट केली. आशियांतील राष्ट्रांची एक परिषद दिल्लीस भरली. महात्माजीहि त्या वेळीं हजर राहिले. आणि या प्राचीन खंडांतल्या राजकीय धुरीणांना एकत्र येण्याची संधि मिळाली. पुढें ज्या वेळीं तीन नोव्हेंबर १९४८ रोजीं संयुक्त राष्ट्रसंघापुढें पंडित नेहरूंनीं तें चिरस्मरणीय भाषण करून आपल्या जगद्वंद्य राष्ट्रपित्याचा सत्य-अहिंसेचा संदेश जगांतील सर्वोच्च व्यासपीठावरून लोकांना ऐकविला त्या वेळीं पाश्चात्य राष्ट्रांना बजावलें कीं, 'केवळ पाश्चात्य राष्ट्रें म्हणजेच सर्व जग आहे असें समजूं नका. आशिया आतां जागा झाला आहे.'

आशिया खंडाची अशी कैफियत पंडितजींनीं आपल्या नेहमींच्या उत्साहानें जगापुढें सदैव मांडली आहे. आज इंडोनेशिया, ब्रह्मदेश, सयाम इ० देशांतील राष्ट्रनेते पंडितजींकडे आपला ज्येष्ठ नेता या आदरबुद्धीनें पाहात आहेत. डॉ. शिवकर्ण आपल्या राष्ट्रीय चळवळीचें नेतृत्व स्वीकारण्याची त्यांना विनंती करतात. डच साम्राज्यशाहीशीं वाटाघाटी करावयास निघालेले डॉ. हाटा दिल्लीस मुद्दाम उतरून नेहरूंचा सल्ला घेतात; आणि ब्रह्मदेशचे थाकिन नू यांनाहि पंडितजींना वेळोवेळीं कौल लावून आपल्या सरकारचें धोरण ठरविणें आवडतें. पूर्व

आशियांतील राष्ट्रीय चळवळींत कम्युनिझम्‌चा प्रभाव बराच मोठा आहे. तेव्हां तेथील राष्ट्रीय चळवळी यशस्वी होणें म्हणजे कम्युनिझम्‌चा एक प्रकारें जयच होणें होय. पण हा धोका पत्करूनहि इंग्रज, फ्रेंच, डच साम्राज्यशाह्यांविरुद्ध नेहरूंनीं या स्वातंत्र्योन्मुख देशांतल्या राष्ट्रनेत्यांना साह्य दिलें आहे. साम्राज्यविरोध हें या पूर्व आशियांतील नेहरूंच्या राजकारणाचें निश्चित धोरण आहे; आणि म्हणूनच इंग्लिश व अमेरिकन भांडवलशाह्यांना पंडित नेहरूंचा हस्तक म्हणून उपयोग करतां येणें शक्य कोटींतलें नाहीं.

पंडितजींच्या परराष्ट्रीय कीर्तीला त्यांच्या अनेक गुणांप्रमाणें त्यांची प्रामाणिकता हीहि कारणीभूत झाली आहे. फॅसिझम्‌नें माणसाच्या संस्कृतींतलीं जीं अनेक मूल्यें नाहींशीं केलीं त्यांत प्रामाणिकता प्रमुख आहे. नाझींचा बिलंदर प्रचारमंत्री गोबेल्स म्हणत असे : ‘ असत्य सारखें उच्चारीत राहिलें म्हणजे त्याला सत्याचें स्वरूप येतें.’ फॅसिझम् आणि तत्सम पंथ यांची थोड्याफार फरकानें हीच वृत्ति आहे ! पं. नेहरूंनीं आंतरराष्ट्रीय राजकारणांत राष्ट्रीय व्यवहाराप्रमाणेंच असत्य व अप्रामाणिकपणा यांना संपूर्णपणें फांटा दिला आहे. पाकिस्ताननें अपहृत हिंदु स्त्रियांना परत करण्याबद्दल अनास्था दाखविली, आर्थिक व व्यापारी करार मोडले, काश्मीरमध्यें ‘ स्वतंत्र काश्मीर ’ चा मुखवटा चढवून दरोडेखोरांची राजवट स्थापिली तरी नेहरूंनीं आपले करारमदार मोडले नाहींत. जीं आश्वासनें येथील मुसलमानांना दिलीं होतीं तीं अक्षरशः पाळलीं. इंग्लंड आणि अमेरिका यांच्या सरकारचें वर्तन कित्येकदां बुचकळ्यांत पाडण्यासारखें असतें. पण म्हणून आपला मोलाचा शब्द मोडावयाचा असें नेहरूंनीं केलें नाहीं. आणि म्हणूनच आंतरराष्ट्रीय राजकारणांत भारताला मानाचें स्थान प्राप्त झालें. एक नवा आदर्श नेहरूंनीं निर्माण केला आहे.

भारताचें स्थान स्वतंत्र आहे आणि राष्ट्रांच्या दंडनीतीला आळा घालून एक नवें परस्पर सहकार्यावर व शांततेवर उभारलेलें जग आपणांला निर्माण करावयाचें आहे. आधुनिक भारतांतल्या द्रष्ट्यांनीं प्रवर्तित केलेली ही कल्पना असून नेहरू तीच प्रत्यक्षांत आणण्यासाठीं झटत आहेत असें म्हणतां येईल. आणि यासाठीं जागतिक प्रभुत्व मिळविण्याकरितां झटणाऱ्या दोन गटांपैकीं कुठल्याच गटाशीं आपणांला एकरूप व्हायचें नाहीं असें नेहरूंचें धोरण आहे. आज सत्ताधारी

झाल्यावर नेहरूंनीं अपरिहार्यतेनें हें धोरण पत्करलें किंवा कुठल्या गटाचा अंगीकार करावा हें न कळल्यामुळें अर्धवटपणें घेतलेला हा तात्पुरता निर्णय आहे असें मुळींच नव्हे. या निर्णयाची भूमिका १९२० सालींच पूर्ण विचारान्तीं नेहरूंनीं तयार केली असल्याचें स्पष्ट दिसतें. ' हिंदी ट्रेड युनियन् कॉंग्रेसनें आपलें अस्तित्व स्वतंत्र ठेवावें. दुसऱ्या इंटरनॅशनलशीं घरोबा करूं नये. कारण ती संस्था भांडवलदारांच्या हस्तकांनीं व प्रतिगामी लोकांनीं व्यापलेली आहे. म्हणजे इंग्लंडसारख्या भांडवलदारी राष्ट्रांच्या हातांतलें तें बाहुलें आहे. आणि रशियाच्या छायेखालील तिसरी इंटरनॅशनल संस्था हीहि आपणांला उपयोगाची नाहीं, कारण ती हिंसात्मक आहे.' अशा आशयाचें मार्गदर्शन पंडित नेहरूंनीं त्या वेळीं ट्रेड युनियन्च्या अध्यक्षपदावरून केलें होतें. आज स्वतंत्र भारताचे पंतप्रधान झाल्यावर त्याच समंजस मार्गाचा अवलंब प्रभावीपणें ते करीत आहेत.

—आतां जगांत दिग्विजय करूं पाहणाऱ्या दोन्ही गटांचीं सरकारें मनांत काय म्हणत असतील कोणास ठाऊक ! पण प्रगतिपर व शांततावादी जगाला नेहरूंचें स्वतंत्र धोरण खास मान्य आहे. युरोप-अमेरिकेच्या विज्ञानसंस्कृतीनें आणलेली लोकसत्ता आज समतेच्या अभावीं धोक्यांत आहे; उलट रशियानें समता आणली पण हुकूमशाहीचा रूळ फिरता ठेवला आहे ! एकोणिसाव्या शतकांतला उदारमतवाद आज पराभूत झाला आहे ! अशा वेळीं नेहरू व त्यांचा भारतदेश यांकडे संत्रस्त जगानें आशेनें पाहावें यांत नवल कोणतें ? जगांतील दोन प्रमुख गटांत अणुबॉंबच्या निर्मितीबद्दल स्पर्धा लागली आहे. गुप्त रीतीनें दोन्ही गट हिंसात्मक शस्त्रास्त्रांचे संभार सारखे वाढवीत आहेत. केव्हां ठिणगी पडेल आणि केव्हां भडका उडेल याचा नेम राहिलेला नाहीं ! अणुबॉंबचा विध्वंसक मार्ग नको असेल तर गांधीजींचा सत्य-अहिंसेचा विधायक मार्ग पत्करला पाहिजे. हे दोनच पर्याय जगापुढें आहेत असें नुकत्याच झालेल्या गांधीजयंतीचे प्रसंगीं पंडितजींनीं सांगितलें. त्यांतला विधायक पर्याय जगानें पत्करला, तर भारत आणि त्याचा हा त्रिखंडकीर्ति नेताच नेतृत्वाचें कार्य करूं शकेल असें जगाला वाटतें. " हिंदी स्वातंत्र्याची मशाल नेहरूंनीं जगांतल्या सर्वच राष्ट्रांना आपला मार्ग दिसावा या हेतूनें पुढें धरिली आहे. " या लॉर्ड पेथिक लॉरेन्स यांच्या उद्गारांचें रहस्य याहून दुसरें कोणतें आहे ?



⊘ ⊘ ⊘

## : ६ :

# त्रिमूर्ति

३० जानेवारी १९४८ हा दिवस जगाच्या इतिहासांत ' काळा शुक्रवार ' म्हणून नोंदला जाईल. त्या दिवशीं गांधीजींचा अमानुष तऱ्हेनें वध करण्यांत आला ! सर्व जग दुःखांत बुडून गेलें ! हिंदराष्ट्र पोरकें झालें ! पण भूतलावर एक व्यक्ति सर्वांत अधिक दुःखी होती. त्या व्यक्तीला आपल्या जीवनांतलाच एक महत्त्वाचा भाग अस्तंगत झाला असें वाटत होतें. पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हृदयांतील शोकाचे फणकारे त्या वेळीं कुणाच्याहि शोकाशीं तुलतां आले नसते. त्यांचा मानसपिता, स्फूर्तिदाता गुरु त्या दिवशीं त्यांच्या स्वतःच्या शहरांतच एका माथेफिरूच्या गोळीला बळी पडला होता ! आपला राष्ट्रपिता अस्तंगत झाला याचें दुःख, आणि आपण स्वतः सत्ताधारी असतां त्याचे पृथ्वी-मोलाचे प्राण रक्षण करूं शकलों नाहीं याची चीड, असा तो दुहेरी शोक होता. पंडितजींच्या या भयंकर शोकाची सर्वांनाच कल्पना होती. गांधीवधाच्या वार्तेनें दुःखित झालेलीं अंतःकरणें या वेळीं पंडितजींना काय वाटत असेल याच कल्पनेंत गढलीं होतीं. गांधीजींच्या मृत्यूमुळें अश्रु ढाळणारे असंख्य नेत्र नेहरूंकडे लागले होते. नेहरूंना काय वाटत असेल, त्यांच्या पर्वतप्राय दुःखाचें स्वरूप काय असेल, हाच विचार प्रत्येकास ग्रासून टाकीत होता.

**" बाळ रडे तेजःकण दिसण्यातें भारी**
**बाळ रडे रात्रभरी भीषण अंधारीं "***

---

* " The child crying for the light
The child crying all the night." —*Tennyson*

पण अशी स्थिति असूनहि नेहरूंना शोकमग्न होऊन भागणार नव्हतें. सामान्य माणसांना अश्रूंना वाट देऊन आपलें हृदय मोकळें करण्यास पूर्ण वाव होता. त्यांच्यावर दुसरी जबाबदारी नव्हती. नेहरू राष्ट्रनेते असल्यामुळें त्यांना मोकळ्या मनानें शोक करीत बसण्याचेंहि स्वास्थ्य व सुख लाभणार नव्हतें. गांधीजींच्या स्वर्गवासामुळें निराश व संतप्त झालेल्या देशाला आंवरून धरण्याचें काम त्यांना करावयाचें होतें. १९३२ सालीं गांधीजींनीं आपल्या प्राणांतिक उपोषणाचा निर्धार त्यांना कळविला तेव्हां 'बापूजी गेले तर काय होईल?' या नुसत्या अभद्र कल्पनेनेंच नेहरू गोंधळांत पडले होते. दुर्दैवानें आज ती कल्पना खरी ठरली होती! १९३२ सालीं नेहरू थोर नेते असले तरी या महान् देशाच्या राज्ययंत्राचें धुरीणत्व त्यांना लाभलें नव्हतें. तें आज लाभलें असल्यानें गोंधळांत पडणें किंवा अश्रु ढाळणें त्यांना शक्य नव्हतें. अंतःकरणाची खोल जखम दाबून धरून देशाला धीर देणें व अराजक माजूं न देणें ही मोठी कामगिरी त्यांना करावयाची होती; आणि ती त्यांनीं मोठ्या हिंमतीनें बजावली यांत शंका नाहीं.

गांधीवधाच्या दिवशीं नेहरूंनीं रेडिओवरून जें राष्ट्राला उद्देशून भाषण केलें किंवा लोकसभेंत दुखवट्याचा ठराव मांडतांना त्यांनीं जें व्यक्तव्य केलें तीं दोनहि वक्तव्यें त्यांच्या जीवनांतील उत्कृष्ट व उदात्त अशीं गणिलीं जातील. 'गांधीजींचा मारेकरी हा तुमच्या आमच्याप्रमाणेंच गांधीजींचें संतान आहे' हें सांगण्यांत तर पंडितजींनीं सहृदयतेची हद्द गांठली. "मी गेल्यावर हा माझी भाषा बोलूं लागेल." ही गांधीजींनीं आपल्या या राजकीय वारसाबद्दल केलेली भविष्यवाणी किती तंतोतंत व लगोलग खरी ठरली हें पाहण्यासारखें आहे.

गांधीजी आणि पंडितजी यांचीं कर्तृत्वें एकमेकांत कितीतरी मिसळून गेलेलीं आहेत. गांधीजींनीं पंडितजींच्या अंगचें मोठेपण फार पूर्वीच ओळखलें आणि त्यांच्या कर्तृत्वाला पहिल्यापासून हवा तेवढा वाव दिला. सूर्यप्रकाश फुलाला वेढून राहतो, पण फुलाच्या विकासाला अडथळा करीत नाहीं. गांधीजींनीं पंडितजींच्या नैसर्गिक गुणसंपदेच्या विकासाला अडथळा न करतां त्यांना सदोदित साह्य केलें. आणि एकपरीनें पंडितजींच्या पित्याचीच भूमिका अधिक तत्परतेनें पुढें चालू ठेविली.

ख्रिस्ती धर्मांत 'पिता', 'पुत्र' आणि 'पवित्रात्मा' अशी त्रिमूर्ति कल्पिलेली

आहे. गांधी-युगांत जेव्हां नेहरू पिता-पुत्रांनीं राजकारणाच्या आघाडीवरचे सनदशीर व क्रांतिकारक असें दोन्ही प्रकारचें नेतृत्व मिळविलें तेव्हां या ' त्रिमूर्ति '-ची उपमा गांधी व नेहरू पितापुत्र यांना देण्यांत येऊं लागली. यांत कित्येकदां उपहासाचाहि भाग असे ! पण तो सोडून दिला तर औचित्य व पावित्र्य या दोनहि दृष्टींनीं ही उपमा मोठी समर्पक होती यांत शंका नाहीं. पण या त्रिमूर्तीच्या परस्पर ऋणानुबंधाचें आकलन मात्र फारच थोड्यांना करतां आलें. या त्रिमूर्तींत कुणीं कुणाला क्रांतिकारक बनविलें आणि कुणीं कुणाच्या जहाल-पणाला नेमस्तपणाची मुरड घातली हें पाहणें फार उद्बोधक ठरेल. कारण गांधीजी, मोतीलाल आणि जवाहरलाल यांनीं एकमेकांच्या जीवनावर जे संस्कार केले त्यांचा इतिहास म्हणजे तिघां मित्रांचा व्यक्तिगत स्नेह्यांचा विलास नसून गेल्या २५ वर्षांत हिंदी राजकारणांत ज्या तीन प्रबळ प्रवृत्ति कार्यक्षम होत्या त्यांच्याच कर्तृत्वाची हकीकत आहे.

मोतीलाल हे एका दृष्टीनें या त्रिमूर्तींत जुन्या जमान्यांतलेच होते असें म्हणावयास हरकत नाहीं. वयानें ते गांधीजींपेक्षां मोठे होते. त्यांची निम्मी हयात नेमस्त मंडळींत दरबारी राजकारण करण्यांत गेली. स्वाभिमान राखून व निरलस राहून भूतलावरील सुखांचा भरपूर आस्वाद घेणारा तो एक उमदा राजयोगी होता. संग्रामाची फारशी फिकीर मोतीलालना नव्हती. उलट, गांधीजी हे वैराग्य-संपन्न कर्मयोगी होते. आणि गरिबांच्या झोपड्यांमध्यें त्यांचें अंतःकरण सदैव गुंतलेलें असे. जीवनाच्या सर्व शाखांत क्रांति करण्यासाठीं त्यांचा पर्वतप्राय उद्योग सुरू होता. आणि म्हणूनच धार्मिक प्रवृत्ति, वेषभूषा इ० गोष्टींमुळें जरी ते जुनेपुराणे वाटत, तरी त्यांची सुधारकी प्रवृत्ति ही सर्वस्वीं आधुनिक होती. आहे त्या चौकटींत चाललेलें काम निरुपयोगी आहे, राजकीय स्वातंत्र्यापासून आहार-शास्त्रापर्यंत सर्वत्र क्रांति झाल्यावांचून माणसाचें, विशेषतः हिंदी लोकांचें जीवन सुखी होणार नाहीं अशी त्यांची क्रांतिकारक दृष्टि होती. आणि या दृष्टीस अनुसरून अहिंसेच्या तरफेनें राष्ट्र वर उचलण्याचा अपूर्व प्रयोग त्यांनीं सुरू केला होता.

जवाहरलाल ऐश्वर्यांत जन्म पावले आणि वाढले ही गोष्ट खरी; पण क्रांतीच्या माहेरघरांत त्यांचें कौमार वय गेलें. नवें जग त्यांना जवळून पाहायला मिळालें. आणि तिकडून परत आल्यावर अंतरंगीं अथांग सहृदयता असल्यानें

आपल्या पीडित देशबांधवांची स्थिति पाहून त्यांचें मन द्रवलें. म्हणूनच ऐश्वर्य व उपभोग सोडून त्यांनीं देशसेवेचा कंटकमय मार्ग पत्करला. आणि या मार्गांत जो सर्वांगीण क्रांतीचा पुरस्कार करणारा महान् नेता (गांधीजी) त्यांना आढळला त्याच्या पथकांत आपलें नांव त्यांनीं नोंदविलें.

मोतीलालना जवाहरलालच्या या साहसानें आकर्षित केलें. मुलाला राजकारणाच्या क्षेत्रांत एकटें सोडून देणें त्यांच्या वत्सल मनाला परवडण्यासारखें नव्हतें. असें सांगतात, जवाहरलालना पहिली शिक्षा झाली त्या दिवशीं रात्रीं मोतीलाल मंचकावर न झोंपतां खालीं झोंपले! आज आपला जवाहर तुरुंगाच्या कोठडींत जमिनीवर झोंपला असेल या कल्पनेनें त्या पुत्रवत्सल नेत्याला मंचकावर झोंप येईना! जवाहरलालनीं धकाधकीचें राजकारण पत्करलें याचमुळें मुख्यतः मोतीलालनीं आपला सनदशीरपणा सोडला. अर्थात् कुठेंहि एकदां ते पडले कीं, आपल्या प्रभावानें अग्रभागीं झळकायचे असें त्यांचें गुणवैभव होतें. आणि म्हणूनच नेमस्त मार्ग सोडून काँग्रेसमध्यें येतांच मोतीलालजी या जहाल संस्थेंतहि अग्रगण्य म्हणून चमकूं लागले.

मोतीलालजींच्या ह्या स्थित्यंतराचीं इतराहि कांहीं कारणें लक्षांत घेतलीं पाहिजेत. नेमस्त पण स्वाभिमानी अशा जुन्या राष्ट्रवादी माणसांत मोतीलालजींची गणना होत असे. क्रांतीऐवजीं विकासाच्या मार्गानें इंग्रजांपासून आपण स्वराज्य मिळवूं शकूं असा ठाम विश्वास बाळगणाऱ्या पिढीचे ते प्रतिनिधि होते. परंतु जालियनवाला बागेच्या हत्याकांडानें या जुन्या राष्ट्रवादी नेमस्तांना जबरदस्त धक्का बसला. अमृतसर काँग्रेसचे अध्यक्ष (१९१९) असतांना मोतीलालांच्या भाषणांत या बदलाचें स्पष्ट प्रतिबिंब पडलें आहे. काँग्रेसमध्यें गांधीयुगाला सुरुवात व्हायच्या सुमारास मोतीलालसारख्यांची मनोभूमिका या युगाच्या स्वागतासाठीं तयार झाली होती. शेतें भाजलीं म्हणजे पुढें पिकें जोमदार येण्याच्या दृष्टीनें तीं चांगलीं होतात, त्याचप्रमाणें जालियनवाला बागेच्या अत्याचारामुळें होरपळलेल्या मोतीलालांच्या व त्यांच्यासारख्या नेमस्त राष्ट्रवाद्याच्या अंतःकरणांत सत्याग्रही क्रांतीचें बीजारोपण होण्यास मदत झाली.

मोतीलालजींच्या अंगच्या आणखीहि एका गुणाचा उल्लेख करणें जरूर आहे. ते स्वतः नेमस्त प्रवृत्तीचे आणि ऐहिक ऐश्वर्याचे भोक्ते असले, तरी

वैराग्य व क्रांतिकारकता यांची महति त्यांच्या तालेवार मनाला जरूर पटे. सरदार भगतसिंग यांना तुरुंगांत भेटायला मोतीलाल गेले होते. त्या युवक क्रांतिवीराला भेटून बाहेर पडतांच मोतीलाल सद्गदित होऊन उद्गारले, "माझ्याहून अधिक सामर्थ्यवान् अशा एका माणसाच्या संगतींत असल्याचा मला इतका वेळ अनुभव येत होता." मोतीलालसारख्या मानधन व लौकिकवान् नेत्याचे हे उद्गार आहेत. यावरून मोतीलालजींच्या गुणग्राहकतेची व क्रांतिकारक वृत्तीसंबंधीं त्यांना वाटणाऱ्या आस्थेची कल्पना येईल. गांधीजींकडे ते आकर्षित झाले ते याचमुळें.

मोतीलालजी काँग्रेसच्या राजकारणांत धडाडीनें पडले आणि आपल्या गुणैश्वर्यानें चमकूंहि लागले. त्यांची कुशाग्र बुद्धि, दरारा, शौर्य, व्यक्तित्व, संपन्नता हीं सर्वच गांधीजींना फार मोलाचीं वाटत. गांधीजींनीं मोतीलालना फकिरीची दीक्षा दिली खरी, पण एवढा ऐश्वर्यसंपन्न पुरुष आपला सहकारी बनला याविषयीं गांधीजींनाहि धन्यता वाटे. गांधीजींच्या लोकविलक्षण तंत्रानें मोतीलाल दिपून जात. पण या तंत्राला क्वचित् नेमस्तपणाचें वळण देण्यासहि त्यांचा उपयोग होई. मोतीलालजींनीं स्वराज्यपक्ष काढल्यानंतर गांधीजींचा त्याला आशीर्वाद मिळविला. गांधीजींच्या एकंदर जीवनदृष्टीशीं मोतीलालजींचें पटण्यासारखें नव्हतें. पण अत्यंत ठळकपणें गांधीजींच्या अवतारकार्यांत मोतीलालजींना एक मोठी विलोभनीय गोष्ट वाटली. ती म्हणजे गांधीजींनीं हिंदी माणसांच्या स्वाभिमानाची केलेली जागृति. स्वतः मोतीलाल मानधन होते. आणि इंग्रजांनीं आपल्या राष्ट्राचा तेजोभंग केला आहे ही गोष्ट त्यांना डांचत असे. इंग्रजांविरुद्ध निःशस्त्र हिंदी लोकांनीं छाती वर काढून कसें उभें रहावें. हें गांधीजींनीं शिकविलें, याची मोतीलालजींना फार फार कृतज्ञता वाटे. गांधीजी व मोतीलाल यांच्या परस्पर आकर्षणाचें रहस्य असें होतें.

तथापि, स्वराज्यपक्ष, नेहरू-रिपोर्ट, मंडलाकार परिषदेची मागणी या मार्गानें जाणारें मोतीलालजींचें कर्तृत्व हें कांहीं क्रांतिकारक होतें असें म्हणतां येणार नाहीं. सनदशीर व तडजोडीच्या राजकारणाकडे कित्येकदां त्यांचें मन वळे. आणि म्हणूनच ज्या आपल्या क्रांतिकारक मुलाच्या प्रेरणेनें ते धकाधकीच्या राजकारणांत पडले त्यालाच कित्येकदां त्यांना विरोध करावा लागला. १९२८ सालीं मोतीलालांनीं तयार केलेला 'नेहरू-रिपोर्ट' जवाहरलालांनीं

१९२९ सालीं लाहोरला रावी नदींत बुडवून टाकला. गांधीजींशीं मोतीलालांचे मतभेद प्रसिद्धच होते. " हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचें भवितव्य माझ्यासमोर याच माझ्या घरांत ठरवा. " असे कळकळीचे उद्गार काढून १९३१ च्या आरंभी या महान् देशभक्तानें इहलोकींची यात्रा संपविली ! मोतीलालांच्या मृत्यूनें त्रिमूर्ती-मधील सनदशीर प्रवृत्तीची मूर्ति पडद्याआड गेली आणि 'पुत्र' आणि 'पवित्रात्मा' या दोघां क्रांतिकारकांच्या हातांत सर्व सूत्रें आलीं.

गांधीजी आणि जवाहरलाल यांची पहिली भेट १९१६ त झाल्याचें पंडितजी सांगतात. त्या वेळीं पंडितजी ऐन पंचविशींत होते. गांधीजींचें सत्याग्रहाचें अभिनव तंत्र व आफ्रिकेंत त्यांनीं त्याचा बराच यशस्वीपणानें चालविलेला प्रयोग याची कथा हिंदुस्थानांत सर्वत्र माहिती झाली होती. त्यामुळें गांधीजींबद्दल सर्वांना, विशेषतः तरुणांना, विशेष कुतूहल वाटे. पण तरुण जवाहरलालनीं गांधीजींना पाहिलें तेव्हां त्यांना ही व्यक्ति कांहींशी न कळण्यासारखी आहे आणि राज-कारणी तर मुळींच नाहीं असें वाटलें ! पुढें १९२० नंतर त्यांचा खरा परिचय होऊन गांधीजी नेहरू कुटुंबाचे स्नेही व मार्गदर्शक झाले. पण जवाहरलाल आणि गांधीजी यांचें खरें सामरस्य मोतीलालजींच्या मरणोत्तरच झालेलें दिसतें.

पुढील १५-१६ वर्षांच्या राजकारणांत जवाहरलाल आणि गांधीजी यांच्या परस्पर सहकार्याचा स्पष्ट ठसा दिसतो. तसें पाहिलें तर दोघांच्या जीवनदृष्टींत किती भिन्नता, किती वेगळेपणा ! गांधीजींचें जीवन म्हणजे व्रतवैकल्यांचे प्रयोग, तर जवाहरलालना कर्मठपणा म्हटला कीं तिरस्कार येतो. धर्म हा गांधीजींना प्राणवायु वाटे, तर पंडितजी त्याविषयीं पूर्ण उदास ! विज्ञानाकडे पाठ फिरवून गांधीजी नवें जग निर्माण करूं पाहणारे, तर विज्ञानशास्त्रावर पंडितजींची गाढ श्रद्धा ! अंतःप्रेरणा, उपास, नम्रता, अपरिग्रह यांवर गांधीजींचा विशेष भर, तर जवाहरलालजी या सर्व गोष्टींचे कडवे विरोधकच म्हणावे लागतील ! दोघांमधील भेदांची यादी आणखी किती तरी वाढवितां येण्यासारखी आहे. पण असें असूनहि या दोघांना एकमेकांचें जबरदस्त आकर्षण कां वाटलें ? भिन्न प्रवृत्तींच्या व भिन्न तत्त्वज्ञानांच्या या दोन विभूतींचें एकमेकांच्या सहकार्यावांचून कां चाललें नाहीं ?

या प्रश्नांचीं उत्तरें शोधण्यास रुक्ष तर्कवादाचा उपयोग होणार नाहीं किंवा असात्त्विक व पुस्तकी वृत्तीनें या दोघांच्या उच्च भूमिकेचा उलगडा करतां येणार

नाहीं. धार्मिकतेनें रंगलेल्या गांधीजींना जवाहरलालमध्यें कोणते सत्त्वगुण दिसले ? आणि ऐहिक गोष्टींचीच आस्था बाळगणाऱ्या नेहरूंना गांधीजींचें नेतृत्व कसें रुचलें ? याचें रहस्य भावनेच्या चक्षूंनीं पाहणाराला मात्र सहज शोधून सांपडण्यासारखें आहे.

चीनचे सुविख्यात लेखक डॉ. लीन यूटांग यांनीं गांधी-नेहरूंच्या सहकार्याचें रहस्य उलगडण्याचा एक स्वतंत्र प्रयत्न केला आहे. ते म्हणतात : " गांधीजी ही भारतीय राष्ट्रांतील स्त्रीगुणाची प्रतिमा आहे. सेवा, त्याग, धार्मिकता इ० गांधीजींचे गुण हें प्रकृतीचें वैशिष्ट्य आहे. उलट, नेहरूंच्या गुणांतली पराक्रमशीलता, चिकित्सा इ० सामग्री ' पुरुष ' लक्षण आहेत. अशा रीतीनें गांधी-नेहरूंचें सहकार्य म्हणजे प्रकृति-पुरुषाची लीला असून तीमधूनच हिंदी राष्ट्रवादाचा आधुनिक विकास झालेला दिसेल." लीन यूटांगचें हें विवेचन केवळ काव्यमय आहे असें नाहीं, तर त्यांत बराच अर्थहि भरलेला आहे.

गांधीजी आणि जवाहरलाल यांच्या स्नेहभावाचें ' प्रकृति-पुरुष ' या रूपकानें केलेलें वर्णन कांहीं वेळ बाजूला ठेवून दुसऱ्या एका मुद्याचा प्रथम विचार करून घेऊं या. या दोघांत स्थूलमानानें विरोधाचा भाग पुष्कळ दिसत असला तरी त्यांच्यांत एकमेकांना ओढून घेणारें असें गाढ साम्य सूक्ष्मांत होतें. गांधीजींनीं ज्या अभय, त्याग, सत्य इ० गुणांची घोर साधना जन्मभर केली, त्या गुणांचीं देणगी पंडितजींना जन्मतःच आहे याचें गांधीजींना साहजिकच कौतुक वाटे.

" जवाहरलाल स्फटिकासारखे शुद्ध आहेत. त्यांचा प्रांजलपणा संशयातीत आहे. ते शूर आहेत......राष्ट्र त्यांच्या हातांत सुरक्षित राहील."

१९२९ सालीं लाहोर कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावर पंडितजींची निवड झाल्यावर गांधीजींनीं त्यांच्यावर जो प्रशंसात्मक लेख लिहिला होता त्यांत वरील आशयाचे उद्गार त्यांनीं काढले होते. गांधीजींनीं वर्णिलेल्या नेहरूंच्या या गुणांचा प्रत्यय आज राष्ट्राला नेहरूंनीं केवढ्या मोठ्या प्रमाणांत आणून दिला हें पाहिलें म्हणजे गांधीजींच्या द्रष्टेपणाचें सादर आश्चर्य वाटतें. गांधीजींना नेहरूंची ही थोर गुणसंपदा पटल्यामुळेंच आपला राजकीय वारस निवडतांना, सांप्रदायिक गांधीवाद्यांपैकीं कुणाचें नांव न घेतां ' जवाहरलाल माझे राजकीय वारस आहेत ' अशी गांधीजींनीं घोषणा केली.

नेहरूंसारख्या धर्म न मानणाऱ्या माणसाशीं गांधीजींचें एवढें सख्य पाहून ज्यांना आश्चर्य वाटतें किंवा ही एक गांधीजींनीं प्रेमाच्या पोटीं पत्करलेली विसंगति होती असा भास होतो, त्यांना गांधीजीहि कळले नाहींत आणि पंडितजीहि उमगले नाहींत!! गांधीजी धर्मप्रवण होते तरी त्यांच्या धर्मविषयक कल्पना संकुचित वा सांप्रदायिक नव्हत्या. फैजपूर काँग्रेसच्या सुमारास त्यांच्या कोणी मतलबी अनुयायानें त्यांच्या कानीं लागून सांगितलें, 'जवाहरलालला धर्माविरुद्ध बोलण्याची मनाई करून तुमच्या धर्मश्रद्धेची दीक्षा द्या.' तेव्हां तें म्हणाले, "जवाहरलालला श्रद्धा देणारा मी कोण? काल कुणीसें त्याला 'तुलसी-रामायण' अर्पण करण्यास आणलें तेव्हां तो म्हणाला, 'यानं गरिबांचं पोट भरणार आहे का? गरिबांचं पोट ज्यानं भरतां येईल तोच माझा धर्म.' इतकी जाज्वल्य ज्याची स्वधर्मनिष्ठा आहे त्याला त्याचा प्रिय धर्म सोडण्यास मी कसं सांगूं! धार्मिक सहिष्णुता हें तर माझं ब्रीद आहे." गांधीजींच्या या मार्मिक उत्तरांत पंडितजींचेंहि वर्णन आहे, आणि गांधीजींच्या उदार धर्मदृष्टीचेंहि दिग्दर्शन आहे.

गांधीजींच्या धर्मदृष्टीचीं क्षितिजें विशाल होतीं म्हणून त्यांना पंडितजींसारख्या 'नास्तिकां'तलें धर्मसत्त्व कळलें. तसेंच, पंडितजी पुस्तकी 'मार्क्सवादी' नव्हते म्हणूनच गांधीजींच्या धर्मप्रवणतेला एकदम 'प्रतिगामी' ठरवून दूर होण्याचा आत्मघातकी मार्ग त्यांनीं पत्करला नाहीं. पंडितजींचा समाजवाद ठोकळेबाज नव्हता. एक नवें आर्थिक तत्त्वज्ञान अथवा आधुनिकपणाचें एक चिन्ह म्हणून कांहीं त्यांनीं समाजवादाचा अंगीकार केला नव्हता. राष्ट्रीय संग्रामाच्या मंथनांतून निघालेल्या समाजवादाचे ते प्रतिनिधि होते, म्हणूनच आपल्या विराट् देशाच्या स्वातंत्र्यासाठीं अधिकांत अधिक सामर्थ्य ज्यानें जनतेच्या अंगीं निर्माण केलें त्या महात्म्याच्या निशाणाखालीं येण्यांत त्यांना धन्यता वाटली.

"माझ्या सद्भाग्याचें मला आश्चर्य वाटतें. स्वातंत्र्ययुद्धांत हिंद-भूमीची सेवा करणें हाच पुरेसा मान आहे. महात्मा गांधींसारख्या पुढाऱ्याचे नेतृत्वाखालीं ती करायला मिळणें हें तर महाभाग्य आणि आपल्या देशासाठीं क्लेश सोसावे लागणें याहून सुदैव तें कोणतें? आपलें

> वैभवशाली स्वप्न मूर्त स्वरूपांत येणें किंवा आपल्या कार्यांत देहार्पण करावें लागणें एवढेंच काय तें या सुदैवाहून उजवें असें म्हणतां येईल.''

असे धन्योद्गार पंडितजींनी काढले आहेत.

म. गांधींबद्दलचें नेहरूंना वाटणारें ममत्व त्यांनीं अगणित वेळां व्यक्त केलें आहे; आणि तें व्यक्त करतांना दर वेळीं गांधीजींच्या अवतारकार्याचें बुद्धिग्राह्य असें विवेचनहि त्यांनीं केलें आहे. मागें एकदां सौम्येन्द्रनाथ टागोर यांनीं युरोप-मध्यें गांधीजींवर एक पुस्तक लिहून गांधीजी हे ब्रिटिश साम्राज्यशाहीचे हस्तक आहेत असा आरोप केला होता! सौम्येन्द्रनाथांच्या या आरोपाला '' 'ल' युरोप'' नांवाच्या एका फ्रेंच नियतकालिकांत पं. जवाहरलाल नेहरूंनीं चोख उत्तर दिलें (१९३६). पंडितजींनीं असा उत्तरपक्ष केला होता कीं, ' गांधीजींचें सारें कार्य हें राष्ट्रवादाच्या मर्यादेंत झालें आहे हें खरें आहे; परंतु स्वातंत्र्यसंग्रामाचा उठाव करतांना दर वेळीं गांधीजींची प्रेरणा बहुजनांचा उद्धार हीच होती. आणि म्हणूनच देशांतील एकंदर राजकीय जागृति खूप वाढविण्यास त्यांच्या चळ-वळींचा उपयोग झाला. विशेषतः घाबरलेले व दलित हिंदी लोक गांधीजींच्या स्फूर्तीनें धीटपणें पुढें सरसावले व अन्यायाचा प्रतिकार करण्यास सज्ज झाले. हिंदी लोकांच्या मनोभूमिकेंत ही विलक्षण क्रांति गांधीजींनीं केली आणि तिला पारतंत्र्य व साम्राज्यशाही यांचा विरोध करण्यास शिकविलें. अशा लोकनेत्यास ब्रिटिश साम्राज्यशाहीचा हस्तक म्हणणें याला काडीचाहि अर्थ नाहीं.

पं. नेहरूंच्या राजकीय जीवनाचे आरंभीं थोडें मागें जाऊन जर आपण पाहिलें तर हें अधिक स्पष्ट होईल. आपल्या ऐन उमेदींत राजकारणांत उतर-तांना पंडितजींनीं कोणता पुढारी कृतिवीर आहे हें नीट हेरलें. एका युगाचा अस्त झाला होता. विचाराची खळबळ पुष्कळ सुरू झाली होती, पण नवी क्रांति होण्याच्या दृष्टीनें कुणी तरी प्रत्यक्ष कृतीची दीक्षा देणें जरूर होतें. अर्ज-विनंत्यांचा काळ संपून गेला होता. दहशतवादाचा फोलपणा कळून चुकला होता आणि साम्यवादी विचार एखादद्दुसऱ्या ग्रंथालयापर्यंत येऊन थांबले होते. बुद्धिवादाच्या नांवानें कितीहि टाहो फोडला तरी सामुदायिक क्रांतीसाठीं प्रत्यक्ष कृतीचा कार्यक्रम कुणी सांगत नव्हता. हें महत्कार्य गांधीजींनीं केलें म्हणूनच जवाहरलाल त्यांच्याकडे ओढले गेले. बुद्धीस कांहींसें न पटणारें असेना का, पण

हा विरागी जें सांगतो त्यांत कांहीं तरी कृतीचा भाग आहे, नवा आशय व अर्थ आहे हें पंडितजींनीं तात्काळ ओळखलें. पंडितजींच्या उद्गारांतले पुढील दोन परिच्छेद या दृष्टीनें मोठे मननीय आहेत :

" सर्व जगाला हें माहीत आहे कीं, आमच्या लोकांची सदिच्छा व पाठिंबा हेंच आमचें सामर्थ्य आहे. जबरदस्ती व जुलूम हीं जुनीं शस्त्रें आम्ही वापरीत नाहीं. प्रेम आणि आत्मयज्ञ यांचें नवें शस्त्र आमच्या महान् नेत्यानें आमच्या हातीं दिलें आहे. आम्ही स्वतः क्लेश भोगूं आणि त्यायोगें आमच्या प्रतिस्पर्ध्यांचा हृदयपालट करूं."

" महात्मा गांधींच्या शिकवणीचा हिंदुस्थानवर परिणाम झाला असेल, लहानसा जरी मानवसंघ त्या तत्त्वाला चिकटून राहणार असेल तरी असहकारिता शाश्वत राहील. आणि आपण हीं तत्त्वें जाणायला नालायक ठरलों आणि त्यांचें आचरण करणें आपणांस अशक्य झालें तरी मागून येणारी पिढी हें महान् शस्त्र यशस्वी रीतीनें वापरूं शकेल. आणि जगाला दाखवून देईल, कीं युद्ध नष्ट करण्याचा व स्वातंत्र्य मिळविण्याचा हा एकच परिणामकारक मार्ग आहे. "

या उद्गारांतली आत्मविश्वासाची खोली पाहिली म्हणजे पंडितजींनीं गांधी-जींच्या तत्त्वज्ञानांतलें अलौकिकत्व किती अचूक ओळखलें आहे हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. " भारताचा शोध " या आपल्या नव्या ग्रंथराजांत पौराणिक कालाच्या अज्ञात प्रदेशांतून आधुनिक कालपर्यंतचा दीर्घ प्रवास केल्यावर गांधीजींसंबंधीं ते म्हणतात :

" आणि नंतर गांधी आले. त्यांचें आगमन आपणाला नव्या सामर्थ्य-शाली वायुलहरीप्रमाणें वाटलें. आपण जरा मोकळेपणानें श्वास घेऊं लागलों. गांधींनीं अंधारांत घुसलेल्या प्रकाशकिरणांप्रमाणें आपल्या डोळ्यां-पुढील तमःपटल नष्ट केलें. या झंझावातानें पुष्कळच गाष्टींत उलटापालट झाली. विशेष म्हणजे माणसांच्या मनांतील विचारचक्रें बदललीं. गांधी वरच्या श्रेणींतून खालीं उतरलें नव्हते; लक्षावधि बहुजनांतून ते वर आल्या-सारखे वाटत. ते या लोकांची भाषा बोलत आणि त्यांच्याकडे आणि त्यांच्या भयंकर दुर्दशेकडे मुद्दाम लक्ष जावें असें करीत. ' किसान व मजूर

यांच्या पिळवणुकीवर-जगणाऱ्यांनीं त्यांच्या मानगुटीवरून दूर व्हावें. दुःख व दारिद्र्य निर्माण करणारी समाजरचना टाकून द्यावी ' असा गांधीजींनीं आदेश दिला. राजकीय स्वातंत्र्य या कल्पनेला नवा आशय व नवें स्वरूप प्राप्त झालें. त्यांनीं सांगितलेल्यापैकीं कित्येक गोष्टी अंशतः स्वीकारल्या गेल्या किंवा कित्येक तर पूर्ण धिक्कारल्याहि गेल्या. पण हें सर्व दुय्यम महत्त्वाचें म्हटलें पाहिजे. सत्य आणि निर्भयता हीं त्यांच्या शिकवणुकीचीं मुख्य सूत्रें होतीं आणि या सूत्रांना कृतीची जोड त्यांनीं दिली व त्याबरोबर बहुजनांचें हित सदैव डोळ्यांपुढें ठेवलें. आपल्या प्राचीन ग्रंथांत सांगितल्याप्रमाणें राष्ट्राला काय किंवा माणसाला काय, ' अभय ' ही सर्वांत मोठी देणगी आहे. हें अभय म्हणजे केवळ शारीरिक धैर्य नव्हे, तर मनांत भीतीचा पूर्ण अभाव. आपल्या इतिहासाच्या अरुणोदयकाळीं जनक व याज्ञवल्क्य यांनीं सांगितलें कीं, लोकांना निर्भय बनवणें हें लोकनेत्यांचें काम होय. पण हिंदुस्थानांत ब्रिटिश अमलाखालीं लोकांची मुख्य भावना म्हणजे भीति—जबरदस्त गळचेपी करणारी भयंकर भीति— हीच होती; लष्कर, पोलीस, हेरखातें यांचें भय; अधिकाऱ्यांचें भय; जुलमी कायद्यांचें व तुरुंगाचें भय; जमीनदारांच्या हस्तकांचें भय; सावकाराचें भय; नेहमीं उंबरठ्याशीं येऊन ठेपलेल्या उपासमारीचें व बेकारीचें भय; या सर्वस्पर्शी भयांविरुद्ध गांधींनीं निश्चयी व गंभीर आवाजांत पुकारा केला—' भिऊं नका ' ...आणि संपूर्णतया नाहीं तरी आश्चर्य वाटावें एवढ्या प्रमाणांत लोकांच्या मनांतलें भयपटल नष्ट झालें. भय हें असत्याचें सहकारी असतें. त्यामुळें निर्भयपणा येतांच त्याच्या मागोमाग सत्यहि आलें."

मात्र, गांधीजींचें सर्व तत्त्वज्ञान अंधश्रद्धेनें मान्य करून जवाहरलालनीं आपलें वैशिष्ट्य गांधी-भक्तींत बुडवून टाकलें असें कधींच कुणी म्हणूं शकणार नाहीं. संपूर्ण स्वातंत्र्याच्या ठरावाला १९२७ च्या मद्रास काँग्रेसमध्यें गांधीजी तितकेसे अनुकूल नव्हते; आणि पुढें आपल्या मुखपत्रांत त्यांनीं जवाहरलालवर टीकाहि केली ! १९३० चा गांधी-अर्विन करार पंडितजींच्या मनांतून पसंत नव्हता. १९४२ सालीं क्रिप्स वाटाघाटी चालू असतां जवाहरलाल व गांधीजी हे कित्येक मुद्यांवर सहमत होते असें म्हणतां येणार नाहीं. उपासासारख्या प्रयोगानें प्रतिपक्षाचा हृदयपालट होतो कीं त्यावर सक्ति केली जाते याविषयींचें

अनुक्रम
त्रिमूर्ति : ७७
हि भाग

पं. नहरूनीं केलेलें विवरण गांधीवादांत बसण्यासारखें नाहीं. सर्वकालीक मुळींच ‘ गुप्तता ’ (Secrecy ) नको या गांधीजींच्या आग्रहाला ‘ गुप्तता नको, पण खाजगीपणा ( Privacy ) तर ठेवाल कीं नाहीं ! ’ असें जवाहरलालनीं विचारलें होतें. इतकीं वर्षें गांधीजींच्या निकट सहवासांत राहूनाहि गांधीजींच्या ध्येयाबद्दल निश्चित कल्पना आपणांला आली नाहीं असें पंडितजींनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे. ‘ पुढें एकाच पावलाची भूमि दिसली तरी मला पुरे आहे. ’ असें गांधीजी म्हणत. आपण वैयक्तिक जीवन चांगलें केलें म्हणजे सर्व कांहीं ठीक होईल हें गांधीजींचें म्हणणें आपणांस नीट उमगलें नाहीं असेंहि पंडितजींनीं सांगितलें आहे. ‘ चांगलें जीवन म्हणजे काय ! ’ असा प्रश्न ते करतात. अलीकडे पंडितजींनीं सांभाळलेला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्याप सूक्ष्मपणें पाहिला तर गांधीजींच्या तत्त्वज्ञानाला कौल लावून प्रत्येक गोष्ट ते करतात असें मुळींच आढळणार नाहीं; उलट, कित्येक गोष्टींत गांधीजी व त्यांचा आचारमार्ग यांच्याशीं कांहींसे भिन्न असेच पवित्रे पंडितजींकडून टाकले जातात असेंच दिसून येईल. परंतु हें सर्व जमेस धरूनाहि लखनौ कॉंग्रेसचे वेळीं ( १९३६ ) पं. जवाहरलाल म्हणाले तें शेवटपर्यंत खरेंच राहणार आहे.

> “ आम्ही व गांधीजी पूर्वीं अनेकदां भांडलों आहोंत व पुढेंहि अनेकदां भांडूं. पण आम्हांला एकत्र आणणारे स्नेहरज्जु हे आमच्यांतील मतभेदांपेक्षां किती तरी अधिक बळकट आहेत. ”

गांधीजींच्या शिकवणुकींतला जो भाग पंडितजींना पटला तो आधुनिक माणसाच्या बुद्धीला रुचेल अशा शब्दांत मांडण्याचें मोठें कार्य पंडित जवाहरलालनीं केलें आहे. खादीकडे गांधीजी ज्या आध्यात्मिक दृष्टीनें पाहात त्या दृष्टीनें जवाहरलाल पाहणें शक्य नाहीं. पण जवाहरलालनीं खादीच्या उपयुक्ततेचें वेगळ्या दृष्टीनें वर्णन केलें आहे. गरिबांना कांहीं नाहीं तर थोडा कामधंदा देणारा व्यवसाय म्हणून खादीची जरुरी ते वर्णितातच, पण खादीच्या गणवेषामुळें श्रीमंत व बहुजनसमाज यांच्यांतलें अंतर तोडलें गेलें आणि एका भूमिकेवर येणें या दोन वर्गांना शक्य झालें. या मानसिक क्रांतीचें महत्त्व पं. नेहरू अधिक उत्कटतेनें पटवून देतात. गांधीजींचा ग्रामोद्योगाचा कार्यक्रम हा यंत्रसंस्कृतीला उघड उघड विरोधकच आहे. नेहरू पाहावेत तर विज्ञानाचे व यंत्राचे कट्टे कैवारी. तरीहि ग्रामोद्योगामुळें निर्माण होणाऱ्या शक्तीचें योग्य आकलन त्यांना आहे.

अफाट लोकसंख्या व अफाट प्रदेश असलेल्या राष्ट्रांत ग्रामोद्योगाचें स्थान हें नेहमींच महत्त्वाचें राहील, असें त्यांनीं सप्रमाण दाखवून दिलें आहे. अशा तऱ्हेनें आधुनिक परिभाषेंत आणि सहज समजेल अशा तऱ्हेनें गांधीजींनीं प्रवर्तित केलेलीं कित्येक व्रतें त्यांनीं सांगितलीं आहेत. अहिंसा हा जो गांधीजींच्या शिकवणुकीचा गाभा त्यांतलेंहि मर्म पंडितजी मोठ्या मार्मिक तऱ्हेनें विशद करतात :

" युरोपच्या धर्तीवर विचार करणारे कांहीं मार्क्सवादी अहिंसेची हेटाळणी करतात. युरोपियन शांतिपाठकांचा मी चाहता नाहीं. अनेक आणीबाणीच्या वेळीं हे लोक केवळ निष्क्रियच ठरले नाहींत तर नकळत प्रतिगामीपणाच्या व लष्करशाहीच्या आहारीं गेल्याचें सिद्ध झालें आहे. त्यांच्या शांतिवादाचा, दुष्ट प्रवृत्तींचा उपयोग झाला आहे. कारण अशा प्रवृत्तींना विरोध करायचा म्हटला कीं त्यांचें शांतिवादाचें व्रत भंग पावलेंच ! राजकीय शरणागतीचें बहुधा अपरिहार्यतेनें नैतिक शरणागतींत पर्यवसान होतें......

" दुष्ट प्रवृत्तींना राजकीय अथवा नैतिकदृष्ट्या शरण जाणें हा मुळीं काँग्रेसच्या अहिंसेचा पायाच नव्हे; इतर राजनीतिप्रमाणें परिस्थितीस अनुसरून समेट साधावेत असें अहिंसावादाचेंहि धोरण आहे. पण कुठल्याहि पद्धतींपेक्षां हींत तडजोडीची वृत्ति कमी. ही अहिंसा चैतन्य-शाली आहे; निष्क्रिय नाहीं. अहिंसा म्हणजे नुसती विरोधशून्यता नव्हे तर दुष्कृत्याला विरोध; मात्र त्या विरोधाचें स्वरूप शांततामय असावयाचें. केवळ व्यवहारांतच अहिंसेनें दृश्य फायदे दिले असें नव्हे, तर राष्ट्राचें शील बळकट करणें आणि शांततामय व शिस्तीचें शिक्षण लोकांना देणें हेंहि महत्कार्य साधलें. "

गांधीजी हे स्वतः एका अपूर्व तत्त्वज्ञानाचे जनक असल्यानें नेहरूंकडून कांहीं नवें शिकण्याचा व त्याचा पाठपुरावा करण्याचा संभव त्यांच्या बाबतींत कमी होता. तरीहि आपल्या या राजकीय वारसाची प्रतिष्ठा व प्रतिभा फार मोठी आहे हें जाणून त्याचें म्हणणें ऐकण्यास व त्याचा योग्य तो आदर करण्यास गांधीजी नेहमींच तत्पर असत. आंतरराष्ट्रीय प्रश्नांत तर नेहरूंचा निर्णय ते

अखेरचा समजत. घटनासमितीची कल्पना गांधीजींना पहिल्यानें विशेष मानवली नव्हती. पण पुढें पंडितजींनीं तिचें स्वरूप त्यांना पटवून दिल्यानंतर त्यांनीं ती इतकी आत्मसात् केली कीं, "जवाहरलालना दिसलीं नाहींत अशीं कित्येक सामर्थ्यें मला या कल्पनेंत दिसलीं." असें महात्माजींनीं पुढें एकदां म्हटलें. कित्येकदां जवाहरलालांच्या म्हणण्याप्रमाणें काँग्रेसचें राजकारण चालविण्याकडे बहुमताचा कल आहे असें दिसून येतांच गांधीजींनीं आपले जादा अधिकार बाजूला ठेवून नेहरूंचा शब्द प्रमाण मानला आहे.

मोतीलाल हे गोखल्यांच्या उदारमतवादी सांप्रदायाचे एक अनुयायी होते, तर गांधीजी हे झुंझार व सत्याग्रही राष्ट्रवादाचे अध्वर्यु होते. यांतच पंडित जवाहरलालनीं समाजवादाचा प्रवाह आणून सोडला. हिंदी राजकारणांत या त्रिमूर्तींपैकीं प्रत्येकजण एका सांप्रदायाचा प्रभावशाली प्रतिनिधि आहे, पण तिघांचेंहि एकमेकांविषयींचें सौहार्द तिघांच्या ध्येयकल्पनांना नवा पण व्यापक आकार देण्यास कारण झालें आहे. मोतीलाल नेमस्तपणा सोडून प्रत्यक्ष प्रतिकाराच्या राजकारणांत पडले. गांधीजींनीं आपल्या गूडवादाला कित्येकदां रजा देऊन शास्त्रीय भूमिका पत्करली, आणि जवाहरलाल बुद्धिवादाच्या मर्यादा ओळखून केवळ ठोकळेबाज समाजवादी राहिले नाहींत. असें वाटतें कीं, आधुनिक भारताचें ध्येयमंदिर सर्वांगसुंदर व्हावें म्हणूनच जणूं भारतभाग्यविधात्यानें या तीन महान् नेत्यांना एकत्र आणलें व परस्परांच्या जीवनकार्यावर संस्कार करण्याची संधि दिली.

० ० ०

: ७ :

# साहित्य

शब्दांना कुणी विचारांचीं आभरणें म्हणतात. पण हें वर्णन फार उथळ आणि अपुरें आहे. शब्दांचा उपयोग केवळ विचार आणि कल्पना सजविण्यासाठींच का करावयाचा असतो ? मुळींच नाहीं. केवळ हाच उपयोग मानायचा म्हणजे विचार आणि कल्पना यांचें मूळ रूप फार सामान्य आहे असें समजावें लागेल. शब्दांची कला मुत्सद्यांनीं मात्र अशा रीतीनें वापरली आहे खरी ! मनांतल कुटिल विचार लोकांना गोंडस दिसावे म्हणून मुत्सद्दी सुंदर शब्दांचीं आभरणें त्यांवर चढवितात; पण त्याला कोणीच साहित्य म्हणत नाहीं. साहित्य म्हणजे अंतःकरणांतील विचारांचा, कल्पनांचा, भावनांचा आविष्कार. शब्द हा विचाराचा व्यक्त अवतार ( Incarnation ) होय असें वर्ड्स्वर्थनें म्हटलें आहे. हेंच उत्तम साहित्याचें यथातथ्य वर्णन होऊं शकेल.

पण शब्द म्हणजे विचाराचा अवतार असें मानलें तरी हा अवतार पूर्ण नसतो. विचाराचा कांहीं अंशच त्यांत उतरलेला असतो. राहिलेला अंश या शब्दरूपी अवतारावरूनच सूचित होत असतो. आणि म्हणूनच वाङ्मयांत ध्वनि या गुणाला फार महत्त्व आलें आहे. साहित्यिकांच्या हृदयांत राहिलेला विचाराचा अंश हा त्यांच्या शब्दांत व्यक्त झालेल्या आशयाला पूरक व सुसंगत असाच आहे. याची कल्पना वाचकांना येणें जरूर आहे. ती तशी येणें हेंच साहित्याचें खरें यश आहे. हें यश मिळविण्यासाठीं साहित्यिकांच्या लेखनांत शैली पाहिजे. आणि ज्यांना शारदेच्या दरबारांत मानाचें आसन मिळालें आहे अशा लेखकांना ती हस्तगत असतेच असते. जगांत जें सौंदर्य आपणांला

प्रतीत झालें तें तेवढ्या प्रमाणांत वाचकांना पटवून देणें आणि आपल्या साक्षात्कारांत त्यांना सहभागी करणें हें लेखकाचें जीवनकार्य आहे. या कार्यांत जे फार मोठ्या प्रमाणांत यशस्वी झाले आहेत अशा आजच्या साहित्यिकांत पंडित जवाहरलाल नेहरूंची गणना करतां येईल.

सुप्रसिद्ध अमेरिकन पत्रपंडित जॉन गंथर यांनीं नेहरूंच्या अनुपम भाषाशैली-बद्दल लिहितांना जगांतील पहिल्या श्रेणीच्या दहा इंग्रजी लेखकांत पंडितजींची गणना केली आहे. आणि पंडितजींच्या एखाद्या लहान पुस्तिकेचें जरी वाचन एखाद्यानें मननपूर्वक केलें असेल तरी गंथरच्या या प्रशंसेंत अतिशयोक्तीचा लवलेश नाहीं असेंच तो म्हणेल. पंडितजी भाषेचे शिल्पकार आहेत. शब्दांचे चिरे अगदीं गुळगुळीत करून प्रमाणबद्ध बसविलेले असतात. बांधणीचा पाया जितका विस्तृत तितकाच खोल घेतलेला असतो. विषयाच्या उंचीमुळें भव्यताहि सहज येते. उपरोधाची किंवा उपमा-उत्प्रेक्षांची नक्षी कमी, पण त्यामुळेंच वाचकाचें मन सूक्ष्म गोष्टींवर न रेंगाळत राहतां एकंदर विषयाच्या मुख्य स्वरूपाकडे वेधलेलें राहतें. पंडितजींच्या वाक्यांतलें, परिच्छेदांतलें, प्रकरणांतलें, आणि सर्व पुस्तकांतलें बांधकाम इतकें पक्कें व रेखीव असतें, कीं अव्यय, विशेषण, उपपद इ० लहानसहान चिरे जरी इकडले तिकडे केले किंवा काढून घेतले तरी सर्व शोभा नष्ट होते.

शिल्पावरून सहजच आणखी एक दृष्टान्त सुचला. तंजावरला एक प्राचीन देऊळ आहे. त्या देवळांतील कांहीं खांबांवरून एखादा गज फिरविला तर सप्त-सुरांचें गोड संगीत ऐकूं येतें. पंडितजींच्या वाङ्मयकृतींचें शिल्प असेंच नादमधुर आहे. त्यांत बाह्यतः कठिणपणा आणि भव्यता दिसत असली तरी आपली मनःशलाका त्यावरून फिरूं लागतांच सहृदयतेचे पडसाद कानीं येऊं लागतात; कळलें नसेल तें कळतें; विषयाच्या गांठी सहज उकलूं लागतात; आणि ज्ञाना-च्याच नव्हे तर सहानुभूतीच्याहि खालच्या पातळीवरून वरच्या पातळीवर आलों आहों असा विश्वास वाटूं लागतो.

कलेची जादू किंवा अद्भुत शक्ति म्हणतात ती हीच आहे. मनुष्यमात्राला आपापल्या जीवनांत चांगल्या गोष्टी स्फुरत नाहींत असें थोडेंच आहे! मनुष्य प्रेम करतो, सहानुभूति दाखवितो, आणि त्यागहि करतो. त्याला जगांत प्रकट

झालेल्या सौंदर्यामुळें आनंदहि होतो. पण हें सारें त्याच्या स्वतःपुरतेंच असतें. कलाकार आपल्या प्रेमाला व्यापक स्वरूप देऊं शकतो हें त्याचें वैशिष्ट्य होय. असें स्वरूप दिल्यानें त्याला दिसलें तें इतरांना दिसूं शकतें. विशेषतः ज्यांना फार मोठी शब्दसिद्धि लाभली आहे असे साहित्यसेवक हा चमत्कार करून दाखवूं शकतात. पंडितजींना ही सिद्धि मोठ्या प्रमाणांत मिळाली आहे.

ही शब्दसिद्धि पंडितजींनीं कशी मिळविली हें पाहणें फार उद्बोधक ठरेल. प्रतिभा ही मूळ देणगी तर याच्या मागें आहेच, पण प्रतिभेची शक्ति अध्ययनानें सुसंस्कृत करण्याची मोठी तपश्चर्या त्यांनीं केली आहे. हिंदुस्थान आणि इंग्लंड येथील शिक्षणक्रमांत त्यांनीं पद्धतशीर व खोल व्यासंग केला हें तर खरेंच, पण पुढेंहि—

"**अनभ्यासें गेली मज सकळ विद्या त्यजुनियां**" असें त्यांनीं होऊं दिलें नाहीं. राजकारणाच्या धकाधकींत बहुधा नेत्यांचें ज्ञान गंजून जातें आणि विद्याभिलाषा मंद होते. नेहरूंचें असें कधींच झालें नाहीं. राजकारणाच्या रणधुमाळींतून वेळ काढून नव्या नव्या ग्रंथांचा, नव्या विचारप्रवाहांचा ते परिचय करून घेत आले आहेत. ज्ञानगंगेंत सदैव विहार करीत राहिल्यामुळें त्यांच्या प्रतिभेची टवटवी कायम राहिली आहे.

पण अध्ययन हें नेहरूंच्या वाङ्मयवैभवाचें एकच रहस्य आहे असें नाहीं. कलाकार आपल्या भावनांचें सौंदर्य व सामर्थ्य हें शब्दांत अधिकांत अधिक कसें प्रकट करतां येईल यासाठीं जिवापाड प्रयत्न करीत असतो. आपल्या मनांत जेवढी प्रचंड खळबळ उडाली आहे तेवढी आपल्या वाचकाच्याहि अंतःकरणांत व्हावी यासाठीं शब्दरचना करण्याची त्याची धडपड असते. पं. नेहरू यांच्या लेखनांत अशी कला प्रकर्षानें दिसते.

पण अध्ययन, शब्दसामर्थ्य, कलात्मकता हीं पंडितजींच्या वाङ्मयवैभवाचीं एका दृष्टीनें दुय्यम कारणेंच ठरतात. त्यांच्या हृदयंगम व भव्य जीविताचा जो प्रत्यय आपणांला त्यांच्या वाङ्मयांत येतो तोच त्यांच्या शब्दसृष्टीचा खरा गाभा आहे असें नाहीं का? अध्ययनानें पंडितजींनीं पांडित्य मिळविलें, पण आपल्या अज्ञ व निरक्षर बांधवांच्या भाषेंत बोलण्याचा हव्यास धरला; ज्या ऐश्वर्याची त्यांना जन्मतःच प्राप्ति झाली होती तें सोडून देश आणि मानवता

यांच्यासाठीं ऐन तारुण्यांत ते कर्तव्यक्षेत्रांत उतरले; जगाचें संघराज्य व्हावें यासाठीं झटणाऱ्या या पुरुषानें तुरुंगांत एका रुग्ण कुत्र्याची सेवा आलोचन जागरणें करून केली आहे; ज्ञानसागर अथवा सृष्टिसौंदर्य याकडे ओढ घेणारें आपलें संस्कारक्षम मन तेथून बळेंबळें ओढून केवळ बहुजनहिताकरितां त्यांनीं राजकारणाच्या रूक्ष कार्याला जुंपलें आहे. या सर्व उदात्त चरित्रानें त्यांचें वाङ्मय संपन्न केलें नसतें तरच नवल! आणि म्हणूनच पंडितजींचें आत्मचरित्र वाचल्यानंतर त्यावर अभिप्राय देतांना कविसम्राट् रवीन्द्रनाथ म्हणाले, "आपल्या कर्तृत्वापेक्षांहि जो अधिक मोठा आहे अशा एका माणसाची ओळख या चरित्रावरून पटते."

पंडितजींचें एकंदर धकाधकीचें जीवन पाहिलें म्हणजे हजारों पृष्ठांचा वैभवशाली साहित्यसंसार त्यांनीं कसा उभा केला याचें मोठें कौतुक वाटतें. तथापि या बाबतींत जगांतील सुसंस्कृत लोकांनीं, विशेषतः पुढल्या पिढ्यांनीं, ब्रिटिश साम्राज्यशाहीचे अप्रत्यक्ष उपकार कृतज्ञतापूर्वक कबूल केले पाहिजेत! कारण पंडितजींच्या दोन तपांच्या राजकीय जीवनांत ८–८। वर्षांची सक्तीची विश्रांति सरकारनें जर त्यांना दिली नसती तर पंडितजींनीं एवढी ग्रंथरचना कशी केली असती! विशेषतः Glimpses of World History [ जगाचा इतिहास ], Autobiography [ आत्मचरित्र ] आणि Discovery of India [ भारताचा शोध ] हे तीन महान् ग्रंथ पंडितजींनीं कारावासांतच विरचिले आणि कारागृहवासांत ग्रंथरत्नांना जन्म देणाऱ्या बनियन्, सर्व्हेंटिस, टिळक इ० महापुरुषांत स्थान मिळविलें. वर सांगितलेले पं. नेहरूंचे तीन मोठे ग्रंथ म्हणजे त्यांच्या आदर्श जीवनाची 'प्रस्थानत्रयी' च आहे. यांखेरीज पृथ्वीच्या उत्पत्ति-स्थितीचा इतिहास सांगणारें त्यांचें पत्रात्मक पुस्तक ( Letters from Father to his Daughter ), सोव्हिएट रशिया-वरील त्यांचा विवेचक ग्रंथ आणि व्याख्यानांचे व स्फुट लेखांचे संग्रह ( 'Recent Essays and Writings', 'India and the World', 'Unity of India', 'Where are we ?' 'Question of Language', 'Gandhiji', etc. ) हीं पुस्तकें आहेतच. याशिवाय कांहीं गौरवग्रंथांत त्यांनीं लिहिलेले लेख, अनेक लेखकांच्या पुस्तकांना लिहिलेल्या प्रस्तावना, राष्ट्रीय संयोजन समितीच्या कामकाजावर केलेलीं टिपणें हीं आणि

वेळोवेळीं केलेलीं भाषणें व आणखी किती तरी सामुग्री अद्यापि पुस्तकरूपानें एकत्रित होऊन प्रसिद्ध व्हायची आहेच! कांहीं होतः आहे आणि कांहीं प्रकाशनाच्या वाटेवर आहे.

नेहरूंचें बरेचसें लेखन प्रबंधात्मक आहे. 'जगाचा इतिहास' लिहितांना त्यांनीं पत्रलेखनाचें तंत्र वापरलें आहे. आत्मचरित्र हा एक वेगळा वाङ्मयप्रकार ठरेल. वक्तृत्व हा स्वतंत्र वाङ्मयप्रकार गणतां येईल कीं नाहीं कोणास ठाऊक, पण त्याची पोटजात प्रबंधाच्या कोष्टकांत कुठें तरी बसवावी लागेल. कित्येकदां नेहरूंनीं प्रवासवर्णनात्मक निबंध लिहिले आहेत, किंवा कांहीं प्रसंगांचीं स्वतंत्र शब्दचित्रें रेखाटलीं आहेत. पण या सार्‍यांना गुजगोष्टीचें माधुर्य आलें आहे असें म्हटल्यास कुणी हरकत घेईलसें वाटत नाहीं. कथा, कविता, कादंबरी, नाट्य इ० ललितवाङ्मयाचे जे ठळक प्रकार आहेत त्यांत नेहरूंनीं आपली लेखणी चालविली नाहीं हें खरें; पण शब्दांची कोवळीक, विचारांचें सौष्ठव आणि रसांचा उत्कर्ष या ललित वाङ्मयाच्या तिन्ही कसोटीवर पंडितजींचें लेखन खासच उतरण्यासारखें आहे.

घरगुतीपणा आणि जिव्हाळा हा पंडितजींच्या लेखनशैलीचा आत्मयि गुण आहे. पत्रात्मक लेखनांत तर तो विशेषच खुलून दिसतो. भास्कराचार्यांनीं आपली कन्या लीलावती हिला पाठ देण्यासाठीं गणितशास्त्रावर ग्रंथ रचिले, त्यामुळें त्या रूक्ष विषयांतसुद्धां गोडी आल्यासारखी वाटते. वेदान्त व नीतिधर्म सांगणार्‍या गीताग्रंथांत एवढें 'माधुर्य रुचीसि आलें' तें कां? तर वक्त्याचें श्रोत्यावर अनन्यसाधारण प्रेम होतें. 'भक्तोऽसि मे सखा चेति' असें अर्जुनाला म्हणत, 'तात! भारत!' अशा प्रेमळ संबोधनांनीं त्याला पुकारीत, आणि 'अभिजातोऽसि पांडव' असे गौरवीत श्रीकृष्णांनीं उपदेश केला. 'जगाचा इतिहास' सांगणारे पंडित जवाहरलाल नेहरू अशाच अपार वात्सल्यानें आपल्या प्रियदर्शिनी कन्येला मानवांच्या विराट् कार्याची व घडामोडीची माहिती करून देत आहेत.

या पुस्तकाच्या आरंभींचें पत्र २६ ऑक्टोबर १९३० रोजीं पं. नेहरूंनीं नैनी जेलमधून लिहिलें. ही हृदयंगम नांदी वाचून पुस्तकांतल्या सौंदर्याशीं वाचक एकदमच समरस होईल. या पत्राचा आरंभ असा आहे :

" प्रियदर्शिनी,

दृष्टीला प्रिय पण दृष्टीआड गेल्यावर अधिक प्रिय वाटणाऱ्या ( कन्ये ! )

आज तुला पत्र लिहावयास बसलों असतांना दूर चाललेल्या मेघ-गर्जनेसारख्या अस्पष्ट आरोळ्या माझ्या कानीं पडल्या. त्यांतले शब्द प्रथम मला कळेनात पण स्वर ओळखीचे वाटले. आणि त्या स्वरांनीं माझ्या अंतःकरणांत उत्तरांचे पडसाद मिळत आहेत असा भास झाला. हळूहळू ह्या आरोळ्या जवळ येत आहेत आणि वाढत आहेत असें दिसलें आणि अखेर शंकाच राहिली नाहीं.

" इन्किलाब् झिंदाबाद् ! "
" इन्किलाब् झिंदाबाद् "

हे शब्द होते. ते. कारागृहांतून या जयशब्दांचा प्रतिध्वनि मोठ्या आव्हानपूर्वक उमटलेला ऐकूं आला आणि आमचीं हृदयें आनंदित झालीं. "

ग्रंथाच्या शेवटचें एक पत्र १४ नोव्हेंबर १९३८ रोजीं अरबी समुद्रांतून प्रवास करतांना लिहिलें आहे. या आठ वर्षांच्या काळांत पं. नेहरूंच्या जीवनांत किती तरी स्थित्यंतरें झालीं. ज्या शोककारक घटनेचा उल्लेख पं. नेहरूंनीं पुढील वाक्यांत केला आहे त्याचें वर्णन किती संयमी व हळुवार हातानें केलें आहे तें पाहण्यासारखें आहे. ' प्रियदर्शिनी'ला ते म्हणतात :

" ज्या दुःखाची छाया माझ्या सर्व जीवितावर पसरली, त्याचे अंशभागी आपण म्हणजे तूं आणि मी झालों. परंतु जगाच्या एकंदर दुःखांत व जंजाळांत आपल्या वैयक्तिक दुर्दैवाची काय कथा ! आपल्या सर्व शक्तीची मागणी आज जग करीत आहे; आणि म्हणून आपण वेगवेगळ्या दिशेस गेलों. तूं विद्याभ्यासाच्या सुरक्षित मार्गांकडे वळलीस आणि मी झुंझीच्या ऐन दंगलींत दाखल झालों. "

जगाचा इतिहास सांगतांना, तसेंच आपलें चरित्र व हिंदी राजकारण यांचें निवेदन करतांना कित्येक लहानमोठ्या व्यक्तींचें चित्रण पंडितजींना करावें लागलें. या चित्रणांत पंडितजींनीं परमावधीचें कौशल्य दाखविलें आहे. अंतर्भेदी

दृष्टीनें वर्ण्य व्यक्तीचे ठळक विशेष उचलून दोन-चार वाक्यांत तिचें यथार्थ दर्शन घडविण्यांत त्यांचा हातखंडा आहे. ज्या व्यक्ति नेहरूंच्या गुणधर्मांच्या व तत्त्वज्ञानाच्या अगदीं उलट आहेत त्यांचींहि चित्रें पंडितजींनीं मोठ्या तन्मयतेनें रेखाटलीं आहेत. विशाल सहानुभूति व सर्वस्पर्शी अंतःकरण असल्याशिवाय हें कठीण काम साधणार नाहीं. चेंगीझखानसारख्याची रसभरित माहिती दिल्यावर त्यांचें त्यांनाच नवल वाटलें. ते म्हणतात :

> " चेंगीझखानाबद्दल मीं पुष्कळच अनवश्यक गोष्टी तुला सांगितल्या. इतक्यांची गरज नव्हती. पण या माणसाची माझ्यावर विलक्षण मोहिनी आहे. सरंजामी पद्धतींतल्या प्रत्येक गोष्टीचा द्वेष करणाऱ्या माझ्यासारख्या शांत व अहिंसावादी शहरवासीयाला या भटक्या लोकांच्या भयंकर, क्रूर व हिंसावादी नायकानें मोहित करावें हें नवलच नाहीं का ! "

महापुरुषाच्या व्यक्तित्वाप्रमाणें त्यांच्या एकंदर मानवी इतिहासांतील स्थानाचेंहि नेमकें महत्त्वमापन करणें अवश्य असतें. एक-दोन ठळक वैशिष्ट्यें सांगून हें महत्त्वमापन करण्यांत नेहरूंचा हात सहसा कोणी धरणार नाहीं. त्यांनीं केलेलें लोकमान्यांचेंच वर्णन पाहा. यावरून लोकमान्य कसे होते हें तर कळतेंच, पण प्राचीन व समकालीन नेत्यांहून त्यांचें वेगळेंपणाहि चटकन् ध्यानांत येतें.

> " महाराष्ट्रांत एक महान् पुढारी उदयास आला. त्याचें नांव बाळ गंगाधर टिळक. पण हिंदुस्थानांत ते ' लोकमान्य ' म्हणूनच प्रख्यात आहेत. पूर्वेचे प्राचीन मार्ग व पश्चिमेची नवी विद्या टिळकांना अवगत होती. ते मोठे विद्वान् होते. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते बहुजन समाजाचे पुढारी होते. त्या वेळच्या काँग्रेसच्या पुढाऱ्यांचें आवाहन इंग्रजी-शिक्षित सुशिक्षितांपर्यंत पोंचलें होतें...पण बहुजनसमाजापर्यंत जाऊन त्यांतून सामर्थ्य निर्माण करणारे पहिले राजकीय पुढारी टिळकच होत. "

पंडितजी स्वतः समाजवादी आहेत ही गोष्ट जगविख्यात आहे. समाजवादाचें स्वप्न ज्या महान् क्रांतिकारकानें सत्यसृष्टींत आणिलें त्या लेनिनवर लिहितांना त्यांची लेखणी विशेषच हळुवार व्हावी यांत नवल तें काय ?

" असें मात्र समजूं नकोस कीं, लेनिन म्हणजे एक अमानुष यंत्र

होतें आणि आपल्या कामाखेरीज कुठलाच विचार तो करीत नसे. आपलें कर्तव्य आणि जीवनध्येय यांच्यांत तो पूर्ण समरस असे; पण आत्मनिरपेक्षहि तेवढाच. तो ध्येयाची चालतीबोलती प्रतिमा होता. पण माणुसकी ओतप्रोत. अत्यंत मनःपूर्वक हंसणें हें जें माणुसकीचें सर्वांत मोठें लक्षण तें त्याच्या अंगीं भरपूर होतें."

'जगाच्या इतिहासां'तील या धांवत्या शब्दचित्रांप्रमाणें आपल्या आत्मचरित्रांतहि पंडितजींनीं आपल्या लेखनकौशल्याची परिसीमा गांठली आहे. विशेषतः गांधीजी आणि आपले पिताजी मोतीलाल यांच्यावर लिहितांना पं. नेहरूंचे सर्व लेखनगुण पूर्ण बहराला आलेले दिसतात. या दोन एका दृष्टीनें अगदीं परस्परविरुद्ध पूज्य पुरुषांविषयीं ते म्हणतात :

"कारण हें स्पष्ट होतें कीं, या (गांधीजींच्या) कृश शरीरांत कांहीं तरी पोलादी, कसल्याहि शरीरबळाला दाद न देणारें असें कांहीं तरी खडकासारखें खंबीर सत्त्व होतें. ही मूर्ति बावळी आणि कौपीनधारी असली तरी तिच्या अंगीं बादशाही ऐट दिसे आणि इतरांना तिजपुढें नम्र व्हावेंसें वाटे. साक्षेपानें नम्र आणि विनीत असलेल्या या माणसाचें सामर्थ्य व सत्ता मोठी होती आणि याची त्याला जाणीवहि होती; कित्येकदां करडेपणानें तो आज्ञा देई आणि त्या पाळाव्याच लागत. त्यांचे शांत गहिरे डोळे दुसऱ्याची नजरबंदी करून हृदयाचा ठाव घेत; त्यांचा स्वच्छ, मृदु स्वर श्रोत्यांच्या अंतःकरणापर्यंत जाऊन भावनेच्या सहसंवेदना निर्माण करी...आपल्या पद्धतीनें त्यांनीं जीवनाची कला शोधून आपलें सर्व जीवन कलामय केलें होतें."

"माझे वडील याहून किती वेगळे होते!...कुठल्याहि समाजांत असले तरी निश्चितपणें सर्वांच्या कुतूहलाचें व आदराचें केंद्र होत... ते नम्र अथवा मृदु नव्हते आणि (गांधीजींच्या उलट) ते प्रतिस्पर्ध्यांची क्वचितच गय करीत असत. त्यांच्या करडेपणामुळें त्यांच्याबद्दल एक आत्यंतिक निष्ठा तरी वाटे किंवा कडवा विरोध तरी निर्माण होई. त्यांच्याबद्दल तटस्थ वृत्ति ठेवणें अशक्य असे. त्यांच्याबद्दल आदर तरी ठेवावा, नाहीं तर त्यांच्याबद्दल नावड तरी बाळगावी, अशी स्थिति होती. भव्य

कपाळ, दार्शीव ओठ, करारी हनुवटी या वैशिष्ट्यांमुळें इटॅलियन पदार्थ-संग्रहालयांतील रोमन बादशहाच्या अर्धपुतळ्याप्रमाणें ते दिसत. त्यांचें छायाचित्र पाहिलेल्या इटलीमधील पुष्कळ मित्रांनीं हें साम्य बोलून दाखविलें होतें...अशी बादशाही भव्यता आणि ऐट त्यांचेजवळ होती, कीं ती आतां शोधूं पाहतां या जगांत मिळत नाहीं असें खेदानें म्हणावें लागतें. ”

गांधीजी हा एक पंडितजींचा असा प्रिय विषय आहे कीं, ज्यावर त्यांच्या प्रतिभेनें आपला अधिकांत अधिक प्रभाव दाखविला आहे. गांधीजींवर त्यांनीं किती तरी लिहिलें आहे. पण दर वेळीं रसोत्कर्षाची अधिक उंच पातळी ते गांठतात. दर वेळीं गांधीजींच्या महनीयतेचें वेगळेंच सौंदर्य पंडितजी आपणांस दाखवितात. गांधीजींच्या स्वर्गवासानंतर ते म्हणतात :

“ एक वैभव नष्ट झालें आहे. ज्या सूर्यानें आपणांस प्रकाश व उष्णता दिली तो मावळला आहे; आणि आपण अंधारांत कुडकुडत आहोंत. पण त्याचें वैभव पाहिलेल्या आपण असें कुडकुडत राहणें त्याला आवडणार नाहीं. कारण, दैवी शक्तीच्या त्या माणसानें आपणांलाहि बदलून टाकलें आहे, आणि त्याच्या शक्तितेजांतून आपणांपैकीं ज्या कोणाला एखादा तेजःकण मिळाला त्यांनींहि त्याच्याच धर्तीवर थोडेंफार काम केलें आहे. म्हणूनच त्याची स्तुति करतांना आपले शब्द अपुरे पडतात; आणि आपण त्यांची स्तुति करतों तेव्हां एकपरीनें ती आपलीच स्तुति असते. ”

पुढें एक वेळीं ते म्हणतात :

“ गांधीजी जसजसे वृद्ध होऊं लागले तसतसें त्यांचें शरीर म्हणजे त्यांच्या सामर्थ्यवान् आत्मशक्तींचें केवळ वाहन बनलें. त्यांच्याकडे पाहणाराला व त्यांचें भाषण ऐकणाराला त्यांच्या पार्थिव देहाचा विसर पडे. म्हणून त्यांच्या पदस्पर्शानें पुनीत झालेली भूमि दिव्यता पावली आणि ते जेथें जेथें आसनस्थ होते त्या त्या ठिकाणीं जणूं मंदिर उदयास आलें. ”

असे किती उतारे द्यावे !

आतां एकच शब्दचित्र देऊन या प्रकारांतलीं अवतरणें आटोपतीं घेतों.

आपल्या प्रियपत्नीचें 'भारताचा शोध' या पुस्तकांत त्यांनीं रेखाटलेलें शब्दचित्र जगांतील अमर वाङ्मयांत स्थान मिळवील अशा योग्यतेचें आहे.

> "...आमच्या घरांत ती एक साधीभोळी मुलगी अशा स्वरूपांत आली. आज प्रचलित असलेल्या कित्येक मनोव्यापारांचा तिला गंध नव्हता. तिच्या चेहऱ्यांतलें किशोरीपण कधींच फारसें उणावलें नाहीं. पण पुढें प्रौढ दशेंत तिच्या नेत्रांत सखोलता व तेज दिसूं लागलें. त्यामुळें शांत सरोवर असून पलीकडे वादळें चाललीं आहेत असा भास होई. 'आधुनिक' मुलगी असें कांहीं तिला म्हणतां आलें नसतें. आणि आधुनिक मुलींत आढळणाऱ्या संवयी व डौलाचा अभाव तिच्यांत नव्हता. पण आधुनिक चालीरीति तिनें सहज आत्मसात् केल्या. ती प्राधान्येंकरून हिंदी मुलगी होती. विशेष म्हणावयाचें म्हणजे भावनाप्रधान आणि मानी, पोरकट तशीच प्रौढ, खुळचट तशीच शहाणीहि, अशी ती काश्मिरी मुलगी होती. अनोळखी किंवा नावडत्या माणसाशीं ती तिऱ्हाईतपणें वागे आणि परिचित व आवडत्या माणसांत तिचा आनंद व मोकळेपणा अगदीं ओसंडून चाललेला दिसे."

भाई एम्. एन्. रॉय यांनीं नेहरूंवर कडाडून हल्ला चढवितांना असें म्हटलें आहे कीं, "ते राजकारणी पुरुषांपेक्षां 'कवि' होण्यालाच अधिक लायक आहेत." मानवेन्द्रबाबूंनीं 'कवि' ही पदवी नेहरूंना निंदाव्यंजक म्हणून दिली असली, तरी तो खरोखरच पंडितजींचा गौरव आहे. एका कोपिष्ट ब्राह्मणानें मारलेली लाथ नाहीं का श्रीविष्णूच्या हृदयावर अलंकार होऊन राहिली! 'कवि' ही उपाधि पंडितजींना शोभादायकच आहे. पंडितजी 'कवि' आहेत म्हणूनच रूक्ष व तर्ककर्कश विद्वानांपेक्षां किती तरी अधिक सहजतेनें त्यांनीं राष्ट्रजीवनांतलीं गूढ प्रमेयें ओळखलीं. बहुजनसमाजाच्या अंतरंगांत त्यांना सिंहासन मिळालें याचें कारण त्यांच्या कविहृदयाला आम हिंदी जनतेच्या वेदना-आकांक्षांचें आकलन पूर्णपणें झालें हें होय. सहानुभूति हा कवीच्या हृदयाचा मुख्य धर्म असतो. या सहानुभूतीमुळेंच त्याच्या भावना उसळतात, पण त्याबरोबर त्या अधिक सुसंस्कृतहि होतात. कवि जगांत सौंदर्य निर्माण करूं पाहतो. पण त्याचबरोबर त्या सौंदर्यनिर्मितीचे कामीं कोणते अडथळे आहेत

ऱ्याचाहि त्याला अंदाज घेतो. मुत्सद्दी सत्तासंपादनाच्या नादांत व्यापक सहानु-भूतीला पारखा होतो. पंथवेडा नेता सरळ मुसंडी मारून ठोकळेबाज प्रचारक बनतो. पण कविहृदयाला असल्या संकुचित मार्गाचें वावडें असतें. पंडितजी कवि आहेत म्हणूनच एखाद्या पक्षाचा आग्रही व आडमुठा प्रचार करीत ते बसले नाहींत. जीवनाचें संपूर्ण व सर्वांगीण दर्शन त्यांना घेतां आलें. गांधीजींच्या जीवनांतलें सौंदर्य व सामर्थ्य त्यांना कळलें आणि त्यांचा राष्ट्रकार्याला त्यांना उपयोग करून घेतां आला.

पंडितजींच्या विशाल साहित्यसंसारांत त्यांच्या या कविहृदयाचा ठसा ठिकठिकाणीं उमटलेला दिसतो. "**जें रम्य तें बघुनिया मज वेड लागे**" अशीच त्यांची सौंदर्यवादी वृत्ति आहे. मनुष्यनिर्मित कलाकृति असो किंवा निसर्गसौंदर्य असो, कांहीं भव्य दिव्य पाहिलें, कीं त्यांची समाधि लागते. आणि मग मागून अशा वेळीं आलेल्या अनुभूतीचें चित्रण करण्यांत ते रंगून जातात. पंडितजींच्या वर्णनपद्धतींतला दुर्मिळ गुण असा आहे कीं, भावनेच्या ओघांत वहात जाऊन त्यांची बुद्धि निर्जीव होत नाहीं किंवा बुद्धीच्या प्रभावानें त्यांची भावना लुळी पडत नाहीं. स्वर आणि ताल यांत सच्चा असलेला गायक जसा आलाप आणि ठेका यांचा मेळ बिघडूं देत नाहीं, तसें पंडितजींचें आहे. बुद्धि आणि भावना यांची एकमेकांवर मात ते कधींहि होऊं देत नाहींत. आदर्श (Classic) काव्यकलेचें हेंच रहस्य नाहीं का?

युरोपांतील शिल्पावर लिहिलेला पुढील मजकूर या दृष्टीनें वाचनीय आहे :

> "ह्या शिल्पाचें सौंदर्य चकित करणारें असे. उत्तुंग श्रद्धा व आकांक्षा त्यांत प्रतिबिंबित झालेलीं दिसत. खरोखर, त्या श्रद्धायुगाचें तें प्रतीकच होतें.... पश्चिम युरोपांत या शिल्पाचा झालेला विकास आश्चर्यकारकच होता. अराजकता, असहिष्णुता, अज्ञान आणि अव्यवस्था यांच्या कचऱ्यांतून हें सौंदर्य प्रकट झालें; जणूं स्वर्गापर्यंत जाणारी प्रार्थनाच होती ती!"

पंडितजींची सौंदर्यवादी वृत्ति काश्मीरच्या नंदनवनांत अगदीं वेडावून जावी हें अगदीं साहजिक आहे. काश्मीर ही पंडितजींच्या वाडवडिलांची मूळ वसाहत आणि निसर्गाच्या लावण्याचें माहेरघर. त्यामुळें या प्रदेशाची एक प्रकारची

विलक्षण मोहिनी त्यांच्यावर आहे. काश्मीरच्या प्रदेशांतला जादूमय निसर्ग-विलास पंडितजींच्या लेखणींतून उतरलेला वाचतांना आपण धुंदीच्या वावटळींत सांपडतों !

“ एखाद्या लावण्यवती स्त्रीप्रमाणें नद्या, सरोवरें, दऱ्याखोरीं व डौलदार वृक्ष यांनीं संपन्न अशा काश्मीरचें सौंदर्य विश्वात्मक आहे. मानवी आसक्तीहून उंच पातळीवर त्याचें अस्तित्व आहे. पण या जादूमय सौंदर्याची आणखीहि एक बाजू प्रत्ययाला येते; उभे डोंगर व कडे, बर्फाच्छादित शिखरें, हिमनद्या, खोऱ्यांत उडी घेणारे भयंकर क्रूर धबधबे हें सारें सौंदर्य मर्दानी आहे. विविधरूपी व विविधरंगी, कधीं सस्मित तर कधीं कारुण्य-पूर्ण उदास, असें तें दिसतें. दाल सरोवरावरील धुक्याचें अवगुंठण दूर होऊं लागलें कीं त्या सृष्टीचें अंतरंग दिसूं लागतें. एखाद्या गिरिशिखराला मिठी मारण्याकरितां मेघ कित्येकदां बाहु पसरून पुढें येतात, तर केव्हां केव्हां खेळांत गुंतलेल्या मुलाप्रमाणें अंग चोरून दऱ्याखोऱ्यांत निसटतात. सदा बदलणाऱ्या या दृश्याचें मीं निरीक्षण केलें आहे आणि कित्येकदां या दृश्याच्या कमनीयतेमुळेंच केवळ माझी शुद्धि हरपल्यासारखें मला वाटलें आहे. ”

पंडितजींचें निसर्ग-प्रेम खासगी व घरगुती पत्रांतूनसुद्धां व्यक्त होतें. आपल्या भगिनीस धाडलेल्या एका पत्रांत पंडितजी लिहितात :

“ तिसरे प्रहरच्या सूर्यानें बर्फ वितळलें आहे. पर्वतशिखरांवर मात्र तसेंच आहे. मेघांनीं गाशा गुंडाळला आहे, आणि आकाश गंभीर निळें निळें दिसत आहे. उत्तर हिंदुस्थानांतील पावसानंतर प्रथमच असें आकाश दिसलें. तें नीलाकाश ! किती आश्चर्यकारक ! किती वेड लावणारें ! या आकाशाचें दर्शन व्हावें म्हणूनच का ढग निघून गेले ? तुमच्या मुंबईत दिसतें असें आकाश ? बरसातीनंतरचें निळें निळें ? पण पाहणार कोण ? आजची संध्याकाळ नेहमींपेक्षां सुंदर होती. ढगांचे खेळ सुरू होते. हंसणाऱ्या सूर्याचे हे किरण पकडून ढग त्यांना चौफेर फेंकीत होते. सगळी-कडे किरणच किरण ? अपूर्व रंग येत होते, जात होते. नाना आकृति दिसत होत्या; बदलत होत्या; रंगाचा धिंगाणा चालला होता. उघडी-बोडकीं पर्वतशिखरें लाललाल दिसत होतीं. पेटलेले गोलकच ते ! ईश्वर

प्रदेशांतली पर्वतांची मला आठवण झाली. मधून मधून बर्फाच्छादित भाग चमकत. पुन्हा निष्प्रभ होत. होतां होतां तो चंद्र आला. त्यानें विविधतेंत नवीनच भर घातली."

सूत्रांतून पाणीदार मोत्यें वेगळीं करावींत त्याप्रमाणें छंदांतून सुटीं केलेलीं हीं काव्यमौक्तिकेंच नाहींत काय?

कविहृदय हें जडांतसुद्धां चैतन्य पाहूं लागतें. मग सजीव सृष्टीशीं त्याचें तादात्म्य अनायासें व्हावें त्यांत आश्चर्य काय? "**जिकडे तिकडे तुझीच नाडी उडे.**" अशी त्याची विश्वात्मक वृत्ति असते. स्थूलाइतकेंच सूक्ष्माचेंहि त्याला आकर्षण वाटतें. उंच पर्वतावर दृष्टि स्थिरावतांना जें आश्चर्य व जें कुतूहल त्याला वाटतें त्याच आश्चर्यानें व कुतूहलानें तो एखाद्या नुकत्याच विकसित झालेल्या फुलाकडेहि पाहात राहतो. पंडितजींच्या साहित्यसंभारांत कविमनाची ही अद्भुत शक्ति ठायीं ठायीं व्यक्त झाली आहे. आल्प्स आणि हिमालय यांचें विराट् सौंदर्य कौशल्यानें रेखाटणारे व लक्षावधि जनसमूहाच्या मानसिक आंदोलनाची सहृदय चिकित्सा करणारे पंडितजी कारावासांत असतांना साध्या पशुपक्ष्यांच्या जीवनांत तन्मय होऊन जात. खारी, मैना, राघू, कबुतरें, माकडें, नाग इ. प्राण्यांच्या हालचालीं, वैशिष्ट्यें, हेवेदावे, प्रणय या गोष्टी चितारण्याची पंडितजींची हातोटी पाहिली म्हणजे त्यांच्या प्रतिभेच्या असाधारण शक्तीची कल्पना येते.

"लखनौ जेलमध्यें मी तासन् तास बैठक मारून वाचीत बसें, तेव्हां एखाद्या खारीनें येऊन माझ्या पायावर चढून बसावें व भोंवतालीं दृष्टि टाकावी. पुढें माझ्या दृष्टीला दृष्टि भिडविल्यानंतर तिला कळून येई, कीं हें झाड किंवा आपण समजतों ती वस्तु नाहीं. क्षणभर भीतीनें तिची गति कुंठित होई पण नंतर ती उडी मारून निघून जाई...डेहराडून जेल-मध्यें एका कबुतराच्या जोडीनें माझ्या खोलीजवळ घरटें केलें होतें. मी त्यांना खायला देत असें. तीं माझ्या चांगलींच संवयीचीं झालीं आणि एखाद्या वेळीं जेवण यायला उशीर झाला तर माझ्याजवळ बसून मोठ-मोठ्यानें जेवणाची मागणी करीत. त्यांच्या त्या खुणा पाहण्यांत आणि अधीरपणाचे शब्द ऐकण्यांत मोठी मौज वाटे...पोपटाचा अनुनय व

प्रणयाराधन हें आकर्षक दृश्य असे, आणि कित्येकदां दोन नरांचें एका मादीवरून भयंकर भांडण होई. अशा वेळीं त्या भांडणाचा निकाल काय होतो हें शांतपणें पाहात विजयी वीराला प्रेमसमर्पण करण्यास उत्सुक होऊन मादी एकीकडे बसलेली असे ! ”

पर्वतराजाची उंची व ऐश्वर्य हें त्याच्या शिखरावरून अजमावतां येतें. लेखनाची थोरवी व सौंदर्य हीं त्यांत ठळकपणें दिसणाऱ्या सिद्धान्तपर वाक्यांवरून ( General truths ) दिसून येतात. विवेचनाच्या ओघांत आपणांस प्रतीत झालेलें एखादें जीवनविषयक प्रमेय किंवा तत्त्व सुंदर भाषेंत लेखक मांडून गेला म्हणजे लेखनाची संपन्नता सहजासहजींच वाढत जाते. पं. नेहरूंच्या लेखनांत अशीं रम्य स्थळें जागोजाग आढळतात.

“ तर्कशास्त्र आणि रूक्ष बुद्धिवाद हीं शस्त्रें भय व अविश्वास दूर करण्यास असमर्थ आहेत. श्रद्धा व उदारता यांनींच तें काम होऊं शकेल. ”

“ उदारता ही उत्तम नीतीच आहे असें नव्हे, तर तें उत्कृष्ट राजकारणहि आहे. ”

अशा तत्त्वरत्नांची खैरात पं. जवाहरलालांच्या अफाट साहित्यसृष्टींत मोकळ्या हातांनीं केलेली आढळते. शिवाय, अशीं सिद्धान्तपर वाक्यें नेमकीं अशा ठिकाणीं येतात, कीं त्यांचा अर्थ अधिकांत अधिक वाचकांच्या मनांत ठसेल अशी तयारी पूर्वीच्या मजकुरानें झालेली असते. तत्त्वाची मोहर ठसावी यासाठीं वाचकांचें मन तापवून किंचित् पातळ करण्याचें विलक्षण सामर्थ्य पंडितजींच्या लेखणींत आहे. ‘ जगाचा इतिहास ’ संपवितांना हें सामर्थ्य विशेष भराला आलेलें दिसतें. संस्कृतीचे उदयास्त व मानवांची जीवनार्थीसाठीं चाललेली अविश्रांत धडपड यांचा विराट् इतिहास पाहिल्यावर एक तऱ्हेचें वैराग्य येणें साहजिक आहे.

**“ मरे एक त्याचा दुजा शोक वाहे**
**अकस्मात् तोही पुढें जात आहे. ”**

अशा उदासीन विचारांत ज्ञानी मनुष्य सांपडतो. पण ह्या विषादांत मनुष्य खोल जाऊं लागला तर अपयश व निष्क्रियता यांखेरीज त्याच्या वांट्याला काय येणार ? पंडितजी कवि आहेत तसे कर्मयोगीहि आहेत; आणि म्हणून

भूतकालाच्या असंख्य घडामोडींच्या कोलाहलांतून मनाला येणारी विकलता नाहींशी करण्यासाठीं आपणांला ते आशावादाच्या उंच पठारावर घेऊन जातात, आणि पुढील अमर पंक्ति आपणांला सांगतात :

> " पण आपण असा निराशावादी ग्रह करून घेतला तर जीवनापासुन किंवा इतिहासापासून आपण नीट बोध घेतला नाहीं असें होईल. कारण इतिहास आपणांला वाढ व विकास आणि मानवांच्या अनंत प्रगतीची शक्यता यांची जाणीव करून देतो. जीवन विविधरूपी व समृद्ध होतें. जीवनांत चिखल, दलदली असल्या तरी भव्य सागर, पर्वत, हिम व हिमनद्या, आश्चर्यमय ज्योत्स्नामंडित रात्री ( तुरुंगांतून विशेषच आश्चर्यमय वाटणाऱ्या ! ), कुटुंबाचें व मित्रांचें प्रेम, समान ध्येयांत एकत्र येणाऱ्या सहकाऱ्यांचा भ्रातृभाव, संगीत, ग्रंथ आणि कल्पनेचें साम्राज्य हेंहि जीवनांत आहे; आणि म्हणून आपणांपैकीं प्रत्येकजण म्हणूं शकेल :

> " परमात्मन् ! मी या भूमातेवर जन्मलों आणि तिचेंच लेंकरूं आहे हें खरें, पण माझें लालन मात्र तारकांकित आकाशानें केलें. "

पंडितजींच्या लेखनांतला एकच महत्त्वाचा गुण आतां सांगावयाचा राहिला. त्यांच्या कविहृदयाचाच तो एक विशेष आहे. निवेदनाच्या ओघांत आपल्या अंतःकरणांतील खळबळी प्रांजलपणें सांगण्याची त्यांची पद्धति अत्यंत मोहक असते. आपल्या अफाट लोकप्रियतेची चर्चा असो किंवा क्वचित् गांधीजींशीं झालेला मतभेद असो, हृदयाचें कपाट स्वच्छ करून जगापुढें उघडें करावयाचें हा प्रामाणिकपणा ते दाखवितात.

> " मला असामान्य बुद्धिमत्तेचें देणें लाभलेलें नाहीं आणि अशी बुद्धिमत्ता लोकप्रियता मिळवून देण्यास साहाय्यक होते असें नाहीं.
>
> " कांहीं आसनें आणि श्वासोच्छ्वासाचे व्यायाम येथपर्यंतच माझ्या योगाभ्यासाची प्रगति झाली आहे. पण शरिराच्या प्राथमिक अवस्थेच्या पलीकडे मी गेलेलों नाहीं. माझें मन बंडखोरच राहिलें आहे आणि कित्येकदां तें गैरवर्तनहि करतें. "

या आत्मनिवेदनांत आपल्या बऱ्यावाईट कृत्यांचें बळेंबळें केलेलें समर्थन कधींच नसतें, किंवा आपल्याकडे उगीच कमीपणा घ्यायचा असा दांभिक

विनयहि नसतो. अहंकार असला तरी तो सात्त्विक असतो आणि आत्मविश्वास असला तरी त्याला संस्कृतीचा सुगंध येत असल्यानें तो आल्हादकारक वाटतो. सृष्टि, जीवन आणि अंतरंग यांना सारख्याच उत्कटतेनें कवळणारा पुढील एकच उतारा पाहा :

" मीं तुरुंगांत घालविलेलीं वर्षें ! एकामागून एक असे अनेक ऋतु विस्मृतीच्या पडद्यामागें चाललेले मीं एकान्तांत बसून विचारमग्न स्थितींत पाहिले आहेत ! कलेकलेनें वाढत जाणारा व तसाच क्षीण होत जाणारा चंद्र आणि मोठ्या राजशाही डौलानें व निश्चितीनें चालणारा तारांचा मेळावा अनेकदां मीं पाहिला आहे ! माझ्या गत कालांतील कित्येक दिवस येथेंच समाधिस्त झाले आहेत ! आणि कित्येकदां या गत दिवसांचीं भुतें जागीं होतात आणि तीव्र स्मृति जागृत करून मला विचारतात, खरोखर, या सर्वांत कांहीं अर्थ होता का ? "

अशा तऱ्हेचा वाग्विलास ठिकठिकाणीं आढळतो. कित्येकदां वाचकाला आपल्या मनांतलेच मुके पडसाद शब्दरूप होऊन आपणांपुढें आले आहेत असें वाटतें. पण जें नवीन असेल तेंहि बुद्धीला पटण्यासारखें असतें. प्रतिभाशाली पुरुष जें नवें प्रमेय मांडील तें सामान्य बुद्धीला पटणारें असतें. हीच तर प्रतिभेची किमया म्हणायची. सकाळच्या कोंवळ्या सूर्यकिरणांत तोंडानें कांहीं अस्पष्ट गुणगुणत रांगोळी घालणारी सुवासिनी अगणित लोकांनीं पाहिलेली असते. पण तें एक नेहमींचें दृश्य म्हणून माणसें त्याला डावलून जातात. पुढें केशवसुतांसारखा कवि जेव्हां या दृश्यांत झालेला स्वर्गभूमीचा मंगल व मनोहर संगम सुंदर शब्दांत दाखवितो तेव्हां तींच माणसें त्या दृश्यापाशीं थांबतात; आणि एक अगदीं नवी अनुभूति आली असली तरी त्यांना ती बरोबर पटते. हें आपणांला अगोदरच पटायला पाहिजे होतें, अशी हुरहुर त्यांना लागते. नवीन असेल तें पटण्यासारखें वाटणें ( Reasonableness of discovery ) ही प्रतिभेची शक्ति आहे असें शॉनीं याच क्रियेला उद्देशून म्हटलें आहे. ही शक्ति चिकित्सक व साधे रसिक यांना सारखीच मोहित करते. म्हणूनच—

" सामान्यांना हृदयस्पर्शी वाटलें पाहिजे आणि ज्ञात्यांचें समाधान झालें पाहिजे. "

(It must appeal to the non-critical and satisfy the critical.)

ही एका लेखकानें उत्कृष्ट वाङ्मयाची अगदीं सोपी अशी कसोटी सांगितली आहे. ती जरी लावून पाहिली तरी पंडितजींचें पहिल्या श्रेणीच्या साहित्यिकांतलें स्थान निश्चित होतें.

पंडितजींच्या एकंदर साहित्यांतलीं कांहीं ठळक वैशिष्ट्यें आणि तींहि साहित्य-कलेच्या क्षेत्रांत पडतात तेवढीं आपण पाहिलीं. विनोदाची कसरत पंडितजी फारशी करीत नाहींत. पण कुठें कुठें उपरोधाचा शिडकावा ते देतात आणि तो आल्हादकारकहि वाटतो. विशेषतः चैनी संस्थानिक, जुलमी अधिकारी, संकुचित सनातनी इ० प्राण्यांवर लिहितांना त्यांनीं उपरोधाचा उपयोग चांगल्या तऱ्हेनें केला आहे. कित्येक गोष्टींची नावड व्यक्त करतांना ते क्वचित् विनोदाचें अस्त्र वापरतात.

> "मला दाढी मुळींच आवडत नाहीं, आणि अफगाणिस्तानच्या अमानुल्लानें दाढीला सक्त मनाई केल्याचें मला कळलें तेव्हां मी हर्षभरित झालों."

अशा गमतीदार वाक्यांचें दुर्भिक्ष्य कांहीं त्यांच्या वाङ्मयांत नाहीं. समोर विराट् विषय पडला असला तरी त्यांतला किती भाग उचलायचा आणि मूळ विषयाची महती व उंची कळेल अशा पद्धतीनें तो कसा मांडायचा हें पंडितजी फारच चांगलें जाणतात. जाणता पालक, विद्वान् शिक्षणशास्त्रज्ञ आणि कुशल साहित्यिक अशा तीन भूमिका त्यांच्या ठायीं एकत्र झालेल्या आपणांला दिसतात.

पंडितजींची साहित्यसृष्टि जितकी विशाल तितकीच अद्भुतरम्य आहे. तीमध्यें मोहेंजोदारो येथील प्राचीन हिंदुस्थानचें वैभव दिसेल, तसेंच लिंडबर्गच्या अर्वाचीन विमानविक्रमाचें दृश्यहि आढळेल; बुद्धाचें दर्शन होईल आणि रोमां रोलांहि भेटतील; मध्ययुगीन युद्धाचें रसभरित वर्णन वाचावयाला मिळेल, तसेंच गेल्या महायुद्धांत मानवतेची किती हानि झाली याचा हिशेब सांपडेल; थोडक्यांत म्हणजे भूतकालांतील ज्ञात इतिहासाच्या अफाट प्रदेशाचा नकाशा दिसेल, वर्तमान-कालीन घडामोडींचा चित्रपट त्यांत पहायला मिळेल, आणि भविष्यकालीन जगाचीं स्वप्नेंहि मधून मधून रंगलेलीं दिसतील. अनंत आकाशांत फिरणाऱ्या

ग्रहगोलांना जसें पंडितजींनीं आपणांला भेटविलें आहे, तसेंच आपल्या मनो-व्यापारांच्या मध्यभागीं नेऊनहि सोडिलें आहे !

अशा संपन्न वाङ्मयसृष्टीचा परिचय एका प्रकरणांत कितीसा देतां येणार? वर सटीक दिलेले चार भाषांतरित उतारे म्हणजे काश्मीरसारख्या भूवरील स्वर्गांतहिंडून दोन-चार ठिकाणचीं घेतलेलीं कांहीं तळहाताएवढीं छायाचित्रें होत. त्यांवरून मूळ सौंदर्याच्या भव्यतेची कांहींशी कल्पना आली, तरी मूळ प्रदेशांतली अलौकिक रंगसंगति व चैतन्य त्यांत कसें दिसणार ! त्यासाठीं प्रत्यक्षच तिथें गेलें पाहिजे. मात्र छायाचित्रांनीं तिकडे जाण्याचा जबरदस्त मोह पडेल याविषयीं मी साशंक नाहीं. आणि असा जो कुणी तिकडे जाईल किंवा अगोदरच गेला असेल तो मादाम चांग कै शेक यांच्या पुढील मतांशीं समरस झाल्यावांचून कधींच राहणार नाहीं :

> " जेव्हां आजच्या राजकीय संग्रामाची वावटळ व गोंधळ थांबेल व तीं एक इतिहासजमा गोष्ट होऊन बसेल तेव्हां नेहरूंची वाङ्मयीन कीर्ति कायमच राहील... ...इंग्रजी भाषा जोंवर आहे तोंवर नेहरू इंग्रजी साहित्याच्या आकाशांत एक तेजस्वी तारा म्हणून झळकत राहतील. ......नेहरूसारख्या सृजनात्मक विचाराच्या माणसानें केलेल्या आपल्या अनुभवाची, आकांक्षांची व यशाची नोंद केवळ त्यांच्या समकालीन लोकांच्या मनालाच वळण देते असें नाहीं, तर मानवी इतिहासावर ती आपला शाश्वत ठसा उमटविते. नेहरूंच्या लेखणीच्या साह्यानेंच भावी पिढ्यांना त्यांच्या व्यक्तित्वाचें मूल्यमापन करतां येणार आहे. "

००००

: ७ :

# तत्त्वमंथन

मेरी कॉलेरिज् हिनें एक लहानशीच पण सुंदर कविता लिहिली आहे. तीमध्यें ती म्हणते, "ईजिप्त, ग्रीस, रोम या प्राचीन राजवटी विस्मृतींत गडप झाल्या, पण या राजवटीच्या लोकांचीं स्वप्नें मात्र अद्यापि कायम आहेत." या कवितेंतला ध्येय-सृष्टीवरचा विश्वास मला फार आल्हाददायक वाटतो. आणि पंडित जवाहरलाल नेहरूंच्या जीवनकार्यांत याचाच प्रत्यय मला विशेष येतो. परिस्थिति झपाट्यानें बदलत आहे; लोकशाहीच्या काळांत कोण चढेल आणि कोण पडेल हें सांगतां येत नाहीं. कदाचित् उद्यांच्या राष्ट्रसंसारांत नेहरूंचें आजचें स्थान राहणारहि नाहीं. पण नेहरूंनीं आजवर जीं ध्येयें व मूल्यें प्रतिष्ठित केलीं त्यांना थोडाच धक्का पोंचणार आहे! देशभक्त किंवा राजधुरीण या नेहरूंच्या भूमिके-पेक्षांहि त्यांची तत्त्वचिंतकाची भूमिका अधिक स्पष्ट व अधिक चिरस्थायी आहे. आणि म्हणूनच त्यांच्या कर्तृत्वाइतकेंच, त्यांनीं निर्मिलेल्या तत्त्वसृष्टीचें निरीक्षण जिव्हाळ्यानें केलें पाहिजे.

इतिहास हा नेहरूंचा अत्यंत आवडता विषय आहे; समाजवादी दृष्टिकोण असणाऱ्या माणसाचा तो असतोच बहुधा. कारण इतिहास म्हणजे समाजशास्त्र व राज्यशास्त्र यांची एक प्रयोगशाळा आहे. शास्त्रीय दृष्टीनें मानवी संसाराचे व्यापार न्याहाळणाऱ्या समाजवाद्याला या प्रयोगशाळेंत जाणून घेण्यासारखें पुष्कळच असतें. जीवनाविषयींचीं प्रमेयेंच मुळीं तो या प्रयोगशाळेंतून मिळवितो. इतिहास म्हणजे कांहीं विभूतींच्या कृत्यांची मालिका होय असें कार्लाईलप्रमाणें तो समजत नाहीं. हा एक चक्रनेमिक्रम आहे; आणि त्या त्या घटनांची पुनरुक्ति

होत असते असेंहि नियतिवाद्याप्रमाणें त्याचें मत नसतें. इतिहासज्ञानानें आपली सध्यांच्या काळाबद्दलची निदानें अचूक ठरावीं आणि भविष्याबद्दलचे आपले अंदाज बरोबर असावेत या हेतूनें समाजवादी इतिहासाचा अभ्यास करतो. केवळ यदृच्छेनें कांहीं तरी होत राहिलें आहे असें त्याला वाटत नाहीं. सामान्य व असामान्य माणसाच्या कर्तृत्वाचा परिपाक म्हणजे इतिहास अशी त्याची श्रद्धा असते. पंडित नेहरूंनीं हेंच मत पुढील शब्दांत स्पष्ट रीतीनें मांडलें आहे :

"कांहीं व्यक्तींच्या कृत्यांची नोंद म्हणजे खरा इतिहास नव्हे. जे मानवी समाज राष्ट्र तयार करतात, जीवनांतल्या सुखसोयी निर्माण करतात आणि सहस्र मार्गांनीं ज्यांची अन्योन्यावर क्रिया—प्रतिक्रिया होते त्यांचा विचार इतिहासानें केला पाहिजे. निसर्ग आणि त्यांच्या शक्ति यांच्याविरुद्ध जंगलें व जंगली श्वापदें यांना तोंड देऊन, आणि स्वतःच्या-पैकीं जे कोणी आपणांस पददलित करीत आहेत व स्वार्थासाठीं पिळीत आहेत त्यांच्याविरुद्ध जाऊन माणसांनीं जो झगडा केला त्याची कथा म्हणजे इतिहास होय. इतिहास म्हणजे माणसानें जीवनासाठीं केलेली झुंज होय......माणसाचा विकास व प्रगति यांविषयींची अपरंपार शक्यता इतिहासावरून आपणांला कळून येते."

वर सांगितलेंच आहे कीं, समाजवादी मनुष्यच इतिहासाकडे मार्गदर्शनाच्या दृष्टीनें पाहूं शकतो. इतिहासाकडे पाहण्याचा हाच शास्त्रीय दृष्टिकोण होय. पंडितजींच्या तत्त्वज्ञानावर विज्ञानशास्त्राचा फार परिणाम झाला आहे. त्यामुळें धर्म, कर्मठपणा, परलोक, सरंजामशाही, भांडवलशाही इ. सर्वच जुन्या कल्पना नेहरूंनीं टाकाऊ ठरविल्या आहेत. विज्ञानासारखा मूर्तिभंजक दुसरा कोण असणार! विज्ञान अंधश्रद्धेनें चढविलेले खोटे मुखवटे भराभर ओढून काढतें आणि रूढ कल्पनांचें वास्तव स्वरूप प्रकट करतें. या विज्ञानवादी दृष्टिकोणास अनुसरूनच मार्क्सनें धर्माला अफूची उपमा दिली. खालच्या पददलित लोकांचा असंतोष दडपून त्यांना भाविकपणाची गुंगी आणण्यास धर्माचा आजवर उपयोग केला आहे, असें मार्क्सनें सांगितलें. नेहरूंनीं याच मताचा अनेकदां अनुवाद केला आहे.

पण ज्या धर्माचा विरोध विज्ञानानें अटीतटीनें केला तो खरा धर्म होता, असें

मात्र म्हणतां येणार नाहीं. या दृष्टीनें पाहतां नेहरूंचा खरा धर्म व विज्ञान यांच्यांत जो मागें विरोध होता तो आतां मिटायला हरकत दिसत नाहीं. आज विज्ञानानें आपले पंख साऱ्या विश्वावर पसरले आहेत. जीवनाच्या सर्व शाखा आतां त्यानें आपल्या कक्षांत आणल्या आहेत. तेव्हां धर्म अथवा तत्त्वज्ञान यांना विज्ञान थोडेंच वगळणार आहे? उलट विज्ञानाच्यामुळें धर्म किंवा तत्त्वज्ञान यांच्यांतलें शुद्ध सत्त्व तेवढेंच राखला मदत होईल. धर्माला विज्ञानाचा पाठिंबा मिळाला तर पिळवणुकीकरितां धर्माचा हीन उपयोग वतनदार लोकांना करतां येणार नाहीं. हें विशद करायचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, गंडेदोरे करून दुःखनिवारण करतां येतें हें खोटें आहे, हें विज्ञान सहज पटवून देऊं शकेल. पण शरीर व मन यांच्या शक्ति कांहीं शिस्तीनें, संयमानें व नैतिक आचरणानें वाढवितां येतात या धर्माच्या शिकवणीला विज्ञान हरकत घेणार नाहीं. उलट, आरोग्य व मानसशास्त्र यांच्या साह्यानें ती शिकवण बरोबर आहे असेंच सिद्ध करील. धर्माला अशा रीतीनें विज्ञानाचा आधार मिळाला म्हणजे सत्य अधिक सुगम होईल. नेहरूंच्या मतें धर्म आणि विज्ञान यांच्यांत तेढ असायचें कारणच नाहीं. विज्ञानशास्त्रज्ञ हा धर्मात्मा असला पाहिजे. ऐहिक जीवनाबद्दल त्याला आसक्ति उपयोगी नाहीं. कर्मफलाची अभिलाषा सोडून सत्य नेईल तिकडे जायला त्यानें तयार असलें पाहिजे. असें नेहरूंचें ठाम मत आहे.

मागील शतकांत विज्ञान जेवढें ताठ्यांत होतें तेवढें तें आज राहिलेलें नाहीं. उथळ बुद्धिवादी पूर्वी विज्ञानानें सर्व कांहीं उलगडा होणार आहे असें समजत. माणसानें निसर्गावर जें थोडेंफार प्रभुत्व मिळविलें आहे त्यामुळें माणूस फार झिंगून गेला होता. आतां त्याची ती धुंदी उतरली आहे. अजून किती तरी गोष्टींचें रहस्य माणसाला जाणावयाचें आहे. पंडितजी विज्ञानवादी असले तरी सृष्टिचमत्काराविषयींची त्यांची आश्चर्याची भावना ओसरली नाहीं. बुद्धिवादानें येणारी रूक्षता व अश्रद्धा त्यांना कधीं आली नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आपलें जग हें साबणाच्या बुडबुड्यासारखें क्षणभंगुर व क्षुद्र असेल, पण त्या जगावर माणसाचें मन व आत्मा हीं एक अजब चीज आहे. या मनाच्या सामर्थ्याची व नित्य नवे प्रदेश शोधून काढणाऱ्या त्याच्या वृत्तीची पंडितजींना धन्यता वाटते, म्हणजे विज्ञानानें सर्व उकललें असें ते

समजत नाहींत. तर मनाच्या गूढ व्यापारावर व शक्तींवर तें मोहित होऊन जातात. येथें गूढवादी कवीची त्यांची भूमिका असते. याच भूमिकेनें त्यांच्या जीवनांत सौंदर्यवाद व कला त्यांना मिळवून दिली आहे.

पंडितजींच्या कलाविषयक मताची पाहणी करण्यापूर्वी एक गोष्ट सांगून टाकली पाहिजे. मार्क्सवादाचा पगडा त्यांच्या मनावर पुष्कळ होता व आहेहि. पण वर सांगितलेली गूढवादी प्रवृत्तीहि त्यांच्या अंगीं असल्यानें ते सहृदयतेच्या नेत्रांनीं जसें जग पाहूं शकतात, त्याप्रमाणेंच मार्क्सवाद म्हणजे सर्वस्व अशा ठोकळेबाज विचारसरणीच्या आहारीं ते जात नाहींत. कुराणांत सर्व कांहीं आहे किंवा वेदांत आगगाड्याहि सांगितल्या आहेत असें मानणाऱ्या सनातन मुल्लांची किंवा भिक्षुकांची वृत्ति कित्येक मार्क्सवादी दाखवितात ! मार्क्स हाच मानवतेचा पहिला व अखेरचा प्रेषित आहे असें हे (अ)धर्मवेडे बुद्धिवादी मानतात ! पंडितजी सुदैवानें या वर्गांत मोडत नाहींत. त्यांचें गूढवादी कवि-हृदय मार्क्सवादाची योग्यता मानूनहि पंथवेडेपणाच्या शृंखलांनीं बद्ध होऊं इच्छीत नाहीं. ते म्हणतात :

> " मार्क्सवाद म्हणजे काय ? मानवी जीवन व आकांक्षा, इतिहास, राजकारण आणि अर्थशास्त्र या सर्वांचा सुसंगत अर्थ लावण्याचें तें एक शास्त्र आहे. तीं एक सिद्धान्तपद्धति आहे; पण त्याबरोबर तीमध्यें कार्यास आवाहनहि आहे. भूत, वर्तमान, भविष्य यांना जवळ जवळ दैववादाच्या सारख्या कांहीं तार्किक शिस्तींत बसविण्याचा हा प्रयत्न आहे. पण जीवन हें इतकें तार्किक आणि कडक नियमांनीं बद्ध आहे हें सयुक्तिक वाटत नाहीं. म्हणूनच या शास्त्राबद्दल पुष्कळांना शंका आहे. "

आपलें मत आणखी स्पष्ट करण्यासाठीं पंडितजींनीं लेनिनचा निर्वाळा दिला आहे. त्यावरून या तत्त्वज्ञानाचा लवचिकपणा व मर्यादा कशा आहेत हें सहज कळून येईल. ते सांगतात :

> " मार्क्सवादाचा सर्वांत मोठा अनुयायी लेनिन होता. त्यानें नुसतें तें तत्त्वज्ञान विवेचिलें नाहीं तर आचरणांत आणिलें. आणि तरीहि तो आपणांला इषारा देतो कीं, मार्क्सवादाला ठोकळेबाज सिद्धान्तांचें स्वरूप देऊं नका. मार्क्सवादाचें रहस्य त्यानें ओळखलें असल्यामुळें मार्क्सवादाचा

तपशील त्यानें अविचारीपणानें कोठेंहि लावला नाहीं. तो आपणाला सांगतो : मार्क्सवाद संपूर्ण अथवा अजिंक्य असें आपण मानतां कामा नये...विशेषत: रशियन समाजवाद्यांनीं मार्क्सवादाचा स्वतंत्र अभ्यास केला पाहिजे; कारण हें तत्त्वज्ञान फक्त स्थूल तत्त्वें शिकवितें; परंतु तीं तत्त्वें इंग्लंडपेक्षां फ्रान्समध्यें निराळ्या पद्धतीनें, फ्रान्सपेक्षां जर्मनींत निराळ्या पद्धतीनें आणि जर्मनीपेक्षां रशियांत वेगळ्याच रीतीनें अमलांत आणावयाचीं असतात."

पंडितजी कलेचे भोक्तेच नव्हे तर निर्मातेहि आहेत. एखाद्या साध्या जाहीर-पत्रकांतसुद्धां शब्दांचें शिल्प दाखविण्याची कोशीस ते करीत असतात. त्यांचें संगोपन ऐश्वर्यांत झालें आणि त्यांची राहणी वैभवांतलीच आहे. पण उच्च कला ही राष्ट्रीय जीवनांतून निर्माण होणार नसेल तर ती चैतन्यशून्य कला होते असें त्यांनीं स्पष्ट म्हटलें आहे. शाश्वतजीवी कलेचें बाह्य स्वरूप कदाचित् अल्पसंख्य लोकांच्या प्रवृत्तींचें निदर्शक असेल, पण त्या कलाकृतींचा पाया हा बहुजनांच्या आशा-आकांक्षांवर उभारलेला असला पाहिजे. रामायण आणि महाभारत यांची रचना ज्या ऋषींनीं केली ते अल्पसंख्याकांचे प्रतिनिधि होते; त्याप्रमाणें त्यांची वापरलेली भाषा, छंद, दृष्टान्त यांवरहि वतनदार वर्गाचा ठसा होता असें म्हणतां येईल. पण त्यांनीं या महाकाव्यांना ज्या राष्ट्रीय जीवनाची बैठक घेतली होती ती केवढी व्यापक होती! एका महान् मानववंशांतलें सारें वैशिष्ट्य, त्याचा पराक्रम, त्याचीं ध्येयें व पुरुषार्थ वरील दोन महाकाव्यांत व्यास-वाल्मीकींनीं रंगविलीं म्हणूनच ना या दोन महान् कलाकृति आज जगाच्या अक्षरवाङ्मयांत चंद्र-सूर्याप्रमाणें झळकत राहिल्या?

भाषेची चर्चा करतांना पंडितजींनीं आपले कलेवरील विचार अधिक विशद केलेले दिसतात. आमच्या देशांत राष्ट्रभाषेचा वाद गेलीं २५ वर्षें चालू होता. सर्व वादांप्रमाणें याहि वादांत जुने-नवे, प्रतिगामी-पुरोगामी असे गट पडले. भाषा हें मानवी विकार-विचार प्रकट करण्याचें सामर्थ्यवान् माध्यम! त्याचा विचार तात्त्विक भूमिकेवरून व्हायला पाहिजे. पण त्याहि कामीं संकुचित विचाराच्या लोकांनीं धर्माचा व संस्कृतीचा बागुलबुवा उभा केलाच! गांधी-नेहरूंना ठराविक दूषणें देण्याची मोहीम त्यांनीं केली! पण या सर्व धूळफेकीनें आपल्या उद्दिष्टांवरून नेहरूंनीं आपली नजर ढळूं दिली नाहीं. भाषेच्या शुद्धते-

विषयीं फार सोंवळ्या व संकुचित कल्पना आपल्या लेखकांनीं करून घेतल्या आहेत. त्या टाकणें जरूर आहे असें त्यांनीं बजावलें. आमचे लेखक कोणाकरितां लिहितात ? कांहीं वरच्या शिक्षित लोकांकरितां; यामुळें त्यांचा आणि बहुजनसमाजाचा संबंध अजिबात तुटला आहे. त्यांचें आवाहन ठराविक वर्गापुरतेंच मर्यादित राहतें. ही स्थिति बदलायची असेल तर केवळ सोपी आणि सुबोध भाषा लिहून भागणार नाहीं. उपमा-उत्प्रेक्षांची व अवघड शब्दांची आरास उतरली तरी जोंवर भाषेंतला आशय बहुजनसमाजाला अगम्य आहे तोंवर त्या भाषेचा त्या समाजाला काय उपयोग ? त्या समाजाच्या आशा-आकांक्षांचीं व सुखदुःखांचीं प्रतिबिंबें ज्या भाषेंत पडतील तीच त्याला आपलीशी वाटणार. नेहरू सांगतात :

> " जिवंत भाषा ही एक चैतन्यानें थरथरणारी गोष्ट आहे. ती सदा बदलते, विकास पावते. तिचा वरचा सरंजाम जरी अल्पसंख्याकांच्या संस्कृतीस शोभणारा असला तरी तिचीं मुळें बहुजनसमाजांत खोल गेलेलीं असतात. "

लोकजीवनाशीं भाषेचा संबंध तुटला तर केवळ तिचें आल्हादकारकत्वच नाहींसें होतें असें नाहीं, तर ती मृतप्राय होऊन पडते.

भाषा हें संस्कृतीचेंच एक अंग आहे. संस्कृति म्हणजे काय ? हा प्रश्न पुष्कळदां विचारला जातो. आणि त्याचीं उत्तरें अनेक तज्ज्ञ अनेक प्रकारांनीं देतात. या उत्तरांनीं मूळ विषय समजण्याऐवजीं अधिकच गुंतागुंतीचा होऊन बसलेला आहे. कुणी धर्म म्हणजेच संस्कृति म्हणतात. कुणी शिक्षण आणि संस्कृति समानार्थी समजतात. जीवनांतल्या गरजा वाढवून तें अधिक संपन्न व डामडौलाचें करणें यालाच संस्कृति असें समजण्याची चूक कित्येक करतात, तर संन्यास म्हणजे उच्च संस्कृतीची परमावधि असें मानण्याकडे कित्येकांचा कल असतो ! हीं सारींच असत्यें किंवा अर्धसत्यें आहेत. संस्कृति म्हणजे काय हें सांगतां आलें नाहीं तरी ओळखतां येतें; " जीवनाची कला शिकवितां येत नाहीं, पण शिकतां मात्र येते " हें हॅवलॉक एलिस्‌चें म्हणणें संस्कृतीलाहि तंतोतंत लावतां येईल. संस्कृतीची सुटसुटीत व्याख्या करतां न आली तरी पंडितजींनीं तिचें स्वरूप अगदीं थोडक्यांत पुढील शब्दांत सांगितलें आहे, त्यावरून संस्कृति म्हणजे काय हें कळण्यास पुष्कळच मदत होईल. ते म्हणतात :

> " संस्कृतींत ज्या अनेक गोष्टींचा अंतर्भाव होतो, त्यांत स्वतःवर संयम आणि दुसऱ्याविषयीं सहानुभूतिपूर्वक विचार या दोन मुख्य होत. माणसांत आत्मनिग्रह आणि सहिष्णुता नसेल तर त्यास असंस्कृत म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. "

पण वर भाषा व कला यांच्या लोकाभिमुख वृत्तीबद्दल जें सांगितलें तेंच संस्कृतीच्याहि बाबतींत पंडितजींचें म्हणणें आहे. शब्दाचा थोडा फरक आहे इतकेंच !

> " माणसाच्या संस्कृतीचीं मुळें त्याच्या राष्ट्रीय प्रतिभेंत खोल गेलेलीं असलीं पाहिजेत. संस्कृतीला त्या भूमीचा वास आला पाहिजे आणि तिनें आपल्या इतिहासापासून स्फूर्ति घेतली पाहिजे. "

भारतीय संस्कृतीविषयीं नेहरू हे अधिकाधिक आस्थेवाईक होत चाललेले दिसतात. पाश्चात्य शिक्षणाचे व वातावरणाचे भडक संस्कार त्यांच्या मनावरून पूर्णपणें निघून कधींच गेले नाहींत, आणि जाणारहि नाहींत; पण ते थोडे फिकट मात्र झाले आहेत. या संस्कारांच्या पार्श्वभूमीचा उपयोग नेहरूंचें भारतीय संस्कृतीविषयींचें प्रेम उठून दिसण्यास फार होतो. आपली संस्कृति व देश यांविषयींचें प्रेम ही आज फार भयंकर गोष्ट होऊन बसली आहे ! कारण या प्रेमानें मानवतेच्या नरडीला नख लावण्याचा प्रयत्न चालविला आहे. माणसांनीं त्याग व प्रतिभा यांच्या जोरावर जी प्रगति केली ती नष्ट करण्याचा हा अघोरी प्रयत्न आहे. हिटलरनें संस्कृतिप्रेमाचे केवढे देव्हारे माजविले ! अरब आणि ज्यू यांच्यांत संस्कृतिप्रेमामुळेंच रक्ताचे पाट वहात नाहींत काय ? फाळणीच्या प्रसंगानें आपण तीच राक्षसी लीला नुकतीच पाहिली आहे ! सुदैवानें भारतीय संस्कृतीविषयींचें नेहरूंचें प्रेम असें आसुरी नाहीं, तें सत्त्वशील आहे.

कारण नेहरूंचें संस्कृति-प्रेम इतरांच्या द्वेषावर उभारलें गेलेलें नाहीं, त्याचप्रमाणें आपल्या विकासाबद्दल आत्मसंतुष्टताहि त्यांना आलेली नाहीं. राष्ट्रवादाच्या भिंतीपर्यंतच जाऊन त्यांची नजर थांबत नाहीं. पलीकडील अफाट मानवताहि त्यांच्या दृष्टिपथांत येते आणि म्हणूनच ते म्हणतात :

" आजची संस्कृति ही कांहीं एका राष्ट्राची अथवा एका मानववंशाची निर्मिति अथवा मिरासदारी नाहीं. सर्व राष्ट्रांनीं तिच्या बांधणींत हातभार लावलेला आहे, आणि मग आपल्या विशिष्ट गरजांस अनुसरून तिच्यांत फेरबदल करून घेतले आहेत. हिंदुस्थानाजवळ जगाला देण्यासारखा संदेश असेल — तो तसा आहे असें निश्चित मला वाटतें — तर इतर राष्ट्रांच्या संदेशांतून त्याला घेण्यासारखें व शिकण्यासारखेंहि पुष्कळच आहे. "

' भारताचा शोध ' या त्यांच्या ग्रंथांत भारतीय एकतेविषयीं झालेला साक्षात्कार त्यांनीं सविस्तरपणें वर्णिलेला असला, तरी त्याची अस्पष्ट कल्पना त्यांना किती तरी पूर्वी आलेली होती. श्रीमत् शंकराचार्यांनीं भारताच्या चार कोंपऱ्यांना चार धाम स्थापिले आणि संस्कृतीचा प्रवाह सर्व देशभर खेळता ठेवण्याची योजना केली, याबद्दल आचार्यांची प्रशंसा त्यांनीं मागेंच (' जगाचा इतिहास ') या ग्रंथांत केली होती. सम्राट् अशोकाविषयीं त्यांना वाटणारा आदर फार जुना आहे. सम्राट् अशोक हा भारतीय संस्कृतीला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्वरूप देणारा असामान्य प्रचारक होता. मात्र या महान् ऐतिहासिक विभूतींच्या कार्यामुळें पंडितजींना पटलेलें सत्य साकार झालेलें पाहण्यास १९३७ साल उजाडलें. त्यावेळीं प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीचा प्रचार करण्यासाठीं पंडितजींनीं देशभर दौरा काढला होता. या दौऱ्याचें वर्णन पंडितजी करतात :

" या विशाल संचाराचा आणखीहि एक फायदा मला पटला. हिंदुस्थान आणि हिंदी बांधव यांचा शोध घेण्यासाठीं मीं सफरच काढली आहे असें मला वाटूं लागलें. हजारों चेहरे ठिकठिकाणीं दिसत, आणि अगदीं भिन्न अशा विशेषांबरोबर हिंदी संस्कृतीच्या ऐक्यतत्त्वाचा ठसठशीत ठसा त्या सर्व चेहऱ्यांवर दिसे. "

अमेरिकेमध्यें नॅशनल प्रेस क्लबनें केलेल्या सत्काराचे वेळीं बोलतांना ( १८ ऑक्टो. १९४९ ) भारतीय संस्कृतीच्या उदात्ततेबद्दल नेहरूंनीं सांगितलें कीं, "ती सर्वांना पोटांत घेणारी आहे. तिच्यापुढें एक विशिष्ट जगत्कार्य आहे." कुठल्याहि आग्रहाचा अभाव आणि नवीन परिस्थितीशीं जुळवून घेण्याचें सामर्थ्य हे भारतीय संस्कृतीचे विशेष होत. नवीन तत्त्वज्ञान किंवा संस्कृति शेजाराला आली

की त्यांतल्या तत्त्वाचा गाभा अलगद् उचलून आपणांत तो मुरवून टाकायचा हें भारतीय संस्कृतीचें अजब कौशल्य आहे. शेंकडों नद्या समुद्राला मिळाल्या तरी त्याचें स्वरूप कायमच असतें, तसेंच भारतीय संस्कृतीचें आहे. मात्र, जगाला संदेश देण्यासाठीं त्याचें पूर्ण फळ जगाला मिळावें म्हणून हिंदुस्थानला एक विशिष्ट दर्जा प्राप्त झाला पाहिजे. जगद्गुरु होऊं शकणाऱ्या भारताचें स्वप्न अलाहाबाद विद्यापीठापुढें बोलतांना ( १३ डिसें. १९४७ ) नेहरूंनीं रंगविलें :

" कशा तऱ्हेचा भारतवर्ष आम्हांला पाहिजे ? कशा तऱ्हेचें जग व्हावें असें आम्ही इच्छितों ?...आपल्या राष्ट्रीय उद्दिष्टांबद्दल आपणांला स्वच्छ कल्पना असली पाहिजे. आम्हांला शक्तिमान्, स्वतंत्र व लोकसत्ताक हिंदुस्थान निर्माण करावयाचा आहे. या हिंदुस्थानांत प्रत्येक नागरिकाला प्रगति व सेवा यांविषयीं समान संधि मिळेल, पैसा व प्रतिष्ठा यांविषयींची आजची विषमता नष्ट होईल, आणि आपल्या शक्ति सृजनात्मक व सहकारी कार्याला लागतील. अशा हिंदुस्थानांत जातिवाद, अलगपणा, अस्पृश्यता, एकारलेपणा. पूर्वग्रह आणि पिळवणूक यांना स्थान राहणार नाहीं. धर्मस्वातंत्र्य जरूर राहील, पण धर्माला राष्ट्राच्या राजकीय व आर्थिक गोष्टींत ढवळाढवळ करूं दिली जाणार नाहीं..."

भारतीय संस्कृतीचा टिळा लावून मिरवणारे या देशांत जे कांहीं पंथ आहेत त्यांच्या आणि पंडितजींच्या भारतीय संस्कृतीविषयींच्या श्रद्धेंत कोणता फरक आहे हें यावरून लक्षांत येईल. न्यूयॉर्कला केलेल्या एका महत्त्वाच्या भाषणांत पंडितजींनीं ' आमचा देश जसा सनातन तसा नित्य नूतन आहे. ' असें मोठ्या आत्मविश्वासानें सांगितलें. अनार्यांच्या देवाला आपल्या देव्हाऱ्यांत प्रतिष्ठा देऊन त्याला सर्व कलांचा अधिपति करण्यांत प्राचीन भारतीयांचें थोरपण व कौशल्य दिसून येतें. " **यत्र विश्वं भवत्येकनीडम्** " ( जेथें सर्व विश्व-एक घरटें होत असतें. ) एवढ्या विशाल कल्पनेचा पाया या संस्कृतीला आहे. ही उदार संस्कृति पंडितजींच्या आदराचा विषय आहे. उलट, या देशांत भारतीय संस्कृतीचा वेळींअवेळीं पुकारा करणारे पंथ फक्त समाजांतल्या प्रतिगामी परंपरांचे भक्त आहेत. त्यांना आपल्या जातीपलीकडील अफाट मानवतेचा उमाळा नाहीं. त्यांना फक्त जुन्याचा पुनरुद्धार पाहिजे आहे. नव्या सुंदर कल्पनांची लागवड त्यांना नको आहे. लोकसत्ता, समता, बंधुता इ० कल्पनांची

त्यांना जात्याच चीड आहे. म्हणून हिंदुस्थानांतल्या कम्युनिस्टांचा उग्र साम्यवाद आणि नेहरूंचा सात्त्विक समाजवाद जसा एक नाहीं, त्याप्रमाणें आमच्या या संस्कृतिनिष्ठांची संकुचित भारतीय संस्कृति आणि पंडितजींची उदार भारतीच संस्कृति यांत महदंतर आहे.

राजकारण किंवा समाजकारण यांत आस्था असलेले लोक थोडे; पण वैयक्तिक जीवन हें प्रत्येकाला जिव्हाळ्याचें वाटतें. म्हणून नेहरूंसारख्या माणसाचें यासंबंधींचें कांहीं तत्त्वज्ञान आहे काय याची उत्सुकता असणारे असंख्य लोक आहेत. नेहरूंनीं याविषयीं कांहीं सूत्रें किंवा आचारमार्ग मुळींच सांगितलेला नाहीं. त्यांच्यावर लोकांचा जो गाढ विश्वास आहे तो लक्षांत घेतां त्यांनीं एखादी नियमावलि प्रेषिताचा आव आणून जगापुढें मांडली असती तरी जगानें तिचें स्वागत जरूर केलें असतें. पण नेहरूंचें मोठेपण येथेंच आहे. त्यांनीं प्रेषिताचा आव आणला नाहीं किंवा उपदेशकाची ऐट मिरविली नाहीं; उलट, आपण कित्येकदां मनानें उच्छृंखल बनतों, अस्वस्थ होतों असें प्रांजलपणें सांगितलें आहे.

पण नेहरूंनीं आचारसूत्रें सांगण्याची फिकीर ठेवली नसली तरी लोक थोडेच त्यांना स्वस्थ बसूं देतात ? प्रवासी पत्रपंडित व जिज्ञासू विद्यार्थी यांनीं त्यांना प्रश्न विचारून अनेकदां त्यांचें जीवनरहस्य शोधून काढण्याचा प्रयत्न केला आहे. कित्येकदां आत्मनिवेदनाच्या ओघांत त्यांनीं आपले विचार सूत्रबद्ध केले आहेत. या सर्वांवरून त्यांच्या जीवनविषयक दृष्टिकोणाबद्दल कांहींशी कल्पना येते. कृति ( Action ) ही त्यांच्या जीवनाची प्रेरक शक्ति आहे. " निष्क्रियतेपेक्षां चुकीची का होईना, क्रिया करीत राहणें हें अधिक चांगलें." असें नेहरूंचें मत आहे. निष्क्रियतेमुळें केवळ संपन्नताच कमी होते असें नाहीं, तर नैतिक अधःपातहि होण्याचा संभव असतो असें त्यांना वाटतें.

गांधीजी आणि मार्क्सवाद दोन्हींचें पंडितजींना आकर्षण आहे. सुभाषचंद्र एकदां म्हणाले होते कीं, " जवाहरलाल बुद्धीनें मॉस्कोचें ध्येय पत्करतात आणि हृदयानें गांधीजींना ध्येयमूर्ति मानतात." बापूजींनीं हें विधान टीकेच्या सुरांत केलें होतें ! पण गांधीजींची शिकवणूक आणि मार्क्सवाद यांत इतर कितीहि भिन्नता असली तरी एक साम्य नाहीं का ? हे दोन्ही पंथ सुखासीनतेचे व

निष्क्रियतेचे विरोधक आहेत. दोन्ही पंथांत कार्याला प्रेरणा आहे. हें जग असेंच राहण्यांत मानवतेचें हित आहे असें गांधीजींना वाटलें नाहीं. मार्क्सहि म्हणतो, 'आजवर जग कसें आहे हें तत्त्वज्ञांनीं सांगितलें, आतां तें कसें असावें त्यासाठीं आपण झटूं या.' आपल्या समाजाची उत्क्रांति अशा अवस्थेपर्यंत व्हावी, कीं जीमध्यें राज्ययंत्राची माणसांना गरजच राहणार नाहीं असें मार्क्सनें सांगितलें. आणि गांधीजींचा आदर्श तरी दुसरा कोणता होता! सरकारच्या सक्तीनें कायदा व कर्तव्य न पाळतां तीं आपखुषीनें सर्वांनीं पाळून सरकार या संस्थेचें अस्तित्वच अनवश्यक ठरवावें असें गांधीजी म्हणत नसत काय! म्हणून बाबूजींनीं पंडितजींविषयीं वरील विधान थोडेसें उपहासानें केलेलें असलें, तरी त्यांतल्या वर्णनांत पंडितजींना कमीपणा आणणारें असें मला कांहींच दिसत नाहीं. पंडितजींनीं गांधीजींचें वैशिष्ट्य सांगतांना असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, त्यांचीं मतें कित्येकांना सर्वस्वीं पटत नव्हतीं तरीहि केवळ त्यांच्या शिकवणुकींत कार्यप्रवृत्त करण्यासारखें होतें, म्हणूनच अगणित लोक त्यांच्याभोंवतीं जमले. मार्क्सवादासंबंधीं जवाहरलालांनीं असेंच म्हटलें आहे. गांधी आणि मार्क्स या दोन ध्रुवांभोंवतीं अशाच साम्यामुळें पंडितजींचा जीवनगोल फिरत राहिला आहे.

मानसिक वादळांवरहि कृति हा एकच रामबाण उपाय पंडितजींना वाटतो. पंडितजींना हॅम्लेटची उपमा दिली जाते हें प्रसिद्धच आहे. ती कोणत्या हेतूनें दिली जाते व तींत कितपत तथ्य आहे हा विचार बाजूला ठेवूं; पण सांधेमोड झालेल्या जगाकडे पाहून हॅम्लेटप्रमाणेंच ते त्रस्त होतात हें मात्र खरें.

> "दुष्ट वृत्तीचाच सर्वत्र विजय होत होता. अधिक वाईट घटना म्हणजे चांगली व सत्त्वशील गोष्ट विकृतपणें जगापुढें मांडली जात होती. मनुष्यजात खरोखर स्वभावतः इतकी का वाईट आहे, कीं तिला शिकवून सुधारण्यासाठीं हजारों वर्षें लागावीं! भोगलालसा, हिंसा, दुष्टपणा इ० दुर्गुणांनीं भरलेल्या मनुष्यप्राण्याचें रूपांतर व्हायला शतकानुशतकांची गरज आहे काय!"

असे भंडावून सोडणारे प्रश्न त्यांनीं स्वतःला पुष्कळदां विचारले आहेत. सार्वजनिक अथवा वैयक्तिक जीवनांत उठलेल्या वादळांनीं इतकीं पटलें कित्येक वेळां त्यांच्या डोळ्यांपुढें येतात, कीं ते हतबुद्ध होऊन जातात. 'अशा वेळीं

कुठल्या तरी मोठ्या कार्यास मी प्रारंभ करतों आणि मग डोळ्यांपुढलीं सर्व वादळें नाहींशीं होतात' असे त्यांनीं उद्गार काढले आहेत. मात्र, कर्मप्रवृत्तीनें त्यांना रूक्ष व यांत्रिक बनविलेलें नाहीं ही आनंदाची गोष्ट आहे. कर्माची भगभग सोडून '**सुखालागिं आरण्य सेवीत जावें**' अशीहि काव्यमय वृत्ति त्यांच्या मनाला क्वचित् वेढून टाकते.

जवाहरलाल नास्तिक आहेत कीं आस्तिक, हें कुतूहल कुणालाहि असेल. रूढ अर्थानें ते 'नास्तिक' च आहेत. हें जग उत्पन्न करणारा कुणी परमेश्वर म्हणून आहे का? छे! पंडितजींना ही कल्पनाच विचित्र वाटते. मेल्यानंतरहि स्वर्गलोक असतो का? असेल किंवा नसेलहि! या जगांतलें ऐहिक जीवनच इतकें भरगच्च आहे, कीं मृत्यूनंतरचा विचार करण्याची फुरसत आहे कुणाला? पंडितजींच्या या विचारावरून कांहींसा या तऱ्हेचा बुद्धाचा एक उपदेश सहज आठवला. भगवान् बुद्धाला त्याचे शिष्य परलोक, ईश्वर इ० कल्पनांवर नाना प्रश्न विचारून भंडावून सोडीत. तो त्यांना सांगे, "या दुःखमय जगांत आपलें दुःख नाहींसें करणें हें आपलें पहिलें व अवश्य कर्तव्य आहे. तें करायचें सोडून अगम्य गोष्टींच्या चिंतनांत व तर्कवितर्कांत कां आपली शक्ति वायां घालवितां? अंगांत विषारी तीर घुसला आहे. तो काढून टाकला नाहीं तर शरीर विषमय होऊन प्राणांवर बेतणार! अशा वेळीं हा बाण कुठून आला? तो कशाचा बनविला आहे? त्याचा मालक कोण? असल्या वायफळ तर्कटांत सांपडून तुम्ही अवश्य तें कर्तव्य टाळणार काय?" बुद्धाच्या या निवेदनांत आणि पंडितजींच्या विचारसरणींत किती तरी साम्य आहे! स्वर्ग या गोष्टीवरच पंडितजींचा विश्वास नसल्यानें स्वर्गासाठीं कांहीं तरतूद करून ठेवण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं; आणि मेल्यानंतर स्वर्गसुख मिळण्याच्या आशेनें या जन्मीं सत्कृत्यें करीत राहायचें म्हणजे मिठाईच्या आशेनें चांगलें वागणाऱ्या मुलांचेंच तें पोरकट अनुकरण नाहीं का? धर्माला असलें देवघेवीचें स्वरूप द्यायचें असेल तर धर्माचें मोठेपण तें काय? असें जवाहरलालना वाटतें. पण ईश्वर, स्वर्ग इ० कल्पना न मानणाऱ्या जवाहरलालना वेदान्तांतला अद्वैत सिद्धान्त मात्र मोहित करतो; आणि त्या सिद्धान्तांतलें रहस्य बुद्धिग्राह्य नाहीं असें पटलें तरी त्या सिद्धान्ताची महति त्यांना वाटते.

नेहरू नास्तिक असले किंवा रूढ धर्मावर त्यांचा विश्वास नसला तरी मानवी

जीवनाला नीतीचा भक्कम आधार पाहिजे ही मात्र त्यांची बळकट श्रद्धा आहे. पण यालाहि आपण तर्काचें स्पष्टीकरण देऊं शकणार नाहीं असेंच त्यांचें म्हणणें. मनुष्यप्राणि हा मूलतः नीतिमान् आहे. सुप्रसिद्ध युरोपीय तत्त्वज्ञ कांट यांच्या मतें " वर अनंत आकाश आणि अंतःकरणांत गाढ नैतिक निष्ठा " ही माणसाला सामर्थ्य व सौंदर्य देणारी जोडी आहे. नेहरूंना कांटची ही विचारसरणी मान्य असावी असें वाटतें. आपल्या नैतिक दृष्टिकोणाला तर्कवादाचा आधार द्याय-चीच गरज आहे काय ? मुळींच नाहीं. उषःकालानें होणारा आनंद अंतःस्फूर्तीनें होतो. त्याची चिकित्सा का कोणी करीत बसतें ? नेहरू विज्ञानवादी असले तरी अखेर बुद्धीनें सर्व गोष्टींचा उलगडा होणें अशक्य आहे असा भ्रम त्यांना नाहीं. नैसर्गिक सद्गुण ( Natural virtue ) म्हणून एक सत्य पण गूढ गोष्ट ते प्रमाण मानतात.

ता 'ओ नांवाचा एक चिनी धर्मग्रंथ आहे. या पंथाच्या विचारसरणीशीं आपलीं मतें विशेष जुळतात असें नेहरूंनीं म्हटलें आहे. हा पंथ नीतीवर विशेष भर देणारा आहे. अर्थात् सर्वच धर्मांचें तें सूत्र असतें. पण ता 'ओ मध्यें कर्मकांड, गूढवाद, परलोक, मायावाद ही अडगळ फारशी नाहीं म्हणूनच कदाचित् पंडितजींना तो आवडला असावा. या पंथाचें बौद्धमताशीं साम्य आहे. ता 'ओ चा नीतिप्रधान दृष्टिकोण पंडितजींनीं अंतःकरणानें पत्करला आहे.

आणि गांधीजींविषयीं त्यांना वाटणारी अपरंपार भक्ति यांतूनच निघालेली आहे. वैयक्तिक जीवनांतच नव्हे तर सामुदायिक कार्यांतहि सत्याची उपासना झाली पाहिजे, साध्याप्रमाणें साधनेंहि शुद्ध पाहिजेत या गांधीतत्त्वावर त्यांचा अढळ विश्वास आहे. आणि असंख्य वेळां हा विश्वास बोलून दाखविण्यांत त्यांनीं कसूर केलेली नाहीं. जीवनाला तुम्ही कोणत्या पद्धतीनें स्पर्श करतां ही गोष्ट नेहरूंना सर्वांत महत्त्वाची वाटते. श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या ११४ व्या जयंतीच्या समारंभांत बोलतांना ( २० मार्च १९४९ ) पंडितजींनीं याविषयीं फार मननीय विचार प्रदर्शित केले आहेत :

" श्रीरामकृष्ण हे धर्मज्ञ व संत होते. राजकारणावर ते कांहींच बोलले नाहींत तरी त्यांची जीवनदृष्टि ही अत्यंत मोलाची गोष्ट होती. मी राज-

कारणी आहे आणि इतर विषयांत फारसा बोलत नाहीं हें खरें असलें तरी मला जरूर असें वाटतें कीं, आपल्या राजकारणांत व एकंदर जीवनांत ती आध्यात्मिक शक्ति व ती नैतिक उंची नसेल तर त्याचा दर्जा पार खालीं जाईल."

नेहरूंचा हा दृष्टिकोण धार्मिक नसला तरी धार्मिकांना सुसंवादी आहे.. रूढ अर्थानें नव्हे तर खऱ्या अर्थानें ते धार्मिक आहेत. धर्मालाहि ज्या 'अधार्मिका' विषयीं आपलेपणा वाटून त्याला धर्म दृढालिंगन देईल असे धर्मपुरुष ते आहेत.

30924

: १ :

# खाजगी दालनांत

आकाश म्हणतांच नीलिमा आणि समुद्र म्हणतांच जलविस्तार डोळ्यांपुढें येतो. तसें जवाहरलालांचें नांव घेतांच त्यांचें रमणीय व्यक्तित्व आपणांला प्रथम व प्रभावीपणें आठवतें. जगांतल्या पहिल्या दर्जाच्या राजकारणी नेत्यांत एवढा देखणा पुरुष नाहीं असें जगभर संचार केलेल्या विख्यात प्रवाशांचें व पत्रपंडितांचें मत आहे. पंडितजींना पाहतांच 'ओ हो!' असा उद्‌गार सहजच तोंडांतुन बाहेर पडतो. भोंवतालचें वातावरण भारावून जातें. चैतन्याचा एक प्रवाह चहूं-बाजूंनीं वाहूं लागला आहे असें वाटूं लागतें. हा अनुभव लाखों लोकांना आला असेल. पंडितजींची उंची व बांधा अत्यंत प्रमाणबद्ध आहे. चेहरा रेखीव असला तरी त्याचें लावण्य ठरीव ठशाचें नाहीं. भव्य कपाळ, हिरकण्यांसारखे दांत, तेजस्वी नेत्र आणि कापसासारखा गोरा वर्ण हे त्यांच्या चेहऱ्याचे सौंदर्यविशेष एकदम डोळ्यांत भरतात. फोटोपेक्षां प्रत्यक्ष ते अधिक सुंदर दिसतात. त्यांच्या अवयवांतलें सौंदर्य शरिराच्या हालचालींत शतगुणित होतें. दरबारांत आणि प्रासादांत उच्च वर्गाच्या मेळाव्यांत दिमाखानें शोभणारें त्यांचें व्यक्तित्व प्रचंड जनसमुदायापुढें विशेषच खुलतें. या 'जातीच्या सुंदराला' कुठलाहि पोशाख शोभूनच दिसतो. त्यांच्या नांवानें प्रसिद्ध असलेला नेहरू शर्ट असो, काळी, पांढरी अथवा पिवळी शेरवानी असो, किंवा पाश्चात्य पोशाख असो, कुठल्याहि कोंदणांत मूळ चित्राची खुलावट व्हायचीच.

" **अंगाचेंनि सुंदरपणें। आंगाचि लेणिया होय लेणें। तेथ अलंकारिलें कवणा कवणें। हें निर्वचेना ॥** " हाच संभ्रम नेहरूंच्या बाबतींत आपणांला पडतो.

आज त्यांच्या वयाला साठ वर्षें पुरीं होऊन गेलीं आहेत. पण केंसांचा शुभ्रपणा सोडला तर जरेचें कुठलेंच चिन्ह त्यांच्या देहावर दिसत नाहीं. त्यांची कांति फुलासारखी टवटवीत आहे. चालण्यांत उत्साह व तडफ आहे. देहयष्टि जरासुद्धां वांकलेली नाहीं. अमेरिकन भूमीवर उतरतांच प्रे. ट्रुमन यांचेबरोबर स्वागत स्वीकारीत ते मोटरपर्यंत गेले, तेव्हां त्यांच्या चालण्यांतला तो डौल व तें चापल्य पाहून अमेरिकन प्रेक्षक चकित होऊन गेले! हा हिंदनेता साठीच्या घराला आला आहे यावर कोणाचा विश्वासच बसेना! विमान थांबलें कीं झटकन् त्यांतून हंसत हंसत उडी मारतील, सभा चालू असतां व्यासपीठावर लोडावरच झटकन् बसतील, इकडून तिकडे वेगानें जातील, गर्दींत उडी घेऊन स्वयंसेवकांना साह्य करतील, ध्वनिक्षेपक बिघडले तर धांवत जाऊन ते यंत्रविशारदाला यंत्रदुरुस्तींत मदत करतील, असें भर ज्वानीचें चापल्य व उत्साह त्यांच्यांत आहे. त्यामुळें नेहरू म्हणजेच यौवन हें समीकरण अद्यापि आपण सोडूं शकत नाहीं.

मात्र एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, पंडितजींचें सौंदर्य व चापल्य शरिराचें जेवढें त्याहूनहि मनाचें जास्त आहे. नेहरूंना लावण्य व आरोग्य यांची देणगी निसर्गतः मिळाली असली तरी त्यांनीं ती प्रयत्नपूर्वक जतन केली व वाढविली हें विसरतां कामा नये. मनुष्याच्या शरिराची वाढ ज्या काळांत होते त्या कौमारकालांत इंग्लंडसारख्या थंड हवेच्या देशांत नेहरू राहिले आणि त्यांच्या संगोपनाची व शिक्षणाची दक्षता फार कसोशीनें घेतली गेली. त्यामुळें पाया बळकट घातला गेला. तारुण्यांत ते नानातऱ्हेचे खेळ खेळत. घोड्यावर बसण्यांत ते पटाईत झाले. बर्फावर घसरत जाण्याची कला त्यांनीं साध्य करून घेतली. पोहण्यांत त्यांनीं उत्तम प्रगति केली. अशा रीतीनें सुदृढ झालेलें शरीरयंत्र त्यांनीं आजवर शिस्त व संयम यांच्या जोरावर अजून कार्यक्षम ठेवलें आहे, सुखवस्तु-पणानें तें गंजूं दिलें नाहीं. सध्यांच्या कार्यव्यग्र जीवनांतूनहि वेळांत वेळ काढून ते व्यायामाची व क्रीडेची हौस पुरवून घेतात. ब्रिटिश राष्ट्रकुलांतील पंतप्रधानांच्या बैठकीसाठीं ते जायला निघाले तेव्हां प्रहरभर टाटांच्या बंगल्यांत जुहूला मुक्काम होता. पण तेवढ्यांत समुद्रांत यथेच्छ पोहून त्यांनीं जलविहाराचा लाभ घेतला. रेडिओवरून शिशुवर्गाशीं बोलतांना त्यांनीं म्हटलें होतें, "तुम्हांला पोहणें येत नसेल तर जीवनांतल्या मोठ्या आनंदाला तुम्ही पारखे होतां." अहमदनगरच्या

किल्ल्यांत स्थानबद्ध असतांना ठरीव फुटांची जागा आंखून त्या प्रमाणांत ते मैल दोन मैल पळण्याचा व्यायाम करीत. योगासनें व प्राणायाम यांवर त्यांचा फार विश्वास आहे. पंडितजी नियमानें शीर्षासन करतात. आयुष्यांत आलेल्या अनेक खडतर प्रसंगांना तोंड देण्याची सहनशक्ति शीर्षासनामुळें आपणांला आली असें त्यांनीं म्हटलें आहे.

खाण्यापिण्याच्यासंबंधीं पंडितजी फार नेमस्त आहेत. जिव्हेवर त्यांची फार हुकमत आहे आणि हेंच त्यांच्या निकोपपणाचें रहस्य म्हणतां येईल. जेवणांत कसलीहि खोड नाहीं. अमुक पदार्थ विशेष आवडीचा असें सांगतां येणार नाहीं. पाटण्याला नुकत्याच झालेल्या एका समारंभांत वृद्ध लेडी वजीर हसन त्यांना शोधीत आल्या आणि म्हणाल्या, "कुठं होतास तूं जवाहर ? तुला सारखी शोधीत होतें मी !" तेव्हां पंडितजी हंसून त्या मातृतुल्य स्त्रीला म्हणाले, "अहो, तुम्हांला माहीत नाहीं का जिथें खाण्याचा कार्यक्रम असेल तिथें मी असायचा." डॉ. राधाकृष्णन् मॉस्कोला हिंदचे वकील म्हणून जायला निघाले, तेव्हां आंध्र मंडळींनीं त्यांना पानसुपारी केली. या समारंभाचे शेवटीं आमचे पंतप्रधान एकदम तेथें हजर झाले आणि हंसत हंसत म्हणाले, "कांहीं चहापाणी आहे का नाहीं ? त्या आशेनें तर मी आलों." पण हे सारे उद्गार खेळकरपणाचे म्हणूनच घ्यायचे. तसा खाण्यापिण्याचा हव्यास त्यांना मुळींच नाहीं. काश्मिरी ब्राह्मणांत मांसाशन रूढ आहे. त्यांतून नेहरू घराण्याची राहणी पुष्कळशी पाश्चात्य वळणाची होती. त्यामुळें प्रथमपासूनच ते मांसाहारी होते, पण पुढें गांधीयुगांत त्यांचें हें वळण पुष्कळच बदललें. धूम्रपानाचे ते शौकीन आहेत; पण किंचित्‌हि अतिरेक व्हायचा नाहीं.

त्यामुळें आपल्या शरीरयंत्रावर त्यांनीं उत्तम प्रभुत्व मिळविलें आहे. डोकेंदुखी आणि निद्रानाश या आधुनिक रोगांचा त्यांना स्पर्शहि झालेला नाहीं. पं. नेहरू यांच्या आजारीपणामुळें त्यांचे कार्यक्रम रद्द करण्यांत आले, असें वृत्त आपण वाचल्याचें स्मरणशक्तीस ताण देऊनहि आठवणार नाहीं. ते सहसा आजारी पडत नाहींत. आजारी पडल्यानें त्यांना अभिमान दुखवल्यासारखें वाटतें. झोंपेच्या बाबतींत ते फार भाग्यशाली आहेत. निद्रा त्यांची स्वामिनी नसून दासी आहे. हांक मारावी त्या वेळीं सेवेला हजर ! गर्दीचा, गडबडीचा कार्यक्रम आटोपून ते आगगाडींत चढले आणि मुक्कामाला पोंचायला दिवस दीड दिवस लागणार असला कीं गाडींत

८-१० तासांची झोंप ते घेऊन टाकतात. कार्यक्रमाच्या रगाड्यांत २-३ दिवस स्वामीजवळ येऊं न शकणारी ही दासी जरा सवड मिळतांच लगबगीनें सेवेसाठीं दाखल होते. अलीकडे नाहीं का ? अमेरिकेंतील राजधानींत झालेल्या अपूर्व स्वागतांत व कार्यक्रमाच्या गर्दींत ३-४ दिवस डोळ्याला डोळा नव्हता लागला त्यांचा; अखेर रूझवेल्टच्या समाधीचें दर्शन घ्यावयाला गेले असतां जातांयेतांच्या १६० मैलांच्या प्रवासांत त्यांनीं झोंपेची भरपाई केली. कामाचे डोंगर उपसण्यांत किंवा चिंतनमननांत पंडितजी शरीरमनाच्या स्वास्थ्याची जराहि पर्वा करीत नाहींत. पण चैन किंवा सुखोपभोग यांत डुंबून शारीरिक व मानसिक शक्तीचा ऱ्हास ते थोडाहि होऊं देणार नाहींत. पंडितजी कर्मठ आहेत असें मुळींच नाहीं; उलट, कर्मठ माणसें पाहिलीं कीं आपण हादरून जातों असें त्यांनीं म्हटलें आहे. पण उथळ भोगवादाचेहि ते द्वेष्टे आहेत. या सर्व कारणांमुळेंच आज मध्यम वय उलटून गेल्यावरहि विकलतेनें त्यांना घेरलें नाहीं. पंडितजी सांगतात :

> " सुदैवानें शरीरस्वाथ्य व आरोग्य यांना मी नेहमींच खूप महत्त्व देत आलों आहें. आणि कित्येकदां मीं माझ्या शरिराची उपेक्षा केली असली तरी त्याला शक्यतोंवर रुग्ण होऊं दिलें नाहीं. मानसिक आरोग्य ही यापेक्षां जरा अगम्य शक्ति आहे. पण तिचीहि मीं पुरेशी काळजी घेतलेली आहे. आणि ज्यांना काँग्रेसचें धकाधकीचें राजकारण व बैठें कारा-जीवन या दोहोंचाहि ताण माझ्याइतका सहन करावा लागला नाहीं, अशाहि कित्येक माणसांपेक्षां शरीरमनाचें बळ मजपाशीं खूप अधिक आहे असें मी अभिमानानें म्हणतों. "

इतक्या ऐश्वर्यात वाढलेल्या या पुरुषाची मर्जी संभाळणें कठीण असणें साहजिकच होय. पूर्वीच्या मानानें आतां पंडितजी पुष्कळच सौम्य झाले आहेत. पण तरी त्यांच्या कांहीं लहरी विलक्षण असतात. सकाळीं उठून मुखप्रसाधन करायचें आणि रात्रीं एक ठरीव पोशाख घालून निजायचें हें त्यांचें व्रत आहे. या व्रताला विमानभ्रमणांतसुद्धां अपवाद करायचा नाहीं असें पंडितजींचें पाहणें असतें. एकदां विलायतच्या प्रवासांत 'रात्रीचा पोशाख' जींत होता ती सूटकेस चुकून दुसऱ्या विमानांत चढविली गेली. रात्र पडतांच पंडितजींनीं आपला रात्रीचा पोशाख देण्यास खाजगी चिटणिसांना फर्माविलें. पण सूटकेसचा तर असा घोटाळा झालेला ! चिटणीस मनांतून घाबरून गेले. पण अखेर त्यांना खरी

गोष्ट सांगितल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. त्यांनीं सूटकेसची हकीकत सांगतांच पंडितजींचा पारा चढला. चिटणिसांना खालीं मान घालून सरबत्तीला तोंड द्यावें लागलें. संरक्षणमंत्री बलदेवसिंग बरोबरच होते. ते सहज म्हणाले, "जाऊं द्या पंडितजी, माझेहि कपडे असेच दुसरीकडे जाऊन पडले आहेत." त्यावर पंडितजी बलदेवसिंगांवर एकदम उसळून म्हणाले, "तुमच कपडे जाऊं द्यात हो! मला नाहीं पर्वा. माझे कपडे मला पाहिजेत." बिचारे सरदारजी दाढीवरून हात फिरवीत मुकाट्यानें बसले! पण इतक्यांत पुढील विमानतळावरच पंडितजींची ती सूटकेस मिळाली आणि सर्व प्रकरण मिटलें!

इंग्लंडचे पंतप्रधान ॲट्ली यांना भेटायला पंडितजी एकदां ३।४ दिवसच विलायतेस गेले होते. कामाची आणि कार्यक्रमांची भयंकर गर्दी होती! पण केंब्रिज येथील विद्यार्थ्यांनीं नजर केलेलीं चार फुलझाडें टवटवीत ठेवण्याविषयीं ते कोण दक्षता घेत! तास दोन तास झाले कीं फुलझाडांना पाणी दिलें कीं नाहीं म्हणून विचारणा व्हायचीच; आणि 'नाहीं' म्हणून चिटणिसाचें उत्तर आलें कीं, चिटणिसाची आलीच कंबक्ति! हार घालणें किंवा फोटो काढणें यांतसुद्धां कुठें जरा दीर्घसूत्रीपणा झाला कीं पंडितजींची मिजास जाते! आपलें भाषण सुरू होण्यापूर्वीं त्याच्या प्रती वांटण्याची त्यांची सक्त मनाई असते. कारण, छापील भाषण हातांत असलें कीं श्रोते नीट लक्ष देत नाहींत आणि पानें उलटण्याची सळसळ होऊन वक्त्याची समाधि भंग पावते असें नेहरू म्हणतात. यांत चूक होऊन कुठें भाषण अगोदर वांटलें गेलें कीं, सभाचालकांचीं शंभर वर्षें भरलींच म्हणून समजा! असे कंगोरे खूप आहेत. पण त्यांच्या घायकुती व रागीट स्वभावाच्या लहरीसुद्धां कौतुकानें पत्करायच्या असाच त्यांच्यावर अलोट प्रेम करणाऱ्या जनतेचा निश्चय दिसतो. या लहरी कधीं फार वेळ टिकत नाहींत. ते जितके जलदीनें रागावतात तितकेच वेगानें शांतहि होतात. हंसतां हंसतां क्षुल्लक कारणावरून त्यांच्या भ्रुकुटि वक्र होतील, पण पुन्हा ओंठ विलग व्हायलाहि वेळ लागणार नाहीं.

पंडितजी मोठे जाणकार कलारसिक आहेत ही गोष्ट प्रसिद्धच आहे. आणि त्यांच्या ग्रंथांत कलेचें रसग्रहण आणि चर्चा अनेकदां आली आहे. जेथें जेथें ते जातील तेथें तेथें कांहीं जुने शिल्प, चित्रसंग्रह, पदार्थसंग्रहालय इ० प्रेक्षणीय असेल तें वेळांत वेळ काढून पाहून येतील. अलीकडील गर्दीच्या जीवनांत

नाट्यमंदिराला भेट देणें त्यांना मुष्किलच होऊन बसलें आहे. सिनेमासुद्धां ते क्वचितच पाहूं शकतात. पण नाट्य, नृत्य, संगीत या कलांचे ते जाणते रसिक आहेत. पाश्चात्य संगीतनाट्य ( ऑपेरा ), नाटक व संगीत यांचे तर त्यांना दर्दीच म्हणतां येईल. उदयशंकर, पृथ्वीराज, मेनका, शुभलक्ष्मी इ. प्रतिभावान् हिंदी कलावंतांचा कलाविलास पाहण्यांत ते अनेकवार तल्लीन होऊन गेले आहेत. उत्कृष्ट संगीत ऐकत असतां आपली एकतानता कुणीं मोडलेली त्यांना मुळींच आवडत नाहीं. एकदां मागें कलकत्ता येथें दिलीपकुमार रॉय यांच्या गायनवादनाचा कार्यक्रम झाला. दिवाणखान्यांत काँग्रेसचे अतिरथी महारथी तो कार्यक्रम ऐकायला बसलेले. राजकारणाची नुकतीच झालेली चर्चा प्रत्येकाच्या इतकी डोक्यांत होती, कीं दिलीपबाबूंचे अभिजात आलाप ऐकण्याचें सोडून जो तो शेजारच्या पुढाऱ्याशीं बोलण्यांत गुंगून गेला होता. पंडितजी त्या वेळीं लहानच होते. त्यांना दिलीपकुमारच्या आलापांनीं वेडें केलें होतें. पण लहानमोठी पुढारी मंडळी गाण्याकडे लक्ष न देतां मोठ्यानें बोलत होती. जवाहरलाल संतापानें उभे राहिले आणि सर्वांना उद्देशून गरजले, “सभ्य गृहस्थहो! तुम्हांला गाणें ऐकायचें नसेल तर नका ऐकूं, पण ज्यांना तें ऐकायचें आहे त्यांच्या-करितां तरी गप्प बसा कीं!” याचा इष्ट तो परिणाम झाला. असो. हार्मोनियम हें वाद्य पंडितजींना मुळींच आवडत नाहीं, ‘माझ्या हातीं सत्ता आली तर हें भसाडें वाद्य कायद्यानें बंद करून टाकीन’ असें एकदां त्यांनीं म्हटलें होतें!

मुलांचें पंडितजींना फार वेड आहे. पंडितजींच्या तापटपणाचा मोठ्यांना उपसर्ग पोंचेल, पण लहान मुलें त्यांत कधींच सांपडणार नाहींत. पंडितजी कितीहि कार्यव्यग्र किंवा त्रस्त असले तरी मुलें जवळ गेल्यास ते कधींच हिडीसफिडीस करणार नाहींत. हातांतलें काम बाजूला ठेवून गृहरत्नांना ते जवळ घेतील, त्यांचे लाड करतील, त्यांच्या प्रश्नांना उत्तरें देतील. मुलाखतीस येणाऱ्या लहानथोर माणसांची वर्दळ सुरू असतां ‘आनंदभवनां’त आपल्या भाच्चांना बाबागाडींत हिंडवतांना त्यांना अगणित लोकांनीं पाहिलें आहे. बोरीबंदरला उतरले कीं बाहेर प्रांतिक नेते, नागरिक व हजारों लोक स्वागतासाठीं आतुर होऊन उभे असतात. पण पंडितजी गाडींतून उतरले कीं त्यांचे दोघे छोटे भाचे ( हाथीसिंग ) आपल्या जगविख्यात मामांचा ताबा अगोदर घेतात आणि पंडितजी तो आनंदानें घेऊं देतात. आपला नातू राजीव याच्या वाढदिवसाच्या

दिवशीं त्यांनीं सुमारें चारशें लहान मुलांना बोलाविलें होतें आणि या छोट्या पाहुण्यांच्या बरोबर लपंडाव व शिवाशिवी खेळण्यांत पंडितजींनीं दिवस घालविला. दिल्ली येथील एका शिशुविहाराच्या चालकांना त्यांनीं कळवून ठेवलें आहे कीं, 'सवड होईल तेव्हां तुमच्या शाळेंत मी येत जाईन, आणि मुलांच्या संगतींत कांहीं काळ घालवीन.' अहमदनगर येथें स्थानबद्ध असतां तेथील अधिकाऱ्याच्या दोन मुलांशीं पंडितजींनीं दोस्ती केली होती. त्या मुलांनीं लौकर जाऊं नये म्हणून त्यांना नाना गोष्टी सांगून व खाऊ देऊन, त्यांच्याशीं खेळून पंडितजी त्यांना रमवीत. मुलांना वश करण्याची त्यांना उत्तम हातोटी साधली आहे. केवळ पालक म्हणून नव्हे तर सवंगडी म्हणून मुलें त्यांच्याशीं रममाण होतात. पंडितजींना मुलें आवडतात, ही त्यांची कीर्ति आतां सातासमुद्रांपलीकडे पोंचलेली दिसते. कारण नुकतीच कांहीं जपानी मुलांनीं त्यांच्याकडे हत्तीची मागणी केली ! जपानी मुलांनीं शेजारचे शिवकर्ण किंवा लांबचे ट्रुमन यांच्यापाशीं बालहट्ट धरला नाहीं. नेहरूंनाच हत्ती मागितला हें पाहण्यासारखें आहे. आणि नेहरूंनीं आपल्या जपानी शिशुमित्रांचा हट्ट तात्काळ पुरविलाहि. म्हैसूरच्या जंगलांतून पैदा केलेली दहा वर्षांची हस्तिनी 'इंदिरा' आज टोकिओच्या प्राणिसंग्रहालयांत नेहरूंच्या शिशुप्रियतेची द्वाही डौलानें फिरवीत आहे. बालकांच्या मधुर सृष्टींत पंडितजींचें मन सारा व्यापसंताप विसरतें आणि आपल्या मूळच्या साध्या व खेळकर प्रवृत्तीचें प्रतिबिंब पाहून हर्षभरित होतें.

वाचन हें नेहरूंचें सर्वांत मोठें व्यसन म्हणतां येईल. प्रत्यक्ष राजकीय रणधुमाळींत काळ घालवून इतकें जबर वाचन-लेखन करणारा मुत्सद्दी आज जगांत दुसरा कोणी नसेल. 'विद्वान् मुत्सद्दी' (Scholar politician) असें त्यांचें एका अमेरिकन नेत्यानें नुकतेंच वर्णन केलें तें अगदीं सार्थ आहे. ते जेलमध्यें असतांना पुस्तकांचीच आवकजावक मुख्यतः होत असे. एकदां हिमालयांत ते चार दिवस विश्रांतीकरितां गेले असतां सहज चाळायला म्हणून पुढील पुस्तकें नेलीं होतीं. 'एण्डस् अॅन्ड मीन्स्' (हक्स्ले), 'विच् वे टु पीस' (रसेल), 'दी क्वेस्ट फॉर इटर्निटी' (जॉन ड्युई), 'लाइफ् ऑफ् लॉर्ड मेटकाफ्' (थॉमसन्, ), 'दी टंग्ज् ऑफ मेन्' (जे. आर. पर्थ) आणि 'फिलॉसफी ऑफ् ए मॉडर्न मॅन्' (लेव्ही).

वाचनानें आपल्या ज्ञानाचा कुणगा दररोज संपन्न करण्यांत ते तत्पर

असतात. आपण ज्ञानभांडार वाढवावें आणि तें जगाला द्यावें ही त्यांची जीवनांतील एकमेव प्रबल इच्छा दिसते. आपल्या धाकट्या भगिनी कृष्णा हार्थीसिंग यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त पाठविलेल्या एका पत्रांत पंडितजी म्हणतात :

"चांगलीं पुस्तकें निवडून घे. कोणतीं घेशील? कांहीं प्राचीन कालच्या ज्ञानभांडाराचीं घे. कांहीं मध्ययुगीन श्रद्धेचीं घे. कांहीं अर्वाचीन संशयवादावरचीं घे. भविष्यकालीन नवयुगाचींहि घे बरं का कांहीं! उशीरां का होईना, आपल्या लाडक्या भावाची ही भेट स्वीकार. तुझा भाऊ विसरभोळा आहे, परंतु आपल्या लहान बहिणीची त्याला नेहमीं आठवण येते. तीं पुस्तकें वाच आणि त्यांतून यक्षनगरी निर्माण कर. त्या यक्षनगरींत नाना स्वप्नें असतील; अनेक उद्यानें असतील; फुलें, निर्झर, सुख आणि सौंदर्य यांची त्यांत रेलचेल असेल. पृथ्वीवरील पार्थिव दुःखांना आणि शापांना तुझ्या यक्षनगरींत मुळींच स्थान देऊं नकोस! या नगरीसाठीं अविरत उद्योग नी साहस करावें लागेल. जीवन म्हणजे मग भोंवतालची सारी कुरूपता, क्षुद्रता, दुःख आणि दैन्य नाहींसें करण्यासाठीं चाललेली महान् साधना वाटेल."

यांतलें सौहार्द व काव्य कोणाला मोहित करणार नाहीं? प्रियजनांना असें मार्गदर्शन करणें पंडितजींना फार आवडतें.

लेखनाची पंडितजींची हौस विख्यातच आहे. काँग्रेसच्या ठरावांतसुद्धां शब्दांची सफाई, अचूकपणा व अर्थगौरव असावा यासाठीं ते दक्ष असतात. काँग्रेस कार्यकारिणीचे गृहस्थ चांगले विद्वान् लोक असतात. पण त्यांच्यापैकीं धुरंधर माणसांनीं केलेले मसुदेहि पंडितजींच्या चोखंदळ दृष्टीला पुष्कळदां अप्रसन्न वाटतात. अशा वेळीं सर्व मसुदे एकत्र करून ते बरोबर घेऊन जातात आणि स्वतःचा उत्कृष्ट मसुदा तयार करून पुढें ठेवतात. नॅशनल प्लॅनिंग कमिटीच्या सभासदांना अध्यक्ष या नात्यानें पंडितजींनीं पाठविलेलीं परिपत्रकेंहि भाषेचे सुंदर नमुने म्हणून दाखवितां येतील. पंडितजींनीं आजवर रमणीय ग्रंथांची रचना केली ती बरीचशी तुरुंगांतच केली. आतां स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तुरुंगवासाचा संभव नाहीं आणि बाहेरील कामाच्या रगाड्यांत तर क्षणाची फुरसत नाहीं त्यांना! मग आतां त्यांचा वाग्विलास जगाला कसा मिळणार!

मिस् जेनी स्मिथ या अमेरिकन युवतीनें न्यूयॉर्कला त्यांना थोड्या निराशाजनक सुरांतच म्हटलें, "आपण आतां तुरुंगांत जाणार नाहीं म्हणजे आपले नवे ग्रंथ आम्हांला वाचायला कांहीं मिळणार नाहींत!" जगांतल्या सर्वच साहित्यप्रेमी लोकांची रुखरुख या युवतीच्या वरील शब्दांत प्रकट झाली नाहीं का? पण ग्रंथलेखनास फुरसत मिळावी म्हणून पंडितजींना पुन: कारावास घडावा अशी अभद्र कल्पना कोण करील! कारागृहाची वारी करावी न लागतां पंडितजींना लेखनासाठीं भरपूर फुरसत मिळेल असा कांहीं चमत्कार घडेल तर बरें!

पंडितजींचें भाषण लक्षावधि लोक पंचप्राण श्रवणांत आणून ऐकतात. त्यांच्या सभांचें मोजमाप आतां लाखांच्या आंकड्यांनींच करावें लागतें. पण तरी उत्तम वक्तृत्वाचीं सर्वसामान्य लक्षणें त्यांच्या भाषणांत आढळतील असें नाहीं. सुरेंद्रनाथ, गोखले, राधाकृष्णन्, जयकर इ० वक्तृत्वकलासंपन्न राजकीय व सांस्कृतिक नेत्यांसारखें नेहरूंचें भाषण कलाकुसरीचें कधींच नसतें. भाषेचा ओघ कित्येकदां खंडित होतो. भावनेचा आवेग किंवा विचारांची गर्दी यांमुळें "लेकिन्–लेकिन्...मैं–मैं-समजता–" असें मध्येंच अडखळल्यासारखें होतें. मुद्यांचे दुवे नीट जोडले असतीलच असें नाहीं. अगोदरच्या भागांत जें सांगेन म्हणूनच पंडितजी जाहीर करतात तें सांगायचें कित्येकदां राहूनच जातें! तरीहि आपल्या शब्दांच्या ओघांत लक्षावधि अंत:–करणांना वाहून नेण्याची जादू नेहरूंच्या वाणींत आहे. त्यांचें विभूतिमत्त्व आणि विशेष म्हणजे त्यांच्या वाणींत ओतप्रोत भरलेली कळकळ ह्यांची जनमनाला खरी ओढ वाटते. आपल्या अंत:करणाचीं महाद्वारें सताड उघडून हा आपला नेता आपणांस प्रेमानें आंत बोलावीत आहे असें श्रोत्यांना वाटतें. विश्वास व हुरूप वाटून या आनंदोत्सवांत सारे समरस होऊन जातात. हें झालें मैदानी वक्तृत्वाविषयीं. सभागृहांतील भाषणांत नेहरू अधिक दक्षतेची व रेखीव भाषा वापरतात. पण ते मैदानांत किंवा मंदिरांत कुठेंहि बोलत असले तरी त्यांच्या शब्दांत स्फटिकासारखी प्रांजलता ही असायचीच.

पंडितजींचा कामाचा उरक पाहून माणूस थक्क होऊन जातो. अलाहाबाद् येथें म्युनिसिपालिटीचे चेअरमन असतांना त्यांच्या चोख कामामुळें गोरे कमि-शनरसुद्धां खूष होऊन जात. कॉंग्रेसची सरचिटणिशी त्यांनीं अनेक वर्षें केली, पण कामें तुंबून पडलीं आहेत, पत्रांचीं उत्तरेंच दिलेलीं नाहींत, हिशेब अर्धवट

आहेत, असें कधीं झालें नाहीं. निवडणुकीच्या वेळीं पंडितजी प्रांतोप्रांतीं प्रचारासाठीं हिंडत. अनेक ठिकाणीं त्यांना थैल्या मिळायच्या. काँग्रेसची प्रथा अशी कीं, प्रांतांत मिळालेल्या पैशापैकीं निम्मा पैसा त्या प्रांताच्या निधींत जमा व्हायचा व निम्मा अ. भा. काँ. कमिटीला मिळायचा. त्या त्या प्रांतांतला दौरा संपला कीं, शेवटच्या मुक्कामीं पंडितजी हा हिशेब पुरा करून टाकीत. दौऱ्याचा शीण कितीहि आलेला असो, रात्र-अपरात्र झालेली असो, प्रांतांत मिळालेल्या पैशांची योग्य व्यवस्था करूनच पंडितजी पुढें निघायचे. स्वकर्तव्याची इतकी तीव्र जाणीव आणि जनतेनें विश्वासपूर्वक हवालीं केलेल्या निधीविषयींची इतकी आस्था कितीसे नेते बाळगीत असतील ?

एका दिवसांत त्यांना कामाचा केवढा आटोप आहे, यासंबंधीं एका दिवसाची दिनचर्या पाहिल्यास कल्पना येईल. यंदा ७ ऑक्टोबरला ते प्रे. ट्रुमन यांच्या निमंत्रणावरून अमेरिकेला भेट द्यायला निघणार होते. त्याच्या आदलें दिवशीं पुण्यास लष्करी विद्यामंदिराचा पायाभरणीचा समारंभ त्यांच्या हस्तें व्हायचा होता. सहा तारखेस भल्या पहाटे ते उठले. प्रातर्विधि आटोपून कामांची निरवानिरव करतां करतां प्रयाणाची वेळ आली. आठ वाजतां दिल्लीच्या पालम विमानतळावरून ते पुण्याकडे येण्यासाठीं विमानांत बसले. बरोबर साडे अकराच्या ठोक्याला पुण्याजवळ लोहगांव विमानतळावर हंसतमुखानें ते खालीं उतरले. यानंतर लष्करी हायस्कूलला भेट, भोजन, अधिकाऱ्यांच्या भेटीगांठीं होईपर्यंत २॥ वाजले. लष्करी विद्यामंदिराच्या पायाभरणीच्या समारंभाची वेळ होत आलीच होती. वाटेनें हजारों दर्शनोत्सुक लोकांचें स्वागत स्वीकारीत खडकवासला येथें ३। ला ते पोंचले. येथील सर्व समारंभ सहापर्यंत आटोपला. पुनः परत पुणें विद्यापीठाला भेट देण्यासाठीं ते आले. इतकें होत आहे तोंवर १॥–२ लाख लोक फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मागील पटांगणांत पंडितजींना पाहण्यास व त्यांची रसवंती ऐकण्यास उत्सुक होऊन बसले होते. तेथें अर्धा पाऊण तास भाषण झाल्यानंतर सैनिकांच्या मेळाव्यांत भोजन करण्यास ते गेले. रात्रीं १०॥ वाजतां पुनः कायदेमंडळाच्या सभासदांपुढें भाषण होतेंच. अंथरुणावर अंग टाकायला मध्यरात्र होऊन गेली. आणि एवढ्या प्रवासांत कार्यक्रमांत आणि भाषणांत उत्साह कायम दिसे. म्लानता मुळींच नव्हती. तरी दुसरे दिवशीं जगांतल्या सर्वश्रेष्ठ देशाला जायचें मनावर दडपण होतें. हें ध्यानांत घेतलें म्हणजे या साऱ्या

आवश्यक्तीबद्दलचें आश्चर्य तर अधिकच वाढतें! केवढा उत्साह हा! केवढी कार्यशक्ति ही!

आणि ही कांहीं एका दिवसापुरती गोष्ट नाहीं. दर दिवशीं अशाच तऱ्हेचा कामाचा रेटा असतो. राजधानींत असले कीं पंडितजी सकाळीं उठून दाढी, स्नान व छोटी हजेरी आटोपून कचेरींत जातात ते परत घरीं यायला चांगला दीड वाजतो. भोजनोत्तर विश्रांतीची त्यांना गरज नसते, आणि ती मिळणें शक्यहि नसतें. पुनः सायंकाळपर्यंत काम चालतें. यांत लोकसभा व घटना-समिति यांच्या बैठकी आणि काँग्रेस नेते, सरकारी अधिकारी, परराष्ट्रीय वकील यांच्या मुलाखती हें काम चालू असतेंच. पुनः रेडिओवरून भाषण आहे, एखादी सार्वजनिक सभा आहे, कसलें उद्घाटन तर कसली चर्चा ह्या आतां नित्याच्याच गोष्टी झालेल्या आहेत. हत्तीएवढ्या या देशांतल्या कानाकोंपऱ्यांतून दर प्रहराला वार्ता येत असतात, मार्गदर्शनासाठीं विनंती केली जाते; धोरणें ठरविण्याचे आदेश प्रांतिक सरकारांना पाठवावे लागतात, आणि पुनः एक कान परदेशाकडे लावून बसावें लागतें. कागदपत्रांचे ढीग बाजूला करून झोंपायला पंडितजींना मध्यरात्र होते. २–२॥ वाजेपर्यंत कित्येकदां पंतप्रधानांच्या दिवाण-खान्यांतले विद्युद्दीप जळत असतात. पंडितजींच्या कार्यव्यग्रतेविषयीं कल्पना येण्यास पुढील एकच गोष्ट पुरेशी आहे. एकदां एक बडा पाहुणा त्यांच्या चिटणिसाकडे येऊन मोठ्या अजीजीनें विनवूं लागला कीं, "मी आज ५।७ दिवस राजधानींत येऊन राहिलों आहें. मला कृपा करून पांच मिनिटें पंतप्रधानांची भेट करून द्या. मला आतां मुक्काम वाढवितां येणें अशक्य आहे." यावर चिटणीस म्हणाले, "हें पाहा, मी माझ्याकडून पराकाष्ठा करतों. पण तुम्ही कुठें उतरलां आहांत तें सांगा. तुमचा नंबर लागला कीं तुमच्या ठिकाणीं तुम्हांला कळवीन." यावर त्या बड्या पाहुण्यानें उत्तर दिलें, "अहो! काय सांगूं आतां? पंडितजींच्या निवासस्थानीं त्यांच्याच निमंत्रणावरून मी उतरलों आहें." घरांतल्या घरांतसुद्धां माणसांना भेटणें, पंडितजींना असें कित्येकदां मुष्किल होऊन जातें! लोक-कल्याणासाठीं जागृतीचा प्रत्येक क्षण वेंचणारा महापुरुष लोकांच्या गळ्यांतील कंठमणि झाल्यास नवल तें काय?

❂ ❂ ❂

: १० :

# अंतरंग

'सर्व जग प्रेमिकांवर प्रेम करतें' असें म्हणतात याचें कारण काय? प्रेमिकामध्यें मृत्यूला कवटाळणारी जी जाज्वल्य निष्ठा असते तिचें माणसाला आकर्षण वाटतें. देवाब्राह्मणांसमक्ष वरलेल्या पत्नीशीं प्रेमानें वागावें हें माणसाला कळतें व तसें बहुतेक माणसें वागतातहि. पण पत्नी नाहींशी झाल्यानंतर रामचंद्राप्रमाणें वेडे होऊन वृक्ष-पाषाणांना कुणी मिठ्या मारीत नाहीं. ती उत्कटता, तें वेड, ती बेहोषी रामचंद्रासारख्या अनन्यसाधारण प्रेमिकाच्या जीवनांतच दिसते. म्हणूनच सामान्य माणसें रामचंद्रासारख्या आदर्श प्रेमिकाला चाहत असतात. रोमिओ आणि ज्यूलिएट, लैला आणि मज्नू हीं प्रेमी युग्में आज स्थलकालाच्या मर्यादा ओलांडून सर्वत्र लोकप्रिय होऊन राहिलीं आहेत. माणसांना प्रेमासाठीं सर्वस्व त्याग केलेला आवडतो. तीं बिचारीं स्वतः जरी एवढीं पराक्रमी नसलीं तरी त्यांना प्रेमांतलें दिव्यत्व ओळखण्याचें सामर्थ्य असतें.

ध्येयवादी आणि प्रेमिक हे वस्तुतः एकच होत. ध्येयवाद्याचें प्रेम अदृश्य वस्तूवर असतें इतकेंच. पण प्रेमिकापेक्षां ध्येयवादी कुठल्याच बाबतींत कमी आग्रही, कमी वेडा किंवा कमी बेहोष नसतो.

**"मी न परी बागेंत–देह हा अणू अणू जळतो**
**त्यांतच समाधान वाटे**
**एकतानता परी भंगतां, जिव हा कळवळतो**
**फुलांचे मग बनती कांटे."**

हे उद्गार एखाद्या स्त्रीरत्नासाठीं झुरणाऱ्या सत्त्वशील प्रेमिकाचे म्हणून सांगतां येतील, त्याप्रमाणें रत्नाच्या घटकांचा अभ्यास करणाऱ्या रामन्‌सारख्या ध्येयनिष्ठ शास्त्रज्ञाच्या तोंडांतहि सहज शोभतील. प्रेमिक अथवा ध्येयवादी यांना यातना सोसाव्या लागतात, वांट्याला अपयशहि बहुधा येतें, पण त्यांच्याबद्दल भोंवतालच्या जगांत आकर्षण असतें हें विसरून चालणार नाहीं. जो निःसंगपणा व तदेकपरता आपण दाखवूं शकत नाहीं ती हा माणूस दाखवींत आहे याचें सादर कुतूहल लोकांना असतें. पंडित जवाहरलाल नेहरूंविषयीं जनतेला जो विलक्षण आदर वाटतो त्याचें कांहींसें रहस्य हें असें आहे.

ध्येयवादी किंवा प्रेमिक हा जात्या शूर असतो. आपल्या ईप्सिताच्या प्राप्ती-साठीं प्राणांची किंमत पायाखालच्या धुळीइतकी समजणें यांत त्याला अवघड कांहींच वाटत नाहीं. शूर प्रेमिकाची अथवा निःसंग ध्येयवाद्याची ही शूर वृत्ति पंडितजींच्या अंगीं भरून राहिली आहे; आणि शौर्याइतकें आकर्षक दुसरें काय असूं शकेल ?

> " फॅसिस्टांचें दुसरें कांहीं आपण घेतलें नाहीं तरी 'साहसपूर्वक जगा' (Live dangerously) हें त्यांचें घोषवाक्य आपण जरूर उचललें पाहिजे......मला झुंज घेण्यांत आनंद वाटतो. कसल्या तरी झुंजींत गुंतलों असलों म्हणजे मी जिवंत आहें असें मला वाटतें. "

असें नेहरूंनीं म्हटलें आहे. आणि या उद्गारांस अनुसरूनच त्यांचें वागणें असतें. सिंधमध्यें मागें निवडणुकीकरितां हिंडत असतां रात्रीं एका स्टेशनवर त्यांच्या डब्यांत दोन हत्यारबंद शिपाई शिरले. त्यांच्या आगमनाचें कारण नेहरूंनीं विचारतांच आपली योजना पंडितजींचे शरीरसंरक्षक म्हणून झाली आहे असें त्यांनीं अदबीनें सांगितलें. पंडितजींचें पित्त भडकलें. 'खालीं उतरा, माझें संरक्षण करण्यास मी समर्थ आहें.' असें ताडकन् बोलून पंडितजींनीं त्या शिपायांची बोळवण केली ! सिंध प्रांत अगोदर हिंसक वृत्तीचा आणि त्यांत त्या वेळीं धर्मवेड्या हूर दरवडेखोरांचा पुंडावा चालू होता ! यावरून नेहरू कोणत्या संकटाच्या खाईंत उतरणार होते हें कळून येईल. पंचवीस फुटांवर गोळीबार चालू असतां निर्वेधपणें भाषण चालू ठेवण्याचा चमत्कार त्यांनीं दाखविला आहे. १९४६ सालीं हंगामी राष्ट्रीय सरकारचे नेते म्हणून त्यांची नेमणूक झाली, तेव्हां

सरहद्दीवरच्या रानटी टोळ्यांच्या प्रदेशांत त्यांनीं दौरा काढला होता. ह्या प्रदेशांत माणसाच्या जीवनाची किंमत नेहमींच शून्याखालीं असते; आणि त्या वेळीं तर जिनाशहांच्या पाकिस्तानी प्रचारामुळें टोळीवाल्यांचीं डोकीं बिथरून गेलीं होतीं ! पण हें सर्व ठाऊक असूनहि नेहरूंनीं त्या प्रदेशांत उडी घातली. मोटारीवर दगडांचा मारा झाला ! एके ठिकाणीं तर ५००–६०० हिंस्र टोळीवाले नेहरूंचें कांहीं बरेंवाईट करावें या इराद्यानें जमले होते ! त्यांच्या गोळ्यांनीं मोटारच्या कांचा फुटल्या आणि डॉ. खानसाहेबांनीं हातांत पिस्तुल घेऊन खंबीरपणें जर रक्षकाची भूमिका घेतली नसती तर काय झालें असतें—छे ! ती अमंगल कल्पनाच करणें नको ! पण नेहरू शांत होते. हास्यमुद्रेनें ते टोळीवाल्यांच्या रानटी लीला पाहात होते. त्या वेळीं 'रॉयटर' या जगविख्यात वृत्तसंस्थेचा प्रतिनिधि मागें बसला होता. 'असल्या भयंकर प्रसंगांत नेहरूंची धिमी वृत्ति पाहून आम्हीं तोंडांत बोट घातलें' असें त्यानें पुढें सांगितलें ! यंदाचीच गोष्ट घ्या. कलकत्ता शहर म्हणजे आज दहशतवाद्यांचें माहेरघर होऊन बसलें आहे. दगडफेक, जाळपोळ, बॉंबस्फोट, गोळीबार, मोडतोड या गोष्टी आतां तेथें नित्याच्या होऊन बसल्या आहेत ! आजचें प्रस्थापित सरकार जेणेंकरून खालीं येईल असे उद्योग तेथें चालू आहेत. गुप्ततेनें संचार करणाऱ्या तेथील हिंसावाद्यांचा सरकारी वरिष्ठांवर डोळा आहे ही गोष्ट प्रसिद्ध आहे. पण इतकें असूनहि १४ जुलैला पंडितजींनीं कलकत्त्याला भेट दिली; इतकेंच नव्हे, तर १० लाखांच्या विराट् सभेपुढें भाषण केलें ! सरकारी बंदोबस्त कडेकोट असूनहि लहानशीं का होईनात, निदर्शनें झालीं, पिस्तुलधारी मनुष्य सांपडला, एक बॉंब फुटला हें लक्षांत घेतलें पाहिजे. पण अशी स्फोटक परिस्थिति असूनहि नेहरू डगमगले नाहींत. मध्यें सरदार पटेल मुंबईला हवा पालटण्यासाठीं येऊन राहिले होते. काश्मीर प्रश्नावर कांहीं नवीन गुंतागुंत झाली म्हणून त्यांचा सल्ला घेण्यासाठीं पंडितजी मुंबईस आले होते. परंतु इंदूरमार्गें ते दिल्लीस जाण्यास निघाले. इंदूरला राजप्रमुखांच्या आग्रहावरून विमानतळावरून राजवाड्यांत ते भोजनासाठीं गेले. या दोन स्थळांतल्या ५-७ मैल अंतराच्या रस्त्यावर लाखों दर्शनोत्सुक लोक केव्हांपासून जमा झाले होते. महामंत्री पंडितजींना म्हणाले, "दुतर्फा माणसें आहेत. सुरक्षिततेच्या दृष्टीनें आपण बंद केलेल्या गाडींतून जावें हें बरें." नेहरू हंसून म्हणाले, "अहो, माझ्या सुरक्षिततेसाठीं इतकी

काळजी मुळींच करूं नका. मी कलकत्त्याला मृत्यूच्या खाईंत जाऊन आलों आहें." आणि पंडितजी उघड्या गाडींतून हजारों भक्तांचीं अभिवादनें स्वीकारीत गेले. त्यांच्या आजपरच्या जीवनांत साहसी वृत्तीचीं अशीं अगणित लहानमोठीं उदाहरणें सांगतां येतील.

योगी अरविंदांनीं पंडितजींच्या अंगीं कांहीं 'सामर्थ्यवान् मनोद्रव्य" (Strong psychic element) आहे असें म्हटलें आहे. अर्थात् हें प्रत्ययाला येतें, पण त्याचें पृथक्करण करणें कठीण आहे. या 'मनोद्रव्या'-मुळेंच पंडितजी स्वतः इतके उत्साही आहेत, आाणि आपल्या भोंवतालच्या लोकांतहि ते उत्साह उत्पन्न करूं शकतात. या उत्साहाचें तांडव किल्येकदां इतकें अनिवार असतें कीं, त्याच्या योगानें इतरांच्या भावनांची पडझडसुद्धां होते! आपले आचार्य रुपलानी हे जरा उशीरा हिंदी बोलूं लागले. अर्थात् त्यांच्या भाषेंत अस्सल हिंदी बोलणाऱ्या माणसाची सफाई व अचूकपणा नसे. एकदां काँग्रेसमध्यें त्यांनीं आपल्या वैयक्तिक उल्लेखासाठीं 'हम...' असें म्हणतांच 'हम नहिं मैं' असें नेहरू गरजले! याच काँग्रेसमधली एक हकीकत आहे. एक अघळपघळ शरिराचे व वृत्तीचे प्रख्यात काँग्रेसनेते आपल्या नातवाला कडेवर घेऊन व्यासपीठावर भाषण करायला जाऊं लागले. त्याबरोबर पंडितजींनीं त्यांना दरडावून अडविलें आणि नातवाला खालीं सोडायला लावलें. यांत उत्साहाइतकीच त्यांची औचित्याची अनिवार आवडहि दिसते. सर्व कांहीं ठाकठीक व्हायला पाहिजे, बेंगरूळपणा कुठें उपयोगी नाहीं, उगीच दिरंगाईच झाली आहे, ढिलाईनें काम चाललें आहे, हें पंडितजींना चालायचें नाहीं. हारांची गर्दी झाली आणि ते घालण्यांत गोंधळ होऊं लागला कीं, त्यांनीं तो कार्यक्रम बंद करायला सांगितलेंच! लाहोर काँग्रेसमध्यें पंडितजी विधिपूर्वक आसनस्थ झाले त्या वेळचा देखावा कोण हृदयंगम व अपूर्व होता! "पित्यानें सुरू केलेलें काम मुलगा पुरें करील." या पर्शियन म्हणीचा उल्लेख करून मोतीलालनीं आपल्या डोक्यावरील अध्यक्षपदाचा मुगुट मुलाच्या मस्तकावर ठेवला व ते सेवानिवृत्त झाले. प्रतापशाली पित्याला आपल्या डोळ्यांदेखत पुत्र आपलें कार्य चालविण्याइतका समर्थ व सर्वमान्य झाला आहे हें पाहण्याचें भाग्य लाभणें हा केवढा दुर्मिळ योगायोग! आधुनिक भारतांतल्या अनेक हृद्य प्रसंगांत या महोत्सवाची गणना होईल. या वेळीं जवाहरलालांच्या मातुश्री स्वरूप-

राणी यांना तर अस्मान ठेंगणें झालें होतें. आपल्या या प्रतापी मुलाची दृष्ट काढण्याकरितां व त्याचें अभीष्टचिंतन करण्याकरितां आरतीची सिद्धता करून स्वरूपराणी व्यासपीठावर चढल्या; पण पंडितजींनीं त्यांना कांहीं ओवाळूं दिलें नाहीं. "हें काय वेड्यासारखं करते आहेस !" असें आपल्या आईच्या अंगावर ते ओरडले. ती प्रेमळ माता बिचारी हिरमुसली होऊन आपल्या जागेवर जाऊन बसली ! प्रेक्षकांना कसेंसेंच वाटलें. मातृहृदयाच्या सहज उद्रेकाला पंडितजींनीं कठोर शिस्तीसाठीं असा बांध घालावयाला नको होता, असेंच जो तो मनांत म्हणत होता. सर्वत्र स्तब्धता पसरली. पण गांधीजींनीं आपली विनोदबुद्धि वापरून पुनः शीतल वातावरण निर्माण केलें. असो. एकदां पंडितजींच्या स्वागतासाठीं सरोजिनीदेवींनीं आपल्या घरीं ( हैद्राबाद येथें ) बडे बडे नबाब व जहागिरदार बोलावले होते. दिवाणखान्यांत मधोमध खास पाहुणे म्हणून पंडितजी बसले होते; आणि ते सरंजामशहा दुतर्फा समोर वीरासन घालून पंडितजींची ओळख होण्याचा क्षण केव्हां येतो याची वाट पाहात बसले होते. सरोजिनीदेवी पंडितजींना म्हणाल्या, "हे हैद्राबादचे बडे बडे नबाब व जहागीरदार आहेत." "फिर इनसे क्या करूं !" (मग यांचं काय करूं ?) असें तुटक व बेपर्वाईचें उत्तर पंडितजींनीं दिलें ! ते सारे लक्ष्मीधर मनांत विरघळून गेले. बिचाऱ्या सरोजिनीदेवींच्या कोमल हृदयाची काय अवस्था झाली असेल त्याची कुणासहि कल्पना येईल ! योगी अरविंदांनीं वर्णिलेलें पंडितजींचें 'सामर्थ्यवान् मनोद्रव्य' कधीं कधीं असें उग्र रूप धारण करतें. औचित्याच्या आवडीमुळेंच कित्येकदां पंडितजी अनुचित उत्साह दाखवितात. एका एका गोष्टीवर अतिरिक्त आस्था दाखविणें हा कलावंताचा गुण असें वर्णिलें आहे. नादिष्टपणा असें त्या गुणाचें ओळखीचें नांव सांगतां येईल. या नादिष्टपणांतूनच उत्तम कलाकृति जन्माला येतात. पण हा नादिष्टपणा कलावंताला जितका भूषणास्पद आहे, तितकाच राजकारणी पुरुषाला दूषणास्पद म्हणतां येईल; आणि पंडितजींच्या कलावंत व राजकारणी या दोन भूमिकांचा पुष्कळदां असा तंटा होतो.

> "माझें अंतःकरण एक युद्धक्षेत्र बनलें आणि अनेक शक्ति त्याचा ताबा घेण्यासाठीं झुंजूं लागल्या."

असें आपल्या अंतःकलहाचें वर्णन पंडितजींनीं एके ठिकाणीं केलें आहे.

परस्परविरोधी प्रवृत्तींचा झगडा असेल तर त्यांत फारशी सूक्ष्म गुंतागुंत असत नाहीं. दया आणि कठोरता यांचेंच द्वंद्व असलें तर उलगडा न होण्यासारखें त्यांत काय विशेष असणार ? पण वेगळ्या तरीहि सामान्य अशा प्रवृत्तींचें युद्ध जुंपलें म्हणजे मात्र मनाच्या यातना फार होतात. पंडितजींच्या मनांतलीं कांहीं युद्धें अशा स्वरूपाचीं असतात. लोकांनीं गैदी, दरिद्री, मागासलेलें असूं नये अशी त्यांची तीव्र इच्छा असते. त्यामुळें सुस्त व बेशिस्त माणसें पाहून त्यांना चीड येते. पण माणसांना सुधारण्याची एक सुधारकी वृत्तिहि ( Reformist tendency ) त्यांच्यांत आहे. माणसें गैदी व अज्ञ राहण्याला समाजस्थितिच पुष्कळ अंशीं कारण असते हा शास्त्रीय दृष्टिकोण पंडितजींना पटलेला आहे. अशा स्थितींत जनसमुदाय व्यवस्थित असावा ही अपेक्षा आणि तो तसा नाहीं याचा राग एका बाजूला असतो. आणि या भावनांशीं माणसांना सुधारण्याच्या इच्छेचा झगडा सुरू होतो !

महत्त्वाच्या कार्याची धुरा खांद्यावर जर आपण घेतली आहे तर लोकांनीं आपल्याबद्दल आतां अकारण संशय दाखवूं नये असें पंडितजींना वाटतें. आणि मग विरोधाचा ओझरता स्पर्श झाला तरी ते संतप्त होतात ! जयपूरच्या काँग्रेसमध्यें नाहीं का आपल्या गैरहजेरींत काँग्रेसमंत्र्यांच्या बाबतचा झालेला ठराव त्यांनीं फिरवायला लावला ? समाजवादी मित्रांनीं कुठें टीका करतांच त्यांना पंडितजींनीं सडकून दूषणें दिलीं. पण यावरून त्यांना हुकूमशाहीची आवड आहे असें कुणी समंजस माणूस म्हणणार नाहीं. आत्मविश्वासाचा अतिरेक होऊन त्यांची बाह्य वागणूक कित्येकदां घमेंडखोरपणाची वाटते. आपण जेवढे कर्तव्यदक्ष आहोंत तेवढींच आपल्याभोंवतालचीं माणसेंहि आहेत असा ( गैर ) समज ते कित्येकदां करून घेतात. आपल्या तल्लीनतेची जाणीव हरएक व्यक्तीला आहे ह्याहि भ्रमांत ते पुष्कळदां असतात. त्यामुळें विरोधाचा किंवा विपर्यासाचा सूर कुठें निघाला कीं, स्वारी नखशिखान्त रागानें लाल होऊन जाते !

पण आत्मकेंद्रित राहिल्यामुळें वेळीं अवेळीं चढणारा हा रागाचा पारा उतरण्यासहि वेळ लागत नाहीं. पंडितजींची खानदानी ऐट व बोलण्याचालण्यांतला डौल आणि वर्णिलेली त्यांची तामसी वृत्ति पाहिली म्हणजे हा मोठा गर्विष्ठ पुरुष असेल असा ग्रह होतो. पण वस्तुस्थिति त्याच्या अगदीं उलट आहे. आपल्या लोकप्रियतेची चिकित्सा करतांना त्यांनीं केलेलें आत्मपरीक्षण जितकें प्रांजल तितकेंच नम्रतापूर्ण आहे.

" माझ्या अंगीं कांहीं चांगले गुण आहेत आणि ते मी झांकण्याचा प्रयत्न करीत नाहीं. परंतु त्या गुणांत असामान्य असें कांहीं नाहीं. माझ्या उणीवांची मला पूर्ण जाणीव आहे...माझ्या लोकप्रियतेचें रहस्य काय? माझें यश कीं माझ्या उणीवा? खरोखर का मी लोकप्रिय आहें! बौद्धिक प्रगति म्हणावी तर ती अलौकिक मुळींच नाहीं. आणि बौद्धिक प्रगति लोकप्रियतेला साहाय्यकहि होत नाहीं. माझ्या त्यागामुळें ही लोकप्रियता असेल तर हिंदुस्थानांतल्या लाखों-करोडों लोकांनीं माझ्यापेक्षां किती पटींनीं अधिक त्याग केला आहे. कांहींनीं तर सर्वस्व गमावलें आहे."

कॉंग्रेसच्या अध्यक्षपदीं पहिल्यानें पंडितजी निवडून आले तेव्हां ते कॉंग्रेसचे सर्वांत लहान अध्यक्ष होते असें कौतुकानें लोक म्हणूं लागले. पण पंडितजींनीं तेंहि आपलें कौतुक पारखून निरर्थक आहे असें ठरविलें आणि गोखले व आझाद आपल्याच शिणेचे असतांना या सन्मान्यपदीं चढले होते असें सांगितलें.

" मी साहित्यिक नाहीं आणि इतिहासज्ञ तर नाहींच. मग मी आहें तरी कोण! अनेक गोष्टींत लुडबूड करणारा मी एक प्राणी आहें."

असें त्यांनीं म्हटलें आहे. या नम्रतेमुळेंच आपली चूक कबूल करायला ते केव्हांहि तत्पर असतात. आपल्या 'जगाच्या इतिहासां'त शिवाजीमहाराजां-संबंधीं पंडितजींनीं एक विचित्र विधान केलें होतें. पण श्री. देवगिरीकरांसारख्या जाणत्या गृहस्थानें तें चूक असल्याचें सप्रमाण पटविल्यानंतर लगेच त्यांनीं दिलगिरीपूर्वक तें माघारी घेतलें. एकदां श्रीप्रकाश यांना संतापानें पंडितजी कांहीं बोलून गेले. कांहीं वेळानें डोळ्यांत अश्रु आणून ते श्रीबाबूंना म्हणाले, "प्रकाशबाबू, एका अधू मित्राला तुम्ही चालवून नाहीं का घेणार!" या नम्रतेपुढें व प्रांजलपणापुढें कोण हतबल होणार नाहीं?

पण पंडितजी अंतर्यामीं नम्र असले तरी नम्रतेचें प्रदर्शन करण्याची त्यांना विलक्षण चीड आहे. आपल्या पायाला ते कोणालाहि हात लावूं देत नाहींत. उत्तर हिंदुस्थानांत एके ठिकाणीं विद्यार्थ्यांपुढें बोलतांना त्यांनीं सांगितलें कीं, " मी गांधीजींचा एवढा चहाता व भक्त आहें, पण त्यांच्या पायाला कधींहि स्पर्श केलेला नाहीं." आपली जनता इतकी सुस्त व भयग्रस्त आहे कीं, तिच्या

नम्रतेला लाचारीची कळा आली आहे. ती स्तुति करायला जाते आणि खुषामत करूं लागते. म्हणून पंडितजी कित्येकदां आवेशानें लोकांना सांगतात, " नम्र राहूं नका. "

गुप्ततेचा पंडितजींना फार तिटकारा आहे. येथें पुनः त्यांची राजकारणी मुत्सद्दी ही भूमिका सुटते. अमेरिकन जनतेवर त्यांच्या ज्या अनेक गुणांची छाप पडली त्यांत त्यांच्या मोकळेपणाला अग्रस्थान द्यावें लागेल. एके ठिकाणीं मुलाखत घेण्याकरितां सुमारें पांचशें प्रमुख पत्रकार जमले होते. आंतरराष्ट्रीय प्रश्नावर मनमोकळेपणानें बोलण्यास त्यांना अवघड वाटूं नये म्हणून या पत्रपंडितांनीं सांगितलें कीं, आम्ही आपल्या उत्तरांतला एक शब्दहि प्रसिद्ध करणार नाहीं. पण पंडितजींनीं ही सवलत स्मितपूर्वक नाकारली आणि म्हटलें, " मी जें सांगेन तें तुम्ही खुशाल प्रसिद्ध करा. माझ्याजवळ गुप्त असें कांहींच नाहीं. " गुप्ततेंत हिंसा असते असें गांधीजी म्हणतात. नेहरूंसारख्या गांधीजींच्या पट्टशिष्याला गुप्ततेबद्दलचा एवढा तिटकारा याचमुळें कदाचित् असेल.

पंडितजींच्या जीवनांत गुप्त असें कांहीं नसल्यानें आपल्या मानसिक तळमळी व खळबळी जगापुढें वेळोवेळीं मांडायला त्यांना संकोच वाटत नाहीं. जगानें सहज ऐकावें इतक्या मोठ्यानें कित्येकदां त्यांचें आत्मगत भाषण असतें. एकदां स्वतःवरच टोपण नांवानें त्यांनीं लेख लिहिला होता :

> " ...परिस्थितींत जरा बदल झाला तर हा माणूस ( जवाहरलाल ) हुकूमशहा व्हायला वेळ नाहीं लागायचा ! मात्र त्या वेळींहि तोंडांत लोकसत्तेची व समतावादाची भाषा असेलच......पण जवाहरलाल फॅसिस्ट होणार नाहींत. फॅसिझम्‌मध्यें असलेली बीभत्सता व रानवटपणा त्यांच्या खानदानी अंतःकरणाला मानवण्यासारखा नाहीं. त्यांच्या चेहऱ्यावरून व त्यांच्या आवाजावरूनसुद्धां हें कळून येण्यासारखें आहे. पण हुकूमशहा होण्याची सारी अनुकूलता त्यांच्यापाशीं आहे — ती म्हणजे विलक्षण लोकमान्यता, दृढनिश्चय, उत्साह आणि गर्विष्ठपणा ! जनतेबद्दल त्यांना प्रेम वाटतें, पण वृत्ति एकंदरीनें तुसडीच ! दुबळ्या व नालायक लोकांबद्दल त्यांना तिरस्कार वाटतो. त्यांचा रागीटपणा व चिडखोरपणा प्रख्यातच आहे ! कोणतेंहि काम लौकर झालें पाहिजे याविषयीं ते तत्पर असतात. अप्रिय गोष्टींचा नाश करून नवी सृष्टि निर्माण करण्यास ते आतुर

असतात. त्यामुळें लोकशाहीचा धिम्मा मार्ग त्यांना कसा परवडेल कुणास ठाऊक! स्वतःविषयीं त्यांना घमेंड तरी किती! पण हें आपण चालू देतां कामा नये. आम्हांला सीझरसारखे लोक नकोत! ..."

त्या लेखांतलें हें कठोर आत्मनिरीक्षण जवाहरलालांच्या प्रांजलतेचें व नम्रतेचें उत्तम उदाहरण म्हणून दाखवितां येईल. 'आपली आपण स्तुति करी। तो एक मूर्ख' असें श्रीसमर्थ म्हणाले. पण 'आपली आपण उणीव दावी' त्याला समर्थांनीं काय म्हटलें असतें कुणास ठाऊक? वरील लेख खुद्द पंडितजींनींच लिहिला आहे, हें गोड गुपित एका अमेरिकन पत्रपंडितानें अखेर फोडलें!

पंडितजी वास्तववादी आहेत कीं आदर्शवादी आहेत? कृतिशील आहेत कीं स्वप्नाळू आहेत? याचेंहि निर्णायक असें उत्तर देतां येणार नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें याहि बाबतींत द्वंद्वांच्या भोंवऱ्यांत त्यांचें मन नेहमीं सांपडतें. डोक्यांत गोंधळ माजला म्हणजे ते कित्येकदां ध्येयसृष्टीचा आसरा घेतात. पण त्याहि ठिकाणीं त्यांना स्वस्थता लाभतेच असें नाहीं! आज राष्ट्राचा एवढा गाडा त्यांनीं चालविला आहे तेव्हां ते कर्मकुशल नाहींत असें कोण म्हणेल? पण संग्रामाच्या ऐन गर्दींतहि समोरच्या भयंकर समस्यांपेक्षां दूरच्या ध्येयसृष्टीकडे त्यांची नजर पुष्कळदां स्थिरावते हें मात्र खास. कार्य उत्कटतेनें चाललेलें असतें, पण मन मात्र नवीं नवीं स्वप्नें पाहण्यांत गुंग असतें. आणि उलटहि अनेक वेळां स्थिति होते. म्हणजे ध्येयाच्या चिंतनांत असतांनाच त्यांना कामाची ओढ लागते. जनसंमर्द आणि एकान्त यांविषयीं त्यांच्या हृदयाची अशीच सारखी ओढाताण होते. १९३८ सालीं हरिपुरा कॉंग्रेस संपल्यावर पंडितजींचें कविहृदय राजकारणाला कांहीं वेळ अगदीं विटून गेलें! ते नित्याचें काम करीत होते, पण त्यांचें मन उत्तरेकडील बर्फाच्छादित गिरिशिखरांवर तरंगत होतें. वायूच्या मंद निःश्वासासाठीं तें आसुसलें होतें. त्याला एकान्त आणि शांतता यांची भूक लागली होती. पंडितजींनीं विचार केला, राजकारणाचा हा व्याप पुरे झाला. मूर्ख व धर्मवेडे लोक जातीय दंगे माजवतील किंवा मंत्री आपलें धोरण चुकीचें आंखतील म्हणून का मीं इथेंच खितपत पडावें? गिरिप्रदेशांत स्वर्गसुखाचें पुढें वाढून ठेवलेलें ताट उगीच कां दूर लोटायचें? आणि एक दिवस अलाहाबाद सोडून ते अल्मोरामार्गें खाली येथें गेले. तेथील वनश्रीची शोभा पाहात नंदादेवी आणि इतर उत्तुंग गिरिशिखरें

यांचो शोध घेऊं लागले. विरल ढगांच्या आच्छादनांत तीं दडलीं होतीं. या गिरिप्रदेशांतील एकान्तानें त्यांच्या मनाला उल्हास वाटूं लागला. डोक्यांतलीं वादळें विरलीं.

पण ही स्थिति अधिक कुठली टिकायला? हिटलेरच्या आक्रमणाची वार्ता पोस्टानें येऊन पोंचली!

> "...खालीमध्येंसुद्धां मला शांति मिळेना. भगभगीपासून सुटका होईना. माझ्या चित्ताला जाळणाऱ्या विचारांपासून माझी सोडवणूक कशी होणार? थरथरणाऱ्या हृदयाला सोडून मीं कुठें वेळ काढायचा? जगाच्या रागद्वेषाशीं आपणाला सामना द्यायचा आहे हें मला कळून चुकलें. यांत जगाच्या मुक्ततेचें स्वप्नहि मी पाहत होतों. हें स्वप्न म्हणजे एखाद्या स्वप्नाळू माणसाचें कल्पनाचित्र होतें कीं त्याहून कांहीं अधिक होतें? तें प्रत्यक्षांत येणें शक्य होईल काय?"

अशी तळमळ त्यांना लागली, आणि त्या रम्य स्थळाला रामराम ठोकून परत वास्तव जीवनांत ते उतरले. वास्तवता आणि स्वप्नसृष्टि या दोन टोकांत नेहरूंचें मन कसें आंदोलत राहिलें हें कळण्यास हा प्रसंग उद्बोधक ठरेल.

पण सागराच्या पृष्ठावर कितीहि लाटा उचंबळल्या आणि आंत केवढाहि मोठा वडवानल पेटलेला असला तरी त्याची विशालता व खोली यामुळें तो नेहमींच समृद्ध व दर्शनीय भासतो. पंडितजींच्या मनाला हेलकावे बसत असतील व संतापाचाहि त्रास होत असेल, पण ते इतके थोर आहेत कीं, त्यांची संपन्नता व विलोभनीयता कधींच कमी होत नाहीं. प्राणिमात्राबद्दल वाटणारें अनिवार प्रेम आणि त्या प्रेमानें आलेली ऋजुता हीं पंडितजींच्या व्यक्तित्वाचीं खरीं आकर्षणें आहेत. त्यांच्या जगन्मान्यतेचीं हींच खरीं कारणें आहेत. प्रो. हॅरोल्ड लास्कीसारखे जगविख्यात साम्यवादी तत्त्वविवेचक पंडितजींवर भाळले ते याचमुळें. सामान्य माणसाबद्दलची दयार्द्रता पंडितजींच्या अंतःकरणांत ओतप्रोत भरली आहे. होमरूल लीगच्या काळांत आपल्या सामान्य अनुयायांबरोबर बसून चणेकुरमुरे खाण्यांत त्यांनीं धन्यता मानली. बिहारच्या भूकंपांत उध्वस्त झालेल्या भागांमध्यें हिंडून व साध्या नागरिकाच्या खांद्याला खांदा लावून त्यांनीं सफाईचें काम केलें. कुठेंहि सार्वजनिक समारंभांत दर्शनोत्सुक जनता दिसली कीं

व्यासपीठावरून सरळ उतरून व शिष्ट निमंत्रितांच्या रांगा ओलांडून ते आम जनतेंत आनंदानें मिसळतात; आणि त्या वेळीं नेतृत्वाचा रुबाब त्यांच्या चेहऱ्यावर मुळींसुद्धां दिसायचा नाहीं. लोकगंगेच्या स्पर्शानें आपण पावन होतो आहों अशीच कृतार्थता त्या वेळीं पंडितजींच्या नेत्रांत दिसते. [illegible] येथें एक पुरभय्या आहे. तो पंडितजींना दरमहा पांच रुपये साखरपाण्यासाठीं [illegible]. बनारसला गेल्यावर या ' विदुराच्या घरीं ' पांच मिनिटें तरी डोकावल्याशिवाय नेहरू राहणार नाहींत. अमेरिकेच्या संचारांत बोस्टन येथें त्यांना विमानतळापर्यंत नेण्याचें काम बटलर नांवाच्या मोटर-ड्रायव्हरकडे आलें. जगांत आपल्यासारखा भाग्यशाली माणूस कुणी नाहीं असें त्याला वाटलें. पण या भाग्याची नोंद कायम कशी करायची? पुढें लोकांना हा भाग्याचा प्रसंग अभिमानानें सांगण्यास आधार कोणता? असा गोंधळ बटलरला पडला. पण पंडितजींनीं या गोंधळांतून त्याला वर काढलें. त्याचा हात धरून आपल्याबरोबर त्यांनीं त्याचा फोटो काढला. बटलरला हर्षवायु व्हायची वेळ आली! अमेरिकेंत होणाऱ्या बादशाही व सरकारी स्वागताच्या लखलखाटांतून स्वतःची सुटका करून घेऊन ते शिकागोपासून ५०-६० मैलांवर किसानांच्या झोंपड्यांत गेले, आणि तेथें त्यांना खरी शांतता लाभली. अत्यंत साधा पण तितकाच दुर्मिळ असा हा माणुसकीचा गुणधर्मच पंडितजींच्या त्रिखंड मान्यतेचा मूलाधार आहे.

मात्र यशःश्रीनें लखलखणाऱ्या पंडितजींच्या जीवनावर एक औदासिन्याची छाया कायम पडलेली सूक्ष्म दृष्टीनें पाहणारास दिसून येईल. हिरव्यागार प्रदेशांत एखादें सरोवर असावें आणि सूर्यावर आलेल्या एखाद्याच ढगाची सांवली त्यावर पडावी म्हणजे जसें उदासरम्य वातावरण तयार होतें, तसें पंडितजींचें जीवन आहे. कित्येकदां लांबचीं शिखरें सोनेरी किरणांत न्हात असतात आणि मध्यप्रदेशाची हिरवळ व जलाशय मात्र छायेनें झांकून जातात, तसें कांहींसें झालें आहे. पंडितजींच्या जीवनावरील ही छाया अनुतापाची आहे का? खासच नाहीं. कारण, आपण पूर्वायुष्यांत अनेक चुका केलेल्या असल्या तरी महत्त्वाच्या प्रश्नांवर आपले निर्णय फारसे चुकलेले नाहींत असें पंडितजी म्हणतात. आणि पुनः आपलें जीवननाटक नांदीपासून सुरू झालें तर त्यांत मूलग्राही असे कांहींच बदल करावे लागणार नाहींत असें त्यांना वाटतें. ऐहिक यश त्यांना एवढ्या प्रमाणांत मिळालें आहे कीं, यक्षकिन्नरांनींच नव्हे, तर देवेन्द्रानेंसुद्धां

त्यांचा हेवा करावा ! मग ही औदासिन्याची सांवली कां पडली आहे ? ध्येय-वाद्याचा तो भोगवटा आहे. पंडितजी तरी त्यांतून कसे सुटणार ?

पहिल्यापासून कौटुंबिक जीवनांत अनुभवावयास लागलेला कांहींसा एकल-कोंडेपणा हें एक कारण तर या औदासिन्यास नसेल ना ? असा संशय येतो. मोतीलालनीं आपल्या राजबिंड्या पुत्राचें संगोपन मोठ्या प्रेमानें आणि इतमामानें केलें. पण सामान्य स्थितींतल्या पित्याला आपल्या मुलांचाळांशीं खेळायला व त्यांच्या अंगावरून वत्सलतेचा हात फिरवायला जसा वेळ मिळतो तसा मोतीलालना मिळालाच असेल असें नाहीं. कारण, वकिलीच्या व्यवसायांत एकाहून एक विजय मिळवून नव्या नव्या उन्मादाचा अनुभव घेत राहणें यांत मोतीलाल मग्न होते. जवाहरलालचें एकमेव आश्रयस्थान माता. स्वरूपराणी प्रकृतीनें जरा नरमच असत. आणि जवाहरलालच्या जन्मानंतर घरांत लौकर पाळणा हालला नाहीं, त्यामुळें लहानपणीं बरोबरीचें भावंड खेळायला कुणीच नव्हतें. जरा मोठे होतांच त्यांना विलायतेस शिक्षणासाठीं प्रयाण करावें लागलें. त्यामुळें उभयतां भगिनींच्या शैशवांतहि त्यांना समरस होतां आलें नाहीं. धन-वंतांचा तालेवार मुलगा म्हणून दासदासींखेरीज कुणी निकट यायचे नाहींत. त्यामुळें कांहींसा एकलकोंडेपणा पंडितजींच्या जीवनांत आला.

हा एकलकोंडेपणा कदाचित् विवाहानंतर गेला असता. जवाहरलालांचा विवाह साहजिकच मोठ्या थाटामाटानें झाला ( १९१६ ). दिल्ली येथें मोठमोठे पाहुणे उतरण्यासाठीं कॉंग्रेस अधिवेशनाप्रमाणें तंबू-राहुट्यांची एक वसाहतच घालण्यांत आली होती. अजूनहि ‘ नेहरू वेडिंग-कॅंप ’ म्हणून या वसाहतीची खूण लोक तेथें दाखवितात. पत्नी खरोखर नक्षत्रासारखी मिळाली. आणि पहिला उमेदवारीचा, रुसण्याफुगण्याचा, अल्लडपणाचा काळ संपून पतिपत्नींचें सामरस्य व्हायचें त्याच सुमारास कमलादेवींना दुर्धर रोगानें पछाडलें ! तेव्हां-पासून १९३६ सालीं युरोपमधील एका रुग्णालयांत त्या स्वर्गस्थ होईपर्यंत त्यांच्या मनाची धडपड पंडितजींना पाहावी लागली. राजकारण व कारावास यांमुळें अनेक वेळां पत्नीला एकाकी सोडून पंडितजींना दूर जावें लागे. १९३६ सालीं तर युरोपमध्यें पंडितजी त्यांची शुश्रूषा करीत असतांनाच पंडितजींची कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावर निवड झाली. मनाचा धीर करून शरपंजरीं पडलेल्या

त्या वीरपत्नीनें देशसेवेसाठीं पंडितजींना हिंदुस्थानांत जायला अनुज्ञा दिली. तथापि अनेक वर्षें सोसाव्या लागलेल्या या सक्तीच्या विरहाचा ताण पंडितजींना फार पडला असावा असें दिसतें. कमलादेवींच्या निधनानंतर तर न हटणारी खिन्नता त्यांना आली आहे, असें त्यांच्या कनिष्ठ भगिनी कृष्णा हाथींसिंग सांगतात.

पंडितजींना मित्राचा जिव्हाळा फार आहे. त्याप्रमाणें आपल्या आप्तांविषयींहि त्यांना विलक्षण ममत्व वाटतें. ते बारा महिने गर्दींत असतात आणि तरीहि आपल्या निकटच्या आप्तांचे व मित्रांचे वाढदिवस ते कधींहि विसरत नाहींत. त्या त्या दिवशीं त्या त्या व्यक्तीला भेट म्हणा किंवा अभीष्टचिंतन म्हणा, जायचेंच. त्यांच्या वडील भगिनी श्रीमती विजयालक्ष्मी पंडित या पहिल्या हिंदी प्रांतिक मंत्री व पहिल्या हिंदी परराष्ट्रीय वकील म्हणून गाजल्या आहेत. दुसऱ्या सौ. कृष्णा हाथींसिंग. यांची साधी व सरळ लेखणी आतां सर्वांच्या परिचयाची आहे. त्यांची एकुलती एक कन्या इंदिरा ही तर पंडितजींच्या डोळ्यांतली बाहुली असावी यांत नवल नाहीं !

**" तेरे साँसों का निस्यंदन**
**मेरे तत हृदय का चंदन "**

असेंच आज पंडितजींच्या एकाकी जीवनांत इंदिरेचें अनन्य स्थान आहे. भगिनी, कन्या आणि त्यांचीं गृहल्तें यांच्यांत पंडितजी नेहमीं रमून जातात. इतर जवळचे नातेवाईक व मित्र यांच्याहि सान्निध्यांत आपलें महान् स्थान विसरून एखाद्या कुटुंबवत्सल माणसाप्रमाणें ते हास्यविनोदांत दंग होतात. पण या सर्वांत एक औदासिन्याची सूक्ष्म छटा मिसळलेली असतेच. एकदां लुप्त झालेला प्रकाश आतां पुन: मिळणार नाहीं अशी एक गूढ हुरहूर त्यांना लागलेली दिसते.

**" आहे मनोहर तरी गमतें उदास ! "**

असें पंडितजींचें जीवन आहे. उदासपणाची ऊब मिळल्यामुळेंच तें मनोहर झालें आहे असें नव्हे; पण उदासीनतेच्या छायेनें त्या मनोहारित्वाला एक विलक्षण उत्कटता व आकर्षण मात्र प्राप्त झालें आहे हें खास.

०००

: ११ :

# टीका-परामर्श

भारताला जवाहरलालांसंबंधीं असीम प्रेम वाटत आहे आणि तें दर दिवशीं वाढत आहे हें अगदीं सत्य आहे. “ माझ्या देशबांधवांनीं माझ्यावर जें प्रेम केलें त्याची परतफेड मला शंभर जन्मांतहि करतां येणें शक्य नाहीं. ” असे सान्-फ्रॅन्सिस्को येथें सद्गदित होऊन पंडितजींनीं उद्गार काढले. पण असें असूनहि या देशांत पंडितजींना विरोध करणारे पक्ष नाहींत किंवा त्यांचा मार्ग अगदीं गुलाबांच्या फुलांनींच मढविलेला आहे असें मात्र म्हणतां येणार नाहीं. उलट काटेकोरपणें पाहिलें तर देशांतले बहुतेक राजकीय पक्ष या ना त्या कारणांनीं नेहरूंवर टीका करीत आहेत असेंच दिसेल. या टीकांचा परामर्श जरूर घेतला पाहिजे. कारण, या टीकांपैकीं पुष्कळशी टीका चुकीची असली तरी कांहीं टीकेंत विचारांना चालना देण्याची शक्ति आहे. शिवाय आजच्या देशस्थितीचाहि विचार त्या टीकांच्या ओघांत येऊन गेला आहे. कांहीं पक्षांच्या व व्यक्तींच्या टीकेंत प्रांजळपणाहि आहे. म्हणून या सर्व टीकांचें संकलित विवरण उद्बोधक ठरणार आहे. नेहरूंची भूमिका अधिक स्पष्ट कळण्यासहि त्याची मदतच होईल.

हिंदुमहासभावादी मंडळींची टीका प्रथम विचारांत घेऊं. वास्तविक टिळक, लजपतराय यांच्या झुंजार व सांस्कृतिक राष्ट्रवादांत वाढलेली जी महासभावादी मंडळी आहेत त्यांना नेहरूंसारख्या महान् देशभक्ताचें सादर कौतुकच वाटलें पाहिजे. ‘**यासाठीं केला होता अट्टाहास**’ असें आनंदानें म्हणत या लोकांनीं नेहरूंच्या मागें उभे राहिला पाहिजे. आपला देश स्वतंत्र झाला, त्याला

राष्ट्रपण आलें, त्याचा ध्वज, तिकिटें, नाणीं, घटना सर्व कांहीं स्वतंत्र तयार झालीं आणि परदेशांत आपल्या या राष्ट्रनेत्याचा अपूर्व गौरव होऊं लागला, हे काय अभिमानाचे विषय नाहींत? महासभेंतला एक प्रगतिपर वर्ग या सर्व गोष्टींनीं जरूर उल्हसित होतो. पण एकंदर महासभावादी मंडळी नेहरूंच्या माहात्म्यानें तल्लीन होऊन निःसंकोचपणें रसग्रहण करण्यास बरींच कचरतात असें दिसतें! जातीय संस्थांवर, विशेषतः महासभेवर, नेहरूंनीं पूर्वी केलेले हल्ले या नव्या राजवटींतहि कदाचित् हे लोक विसरूं शकत नसतील. मुसलमानांबाबतचें नेहरूंचें उदार धोरणहि त्यांना आवडत नसावें. हा थोर देशभक्त व त्यागी नेता आहे हें खरें; पण याचें मन दुसऱ्या जमातीशीं कठोर न होण्याइतकें उदार व कोमल आहे याची आमच्या हिंदुसभावाद्यांना खंत वाटते! नेहरूंची आंतरराष्ट्रीय दृष्टि या लोकांना परवडत नाहीं. साध्यसाधनांची शुचिता व सुसंगति ठेवली पाहिजे आणि अहिंसा हाच श्रेष्ठ मानवधर्म आहे हा नेहरूंना वाटणारा विश्वास प्रसिद्ध आहे. पण महासभामंडळींचा याहि बाबतींत नेहरूंशीं मतभेद असावासा दिसतें. मौज अशी कीं, या तात्त्विक चर्चेंत धर्माभिमुख महासभानेते पुष्कळदां जडवादी कम्युनिस्टांची कठोर व्यवहारी भाषा बोलूं लागतात!

महासभा आणि तिचीच सहोदर रा. स्व. संघाची संघटना यांना भारतीय संस्कृतीविषयीं विलक्षण प्रेम आहे आणि त्या संस्कृतीला विश्वव्यापी स्वरूप देणें हें या संस्थांचें ध्येय आहे असें मानलें जातें. या संस्थांना यामुळें तरी नेहरूंच्या जीवनकार्याचा गौरव वाटायला हरकत नाहीं असें प्रथमदर्शनीं वाटेल. कारण, नेहरूहि भारतीय संस्कृतीचे उपासक आहेत, आणि 'भारताचा शोध' या आपल्या पुस्तकांत आपली श्रद्धा त्यांनीं सविस्तर रीतीनें बोलून दाखविली आहे. त्यांच्या अमेरिकेच्या दौऱ्यांत जवळ जवळ प्रत्येक महत्त्वाच्या भाषणांत या श्रद्धेचे पडसाद उमटले. पण असें असूनहि महासभा, विशेषतः रा. स्व. संघ ही संस्था आणि नेहरू यांच्यामधून आज विस्तव जात नाहीं! याचें कारण या संस्था आणि नेहरू यांच्या भारतीय संस्कृतिसंबंधींच्या दृष्टिकोणांतला फरक होय. हिंदुस्थानांत आलेल्या अनेक प्रमुख जमातींनीं, मुसलमानांनींसुद्धां, भारतीय संस्कृतींत विविधतेचे रंग भरले आहेत. ही दृष्टि महासभा व संघ यांच्या तत्त्वप्रणालींत बसण्यासारखी नाहीं. जंगली जमातीच्या देवांनासुद्धां आपल्या

देव्हाऱ्यांत नव्या व सुबक मूर्तीच्या रूपानें स्थान देणारी विशाल मानवतावादी संस्कृति नेहरूंना हवी आहे, हें मागें सांगितलेंच आहे.

भारतीय संस्कृतीचे आमचे जातिनिष्ठ प्रचारक नेहरूंना दूरचे मानतात, तर एम्. एन्. रॉयसारखे जगविख्यात तत्त्वचिंतक व त्यांचे व्युत्पन्न अनुयायी नेहरूंना भारतीय संस्कृतीच्या प्रतिगामी गटाचे सोयरे समजतात ! ! नेहरूंच्यावरील आपल्या पुस्तकांत रॉयनीं विवेकानंद, टिळक, गांधी इ. प्रतिगामी व पुनरुत्थान-वादी ( Revivalist अर्थात् रॉयच्या मतें ! ) नेत्यांच्या मालिकेंत नेहरूंना गोंवलें आहे. " गांधी हे हिंदी राष्ट्रवादाचे नेते आहेत तर नेहरू राष्ट्रीय समाज-वादाचे नेते होत. आणि राष्ट्रीय समाजवाद म्हणजेच नाझीझम् " अशी रॉय-साहेबांची तर्कपद्धति आहे. अर्थात् राष्ट्रीय समाजवाद्यांच्या धोरणास अनुसरून पूर्वेतिहास, संस्कृति यांवर नेहरू भर देतात आणि त्यांचें राष्ट्रप्रेम व संस्कृति ही नाझींप्रमाणें लढाऊ आहे. यांतुनच कदाचित् उद्यांचें महायुद्धहि निघेल ! राष्ट्र हेंच सर्वस्व मानणें म्हणजे युयुत्सु वृत्तीला चक्क पोषण देण्यासारखें आहे. कारण, दुसऱ्या राष्ट्राचें निर्दालन करूनच कुठलेंहि राष्ट्र जिवंत राहात असतें. हिटलेर-मुसोलिनीच्या राष्ट्रप्रेमानें जसें दुसरें महायुद्ध पेटलें तसेंच नेहरूंच्या राष्ट्रप्रेमानें कुणीं सांगावें, तिसरें महायुद्ध पेटेल ! नेहरूंचा समाजवाद हा परंपरागत राष्ट्र-वादच आहे. आज जुनी राष्ट्रवादाची भाषा त्रस्त व असंतुष्ट लोकांचें समाधान करण्यास अपुरी पडूं लागली म्हणून नवी पुरोगामी भाषा बोलणारा, पण मनानें जुनाच असलेला एक नेता भांडवलशाहीनें मतलबासाठीं जनतेपुढें उभा केला. तो नेता जवाहरलाल नेहरू हा होय, अशी रॉयसाहेबांची विचारसरणी आहे. आणि त्यांच्या प्रभावळींतले लोक याच विचारसरणीचे स्पष्टास्पष्ट ध्वनि आपल्या भाषण-लेखनांत उमटवीत असतात ! पण रॉयसाहेबांना नेहरूंबद्दल थोडेंफार ममत्वहि आहे. " नाझीवादांतल्या क्रूर गोष्टी नेहरूंना मुळींच पटणार नाहींत, कारण ते सुसंस्कृत आहेत. " असें एक लहानसें शिफारसपत्र मानवेन्द्रबाबूंनीं पंडितजींना बहाल केलें आहे. आपल्या नेत्याला नेहरूंबद्दल वाटणारा हा ओलावा माजी व आजी रॉयवाद्यांनींहि पत्करला आहे हें मात्र मान्य केलें पाहिजे !

नेहरूंच्यावर टीका करतांना रॉयनीं आपल्या लोकोत्तर बुद्धीनें विपर्यस्त विधानांची जी उतरंड रचली आहे, ती तडाख्यानें खालीं आणण्यास एका ग्रंथाची अक्रम काठीच तयार करावी लागेल. पण तिच्या अभावीं आज रॉयच्या टीके-

त्तला खोलपणा थोडक्यांत सूत्रबद्ध रूपानें सांगावा लागत आहे. तसें पाहिलें तर नेहरूंच्या लेखन-भाषणाच्या अफाट संसारांत रॉयनीं केलेल्या सर्व विपर्यासाला चोख उत्तरें घेऊन गेलीं आहेत. नेहरूंनीं राष्ट्रीय समाजवादाचा प्रचार कधींच केला नाहीं. राष्ट्रवाद हा समाजवादाभिमुख असावा आणि अखेर त्याची परिणति समाजवादांत व्हावी हें नेहरूंचें सांगणें होतें. कुठलेंहि तत्त्व हें सर्वत्र व सर्वकाळ पुरोगामी किंवा प्रतिगामी असूं शकत नाहीं हें मार्क्सवादांतलें मुख्य तत्त्व आहे. जर्मन राष्ट्रवाद (नाझीवाद) जन्माला आला तो भांडवलशाही टिकविण्याच्या धडपडींतून जन्मला; अर्थात् त्याचें स्वरूप प्रतिगामी होतें. उलट, हिंदी राष्ट्रवाद साम्राज्यवादाला उखडून टाकण्याकरितां सरसावला म्हणून तो प्रगतिपर आहे. म्हणूनच या दोघांत कसलेंहि सारखेंपण नाहीं. यावरून पंडितजींच्या सात्त्विक व सुसंस्कृत डोक्यावर प्रतिगामी हिटलेरच्या जावळाचा टोप बसविण्याचें रॉय-महाशयांचे प्रयत्न किती फोल आहेत हें कळून येईल.

गांधीजींच्या प्रतिगामी राष्ट्रवादाचे नेहरू हे वारस आहेत असें रॉयनीं म्हटलें आहे. अगोदर गांधीजींचा राष्ट्रवाद हा संकुचित नव्हता; आणि नेहरूंनीं गांधी-जींच्या शिकवणींत आधुनिक दृष्टीला प्रतिगामी दिसणारा कांहीं भाग कधींच स्वीकारला नव्हता, हें मागें सांगितलेंच आहे. गांधीजींच्या तत्त्वज्ञानांत मुख्यतः माणुसकी व हृदयाचा विशालपणा यांचा जो जाज्वल्य प्रत्यय येत असे तो नेहरूंनीं आपल्या आचरणांत प्रकर्षानें आणला आहे. गांधीजी जीर्ण परंपरेचे रक्षण करणारे स्थितिप्रिय पुरुष असते तर त्याच परंपरेंतल्या एका मारेकऱ्याच्या गोळ्यांना कशाला बळी पडले असते ! रॉयनासुद्धां हें सत्य शेवटीं उमगलें असावें. कारण, गांधीजींवर रॉयनीं जो अप्रतिम मृत्युलेख लिहिला होता त्यांत गांधीजींचा मानवतावादी दृष्टिकोणच त्यांचा बळी घेण्यास कारण झाला असें रॉयनीं सूचित केलें आहे. म्हणजे "नवमानवतावादाच्या" या प्रेषितानें गांधीजींना पूर्वींच्या दोषारोपांतून मुक्त केलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आतां गांधीजींच्या वारसालाहि मानवेन्द्रबाबू त्याच उदारदृष्टीनें दोषमुक्त करतात कीं काय तें पाहायचें.

कम्युनिस्ट पक्ष हा नेहरूंचा सर्वांत मोठा टीकाकार असावा हें कुणालाहि कळण्यासारखें आहे. नेहरूंचा ऋजु व अहिंसावादी दृष्टिकोण या तमोगुणी पक्षाला कसा मंजूर व्हावा ? तसें पाहिलें तर हिंदी कम्युनिस्टांच्या धर्मभूमीनें (रशियानें) किसान-कामगारांसाठीं केलेली भव्य कामगिरी व एक नवसमाज-

रचनेसाठीं चालविलेले अफाट प्रयत्न यांचें नेहरूंना सादर आकर्षण आहे. मार्क्सनें मानवी इतिहास उकलण्याचें अजब तंत्र शोधून काढलें हें ते कबूलच करतात. पण एकपक्षाची म्हणजेच कम्युनिस्ट पक्षाची हुकूमशाही झाली तरच जनतेचा उद्धार आहे असें मात्र नेहरू मानीत नाहींत. आणि कम्युनिस्टांच्या (अ)धर्म-वेड्या वृत्तीला नेहरूंचा याचसाठीं राग येतो! नेहरूंनीं सर्वपक्षीय सरकार बनविलें यामुळें प्रथम कम्युनिस्टांचा कपाळशूळ उठला! राष्ट्र बाल्यावस्थेंत असतांना सर्व थरांना प्रतिनिधित्व देऊन त्याचा सर्वांगीण विकास करायला पाहिजे हें नेहरूंचें उदार धोरण कम्युनिस्टांना मंजूर नव्हतें. स्वातंत्र्यप्राप्तिनंतर प्रथम नेहरू सरकारला पाठिंबा द्यावा असें हा पक्ष म्हणत असे. पण मग कुठून कळ फिरली न कळे, पण हिंदी कम्युनिस्ट पक्षांतील रणदिवे-गटाच्या नेहरू-सरकार विरोधी 'थीसिस्'-चा जय झाला; आणि आज नेहरू-सरकार भस्म करण्यासाठीं असंतोषाच्या ज्वाला चहूंबाजूंनीं पेटविण्याचा हा पक्ष प्रयत्न करीत आहे! जगाच्या राज-कारणांत अमेरिका व रशिया असे दोन पक्ष पडले आहेत. या पक्षांपैकीं अमेरिकेच्या पक्षांत हिंद सामील करण्याचें नेहरूंचें धोरण आहे; आणि अमेरिका ही जगाची सावकार असल्यानें हिंदवरहि भांडवलशाहीचाच वरचष्मा राहील आणि हिंदी जनतेचें दारिद्र्य व दुःख कमी न होतां वाढतच जाईल. पंडितजींनीं देशांतील उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण तात्काळ करणें शक्य नाहीं असें सांगितलें असल्यानें भांडवलशाहीकडे असलेला त्यांचा कल स्पष्ट होतो, असें कम्युनिस्ट टीकेचें स्वरूप आहे.

विकसनशील अशा लोकशाहीवर श्रद्धा नसल्यामुळेंच कम्युनिस्टांनीं हा एकांडेपणाचा विरोध चालविला आहे. नेहरू कदाचित् प्राचीन भारतीय परंपरेच्या दास्यांत गुंतलेले असतील, पण म्हणून कम्युनिस्ट आपल्या भवितव्याचे रचनाकार होण्यास मोकळे आहेत असें थोडेंच आहे! ते मॉस्कोच्या शृंखलांत अडकून पडले आहेत! आज जागतिक दैन्यामुळें असंतोषाचा भडका वाढविण्यास परिस्थिति फार अनुकूल आहे हें खरें! पण भलींबुरीं साधनें वापरून अराजक माजविलें तर नेमके पुरोगामी लोकच राज्यारूढ होतील असें थोडेंच आहे! ज्या नेहरू-सरकारला कम्युनिस्ट 'प्रतिगामी' म्हणतात, त्याहूनहि 'प्रतिगामी' लोक कदाचित् सत्ता बळकावून बसतील. आणि मग झाली आहे एवढीहि देशाची प्रगति खतम होईल! पण अंदाधुंदी माजवून

आपण सत्तारूढ होऊंच होऊं असा बेफाम विश्वास बाळगणाऱ्या या आधुनिक 'एकेश्वरी' पंथाला समंजसपणाच्या गोष्टी पटविणें ब्रह्मचालहि शक्य होणार नाहीं ! !

नेताजींच्या पुण्याईवर जगलेला पुरोगामी गट नेहरूंचा एके काळीं कांहींसा चाहता होता. नेताजींच्या आझाद हिंद सेनेचा पक्ष घेण्यास मोठ्या हिरिरीनें नेहरू पुढें सरसावले. आझाद हिंद सेनेच्या तिघां सेनानींच्या बचावासाठीं धूळ खात पडलेला आपला बॅरिस्टरीचा झगा नेहरूंनीं अंगावर चढविला ! यामुळें कदाचित् असेल, पण कृतज्ञतेच्या पोटीं पुरोगामी नेते पंडितजींबद्दल आदबीनें बोलत. पण अलीकडे त्यांनींहि साम्यवादाची भाषा काढून पंडितजींना विरोध करण्यास सुरुवात केली आहे. नेताजींचे 'बोरोदादा' शरच्चंद्र यांनीं तर २८ पक्षोपपक्षांची एक जंगी आघाडी नेहरूंवर मात करण्यासाठीं उभी केली आहे ! या २८ पक्षांच्या अस्तित्वाची दखल जनतेला पहिल्यानेंच लागत आहे ! तसें पाहिलें तर खुद्द पुरोगामी गटाचा संसारच आज तिभंगला गेला आहे. रुईकरांचा स्वयंभू-पुरोगामी गट वेगळा, आणि शीलभद्र याजींचा कम्युनिस्टप्रेमी पुरोगामी गट वेगळा. शरच्चंद्रांची 'अठ्ठाविशी' आघाडी अलगच आहे ! नेताजींच्या अस्तित्वाबद्दल मधून मधून नव्या रंगीबेरंगी वावड्या उडवून आपल्या अस्तित्वाची जाणीव जनतेला देत राहणें एवढाच या सर्व पुरोगामी उपगटांचा आजचा कार्यक्रम दिसतो. पण नेहरूंना विरोध करण्याचे बाबतींत मात्र त्यांचें मतैक्य आहे. आणि त्या विरोधाचे मुद्दे त्यांनीं कम्युनिस्टांपासून उसने घेतले आहेत.

आमच्या महाराष्ट्रांत जन्माला आलेला झुंजार शेतकरी-कामकरी पक्ष हा नेहरूंचा एकपरीनें विरोधकच आहे. याच्याहि विरोधाचें स्वरूप कांहींसें कम्युनिस्ट पक्षाशीं जुळणारेंच आहे. नेहरू जातीयवादाचे कट्टे विरोधक आहेत याचा या पक्षाला संतोष दिसतो. तसेंच व्यक्तिशः नेहरूंचा प्रांजलपणा व सरळपणा या पक्षाच्या नेत्यांना आदरणीय वाटतो, पण "नेहरूंचें मन भांडवलशाहींत गुंतलेलें आहे; दिल्लीच्या सिंहासनावर शेतकरी बसेल आणि नेहरू त्याचे चिटणीस होतील तेव्हांच खरें लोकराज्य प्रस्थापित होईल." असें या पक्षाचे कांहीं प्रवक्ते म्हणतात !

आतां एकाच पक्षाच्या नेहरूंवरील टीकेचा विचार करायचा आहे. तो पक्ष

म्हणजे समाजवादी पक्ष होय. या पक्षानें नेहरूंवर क्षोड उठविलेली पाहिली म्हणजे माझें मन विषण्ण होऊन जातें! कारण, आज समाजवादी पक्षाइतका ऋणानुबंधानें व तत्त्वज्ञानानें नेहरूंना जवळचा पक्ष दुसरा कुठलाच नाहीं. सायमन बहिष्कारपर्वांत तरारलेली युवकसंघाची चळवळ ही या पक्षाची 'गंगोत्री' होय. आणि ती चळवळ तर सर्वस्वीं नेहरूंच्या स्फूर्तीनें व मार्गदर्शनानेंच बहराला आली होती. दक्षयज्ञाचा विध्वंस करण्यासाठीं भगवान् शंकरांनीं ज्याप्रमाणें आपल्या जटेंतून वीरभद्र निर्माण केला, त्याप्रमाणें देशांत मूळ धरूं पाहणाऱ्या सनदशीर राजकारणाचा बीमोड करण्याकरितां नेहरूंनीं युवकसंघाला जन्म दिला. म्हणून समाजवादी पक्षाचे स्फूर्तिदातेच नव्हे, तर जन्मदातेच नेहरू होत असें म्हणण्यास हरकत नाहीं. नेहरूंवरील आत्यंतिक भक्तीनें मी हें विधान करतों असें नाहीं. मुंबई येथें भरलेल्या ऑ. इं. कॉं. कमिटीच्या एका बैठकींत समाजवादी पक्षाचे अध्वर्यु साथी जयप्रकाश नारायण कृतज्ञतापूर्वक म्हणाले होते कीं, "आम्ही आज दोन पायांवर उभे आहोंत याला कारण पंडित नेहरूच होत." समाजवादी पक्षाच्या जन्मापासून त्यांच्या कांहीं सदस्यांना कॉंग्रेस वर्किंग कमिटींत स्थान देण्याचा नेहरू आग्रह धरीत. १९४२ ची जी चळवळ समाजवादी पक्षानें चालविली, तींत कॉंग्रेसच्या अहिंसावादी धोरणाच्या मर्यादांचें कांहींसें उल्लंघन झालें होतें. पण राष्ट्राच्या स्वाभिमानाला व स्वातंत्र्यप्रेमाला समाजवाद्यांनीं उद्गार दिला. यानें संतुष्ट होऊन नेहरूंनीं कारामुक्त होतांच त्या 'ऑगस्टवीरां'ना धन्यवाद दिले. या व अशा अनेक गोष्टी आहेत कीं, ज्यायोगें नेहरू व समाजवादी पक्ष यांचें सामरस्य सहज सिद्ध करतां येईल.

पण हें सामरस्य केवळ वैयक्तिक ऋणानुबंधाचें आहे असें नाहीं. याहून त्यांत अधिक खोलपणा आहे. 'नेहरू-वाद' असा एखादा तात्त्विक पंथ नाहीं. पण एवढें मात्र खरें कीं, नेहरूंनीं आपल्या अतुलनीय कामगिरीनें जगांतील दोन महान् तात्त्विक पंथांचा समन्वय साधला आहे. मार्क्सवाद आणि गांधीवाद या दोन तत्त्वज्ञानांतलें जें 'श्रीमत्' आणि 'ऊर्जित' आहे तें नेहरूंच्या कामगिरींत एकवटून एक नवेंच तत्त्वज्ञान या भूमींत निर्माण झालें आहे. या नव्या तत्त्वज्ञानांत मार्क्सवादांतला विज्ञानवादी दृष्टिकोण आहे, त्याप्रमाणें गांधीवादांतील साध्यसाधनशुचिता आहे; लोकसत्ता आहे त्याप्रमाणें व्यक्तिविकास आहे. थोडक्यांत म्हणजे गांधीवाद आणि मार्क्सवाद यांचा हा प्रीतिसंगम आहे.

आणि नेहरूंच्या कामगिरींतला हा प्रीतिसंगमच समाजवादी पक्षाच्या ध्येय-कल्पनेंत झालेला दिसतो. म्हणूनच मीं वर म्हटलें कीं, नेहरू व समाजवादी पक्ष यांचे ऋणानुबंध केवळ वैयक्तिक स्नेहसंबंधाचे नाहींत, तर तात्त्विक एक-रूपतेचे आहेत. आणि म्हणूनच या पक्षाचा व नेहरूंचा तंटा यावा या गोष्टीचा विषाद वाटल्यावांचून राहात नाहीं.

नेहरूंनीं सरकारी राज्ययंत्र सोडून बाहेर यावें, त्यावांचून आपल्या पुरोगामित्वाला आकार देण्याचें सामर्थ्य नेहरूंना येणार नाहीं असें समाजवादी म्हणतात. नेहरूंनीं पंतप्रधानपद सोडलें तर त्या सरकारची काय अवस्था होईल हा चिंतनीय प्रश्न आहे. आज नवें हिंदी राष्ट्र उध्वस्त करायला देशीविदेशी केवढ्या तरी आसुरी शक्ति गुप्त वा प्रकट रीतीनें प्रयत्न करीत आहेत. या शक्ति बऱ्याच अंशीं जरबेंत ठेवण्याचें काम आजचें सरकार करूं शकत आहे. नेहरूंनीं या सरकारचें धुरीणत्व सोडलें आणि तें कमकुवत झालें तर या आसुरी शक्ति केवढा प्रलय मांडतील ! याच कारणाकरितां थोडीं कळ सोसून आणि अप्रिय गोष्टींना बगल देऊन पंडितजी राजदंड आपल्या हातांत कायम ठेवीत आहेत.

पण नेहरू राज्ययंत्राबाहेर आले तरच जनतेची पुरोगामी शक्ति अमर्याद वाढेल, आणि मग त्या प्रचंड लढ्यांत देशीविदेशी हितशत्रु पार दिगंतराला वाहून जातील असा समाजवाद्यांचा कयास असेल, तर कांहीं बिघडत नाहीं. या कयासाप्रमाणें नेहरूंनीं सरकारी नेतृत्वाचीं वस्त्रें उतरावीं असा आग्रह नेहरूंना करण्याचा समाजवाद्यांना जरूर हक्क आहे. पण तो हक्क बजावण्याचें सोडून 'नेहरू समाजवादी आहेत काय ?' असा पंचनामा माझ्या कांहीं समाजवादी मित्रांनीं मांडावा याचें मला सखेदाश्चर्य वाटतें ! ! **"न्याय करूं नका, कारण न जाणो कदाचित् तुमचाच न्याय केला जाईल."** असें येशू ख्रिस्ताचें वचन आहे. या वचनाची आठवण माझ्या प्रिय साथी स्नेह्यांना यावीशी वाटते. हें 'नारायणास्त्र' कदाचित् साथी लोकांवरच उलटण्याचा संभव आहे. नेहरूंपासून समाजवादाची स्फूर्ति घेणारांनीं तरी असला अंगलट येणारा अनादराचा व्यापार करूं नये हें सुसंस्कृतीस धरून नाहीं काय !

पंडित नेहरूंनीं आपली स्वतःची अशी संघटना केली नाहीं, लोकप्रियतेच्या प्रवाहांत उलट दिशेनें हात मारण्याचें सामर्थ्य नेहरूंत नाहीं, इ० कांहीं मुद्दे समाजवादी आज काढीत आहेत. पायाभरणीपासून नवेंच घर बांधणारा हा

जुनें घर विकत घेणाऱ्यापेक्षां अधिक पराक्रमी हें खरें आहे. काँग्रेसची आयती संघटनाच नेहरूंनीं वापरली आणि सरकारी चौकटहि त्यांना सहजच मिळाली यांत शंका नाहीं. पण या दोन्ही संघटनांना नेहरूंनीं नवें बळ व नवें तेज दिलें हें विसरून चालणार नाहीं. आज तर या संस्थांचें सौभाग्य नेहरूमुळेंच टिकलें आहे. या संस्था सुटल्या तर आपण निराधार होऊं या भीतीनें नेहरू या संस्थांना चिकटून आहेत असें समजण्याचें कारण नाहीं.

पण समाजवादी मित्रांनीं आज नेहरूंशीं असे दोन हात चालविले असले तरी पंडितजी व समाजवादी पक्ष यांच्यांत कधीं न भरून येण्यासारखी दरी पडेल असें मला वाटत नाहीं. समाजवादी मित्रांना जगांतील दोन परस्परविरोधी गटांत सामील न होतां स्वतंत्र राहण्याचें पंडितजींचें धोरण मान्य आहे. कलकत्त्याला बेसावधपणें व गाफलतीनें झालेला प्रकार सोडला तर नेहरू-विरोधी निदर्शनांत समाजवादी पक्ष कुठें सामील झालेला दिसत नाहीं. नवी घेऊं घातलेली राज्यघटना बरीच लोकाभिमुख आहे व ती वापरून शांततेनें सत्तांतर करावें असें समाजवादी नेते बोलतात. नेहरूंच्या महानुभावित्वावरचा त्यांचा विश्वास साफ उडालेला नाहीं. ' नेहरू सरकारी धुरीणत्व करीत आहेत तोंवर सरकारविषयीं आम्ही पूर्ण निराश होत नाहीं ' असें अरुणादेवी म्हणतात.

> " राष्ट्रसंघामध्यें हिंदुस्थानला मानाची ' मानवी ' पदवी मिळवावयाची असेल तर गांधीजींना ज्या संस्कृतीचें दर्शन घडलें होतें आणि जिचा घोष पंडितजी वारंवार करीत असतात त्या संस्कृतीचें हिंदुस्थान भाजन बनला पाहिजे, वाहन बनला पाहिजे. भारताला नवयुगाचा ध्वजधारी बनविण्याचा प्रयत्न करण्यानेंच पंडितजींच्या आयुष्याला कृतार्थता येणार आहे......पंडितजींचें उर्वरित आयुष्य या कार्यासाठीं खर्च व्हावें अशीच इच्छा कोणीहि व्यक्त करील. कोणीहि अशीच अपेक्षा करील, कीं आज देशांत ज्या राक्षसी शक्ति मोकाट सुटल्या आहेत, त्यांचें निर्दालन करण्याचें वज्रसामर्थ्य पंडितजींच्या ठिकाणीं यावें. "*

* पंडित नेहरू : इंद्रवज्र कीं इन्द्रचाप ?—ले. ना. ग. गोरे [ ' नवभारत ' नोव्हेंबर १९४९ ]

माझ्या समाजवादी प्रिय मित्रांना पंडितजींविषयीं अजून असलेल्या या सद्भावनेमुळें मला त्यांच्या पक्षाच्या व देशाच्या भवितव्याबद्दल आशा वाटूं लागते.

पंडितजींना या देशांतल्या जुन्यानव्या पक्षोपपक्षांचा कसा विरोध आहे याचा हा ताळेबंद आहे. यांतले बरेच पक्ष एकमेकांना खाऊं का गिळूं असें करणारे आहेत ! पण नेहरू-विरोधाचा सर्वांचा कार्यक्रम कांहीं अंशीं सारखा आहे. विशेषतः 'नेहरू भांडवलवाल्यांच्या गोटांत शिरले आहेत, ब्रिटिश राष्ट्रकुलांत भारताचा पाय अडकवून त्यांनीं देशाची परागति केली, आणि त्यांचा चांग कै शेक होणार' हें तर सर्व पक्षांचें वृंदगीत आहे ! नाटकांत प्रथमपासून काम केलेलीं पात्रें एकमेकांच्या परस्परविरोधी भूमिका विसरून एकच भरतवाक्य म्हणायला येतात, त्याप्रमाणें वरील आक्षेपांत अनेक लहानमोठे पक्ष पुढें येऊन तारस्वरानें आपला सूर मिळवितात. या आक्षेपांत तथ्य असेलहि. पण काय म्हटलें जातें इतकेंच, कोण म्हणतें यालाहि महत्त्व नाहीं काय ?

मात्र, इतका विरोध असूनहि पंडितजींच्या लोकप्रियतेला वध पक्ष माहीत नाहीं. ती सारखी वाढतच आहे. दररोज सूर्याच्या उष्णतेनें पाण्याची वाफ होत राहिली तरी समुद्र सदा भरलेला व उफाळलेलाच दिसतो. राजकीय वा सांस्कृतिक पक्षांनीं व नेत्यांनीं तात्त्विक-अतात्त्विक विरोधाच्या फैरी झाडल्या तरी नेहरूंची लोकप्रियता रतिमात्र कमी होत नाहीं; आणि प्रतिपक्षांनीं टीकेची राळ उडवूनहि नेहरूंची उदारमनस्कता ढळली नाहीं. हिंदुमहासभेचे कार्याध्यक्ष त्यांनीं आपल्या मंत्रिमंडळांत घेतले, रॉयच्या 'लोकयोजने'ची तोंड भरून स्तुति केली; रा. स्व. संघावरील बंदी उठविली; कम्युनिस्ट पक्षानें गळ्याला तात लावली असूनहि तो पक्ष अद्यापि बेकायदा ठरविला नाहीं; पुरोगामी गटाच्या वाक्प्रहाराला त्यांनीं उलट दुरुत्तरें केलीं नाहींत; आणि समाजवादी नेते साथी जयप्रकाश नारायण यांना या देशाचें भवितव्य घडविण्यांत फार मोठी कामगिरी करावयाची आहे, अशी त्यांची कौतुकपूर्ण प्रशंसा आपल्या आकाशवाणींतील वक्तव्यांत केली ! आपल्या टीकाकारांना इतक्या उदारतेनें वागवून आपल्या थोर पातळीवर स्थिर राहिलेल्या या महापुरुषाची महति कशी वर्णावी ? 'या सम हा' या अनन्वय अलंकाराचाच उपयोग या ठिकाणीं करावा लागणार ?

० ० ०

## : १२ :

# समारोप

**फुलेर मतन आपनि फुटाओ गान**
**हे आमार नाथ ! एइ तो तोमार दान***

**—रवीन्द्र**

ता. १४ नोव्हेंबर १९४९ रोजीं पंडित जवाहरलाल नेहरूंना साठ वर्षें पूर्ण झालीं. त्यांना एकसष्टावें वर्ष लागलें, आणि त्याच दिवशीं त्रिखंड गाजलेला आपला अमेरिकेचा दौरा संपवून ते परत आले. खरोखर, आपल्या हीरक-महोत्सवाच्या दिवशीं एवढ्या अतुल ऐश्वर्यानें व यशानें कृतार्थ होण्याचें भाग्य आजवर फार थोड्यांना मिळालें असेल ! प्रसिद्धीचे सारे देदीप्यमान विद्युद्दीप इतक्या मोठ्या प्रमाणांत इतर कुणा नेत्यावर क्वचितच पडले असतील ! अमेरिकेंत ५० वर्षांपूर्वी श्रीमत् स्वामी विवेकानंद जगद्धर्म-परिषदेस गेले त्या वेळीं त्यांचा फार मोठा गौरव झाला व अमेरिकन लोक त्यांच्या रुबाबानें, विद्वत्तेनें व कळकळीनें भारून गेले. विवेकानंदांचा अमेरिकेंतला सत्कार हा भारताला अभिमानास्पद विषय झाला यांत शंका नाहीं. पण स्वामीजी हे धार्मिक प्रवक्ते म्हणून तेथें गेले होते. त्यामुळें त्यांच्या स्वागताला अर्थात् मर्यादा पडल्या होत्या. शिवाय भारत त्या वेळीं परतंत्र होता. प्रसिद्धीचीं साधनेंहि आजच्याइतकीं प्रभावी नव्हतीं हेंहि विसरून चालणार नाहीं. गांधीजींना निमंत्रण असूनहि

* ‘ तुझ्याच कृपेनें फुलाप्रमाणें हें गीत स्फुरलें आहे. हे माझ्या स्वामिन्, हें तूंच दिलेलें दान आहे. ’

अमेरिकेला जातां आलें नाहीं. तरी रे. डॉ. होम्स यांनीं तेथें गांधीजींच्या नांवाची एक संस्था स्थापन केली होती. गांधीजींना जर अमेरिकेला जाणें शक्य झालें असतें तर त्यांचें स्वागत अर्थातच अपूर्व प्रमाणावर झालें असतें यांत संशय नाहीं. पंडित जवाहरलाल नेहरूंची योग्यता जशी मोठी तसा त्यांचा ग्रहयोगहि बलवत्तर ! स्वतंत्र भारताचे मुख्य प्रधान म्हणून प्रे. ट्रुमन यांचेकडून मोठ्या सन्मानपूर्वक त्यांना निमंत्रण आलें. आशिया खंडांतल्या उद्योन्मुख राष्ट्रांचे अनभिषिक्त नेते हा त्यांचा लौकिक तर चोहोंकडे दुमदुमतच होता आणि जगद्वंद्य गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा वारसा त्यांच्याकडे आला होता. यांत त्यांच्या सुसंस्कृत व आकर्षक व्यक्तित्वाची भर पडली. त्यामुळें या आमच्या राष्ट्रनेत्याचें अमेरिकेनें न भूतो न भविष्यति असें स्वागत केलें. दररोज येणाऱ्या त्यांच्या स्वागताच्या वार्तेनें अगोदर झालेला सोहळा फिका ठरे. लंडनलाच नेहरूंना आणण्याकरितां ट्रुमननें आपलें विमान पाठविलें. तेथपासून या अनन्यसाधारण गौरवाची नांदी सुरू झाली. अमेरिकेंत पोंचल्यावर ठिकठिकाणीं तोफांची बाद-शाही सलामी व मानवंदना नेहरूंना देण्यांत आली. संयुक्त संस्थानें व कॅनडा या दोन्ही देशांच्या लोकसभांपुढें त्यांचीं भाषणें झालीं. नगराध्यक्षांनीं सत्कार केले. सॅनफ्रॅन्सिस्कोचें व व्हॅनकुव्हरचें सन्मान्य नागरिकत्व त्यांना अर्पण करण्यांत आलें. व्हॅनकुव्हर येथें विमानांतून त्यांच्यावर पुष्पवृष्टि करण्यांत आली, दोस्तांचे जगविजयी सेनासारंग जनरल आयसेन होअर यांच्या हस्तें कोलंबिया विद्या-पिठानें त्यांना पदवी समर्पण केली. वृत्तपत्रीय मुलाखती झाल्या; रेडिओनें त्यांच्या भाषणाचे कार्यक्रम केले. त्यांच्या भाषणाच्या ध्वनिमुद्रिका घेण्यांत आल्या. गौरवपर लेख, चित्रें, वार्तापट यांची तर गर्दी उडाली. अमेरिकेंत राहणाऱ्या हिंदी लोकांना तर हा जितका आनंदाचा तितकाच अभिमानाचा समारंभ होता. नीग्रोंनीं ' हा खरें पाहतां आम्हां दलित लोकांचा नेता आहे ' असें म्हणून आपणांला अमेरिकन सरकारनें नेहरूंचा सत्कार करण्यांत पुरेसें प्राधान्य न दिल्यानें रुसवा धरला ! आपलें वैभव दाखविण्याऐवजीं नेहरूंना पाहण्यास व ऐकण्यास अमेरिकन सरकार व लोक विलक्षण उत्सुक होते. आपलीच नव्हे तर आपल्या देशाचीहि इभ्रत अशा रीतीनें उंच मर्यादेपर्यंत वाढवून पंडित नेहरू मातृभूमीच्या किनाऱ्यावर पाय ठेवते झाले.

आमच्या हिंदी जीवनाच्या पट्टीनें मापल्यास पंडितजींना आतां वृद्ध समज-

ण्यास हरकत नाहीं. संसारांतील लक्ष काढून मुनिवृत्तीनें राहण्याचा हाच समय होय. अलीकडे त्यांचे नेत्र पैलतीरीं लागले आहेत असा भास कित्येकदां त्यांच्या बोलण्यांतील एखाद्या वाक्यावरून होतो. सरोजिनीदेवींच्या निधनाचे वेळीं त्यांनीं शोकावेगानें काढलेल्या उद्गारांत म्हटलें होतें : “ माझ्या पिढीचे एकेक सेनानी व लोकाग्रणी हळूहळू नाहींसे होत आहेत. ” जाहीर सभेंतूनसुद्धां कित्येकदां ‘ मी आतां थोड्या दिवसांचा पाहुणा आहें ’ असें ते म्हणतात. जीवनाची सांज होऊन लांब सावल्यांनीं प्रकाश हिरावून घेण्यास सुरुवात झाली आहे अशी जाणीव होत असल्याचें त्यांच्या उद्गारांवरून वाटतें.

पण त्यांच्या अनिवार उत्साहावरून व कामाच्या आटोपावरून त्यांना वृद्ध म्हणण्याचें धाडस कोण करील? नवे नवे अनुभव घेण्याविषयींची त्यांची उत्सुकता आणि जीवनाची हौस पाहिली कीं, जवाहरलाल तरुण आहेत असेंच वाटतें. मुंबईच्या गृहमंत्र्यांनीं आपली हातांतली कांठी चंदनाची आहे असें सांगितलें कीं लगेच पंडितजी ती नाकाशीं नेऊन वास घेऊन पाहतील. टेनेसी व्हॅलीच्या तंत्राची माहिती एखाद्या प्रामाणिक विद्यार्थ्याच्या तन्मयतेनें ऐकतील आणि म्हणतील, “ पुनः मी अमेरिकेंत येऊन हें सर्व तंत्र माहीत करून घेणार आहें. ” नव्या फुलझाडापासून उत्तुंग एंपायर बिल्डिंगसारख्या मानवनिर्मित चमत्कारांपर्यंत सर्वांत तत्परतेनें ते लक्ष घालतात. म्हणूनच जवाहरलाल हे आपणांस तरुणच वाटतात. आणि आज त्यांच्या षष्ट्याब्दिपूर्तीच्या समारंभावरहि अशा महोत्सवावर पडणारी एका गंभीर उदासीनतेची छाया पडलेली नाहीं.

आचार्य कृपलानी यांनीं एकदां कॉँग्रेसमधील पक्षोपपक्षांची मोठी मार्मिक चर्चा केली होती. त्या चर्चेत ते म्हणाले होते कीं, “ कॉँग्रेसमध्यें एक जवाहर पक्ष आहे, आणि या पक्षाच्या सभासदांची संख्या फक्त एक आहे! ” पंडित जवाहरलालशिवाय त्यांच्या पक्षाचा दुसरा कुणी सभासद नाहीं. पंडितजी हे आपल्या मताचे एकमेव नेते व अनुयायी आहेत असेंच आचार्यांना म्हणावयाचें होतें; आणि ती गोष्ट बऱ्याच अंशीं खरी आहे. पंडितजी गांधीजींचे सांस्कृतिक वारस आहेत, पण सांप्रदायिक कर्मठ गांधीवादी मात्र नाहींत; समाजवाद भारताला त्यांनींच शिकवला, पण ते कुठल्याहि नरमगरम समाजवादी पक्षाचे सभासद नाहींत; विज्ञानवादी असून भावुक आहेत; खानदानी असून लोकसत्ताप्रेमी आहेत. गांधीजींनीं म्हटल्याप्रमाणें, ‘ त्यांचा राष्ट्रवाद हा त्यांच्या

आंतरराष्ट्रवादाचा एक भाग आहे.' सर्व जगांत एकछत्री लोकशाही व्हावी असें पंडितजींना वाटतें, पण रूक्ष एकसारखेपणा जगांत नसावा असें ते म्हणतात. कारण, विविधतेंतच सौंदर्य व चैतन्य आहे असें त्यांचें मत आहे. राजकारणी असून ते प्रामाणिक आहेत, आणि साहसी असूनहि संयमी आहेत. अशा रम्य विरोधाभासांनीं ज्यांचें जीवन संपन्न झालें आहे त्यांना अनुयायी न मिळावेत यांत आश्चर्य नाहीं. पण 'जवाहरपक्ष' हा कॉंग्रेसमध्यें काय अथवा जगतांत काय, संख्येनें एक असला तरी त्या 'एक' संख्यीय संघटनेचे असंख्य भक्त आहेत आणि त्या संघटनेकडे त्रस्त झालेलें जग विमोचनाच्या आशेनें पाहात आहे.

आजच्या जगांत इतकें अस्वास्थ्य व असुरक्षितता माजली आहे, कीं तिचें वर्णन करणें हजार जिभा असलेल्या शेषालासुद्धां शक्य नाहीं! विश्ववर्चस्वासाठीं चाललेल्या झगड्यांत विज्ञानशास्त्राचें आसुरी साह्य घेण्यांत येत आहे. एका बाजूस लोकशाहीला भांडवलशाहीनें ग्रासलें आहे, तर त्यावर मात करण्यासाठीं निघालेली समता हुकूमशाहीनें जखडून टाकली आहे. रसेलसाहेब म्हणतात :

> "भावनात्मकतेपेक्षां इच्छाशक्तीला प्राधान्य देण्यांत येत आहे. हृदय-परिवर्तनाची जागा जबरदस्तीनें घेतली आहे. शास्त्रीय सत्यापेक्षां प्रचाराला महत्त्व देण्यांत येत आहे. आत्मसंयमाचा उपयोगसुद्धां परलोकांत पुण्याची सांठवण करण्यासाठीं करण्यांत येत नसून, दुसऱ्यावर हुकमत गाजविण्याची शक्ति कमाविण्याकडे होत आहे."

रसेलसाहेबांनीं फॅसिझम्‌चें हें वर्णन केलें असलें तरी फॅसिझम्‌ला गाडूं पाहणाऱ्या कम्युनिस्ट हुकूमशाहींतहि याच साऱ्या गोष्टी आहेत.

एक जबरदस्त रोग जडला म्हणजे त्यांतुन क्रियाप्रतिक्रियात्मक पद्धतीनें आणखी अनेक रोग उद्भवतात. निसर्गावर विजय मिळवून सुखसंपत्ति मिळविण्यासाठीं माणूस निघाला आणि त्यांतूनच आजचीं सारीं दुःखें जन्माला आलीं. सत्ता व संपत्ति यांचें फार प्रचंड प्रमाणावर केंद्रीकरण करण्याच्या माणसांच्या हव्यासामुळें सारी दुर्दशा झाली. आज अमेरिकेजवळ कांहीं निखर्व एवढें सोनें आहे म्हणतात! या पैशाच्या जोरावर जगांतल्या लहानमोठ्या खंक राष्ट्रांना

आपल्या दावणींत अडकवून संपत्तीप्रमाणें सत्तेचेंहि केंद्रीकरण करण्याचा अमेरिकेचा उद्योग सुरू आहे. याच्या उलट स्वातंत्र्योन्मुख राष्ट्रांना गुप्त मदत करून आपल्या 'लाल' तत्त्वज्ञानाची दीक्षा देणें व अशा रीतीनें स्वतःच्या जगाच्या शक्तीचें केन्द्र बनविणें असा सोव्हिएट रशियाचा प्रयत्न आहे! अमेरिकेनें अणुबाँबचें अस्त्र जपानवर सोडून संहार-शास्त्राचा एक नवा विक्रम केला, आणि आजवर तरी 'निर्वीरमुर्वीतलम्' अशा मग्रुरींत अमेरिका वागत होती. पण आतां रशियालाहि हें अस्त्र माहीत असल्याचें प्रसिद्ध झालें! त्यामुळें अमेरिकेचा गर्व कांहींसा खंडित झाला असला तरी तिची चीड व महत्त्वाकांक्षा वाढलीच आहे. अणुबाँबचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन तिनें सुरू केलेलें आहे! जें शास्त्रीय ज्ञान जगांत सुखसमृद्धि करायला व राष्ट्रांना एकत्र आणायला उपयोगी पडायचें तें जगांत अशांततेचें व विनाशाचें तांडव सुरू करण्याचे कामीं वापरलें जात आहे.

अगदीं थोडक्यांत आजच्या भीषण स्थितीचें वर्णन सांगावयाचें म्हणजे भांडवलशाही गट व साम्यवादी गट या दोघांच्या साठमारींत शांततावादी जगाला 'राम' म्हणण्याची पाळी येणार आहे! खासगी मालकीनें दैन्य व दारिद्र्य वाढत आहे हें दिसत असूनहि नाना उपायांनीं माणसांना 'जैसे थे' ठेवण्याची वृत्ति सोडायला व आपलें स्वतः होऊन विसर्जन करून घ्यायला भांडवलशाही तयार नाहीं. अर्थात् यामुळें फार मोठा मानवी समाज दिवसेंदिवस कंगाल बनत चालला आहे. त्याच्या असंतोषाच्या ज्वाला जास्त भडकून आपली आहुति पडण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून भांडवलशाहीनें उदारमतवादाला सरळ फांटा देऊन लष्करी दृष्ट्या अधिक संघटित व समर्थ होण्याचा प्रयत्न चालविला आहे. मार्शल योजनेप्रमाणें अनेकांना अमेरिकेनें दक्षिणा वांटली. २५ कोट लोकसंख्येच्या राष्ट्रांचा एक 'अटलांटिक करार' केला आणि अणुबाँब-निर्मिति वाढविण्याच्या योजनेला ट्रुमननीं मान्यता दिली. यावरून दुसरें काय सिद्ध होतें? याच्या उलट कंगाल होत चाललेल्या मोठ्या मानवसमूहाच्या असंतोषाचा फायदा घेऊन रशिया आपली पोळी भाजून घेत आहे. भांडवल-शाहीच्या मगरमिठींतून आपण लोकांची सुटका जरूर करूं, पण त्यासाठीं कम्युनिस्ट पक्षाची गुलामगिरी पत्करा, ह्या ना त्या मार्गानें ठिकठिकाणीं सरकार उलथून पाडा, असा आदेश रशिया देत आहे! पूर्व जर्मनी, झेकोस्लोव्हाकिया,

चीन इ. देशांतील राशियाचीं अशींच कारस्थानें आहेत. त्यामुळें दुसऱ्या महायुद्धाच्या कुपाल्यांतून लगोलग तिसरें महायुद्ध येणार असें भय वाटूं लागलें आहे !

भांडवलशाही व कम्युनिझम् यांच्या झगड्यांत मुख्य ऱ्हास झाला आहे तो उच्च मानवी मूल्यांचा. उदारमतवादाला आज जागा नाहीं. 'जगा आणि जगूं द्या' याऐवजीं 'जगा आणि त्यासाठीं दुसऱ्याला ठार करा' असा न्याय रूढ होत आहे. पूर्वी वंशभेद व वर्णद्वेष होता. तो तर जीव धरून आहेच, पण त्याच्या जोडीला आतां पक्षद्वेष आला आहे. माझ्या पक्षाचा असेल तोच जगायला लायक ही वृत्ति बळावत आहे. लोकशाहीचें तर दिवाळेंच वाजलें आहे. अमेरिकेंत संपत्तीच्या जोरावर ठरीव पक्ष निवडणुकी जिंकतो. राशियांत एकपक्षीय हुकूमशाही चालते. या दोनहि गटांतल्या इतर देशांची हीच स्थिति आहे ! ( एक इंग्लंड या गोष्टीला कांहींसा अपवाद म्हणतां येईल. ) समाजवादांत खाजगी मालकी गेली, पण खरी लोकसत्ता मात्र आली नाहीं ! भीतीचें वातावरण सर्वत्र पसरलें आहे आणि भयामुळें मानवी मन आज विकृत झालें आहे, भयानें माणसाची प्रसन्नताच नष्ट होते असें नाहीं, तर त्याची नैतिक अधोगतीहि होते. तो अश्रद्ध तरी होतो किंवा अंधश्रद्ध तरी बनतो. संशयाची कीड त्याच्या जीवनाला लागते. उदार मनानें तो विचार करीत नाहीं. आपली सोय पाहून घ्यायची त्याची वृत्ति बळावते, म्हणजेच तो बंधुभावाला पारखा होतो.

या जागतिक विप्लवांत सांपडलेल्या हिंदुस्थानची स्थिति तर अधिकच शोचनीय आहे. पश्चिमेकडील देशांत विज्ञान व त्याबरोबर वाढलेली भांडवलशाही निदान कांहीं दिवस तरी लोकशाहीची वेल फुलवू शकली; पण पारतंत्र्याच्या शापामुळें हिंदुस्थानला तोहि लाभ मिळाला नाहीं. इकडील भांडवलशाही ही पाश्चिमात्य भांडवलशाहीची केवळ दलाल मात्र राहिली ! आज तर हिंदी भांडवलशाहीच्या अधोगतीला व स्वार्थाला सीमाच राहिलेली नाहीं. जग जेव्हां पुढारत होतें त्याच काळांत येथें पारतंत्र्यामुळें सारी प्रगति थंडावली होती. लोकसत्ता, संघटना, कार्यक्षमता, संशोधनशीलता, औद्योगिक भरभराट यांपैकीं कांहींच उबदाऱ्याला आलें नाहीं. आणि आतां पारतंत्र्याचें ग्रहण सुटलें तेव्हां या साऱ्या गोष्टी मिळवण्यासाठीं कंबर कसायची तों जागतिक प्रलयांत हें नवजात भारतराष्ट्र फेंकलें जात आहे !

या जागतिक प्रलयावर उपाय कोणता ? आणि तो कोण करूं शकेल ? अमेरिकेंत पं. नेहरूंनीं जीं जाहीर भाषणें केलीं व मुलाखती दिल्या, त्यांत सांगितलेले ध्येयवादच अखेर मानवजातीला तारणारे आहेत यांत शंका नाहीं. पंडितजींनीं आजवर जें सांगितलें व आचरिलें त्याचा अनुवाद अमेरिकेंतील वक्तव्यांतून केला आहे. पण आशय तोच असला तरी त्याला स्थानमाहात्म्यामुळें म्हणा किंवा नव्या पद्धतीच्या मांडणीमुळें म्हणा, एक प्रकारचें नावीन्य आलें आहे. नेहरूंच्या अमेरिकेंतील वक्तव्याचें सार सूत्ररूपानें पुढीलप्रमाणें सांगतां येईल :

"मी हिंदी जनतेच्या, सरकारच्या व भावी प्रजासत्ताक राष्ट्राच्या सदिच्छा घेऊन अमेरिकेकडे आलों आहें. अमेरिकन लोकांनीं माझें जें अपूर्व स्वागत केलें त्यानें मी अक्षरशः गुदमरून गेलों आहें! पण हा मी माझा बहुमान समजत नाहीं, तर माझ्या राष्ट्राचा व त्या राष्ट्राला राष्ट्रपण देणाऱ्या महात्मा गांधींचा समजतों. पाश्चात्य व पौर्वात्य हे भेद खोटे आहेत. हिंदचा युरोपीय संस्कृतीशींहि संबंध आल्यानें हिंद म्हणजे नव्या-जुन्यांचा संगम होय. एखादें माणूस वा राष्ट्र केवळ वेगळ्या संस्कृतीचें आहे, म्हणून त्याचें आपणाशीं शत्रुत्व आहे असें मानणें चूक ठरेल. शास्त्रीय व यांत्रिक प्रगतीमुळें जागतिक ऐक्याकडे कल झुकत आहे. पण हें ऐक्य स्वेच्छेनें झालें पाहिजे. 'हेंच घ्या, हेंच प्या, असाच विचार करा' अशी सक्ति करून जागतिक ऐक्य साधण्याचा प्रयत्न होणें उचित नव्हे. मानवतेसाठीं व आपापल्या राष्ट्राच्या हितासाठीं पाश्चात्य व पौर्वात्य जगांतील राष्ट्रांना एकमेकांशीं सहकार्य करणें शक्य आहे. जागतिक ऐक्यामुळें व्यक्तिस्वातंत्र्यास मुरड पडतां कामा नये. भारताला दुसऱ्या कुणावर प्रभुत्व गाजविण्याची इच्छा नाहीं. आमच्या ध्वजावरील अशोकचक्र म्हणजे शांतता व सद्भावना यांचें उत्कृष्ट प्रतीक होय. विचार अथवा कृति यांची सत्यापासून यत्किंचितहि फारकत होतां कामा नाहीं हें गांधीजींनीं आम्हांला शिकविलें. हिंदला राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानें त्याचीं अनेक सामर्थ्यें बंधमुक्त झालीं आहेत. आशियांतील इतर राष्ट्रेंहि अशींच स्वतंत्र झालीं पाहिजेत. आशियांतील जागृतीचा सर्व जगानें सहानुभूतीनें विचार करायला हवा. आशियांतील मूलभूत प्रश्न सुटल्याशिवाय जगांत शांतता नांदणें शक्य नाहीं. आंतरराष्ट्रीय राजकारणांतून द्वेष व भीति

यांची हकालपट्टी झाली पाहिजे. सत्य व इभ्रत यांना डावलून कुठलेंहि धोरण तुम्हीं आंखलेंत तर त्याचे भयंकर परिणाम होतील हें ध्यानांत ठेवा! वर्णद्वेष व विषमता हीं कोण आहेत? तर भूतकाळाचीं सन्तानें? त्यांचेमुळें धोका उत्पन्न झाला आहे. तीं समूळ नष्ट झालीं पाहिजेत. अलगपणा, वांशिक असमानता व आर्थिक नड हीं तीन कारणें टाळलीं तरच युद्धाची भीति टळेल. मुत्सद्दी लोक जनतेपासून दूर राहतात, आपल्याच स्वतःच्या संकुचित जगांत राहून ते विचार करतात. म्हणूनच मानवी हितबुद्धीच्या दृष्टीनें त्यांना विचार करतां येत नाहीं! हेंच तर साऱ्या तंट्याबखेड्याचें कारण आहे! माणुसकीची दृष्टि स्वीकारली तर कित्येक अवघड प्रश्न कमालीचे सोपे होतील. ब्रिटनला मीं कर्ज माफ करावें हें कसें शक्य आहे? माझ्या गरीब देशाला खर्चीं घालून हें औदार्य मी कसें दाखवूं?' आग्नेय आशियांत कम्युनिस्ट राज्य स्थापन झालें म्हणून मला भय वाटतें? छे! मुळींच नाहीं. कशाविषयींच भय बाळगण्याचें मीं कित्येक दिवसांपासून सोडून दिलें आहे. युद्धांत विजय मिळविण्यासाठीं गनिमी काव्याचा अवलंब करावा लागतो, तसाच शांततेसाठींहि लागतो. अमेरिकेशीं स्नेह व्हावा ही माझी इच्छा होती. पण स्टॅलिननें आमंत्रण दिलें तर मी मॉस्कोलाहि जाईन! शांततेसाठीं योजायचा गनिमी कावा म्हणजे समजूतदारपणाचा मार्ग. एका वर्गानें दुसऱ्या वर्गाकडे स्नेहार्द्र दृष्टीनें पाहून बौद्धिक व मानसशास्त्रीय मार्ग चोखाळला पाहिजे. ॲटम बॉंबचें भय कोणाला? गांधीजींच्या मार्गानें गेलांत तर ॲटम बॉंबबद्दल भय बाळगायचें कारणच नाहीं."

पंडित नेहरूंचें हें उदात्त वक्तव्य म्हणजे शांतता व समता यांवर आधारलेल्या उद्यांच्या जगाचें मानचित्रच ( Blue print ) नव्हे काय? आपल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय धोरणाची स्पष्ट कल्पना यांत त्यांनीं दिलेली आहे. आंतबाहेर असें कांहीं नाहीं. हिंदी पंतप्रधान, आशियाचा नेता आणि गांधीजींचा वारस या आपल्या तीनहि भूमिकांची जबाबदारी नेहरूंनीं या मानचित्रांत संभाळलेली आहे; आणि विशेष कौतुकाची गोष्ट म्हणजे ती जबाबदारी संभाळण्यांत प्रयत्न नाहीं, तर सहजतेचा डौल आहे. जवाहरलालना या सर्व उदात्त गोष्टी सांगण्या-

साठीं कांहीं मुद्दाम आव आणण्याचें प्रयोजनच काय ? लोकांपुढें प्रकाश धरण्यासाठीं सूर्याला का मुद्दाम मशाल पेटवावी लागते ?

अमेरिकेंत ' विद्वान् राजकारणी ' यापासून ' जगाचा नागरिक ' अशीं अगणित विशेषणें पंडितजींच्या गौरवासाठीं वापरण्यांत आलीं, आणि तीं सार्थहि होतीं. तथापि ठिकठिकाणीं ' गांधीतत्त्वज्ञानाचा प्रचारक ' हें जें बिरुदच त्यांना विशेष आस्थेनें लावण्यांत येई त्याचें महत्त्व मला विशेष वाटतें. बुद्धाला ज्या बोधिवृक्षाखालीं साक्षात्कार झाला, त्याची एक एक फांदी मोडून सम्राट् अशोकानें ती अनेक देशांत पाठविली आणि समारंभपूर्वक त्या फांद्यांवर तेथें सुंदर स्तूप व विहार उभारले. हिंदुस्थानांत जन्मलेलें अहिंसावादाचें तत्त्वज्ञान अशोकानें याप्रमाणें आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत सर्व दूर नेलें. गांधीतत्त्वज्ञानाचे बाबतींत पंडित नेहरू तेंच कार्य आज करीत आहेत. मात्र, गांधीवादाला सांप्रदायिकतेच्या वर्तुळांत त्यांनीं ठेवलेलें नाहीं, तर विशाल केलें आहे. गांधीवादांतलें सामर्थ्य व सौंदर्य त्यांनीं लोकांना अधिक पटेल असें सुबोध व सहजगम्य बनविलें आहे. पंडितजींच्या अंगची ओतप्रोत व बावनकशी माणुसकी आणि प्रांजलता यांमुळेंच हें कार्य त्यांना घटपटाची खटपट न करतां साधलें. त्यांच्या ध्येयसृष्टींत बांधणीचा नवीनपणा खास आहे. पण गांधीजींच्या ध्येयवादांतली बरीच सामुग्री आपणांला त्यांच्या या रचनेंत दिसते.

मात्र, आपण अपूर्णतेंतून पूर्णतेकडे जात आहोंत आणि म्हणूनच कित्येक विरोधाभास आपणांला पत्करावे लागतात ही वास्तव दृष्टीहि पंडितजींना आहे. गांधीप्रणीत अहिंसेचा जयजयकार करणारे आमचे पंतप्रधान पुणें येथें लष्करी विद्यापीठाच्या इमारतीची कोनशिला बसवितात आणि त्या वेळीं सांगतात कीं, " हिंदुस्थानांतली प्रत्येक गोष्ट पहिल्या दर्जाची पाहिजे असें मी म्हणतों. लष्करी शिक्षणहि याला अपवाद नाहीं. " ध्येय व व्यवहार यांत नाइलाजानें स्वीकाराव्या लागणाऱ्या या विसंगतीची जाणीव सर्वांपेक्षां नेहरूंना अधिक आहे. या विसंगतीवर कांहींसा उताराहि त्यांनीं योजून ठेविला होता असें दिसतें. या लष्करी विद्यापीठाला " सामरिक विद्यापीठ " न म्हणतां " संरक्षण-विद्यापीठ " म्हणावें असें नेहरूंनीं ठरविलें. या दोन नांवांतील अर्थाच्या छटांत केव्हांहि मोठाच फरक आहे. " संरक्षण-विद्यापीठ " या नांवानें सूचित होणारी कल्पना

अहिंसेला जरा जवळ आहे. वर निर्देशिलेल्या समारंभाच्या वेळींच पंडितजींनीं सनिकांना उद्देशून असें म्हटलें कीं, "लष्करी शिक्षणाबरोबरच जनसेवेची दीक्षाहि सैनिकांनीं घ्यावी. आसामांत खेडेगांवीं सुटीसाठीं आलेल्या सैनिकांनीं गांवकऱ्यांना व शेतकऱ्यांना मदत केली हें उदाहरण तुम्ही डोळ्यांपुढें ठेवा." पण असा कांहीं उतारा योजून व आक्रमण नव्हे तर आर्तत्राण हेंच आपलें ध्येय असलें पाहिजे असें सांगूनहि, अहिंसेच्या शुद्ध आदर्शाला लष्कर ही गोष्ट विसंगतच आहे असें नेहरूंनीं प्रांजलपणें सांगितलें. नेहरूंच्या या भाषणावर कुठें कुणीं कडाडून हल्ले केले असें दिसलें नाहीं. पण नेहरूंच्या वरील भाषणांत व त्यांच्या अहिंसेवरील श्रद्धेंत विसंगति असल्याची टीका होत आहे अशा कल्पनेनें एका पूज्य गांधीवादी आचार्यांनीं नेहरूंची कैफियत देण्याचा प्रयत्न केला. ह्या प्रयत्नाची कांहीं गरज नव्हती असें सिद्ध करून महाराष्ट्रांतील एक चिंतनशील समीक्षाकार प्रा. श्रीकृष्ण के. क्षीरसागर यांनीं 'लष्कर व अहिंसा' यावर आपल्या नेहमींच्या उत्कृष्ट शैलीनें कांहीं विचार प्रदर्शित केले आहेत :

"आजच्या राज्यकर्त्यांना अहिंसेपेक्षां प्रांजलपणानेंच गांधीवादाच्या अधिक जवळ पोंचतां येईल. पाकिस्तानी लोक आणि कम्युनिस्ट लोक यांनीं वेढलेल्या नूतनजात राष्ट्राच्या जीवनमरणाचा प्रश्न सोडवीत असतांहि, प्रत्यक्ष लष्करासमोर प्रांजल भाषण करण्यांत नेहरूंनीं गांधी-वादाचेंच पालन केलें यांत शंका नाहीं. स्वतःचा दोष मान्य करणें म्हणजे तो अर्धाअधिक निर्मूल करणें होय, अशा अर्थाचें **मार्क्सचा गुरु हेगेल** याचें एक वचन आहे ( To know a defect is already to overcome it ). हिंदी लष्करांतील उमदे जवान आणि बहादुर अधिकारी नेहरूंच्या या निर्भय मनमोकळेपणाचें निःसंशय कौतुकच करतील... **ॲरिस्टॉटल** यानें आपल्या नीतिशास्त्रांत मनाच्या मोठेपणाला ( Magnanimity ) सर्व गुणांच्या शिरोभागीं बसविलें आहे. धैर्य, शौर्य, शिस्त यांच्या पोटीं हा गुण जितका लवकर निपजेल तितका पापभीरु अहिंसेच्या पोटीं निपजणार नाहीं ! ... अहिंसा हा पहिला गुण नसून शेवटचा गुण आहे. शौर्य, धैर्य, शिस्त, राष्ट्रवाद, आंतरराष्ट्रवाद, यंत्रदास्याला विरोध, द्रव्यदास्याला विरोध हे गुण असल्याखेरीज अहिंसेच्या जपाला अर्थ नाहीं.

वरील सर्व गुण नेहरू आणि लष्कर यांच्या अंगीं कर्मठ गांधीवाद्यांहून अधिक आहेत. " *

प्रा. क्षीरसागर यांनीं वरील उताऱ्यांत जें सांगितलें आहे व सूचित केलें आहे, तें पुरेसें स्पष्ट व बिनतोड आहे असें माझ्याप्रमाणेंच इतरांनाहि वाटेल.

महाभारताच्या शेवटीं एक उदात्तरम्य गोष्ट आहे. वनांत राहणाऱ्या आपल्या आप्तांना भेटायला श्रीकृष्ण गेले असतां त्यांनीं महात्मा विदुर कुठें आहे अशी चौकशी केली. त्या वेळीं तो कुठें तरी एकीकडे राहून योगसाधन करीत असतो, अशी वार्ता त्यांना कळली. आप्तांची भेट घेऊन ते परत जायला निघाले, तोंच विदेही स्थितींत हिंडणारा भक्तराज विदुर समोरून आला. श्रीकृष्णांना पाहतांच त्या महात्म्याचें हृदय प्रेमभरानें उचंबळून आलें. तो धांवतच श्रीकृष्णापुढें येऊन उभा राहिला. त्यानें श्रीकृष्णाकडे पाहिलें तोंच त्याच्या तोंडांतून एक ज्योत निघून श्रीकृष्णाचे शरिरांत शिरली! विदुर गतप्राण होऊन पडला आणि भगवान् श्रीकृष्ण अधिक कांतिमान् दिसूं लागले. महात्मा गांधीजींचें दिव्य तत्त्वज्ञान त्यांच्या जीवनांतून निघून अशाच रीतीनें पंडितजींच्या जीवनांत प्रविष्ट झालें आहे असें मला वाटतें; त्यामुळें पंडितजींचीं भाषणें व वागणूक पूर्वीपेक्षांहि आज अधिक तेजस्वी वाटते. आणि म्हणून जगत्प्रलयाला बांध घालून माणुसकी व मानवी संस्कृति वांचविण्याचें विश्वकार्य त्यांनीं करावें असें जगाला वाटूं लागलें आहे.

" सर्वांना समान संधि आणि न्याय, सर्व वर्गभेदांचा निरास, माणसांची भौतिक व सांस्कृतिक पातळी वाढावी यासाठीं संघटित व योजनाबद्ध समाजरचना, सहकार्य, निःस्वार्थता, सेवाभाव, सदिच्छा, प्रेम व सद्भावना या आत्मिक गुणांचा विकास करणारें वातावरण—अशी जगाची पुनर्घटना करणें हें आमचें ध्येय आहे. "

जगाच्या आदर्श स्थितीबद्दलचें नेहरूंचें हें स्वप्न आहे. आजवर या स्वप्नांच्या प्रचारासाठीं त्यांनीं वाणीनें, लेखणीनें, आचरणानें अविश्रांत श्रम केले. आज नेहरूंच्या जीवनांत अशी एक अवस्था आली आहे कीं, आपलें आदर्श जगाचें

---

* ' लोकसत्ता ' ( सुखसंवाद १४ )

स्वप्न साकार करण्याचें सामर्थ्य इतिहासानें त्यांच्यापुढें केलें आहे. त्यांच्या अवतारकार्याचें मंदिर शिखरापर्यंत पुरें झालें. आतां त्यावर कळस चढण्याचा योग येणार आहे. तो साधणें न साधणें पंडितजींच्या हातीं आहे.

तें साधण्यासाठीं भारत, आशिया आणि जग अशा तीनहि क्षेत्रांत पंडितजींना वेगवेगळ्या पद्धतीनें झगडावें लागणार आहे. भारतांत पंडितजी व्यक्तिशः जनतेचे पंचप्राण आहेत. पण त्यांचें सरकार त्यांच्या तोलाचें नाहीं. ज्या काँग्रेस संस्थेतून ते उदयाला आले तीहि स्वातंत्र्यपूर्वकाळांत होती तेवढी भक्कम राहिलेली नाहीं; तिच्यांतील क्रांतिशक्ति एकामागून एक अशा तीमधून बाहेर पडत आहेत आणि पूर्वी तिच्या वाइटावर असलेल्या प्रतिगामी शक्ति तिच्यांत दाटी करूं लागल्या आहेत! भांडवलशाहीनें चालविलेल्या स्वार्थी कारवायांनीं गांजलेली जनता अगदीं कावून गेली आहे. स्वातंत्र्य मिळालें कीं सर्व आबादी-आबाद होईल अशी तिची अपेक्षा सर्वस्वी ढांसळली आहे. याचा दुष्परिणाम विध्वंसक वृत्तीचे व हिंस्र पंथाचे लोक तिचा कबजा घेण्यांत होईल कीं काय न कळे! काळाबाजार, लांचलुचपत, वशिलेबाजी ही तर थांबत नाहीं आणि गुप्त रीतीनें नांदणाऱ्या शांतिविरोधी शक्ति तर दक्षतेनें याचा फायदा घेण्यास टपल्या आहेत. अशा वेळीं क्रमविकास पद्धतीनें व शांततेच्या मार्गानें लोकशाहीचा पूर्णावतार व्हावा असें सांगणाऱ्या लोकांचा आक्रोश फोलच नाहीं का? त्यांचें म्हणणें अरण्यरुदनवत् ठरायचें नसेल आणि नेहरूंना आपलें भारताचें स्वप्न सत्यसृष्टींत आणावयाचें असेल तर काँग्रेसमध्यें, सरकारांत व समाजांत गुप्त वा प्रकट वावरणाऱ्या अस्सल प्रतिगामी व दिखाऊ पुरोगामी शक्तींशीं निकरानें झुंज दिली पाहिजे. त्या एकमेकांवर पोसत आहेत. भांडवलशाही बळावली कीं कम्युनिस्ट फोफावतात; आणि दोघांच्या लढतींत जनता भयग्रस्त होऊन मानवी मूल्यें झांकळून जातात. आशिया खंडांत थोड्याफार अंशानें हीच स्थिति आहे. तेथेंहि पंडितजींना ठिकठिकाणच्या लोकसत्ताप्रेमी संघटनांनाच साह्य द्यावें लागेल. जगाच्या राजकारणांत प्रभुत्व मिळवूं पाहणाऱ्या दोन गटांपैकीं कुठल्याहि गटाशीं समरस न होण्याचें पंडितजींचें धोरण निःसंशय शहाणपणाचें आहे. पण त्या धोरणाचें पालन काटेकोर रीतीनें होण्यास भारत समर्थ झाला पाहिजे. एका अवस्थेचें कवच फोडून पंडितजी बाहेर आले तर यशस्वितेनें ते हें कार्य साधूं शकतील.

—आणि या कार्यांत त्यांना जनतेचें पाठबळ केवढ्या प्रचंड प्रमाणांत मिळणें शक्य आहे! पंडितजी विश्वशांतीचा व माणुसकीचा जो ध्येयवाद सांगतात तो जगांतील राजकीय सत्ताधाऱ्यांना व पंथाभिमानी चळवळ्यांना पटत नाहीं; आणि हे सत्ताधारी आणि चळवळे लोकच या ध्येयवादाच्या पूर्तीच्या आड येत आहेत. जनता बिचारी सारें पटत असलें तरी अकर्ती होत आहे! आपल्या हिताचें पाहणारा सत्त्वगुणसंपन्न नेता म्हणून नेहरूंचा जयजयकार करावयाचा एवढेंच ती पाहते. पण नेहरूंनीं आपला ध्येयवाद आणि जनता यांना चार कोस दूर ठेवणाऱ्या सत्ताधाऱ्यांना व चळवळ्यांना तृणवत् लेखून आपल्यावर म्हणजेच आपल्या ध्येयवादावर प्रेम करणाऱ्या जनतेला अधिक जवळ केलें तर जनतेतल्या प्रत्येक घटकाला हजार नागांचें बळ येईल, नेहरूंचें ध्येयस्वप्न साकार होईल, माणुसकीची प्रतिष्ठा राहील, आणि नोहानें जगत्प्रलयांतून प्राणिमात्राला आपल्या होडींत भरून वांचविलें त्याप्रमाणें नेहरूंनीं मानवता व माणुसकी यांचें परित्राण केलें असा त्यांचा लौकिक यावच्चंद्रदिवाकरौ दुमदुमत राहील.

'पंडित जवाहरलाल नेहरू' हें सुंदर नांव उच्चारतांच अष्ट सात्त्विक भाव मनांत गर्दी करूं लागतात. विविध गुणांच्या दोन प्रवाहांच्या प्रयागतीर्थावर अंतःकरण जाऊन थांबतें. मानवतेच्या सरोवरांत असें सुवर्णकमळ क्वचितच विकसित होतें. शौर्य, त्याग, ज्ञानसंपन्नता, प्रांजलता, ध्येयदृष्टि, सुसंस्कृतता इ० या कमळाच्या पाकळ्या आहेत. एकेक पाकळी एकेकीहून सुंदर पण एक दुसरीला शोभेशी अशी आहे; आणि माणुसकीचा सुगंध त्यांतून चहूंकडे दरवळत आहे. चर्मचक्षु आणि अंतश्चक्षु या दोघांनाहि आल्हाद देणारें हें कमळ आज पूर्ण विकसित झालें आहे. या कमळाचा सुगंध रसिकतेनें जग घेऊं शकतें. यांतच मला जगाच्या उद्धाराची आशा वाटते. प्रियतम पंडितजी, तुमच्याविषयीं वाटणारें अपार प्रेम वर्णन करायला आमचे शब्द अपुरे पडतील.

**"वेद जेणें सुभाष। सुख जेणें सोल्हास।**
**हें असो रूपस। विश्व जेणें॥"**

ही आमच्या 'योगियांच्या राजा'ची वाणीच आम्हांला तुमच्याबद्दल काय वाटतें तें सांगूं शकेल! आजवर तयार झालेल्या भव्य कीर्तिमंदिरावर कळस

चढविण्याची महापर्वणी आज चालून आली आहे. ती साधण्यासाठीं परमेश्वरानें आपणांला सामर्थ्य व आयुरारोग्य यावें अशी तुमच्या हीरकमहोत्सवाचे वेळीं जग प्रार्थना करति आहे. आज दुःखदग्ध झालेल्या जगाचें ' **आनंदभुवन** ' करणें तुमच्या हातीं आहे. तें विश्वकार्य तुम्हीं साधलें म्हणजे माणसेंच काय, देवगंधर्वहि तुमच्यावर पुष्पवृष्टि करतील. तो सोन्याचा दिवस लौकर उगवो !

**जय जय जय हे जय राजेश्वर**
**भारतभाग्यविधाता !**

# परिशिष्ट

## शांतिकार्य आणि नवभारतरचना

१४ नोव्हेंबर १९४९ रोजीं अमेरिकेचें देवदुर्लभ स्वागत व सत्कार घेऊन पंडित नेहरू भारताला परतले त्या वेळीं हीरकमहोत्सवासाठीं सारें भारत आतुरतेनें त्यांची वाट पाहात होतें. मुंबईच्या विमानतळावर त्यांनीं विमानांतून पाय ठेवल्यापासून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला. पंडितजींनीं आपल्या अलौकिक जीवनाचीं साठ वर्षें पुरीं केलीं. केवढें कार्य, केवढा त्याग, केवढी कृतार्थता! पण जीवनाची चढती कमान याहि उत्सवानें खालीं आलेली नाहीं. ती अजून चढत आहे. पं. नेहरूंनीं आपल्या लोकप्रियतेचा विक्रम आपणच मोडला आहे. तें इतर कुणाला शक्यच नाहीं.

परदेशांतल्या स्वागत-सत्काराचेंच पाहा. अमेरिकेनें पंडितजींचें स्वागत केलें तेव्हां कांहीं टीकाकार कुत्सितपणें असें म्हणाले, " अमेरिका हा भांडवलशाही देश आहे आणि भांडवलशाही समाजरचनेचे पंडितजी कट्टे वैरी आहेत असें नाहीं. निदान त्यांनीं तसें होऊं नये या मतलबानें अमेरिकेनें त्यांचा अफाट गौरव केला आणि त्यांना अंकित करून टाकलें. " पण ह्या टीकेचा फोलपणा पंडित नेहरूंनीं पुढें लगोलग आपल्या प्रगतिपर कृतींनीं सिद्धच केला. कोरिया किंवा फ्रेंच इंडोचायना येथील लढ्यांत व नवचीनच्या संयुक्त राष्ट्र-संघ प्रवेशाच्या प्रकरणीं पंडितजींनीं अमेरिकेच्या विरुद्ध ठाण मांडलें; आणि आशियांत अमेरिकेच्या राजकारणाचें वर्चस्व बांडुग परिषदेनें त्यांनीं साफ मोडून काढलें.

पण यापेक्षां अमेरिकन-धार्जिणेपणाच्या त्यांच्यावरील आरोपाला चोख उत्तर कशानें मिळालें असेल तर चीन व रशिया येथें त्यांचा सरकार व जनता यांनीं

जो अपूर्व व स्वयंस्फूर्त गौरव केला त्यामुळें. १९५४ मध्यें त्यांनीं चीनमध्यें १२ दिवसांचा दौरा काढला होता. चीनचे क्रांतिनेते अध्यक्ष माओ–त्सेतुंग यांची आणि पंडितजींची मुलाखत झाली ती जगाच्या दृष्टीनें ऐतिहासिक महत्त्वाची होती असें एका प्रख्यात ब्रिटिश पत्रानें वर्णन केलें आहे. सरकारी सरंजाम पंडितजींच्या स्वागतास असेल यांत नवलच नाहीं. कारण चीन सरकारचे ते पाहुणेच होते. पण आबालवृद्ध स्त्री-पुरुषांचे प्रचंड समुदायहि पंडितजींच्या स्वागतास व त्यांचें दर्शन घेण्यास वेडे होऊन येत. रशियांत नुकतेच ते गेले होते. पंडितजींच्या स्तुतिपर ‘ प्रवदा ’ नें लिहिलेल्या लेखांत ‘ असामान्य नेता ’ म्हणून त्यांचा गौरव केला होता. रशियाच्या कानाकोपऱ्यांत ते गेले. १५ दिवसांच्या मुक्कामांत त्यांनीं १० हजार मैल प्रवास केला. तैमूरच्या थडग्यापासून अणुशक्ति केंद्रापर्यंत जुन्या नव्या महत्त्वाच्या ठिकाणांना भेटी दिल्या. क्रेमलिनमध्यें सोव्हिएट नेत्यांबरोबर पंडितजींनीं जितक्या उत्साहानें बादशाही खाना घेतला तितक्याच उत्साहानें ताश्कंद वगैरे ठिकाणीं शेतकऱ्यांच्या झोंपड्यांत जाऊन त्यांच्यासमवेत भोजन केलें. समरकंद शहरांत नेहरू-स्वागतासाठीं सारें शहर लोटलें. समुद्रस्नानाची पर्वणी सोडून नेहरूंच्या दर्शनास लोक धांवले. मॉस्को येथें त्यांचा सत्कार व जाहीर भाषण झालें त्या वेळीं १० लाख लोकांची विराट् सभा जमली होती ! रशियांत सोव्हिएट राज्य प्रस्थापित झाल्यापासून कुठल्याहि परकीय नेत्याचा एवढ्या प्रमाणावर व इतक्या जिव्हाळ्यानें सत्कार झाला नव्हता.

पंडितजींचें हें जें स्वागत सर्व जगभर होत आहे त्याला त्यांचें वैयक्तिक आकर्षण व विभूतिमत्त्व हें तर कारण आहेच, पण पंडितजींनीं जी आज शांतता-वादाची भूमिका घेतली आहे तीमध्यें या लोकप्रियतेचें खरें रहस्य सांपडेल. दरवडेखोरहि देवाची भाषा बोलतात. राजकारणांत तर ‘ ओठीं एक आणि पोटीं एक ’ हा नियमच असतो. युद्धखोर राष्ट्रांच्या नेत्याचे तोंडीं ‘ शांतिरस्तु पुष्टिरस्तु ’ हाच मंत्र आहे. पण पंडित जवाहरलाल नेहरू हे एकच असे राष्ट्रधुरीण आहेत कीं, ज्यांचा शांततावाद अंतःकरणापासून आहे अशी जगाच्या शांतता-वादी लोकांना खात्री पटली आहे. भारताएवढें प्रचंड राष्ट्र या प्रांजल नेत्यानें जर शांततेच्या कारणीं लावलें तर तिसरें महायुद्ध खात्रीनेंच होणार नाहीं असा विश्वास सर्वांना वाटतो. पंडितजी आज इतिहासाचे एक प्रमुख शिल्पकार झाले

आहेत ते या अर्थानें आणि म्हणूनच शांततेसाठीं आसुसलेलें जग आज पं. नेहरूंच्या व्यक्तित्वानें भारलें गेलें आहे.

यंदां राजकारणाच्या क्षेत्रांत ‘ पंचशिला ’ तत्त्वाचा जयजयकार चालू आहे. मॉस्को येथें सोव्हिएट नेत्यांबरोबर काढलेल्या संयुक्त पत्रकांतहि या तत्त्वाला पंडितजींनीं प्रतिष्ठा मिळवून दिली. इंडोनेशियांत बांडुग येथें १८ एप्रिल १९५५ ला जी परिषद् भरली तींत या तत्त्वाला आशिया-आफ्रिका या दोन महान् खंडांतील सुमारें ३० राष्ट्रांची मान्यता मिळाली. या राष्ट्रांत भारताबरोबर पाक, ईजिप्त, इंडोनेशिया, ब्रह्मदेश, चीन, व्हिएटनाम इ. प्रमुख उदयोन्मुख देश असल्यानें आतां हें उदात्त तत्त्व म्हणजे नुसती दुर्बळ सदिच्छा राहिलेली नाहीं. या परिषदेचे यजमान इंडोनेशिया हें राष्ट्र असलें तरी प्रवर्तक व सूत्रधार पं. जवाहरलालच होते. ईजिप्तचे राष्ट्रधुरीण नासर यांनीं ही परिषद् संपल्यावर पंडितजींना धन्यवाद देतांना याच अर्थाचे उद्गार काढले. या परिषदेची कल्पना प्रथम कोलंबो येथील लहान परिषदेंत जन्म पावली. कोलंबो परिषदेंत सिलोन, भारत, ब्रह्मदेश, पाकिस्तान आणि इंडोनेशिया यांच्या मुख्य प्रधानांनीं भाग घेतला होता. आशिया खंड आणि सुधारलेलीं पाश्चात्य राष्ट्रें यांच्यांत एक रुंद दरी आहे. आशियाचे कांहीं खास प्रश्न आहेत आणि ते सोडविण्याचे पाश्चात्यांचे मार्ग हितावह नाहींत. आशियानें स्वतंत्र संघटना करूनच आपले प्रश्न सोडविले पाहिजेत. कारण अविकसित देशांना विकसित देशांचें प्रगतितंत्र कसें उपयोगीं पडणार ? हा विचार आज आकाराला आला असला तरी पंडितजींनीं फार पूर्वींपासून या प्रकारचें प्रतिपादन केलें होतें. भारत स्वतंत्र झाल्यानंतर लगेच दिल्ली येथें आशिआई परिषद् भरली होती आणि तींत या विचाराला विशेष जोरानें चालना मिळाली.

इंडोनेशियाच्या राजचिन्हावर गरुडाच्या खालीं चौकटींत पांच चिन्हें रेखाटलेलीं असतात. तारका, रेड्याचीं शिंगें, वटवृक्ष, धान्य आणि सांखळी. या पांच चिन्हांनीं चिकाटी, सामर्थ्य, संरक्षण, कल्याण आणि ऐक्य ह्या पांच गोष्टी सूचित केल्या आहेत. इंडोनेशियांत या चिन्हांना ‘ पंचशिला ’ म्हणतात. ‘ पंचशीला ’ असा शब्द अधिक बरोबर ठरेल. इंडोनेशियांतच बांडुग परिषद् भरली म्हणून त्या परिषदेंत प्रवर्तित झालेल्या पांच तत्त्वांना ‘ पंचशिला ’ असें संबोधण्यांत आलें. हीं पांच तत्त्वें आतां जगविख्यात झालीं आहेत :—

( १ ) सर्व राष्ट्रांनीं एकमेकांचें सार्वभौमत्व मान्य करणें.

( २ ) प्रत्येक राष्ट्राला स्वातंत्र्य व स्वायत्तता आहे.

( ३ ) एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण न करतां समानतेच्या भूमिकेवरून एकमेकांचा मान राखला पाहिजे.

( ४ ) कोणत्याहि राष्ट्राच्या अंतर्गत राज्यकारभारांत दुसऱ्या कुठल्याहि राष्ट्रानें हात घालूं नये.

( ५ ) शांततापूर्ण सहवास्तव्याला पोषक असें वातावरण व वृत्ति वाढीला लावणें.

हीं तत्त्वें बाह्यतः पांच दिसत असलीं तरी त्यांचा गाभा एकच आहे आणि तो म्हणजे 'जगा व जगूं द्या' हा उदारमतवादी मंत्र होय. पं. नेहरूंसारख्या अहिंसावादी परंपरेंत वाढलेल्या सत्त्वगुणी नेत्यानें हें 'पंचशिला' तत्त्व उचलून धरावें हें उचितच नव्हे काय ? इतरांच्या स्वार्थी व हिंस्र वृत्तीनें या तत्त्वाची कुठें पायमल्ली झाली किंवा होत असली तरी पंडितजींच्या या तत्त्वावरील श्रद्धेबद्दल जगांत कुणालाहि संशय नाहीं. पंडितजींना आज 'शांतिदूत' म्हणून जग गौरवीत आहे.

आपल्या विधायक कल्पनांना साकार करण्याचें पंडितजींच्या हातांतलें फार मोठें साधन म्हणजे काँग्रेस ही सर्वश्रेष्ठ संस्था. मेघ आणि सागर हे जसे एकमेकांना जीवन देतात, त्याप्रमाणें पंडितजींनीं काँग्रेसला आणि काँग्रेसनें पंडितजींना सतत बळ दिलें आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९५१, १९५३ आणि १९५४ याप्रमाणें तीन वेळां दिल्ली, हैद्राबाद आणि कल्याणी येथें त्यांना काँग्रेसचें अध्यक्षपद मिळालें. लोकसत्तेची चाड असल्यानेंच त्यांनीं हा मान कायम आपणांकडे येत असतां तो नाकारला आहे. पण अध्यक्ष कुणीहि असलें तरी काँग्रेसची स्फूर्ति, उत्साह व चैतन्य पंडितजीच आहेत ही गोष्ट निर्विवाद. १९२९ सालीं लाहोर येथें काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून त्यांनीं आपण समाजवादी आहों ही घोषणा केली आणि आतां आवडीच्या अधिवेशनांत खुद्द काँग्रेसलाच समाजवादी तत्त्वाची दीक्षा त्यांनीं दिली. एवढ्या अवधींत रक्तमय क्रांतीचा मार्ग टाकून लोकांची मनोभूमिका समाजवादी समाजरचनेला अनुकूल करण्यासाठीं पंडितजींनीं वाणीनें व कृतीनें अविश्रांत प्रचार केला. काँग्रेस संस्थेची अवाढव्य वाढ हें तिचें जसें बळ तसेंच दौर्बल्यहि आहे. अनेक जागीं गटबाजी, असंतोष,

कारस्थानें चाललेलीं पण पंडितजींचें व्यक्तिमत्त्व इतकें प्रभावी आणि त्यांचें संघटनाचातुर्य इतकें विलक्षण कीं, पंजाब, पेप्सु, त्रावणकोर इ. अनेक जागीं एकीला तडे जाऊनहि या संस्थेचें अभंगत्व पुष्कळसें कायम राहिलें आहे. विरोधी पक्ष व तत्त्वज्ञानें यांचे इतके रट्टे बसत असून काँग्रेसचें महत्त्व कमी झालेलें नाहीं.

काँग्रेस या लोकसंस्थेचे पंडितजी जसे धुरीण आहेत त्याप्रमाणें सरकारचे अभिषिक्त नेते तेच आहेत. भारतीय राज्यशासनांत पाहिजे तेवढी कार्यक्षमता अजून आली नसेल किंवा कित्येक ठिकाणीं पडलेलीं भगदाडें विशेष श्लाघ्य नसतील, पण भारत सरकारच्या कट्टया विरोधकालाहि हें कबूल करावें लागेल कीं, आशियांतल्या अनेक उद्योन्मुख राष्ट्रांपेक्षां भारताचें सरकार अधिक स्थिर व अधिक प्रगतिपर आहे आणि लोकशाहीची पुष्कळच बाजू त्यानें राखलेली आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सारेंच काम इतकें मागासलेलें होतें कीं, नवी लोकसत्ताक राज्यघटना न करतां नेत्यांनीं जरी राज्यकारभार तसाच रेटला असता तरी जनतेनें कांहीं म्हटलें नसतें. पण पंडित नेहरू हे हाडाचे लोकसत्तावादी. त्यांनीं मिळालेल्या सत्तेला लोकमान्यतेचा भक्कम पाया मिळावा यासाठीं लगेच घटनासमितीची उभारणी केली. डॉ. राजेन्द्र-प्रसाद हे अध्यक्ष होते. राज्यघटना तयार करण्याचें काम डॉ. आंबेडकरांकडे सोंपविण्यांत आलें. सुमारें तीन वर्षें हें काम चाललें आणि ३९५ कलमांची विशाल, उदार व लोकमतानुवर्ती राज्यघटना तयार होऊन २६ जानेवारी १९५० रोजीं तिचा अंमल या देशांत सुरू झाला. डॉ. राजेन्द्रप्रसादांसारखे अजातशत्रु व चारित्र्यसंपन्न अध्यक्ष लाभल्यानें भारताची उज्ज्वल परंपरा पुनः नव्या तेजानें झळाळत आहे असा भास झाला. या घटनेप्रमाणें लौकरच निवडणुकी झाल्या. हा जगाच्या इतिहासांत एक नवा प्रयोग होता; कारण प्रौढ मतदानानें एवढ्या प्रचंड प्रमाणावर होणारी ही पहिलीच निवडणूक होती. १६ कोटि लोकांनीं मतदान केलें. पण सारीं कामें इतकीं बिनचूक व बिनबोभाट पार पडलीं कीं, या बाल्यावस्थेंतल्या राष्ट्रानें हा विक्रम कसा केला याचें साश्चर्य कौतुकच पुढार-लेल्या राष्ट्रांनीं केलें. निवडणुकींचे मुख्याधिकारी श्री. सुकुमार सेन यांना आतां इतर राष्ट्रांकडून नव्या निवडणुकीचा मांड मांडून देण्यासाठीं बोलावणीं येऊं

अनुक्रम
: आनंदभुवन
क्रमांक
ग्रंथालय

लागलीं. केवढा हा भारताचा मान! या निवडणुकींत अधिकारी मंडळी दक्षतेनें वागली आणि जनतेनें शिस्त राखली. पंडितजींनीं साऱ्या भारतांत तुफान दौरा काढून काँग्रेसचें ध्येय व राज्यघटना समजावून सांगितली. काँग्रेसपक्ष पुनः सत्तारूढ झाला. याच श्रेयाचा कांहीं अंश त्या पक्षाच्या पूर्वपुण्याईकडे जात असला तरी पंडितजींच्या लोकोत्तर व्यक्तिमत्त्वाला आणि तुफानी प्रचारालाच या श्रेयाचा जास्तींत जास्त वांटा जाईल हें खास.

पंडितजी हे नुसते जलाल प्रचारक किंवा खंदे लढवय्ये नाहींत; ते स्वप्नदर्शी आहेत याचा प्रत्यय आज भारताच्या विकासांत सहज येण्यासारखा आहे. पुणें व दिल्ली येथील रसायनशाळांप्रमाणें एकंदर चौदा संस्था भारतांत गेल्या सहा वर्षांत निर्माण करण्यांत आल्या. भाक्रा-नानगल, हिराकुड इ० धरणांचा प्रचंड व्याप; चित्तरंजनसारख्या कारखान्यांत होणारें एंजिनचें उत्पादन; विजगापट्टमचा बोटींचा कारखाना, पेनिसिलीन, तेलशुद्धि इ० कारखाने हे सर्व भारतांत नव्यानें उभे राहिले आहेत. याशिवाय एक पंचवार्षिक योजना संपूर्ण होऊन दुसरी वाट चालूं लागली आहे. या योजनांत साक्षरतेपासून डांबरी रस्त्यांपर्यंत अनेक लोकोपयोगी गोष्टी आल्या आहेत. पंडितजी जसे राजकारणी नेते तसे कलासक्त नागरिक आहेत. आपला देश विज्ञानांत जसा पुढें यावासा त्यांना वाटतो, त्याचप्रमाणें तो कला व क्रीडा या क्षेत्रांतहि चमकला पाहिजे अशी त्यांची उत्कट इच्छा आहे. आणि आज लोकनृत्य, लोकनाट्य, चित्रपटविषयक पारितोषिकें, संगीताचे राष्ट्रीय कार्यक्रम, युवक महोत्सव, साहित्य अकादमी, शिष्टमंडळाची ये-जा इ० ज्या कलाविषयक व सांस्कृतिक उपक्रमांनीं आपला देश गजबजून गेला आहे त्यांना मूळ कारण पं. नेहरूंची स्फूर्ति व प्रकाश हाच होय हें कोण जाणत नाहीं? "विधायक योजनांचीं केंद्रें हीं मला तीर्थक्षेत्रें व मंदिरें वाटतात...आज काम हा तुमचा जीवनमंत्र ठरावा. 'आराम हराम है'" हीं सतत कानांवर पडणारीं पंडितजींचीं वचनें त्यांचें ध्येय व तत्त्वज्ञान विशद करण्यास पुरेशीं आहेत.

पण विकासाचा हा भव्य आराखडा पुढें दिसत असला तरी त्यांत रंग भरण्याचें काम अजून व्हायचेंच आहे. तसेंच, आशियांतील इतर बहुतेक राष्ट्रांच्या मानानें भारत प्रगतीच्या मार्गावर पुढें असला तरी पंडितजींच्या मार्गावर सारीं फुलेंच फुलें आहेत असें मानण्याचें कारण नाहीं. जातीयवाद हा भारताच्या

रोमरोमीं खिळलेला भयानक रोग मधूनच उसळी घेतो. भाषावर प्रांतरचनेनें स्फोटक परिस्थिति निर्माण केली आहे. ज्ञान आणि शिस्त यांत अजून पुष्कळ पल्ला गांठावयाचा आहे. भांडवलशाही आणि हुकूमशाही यांचीं सूक्ष्म आक्रमणें चालूं आहेतच. काश्मीरचें भिजत घोंगडें अजून वाळत नाहीं. सर्व क्षेत्रांत अजून पुरेशीं कार्यक्षम व नेकीचीं माणसें निर्माण झालेलीं नाहींत. 'माझ्या आतां राहिलेल्या थोड्या आयुर्मर्यादेंत भारत संपन्न झालेला व त्यामधून जातीयवादाचें उच्चाटन झालेलें मला पाह्यचें आहे.' असा एखादा उल्लेख पं. नेहरूंच्या भाषणांत येतो तेव्हां त्यांतली औदासिन्याची व विरक्तीची छाया कुणालाहि व्यथितच करते. तथापि, देशीविदेशी कोट्यवधि अंतःकरणें ज्याच्या आयुरारोग्याविषयीं परमेश्वराजवळ प्रार्थना करीत आहेत त्यांच्या हातून यांहूनहि थोर शिवकार्य पार पडणार आहे अशी आशा कां करूं नये !

१४-११-५५

नेहरू जयंति

---

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 30724
विभाग
क्रमांक 22 ९.५
नों. दि.

म. ग्रं. सं. ठाणे, मासिकमाळा शाखा,
वा. क्र. ६९७६
नों. दि.
वि. ...
IRBK-0106947
IRBK-0106947